S P E A K | R E A D | W R I T E



# माय मराठी ६
# My Marathi 6

सरावपुस्तक | PRACTICE BOOK FOR COMMUNICATIVE MARATHI




NIRUPAMA JOSHI
VAISHALI KARLEKAR



UNIVERSITY OF MUMBAI

RAJYA MARATHI VIKAS SANSTHA

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

निरुपमा जोशी / NIRUPAMA JOSHI
वैशाली कार्लेकर / VAISHALI KARLEKAR

# माय मराठी ६
# My Marathi 6

सरावपुस्तक / Practice Book for Communicative Marathi

**संपादक / EDITORS**
माधुरी पुरंदरे / MADHURI PURANDARE
सोनाली गुजर / SONALEE GUJAR
विभा सुराणा / VIBHA SURANA
संजय कृष्णाजी पाटील / SANJAY KRUSHNAJI PATIL

**संकल्पना, निर्मिती आणि प्रकाशन / CONCEPT, PRODUCTION & PUBLICATION**
जर्मन विभाग, मुंबई विद्यापीठ
Department of German, University of Mumbai

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
**RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI**

मुंबई विद्यापीठ
**UNIVERSITY OF MUMBAI**

**ISBN No.: 978-93-5407-517-9**

**FIRST EDITION 2022**
**पहिली आवृत्ती २०२२**

**क्रिएटिव्ह कॉमन्स ॲट्रिब्यूशन – शेअरअलाईक लायसन्स (CC BY-SA 4.0) ह्याअन्वये उपलब्ध**
**Published under Creative Commons Attribution – ShareAlike License (CC BY-SA 4.0)**

- **प्रकल्प समन्वयक / PROJECT CO-ORDINATOR**
  विभा सुराणा / VIBHA SURANA

- **लेखक / AUTHORS**
  निरुपमा जोशी / NIRUPAMA JOSHI
  वैशाली कार्लेकर / VAISHALI KARLEKAR

- **संपादक / EDITORS**
  माधुरी पुरंदरे / MADHURI PURANDARE
  सोनाली गुजर / SONALEE GUJAR
  विभा सुराणा / VIBHA SURANA
  संजय कृष्णाजी पाटील / SANJAY KRUSHNAJI PATIL

- **संपादकीय मंडळ / EDITORIAL TEAM**
  मेहेर भूत / MEHER BHOOT
  प्र. ना. परांजपे / P.N. PARANJPE
  गिरिषा टिळक / GIRISSHA TILAK

- **मराठीसाठी तांत्रिक साहाय्य / TECHNICAL SUPPORT FOR MARATHI**
  अभिजित रणदिवे / ABHIJEET RANADIVE
  गुरुनाथ कलमकर (मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ) / GURUNATH KALAMKAR (DEPARTMENT OF MARATHI, UNIVERSITY OF MUMBAI)

- **कला, मांडणी, चित्रे / छायाचित्रे / अक्षर जुळणी**
  **LAYOUT DESIGN / PHOTOS / TYPESETTING**
  नागेश सिरसाल / NAGESH SIRSAL
  गिरिषा टिळक / GIRISSHA TILAK
  सुभाष गोपाळे / SUBHASH GOPALE

- **प्रकाशन / PUBLICATION**
  मुंबई विद्यापीठ / UNIVERSITY OF MUMBAI
  राज्य मराठी विकास संस्था, मुंबई / RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI

- **ई-पत्ता / E-MAIL**
  rmvs_mumbai@yahoo.com

- **संकेतस्थळ / WEBSITE ADDRESS**
  https://www.learn-marathi.com, www.mu.ac.in
  rmvs.maharashtra.gov.in

Online access link: https://mu.ac.in/mymarathi6

**ORIENTATION BOOK AND PRACTICE BOOK ₹ 1250 | $ 25 | € 20**

# प्रस्तावना

'माय मराठी' अभ्यासक्रमाची ही सहावी आणि अंतिम पातळी आहे. या पातळीसाठी दोन पुस्तके तयार करण्यात आली आहेत. त्यांपैकी एक मार्गदर्शिका असून दुसरे सरावपुस्तक आहे. आधीच्या पाच पातळ्यांमध्ये विद्यार्थ्यांची मराठी भाषेच्या अध्ययनाची जी तयारी झालेली असणे अपेक्षित आहे, त्यापुढची ही पातळी असेल. साहजिकच ही पातळी आणि पर्यायाने हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर विद्यार्थ्यांना निजभाषकांप्रमाणे मराठीत व्यवहार करणे शक्य व्हावे ही अपेक्षा आहे. त्यामुळेच प्रस्तुत पुस्तके ही सहाव्या पातळीच्या परीक्षेची तयारी करण्यासाठी तयार केलेली मार्गदर्शक पुस्तके आहेत. शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी केवळ या पुस्तकांतील मजकुरावर अवलंबून न राहता, त्यांचा उपयोग भाषेची अपेक्षित पातळी गाठण्यासाठी नमुना म्हणून करणे अभिप्रेत आहे. सहाव्या पातळीच्या लेखन परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना निवडक दोन साहित्यकृती अभ्यासावयाच्या आहेत. उदाहरणादाखल या सरावपुस्तकात दिलेल्या नमुना प्रश्नपत्रिकांमध्ये प्रकाश आमटे यांच्या 'प्रकाशवाटा' व मिलिंद गुणाजी यांच्या 'अनवट : शब्द, सूर, डोंगरवाटा' या साहित्यकृती अभ्यासणे अपेक्षित आहे. परीक्षा घेणारे मंडळ प्रस्तुत साहित्यकृतींऐवजी अन्य साहित्यकृती निवडू शकते. मात्र निवडलेल्या साहित्यकृतींविषयीची माहिती वेळेत जाहीर करणे अपेक्षित आहे.

**मार्गदर्शिकेचा आराखडा**

या पुस्तकातील प्रत्येक पाठात त्याच्या विषयाला अनुसरून विविध पैलू मांडण्यात आले आहेत. त्यावर विद्यार्थ्यांनी आपापसात चर्चा करावी, साधकबाधक विचार करावा व आपले म्हणणे त्यांना मुद्देसूदपणे मांडता यावे यासाठी उपयोगी ठरतील, अशा स्वरूपाच्या उताऱ्यांचा यात समावेश केला आहे. यासाठी पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके, इंटरनेटवरील ब्लॉग्ज, मुलाखती इत्यादींचा तसेच ध्वनिफिती व दृश्यफितींचा वापर करण्यात आला आहे. मजकुराच्या आवश्यकतेनुसार संपादन करण्यात आले आहे. भाषिक कौशल्याबरोबरच वाचन, लेखन, श्रवण व संभाषण यांसंबंधी अंतिम परीक्षेच्या दृष्टीने उपयुक्त ठरतील अशा स्वरूपाचे प्रश्न येथे देण्यात आले आहेत.

**सरावपुस्तकाचा आराखडा**

सरावपुस्तकामध्ये विभाग अ आणि विभाग ब असे दोन विभाग आहेत.

विभाग अ

या विभागात प्रथम सहाव्या पातळीच्या परीक्षेचे स्वरूप स्पष्ट केले असून वाचन, लेखन, श्रवण व संभाषण यांवरील प्रश्न कसे सोडवावेत यासंबंधी विस्तृत मार्गदर्शन केले आहे. उपरोक्त प्रत्येक कौशल्याचा सराव व्हावा यासाठी परीक्षेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांच्या धर्तीवर काही उतारे व त्यांवरील प्रश्न येथे देण्यात आले आहेत.

विभाग ब

पहिल्या पाच पातळ्यांमध्ये विद्यार्थ्यांचे व्याकरणाचे अध्ययन झालेले आहे. ते विचारात घेऊन आतापर्यंत शिकलेल्या व्याकरणाची उजळणी होईल, अशा स्वरूपाचे सरावाचे प्रश्न येथे देण्यात आले आहेत.

सरावपुस्तकाच्या शेवटी दोन नमुना प्रश्नपत्रिका दिल्या आहेत.

या कामात बहुमोल साहाय्य करणाऱ्या राज्य मराठी विकास संस्थेचे अधिकारी आणि कर्मचारी यांचे, तसेच, कुलगुरू सुहास पेडणेकर आणि प्र-कुलगुरू रवींद्र कुलकर्णी यांच्या नेतृत्वासह कार्यतत्पर अशा मुंबई विद्यापीठातील अधिकाऱ्यांचे व हा प्रकल्प सुरळीत चालण्यासाठी साहाय्य करणाऱ्या सर्वांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

माधुरी पुरंदरे, सोनाली गुजर, विभा सुराणा आणि संजय कृष्णाजी पाटील
संपादक

# अनुक्रमणिका


| पाठ | शीर्षक | परीक्षेनुरूप प्रश्नप्रकार | उतारा | व्याकरण उजळणी व शब्दसंपदा | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| १ | शब्द शब्द जपून ठेव | वाचन<br>श्रवण<br>*अशोक केळकर* | उरलो विदा / डेटापुरता<br>आदेश<br>*अविनाश बिनीवाले* | काळांचे प्रकार<br>समानार्थी क्रियापदे<br>विभक्तिप्रत्यय - शब्दयोगी अव्यये जोडून वाक्य तयार करणे. - विधान, आज्ञार्थी, विध्यर्थी, संकेतार्थी वाक्ये -<br>एका क्रियापदाचे दोन अर्थ | ७ |
| २ | घे भरारी | वाचन<br>संभाषण | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण<br>*वसंत काळपांडे*<br>चित्तरकथा<br>*कौशल इनामदार* | 'जागे राहणे'चे विविध अर्थ<br>वाक्ये जोडणे<br>शब्दांच्या मदतीने उतारा<br>वाक्प्रचार<br>क्रियाविशेषणे | २२ |
| ३ | आस नित्य नव्याची | लेखन<br>संभाषण | औदुंबर कवितेचे रसग्रहण<br>*मो. रा. वाळंबे* | विशेषणांचे विविध प्रकार<br>वाक्प्रचार | ३७ |
| ४ | कोणे एके काळी | वाचन<br>लेखन | वाडा<br>*महेश एलकुंचवार*<br>भारतीय उत्सव<br>*माधवराव चितळे*<br>काळ : एक कल्पना<br>*श्री. बा. जोशी* | लेखनविषयक नियम<br>मुद्रितशोधन<br>वाक्प्रचार, म्हणी, शब्दार्थ<br>उभयान्वयी अव्यये, केवलप्रयोगी अव्यये<br>शब्दसमूहाबद्दल एक शब्द<br>अर्थ वेगळा पण सारख्याच भासणाऱ्या शब्दजोड्या<br>विरामचिन्हे | ५१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | हे जग<br>सुंदर आहे | संभाषण<br>लेखन | काझिरंगा<br>*व्यंकटेश माडगूळकर*<br>गोठवलेलं दूध<br>बचत : साबणाची आणि पाण्याची<br>सहभोजन<br>*दिलीप कुलकर्णी*<br>ऋतुरंग<br>*दुर्गा भागवत* | रिती भूतकाळ<br>शब्दयोगी अव्यये<br>सामान्यरूप<br>विरुद्धार्थी शब्द<br>मुद्रितशोधन<br>नाम-क्रियापद जोड्या<br>वाक्प्रचारांच्या गोष्टी | ६५ |
| ६ | तिसरी<br>घंटा | लेखन<br>वाचन | तालमीला सुरुवात<br>*विजया मेहता*<br>स्वर्गातील आत्मे<br>*दिवाकर* | नामे<br>सर्वनामे<br>लिंग<br>वचन<br>नाम + सोडणे रचना<br>नाम-क्रियापद जोड्या | ८२ |
| ७ | कलांच्या<br>प्रांगणात | वाचन<br>श्रवण<br>*राहुल देशपांडे* | चित्रकला : एक आनंदयात्रा<br>*विशाल वाड्ये*<br>रेषेचे लाघव<br>*शांता शेळके*<br>हिराबाई<br>*पु. ल. देशपांडे*<br>म्हणींची लज्जत<br>*शैलजा भा. शेवडे* | नाम-क्रियापद जोड्या<br>क्रियापदाचे प्रकार<br>शब्दार्थ - वाक्प्रचार व म्हणी | ९७ |
| १ | नमुना प्रश्नपत्रिका १ | | | | ११३ |
| २ | नमुना प्रश्नपत्रिका २ | | | | १३१ |

९



# शब्द शब्द जपून ठेव

# १ शब्द शब्द जपून ठेव

## विभाग अ

### परीक्षेसाठी उपयुक्त सूचना

*वाचन*

- वाचन या भागात चार प्रकारचे प्रश्न असतील. ते सोडविण्यासाठी बऱ्यापैकी मोठ्या उताऱ्यांचे वाचन ठरावीक वेळात (८० मिनिटांत) पूर्ण करावे लागेल. हे वाचन करताना शब्दकोश इत्यादी साधनांचा वापर करता येणार नाही.
- यासाठीची प्राथमिक तयारी म्हणून मराठी वर्तमानपत्रे व मासिके तसेच इंटरनेटवरील लेख, जाहिराती, माहितीपर सदरे इ.चे नियमित वाचन करावे.
- हळूहळू आपल्या वाचनाचा वेग वाढवावा. वेगवेगळ्या प्रकारे वाचन करत असतानाच पुढील काही बाबी समजून घ्यायचा प्रयत्न करावा : दिलेल्या उताऱ्याचा मुख्य विषय काय आहे? दिलेल्या उताऱ्यात कशाविषयी साद्यंत माहिती देण्यात आली आहे? दिलेल्या उताऱ्याद्वारे लेखक कोणते मत प्रदर्शित करत आहे? इत्यादी.
- सर्व उताऱ्यांचे त्यातील मुख्य विषय, त्या विषयासंबधी मांडलेले विचार, उताऱ्यात केलेली विधाने अशा सर्वांगांनी आकलन व्हावे असा प्रयत्न करा. त्याचबरोबर उताऱ्यातील मुद्दे वेगळ्या प्रकारे (समानार्थी शब्द इ. वापरून) कसे मांडता येतील, याचा विचार करा.
- विविध विषयांवरील आणि विविध प्रकारच्या उताऱ्यांचे वाचन करणे फायदेशीर ठरते.

### प्रश्न १ वाचन आकलन

- दिलेला उतारा वाचन, आकलनासाठी असतो. त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे तुम्हाला लिहायची आहेत.
- दिलेल्या उताऱ्याचा क्रमाक्रमाने व परिच्छेदांनुसार विचार करा.
- लेखकाने अप्रत्यक्षपणे जे सुचविलेले आहे, जे मत मांडले आहे तिकडे लक्ष द्या.
- उताऱ्याचे परत एकदा सखोल वाचन करा. हे वाचन करताना उताऱ्यात दिलेल्या सविस्तर माहितीकडे लक्ष द्या.

### प्रश्न २ परिच्छेदाशी जुळणारी विधाने

- दुसऱ्या प्रश्नामध्ये उताऱ्याशी संबंधित ९ विधाने दिलेली असतात. ती विधाने उताऱ्यातील संबंधित परिच्छेदांशी जुळवायची असतात. दिलेल्या एकूण विधानांपैकी दोन विधाने न जुळणारी असतात.
- या प्रश्नाच्या तयारीसाठी वर्तमानपत्रे व मासिकांमधील लोकप्रिय सदरे तसेच वस्तुनिष्ठ लेखांचे वाचन करा. त्यातील प्रमुख मुद्द्यांच्या आधारे लेखाचा सारांश स्वतःच्या शब्दांत लिहायचा सराव करा.
- उताऱ्यातील प्रमुख आशय कोणता, उताऱ्यात कोणत्या मुख्य संकल्पना आल्या आहेत, या प्रश्नांच्या अनुषंगाने उताऱ्यातील समर्पकपणे जुळणाऱ्या भागावर खुणा करा. तो वेगळ्या शब्दांत किंवा वेगळी वाक्यरचना वापरून कसा मांडता येईल यावर विचार करा.
- प्रत्येक परिच्छेद वाचून त्याचा सारांश एक किंवा दोन ओळींत लिहा. जी विधाने जुळवण्यासाठी दिली आहेत, त्यांच्याशी तो ताडून पाहा.

**प्रश्न ३ लेखाची पुनर्रचना**

- या प्रश्नात तुम्हाला एका लेखाची पुनर्रचना करायची आहे. त्यासाठी तुम्हाला तो लेख १४ तुकड्यांमध्ये विभागून देण्यात येईल. यांतील ७ तुकडे क्रमवार अंकांनी तर ७ तुकडे अक्षरांनी निर्देशित केलेले असतील. यातील क्रमवार अंकांनी दर्शविलेल्या प्रत्येक भागानंतर आशयाशी जुळणारा अक्षराने दर्शविलेला एक भाग निवडायचा आहे आणि त्यातून एक सलग अर्थपूर्ण उतारा तयार करायचा आहे.
- या प्रश्नाच्या तयारीसाठी वर्तमानपत्रे व मासिकांमधील दीर्घ वार्तांकने असणाऱ्या लेखांचे वाचन करा. हे वाचन करताना लेखनातील भाषिक वैशिष्ट्यांकडे व सूचकतेकडे विशेष लक्ष द्या.
- सर्वनामे, उभयान्वयी अव्यये या वाक्याच्या अंगांची उजळणी करा.
- परीक्षेत लेखातील समग्र आशयाबरोबरच स्वतंत्ररित्या तुकड्यातुकड्यांमधून व्यक्त होणारा आशयही विचारात घ्या.
- गाळलेल्या जागेसाठी सुयोग्य परिच्छेद निवडताना ज्या ठिकाणी विवक्षित परिच्छेद घालायचा आहे, त्याच्या आधीचा परिच्छेद व त्यानंतरच्या परिच्छेदाकडे लक्ष द्या.

**प्रश्न ४ शासकीय परिपत्रक**


- या प्रश्नात तुम्हाला काही शासकीय परिपत्रके वाचून त्यावर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहायची आहेत.
- या प्रश्नाच्या तयारीसाठी परिपत्रके लक्षपूर्वक वाचा. त्यात नेमके काय सांगितले आहे, ते समजून घ्या.
- हा प्रश्न सोडविण्यासाठी जलद आणि नेमके वाचन करणे गरजेचे आहे. म्हणूनच परिपत्रके बारकाईने वाचण्याचा सराव करा.



## १ परीक्षेतील *वाचन* या भागासंबंधी सराव नमुना प्रश्न

**पुढील उतारा वाचा.**

### उरलो 'विदा (डेटा)' पुरता



'सुस्वागतम! तुम्ही औरंगाबादच्या विसावा या पंचतारांकित हॉटेलपासून फक्त वीस किलोमीटरवर आहात. 'विसावा'मध्ये तुमच्यासाठी उत्तम भोजन आणि सुसज्ज निवासव्यवस्था उपलब्ध आहे.' प्रवास सुरू असताना तुम्ही औरंगाबादला पोहोचल्यावर कुठल्या हॉटेलमध्ये उतरायचं, याचा विचारच करत असता; तेवढ्यात – जणू तुमच्या मनातला विचार ओळखून – असे अनेक संदेश तुमच्या चलभाषावर चमकू लागतात. 'अरे, यांना कसं कळलं, की मला औरंगाबादच्या हॉटेलमध्ये उतरायचं आहे?' असं अजिबात वाटून घेऊ नका. कारण तुम्हीच ते त्यांना सांगितलेलं असतं. तुम्हीच

ऑनलाइन तिकीट आरक्षित करून गेले दोन दिवस औरंगाबादमधल्या निवासव्यवस्थेविषयी इंटरनेटवर केलेली भरपूर शोधाशोध त्यांना पुरेशी असते. त्यातून तुमचं सद्य स्थळ दर्शविणारी 'लोकेशन' नामक सुविधा तुम्ही सुरू ठेवली असेल तर बोलायलाच नको. त्यामुळे एकदा का तुम्ही ऑनलाइन झालात, की आजच्या जगात तुमचं खाजगीपण संपलं. एवढंच काय, स्मार्टफोन जरी वापरलात तरी तुम्ही एक 'विदा (डेटा)' म्हणजेच 'माहिती' बनता. मग अशा काळात जर तुमचं खाजगी आयुष्य खाजगीच राहावं, असं वाटत असेल तर महाजालाकडे (इंटरनेट) फिरकूच नका. एवढंच नव्हे तर स्मार्टफोनसुद्धा वापरू नका. कारण तुमचा बंद करून ठेवलेला स्मार्टफोनसुद्धा प्रामाणिकपणे तुमची माहिती इतरांना पुरवत राहण्याचं कर्तव्य पार पाडत असतो.

आपली साधीसुधी वाटणारी माहिती आज अचानक एवढी महत्त्वाची का झाली असेल बरं? तर आज जग हे एक मोठं खेडं झालं आहे आणि प्रत्येक जण त्यातला ग्राहक. त्यातून दूरसंचार क्षेत्राची सतत वाढणारी साऱ्या जगाला कवेत घेणारी गरूडझेप. त्यामुळे आज तुमची विदारूपी माहिती हेच तर अनेकांच्या व्यवसायाचं मुख्य भांडवल आहे. वापरकर्त्याचं वय, व्यवसाय, आवडीनिवडी याबद्दल माहिती घेऊन ग्राहक म्हणून त्याची माहिती कोणत्या विक्रीसंस्थेला पुरवता येईल हे सांगणारं मोठं व्यवसायक्षेत्र आज विकसित झालं आहे. म्हणूनच गुगल, फेसबुकसारख्या माध्यमसंस्थांवर वापरकर्त्यांची वैयक्तिक माहिती व्यावसायिक हेतूने इतरांना पुरविल्याचे आरोप अधूनमधून होत असतात. अर्थात, त्यांच्याकडून 'आम्ही असं केलं नाही' असं स्पष्टीकरण दिलं जातं. पण खरी गोष्ट अशी आहे, की आपणच त्यांना ही परवानगी दिलेली असते.

आपण जेव्हा एखादं अनुयोजन म्हणजे ॲप्लिकेशन आपल्या फोनमध्ये सुरू करतो, तेव्हा त्याची नोंदणी करताना त्यातील नियम व अटी पूर्णपणे वाचलेल्या नसतात. एकतर आपल्याला घाई असते; आणि वाचायचं म्हटलं तरी ते इतक्या तांत्रिक भाषेत आणि रटाळ लिहिलेलं असतं, की आपण भराभर पुढे सरकवून आंधळेपणाने सगळं मान्य असल्याची खूण करतो. आपण जर थोडासा त्रास घेऊन या अटी वाचल्या, तर खरोखरच आपले डोळे उघडतील. आपल्या फायद्यासाठी, आपल्याला उत्तम सेवा पुरवण्यासाठी या सर्व सुविधा आहेत, असं गोड शब्दांत सांगून आपल्याला सर्व अटी मान्य करण्यासाठी गळ घातलेली असते आणि आपण सरळपणे आपली माहिती वापरायला परवानगी देतो.




विविध समाजमाध्यमं हा काही लोकसेवेसाठी सुरू केलेला उपक्रम नाही. त्यामुळे हे व्यासपीठ जेव्हा मोबदला न घेता उपलब्ध करून दिलं जातं, तेव्हा त्याच्यापासून कुणालातरी काहीतरी लाभ होत असणारच, याची आपण खूणगाठ बांधून ठेवायलाच हवी. आपण लिहिलेल्या आणि आपल्याला आलेल्या मेल, आपण पाठवलेले संदेश, खरेदी केलेल्या वस्तू, बँकेच्या कार्डाने दिलेले पैसे, मोबाईल क्रमांक, पत्ता, ई मेल हे सारं कुणीतरी माहिती म्हणून साठवून ठेवलेलं असतं. आपण सहज किंवा काही कामासाठी ज्या ज्या संकेतस्थळावर जातो, त्या त्या संकेतस्थळाची नोंद, आपण काय पाहतो, काय उतरवून घेतो ह्याची नोंद कुठे ना कुठे होतच असते.

म्हणूनच कोणतीही वैयक्तिक माहिती देताना काळजी घेणं, फसवणाऱ्या संदेशांपासून सावध राहणं, महाजालीय सुरक्षिततेचे जास्तीत जास्त नियम पाळणं हाच त्यावरचा एकमेव उपाय आहे. कारण आता

या माहितीच्या महाजालाच्या सागरात सोडलेली छोटीशी माहितीची होडीसुद्धा किती दूरवर जाईल आणि कुणाच्या हातात जाईल हे सांगता येत नाही. थोडक्यात, या किनाऱ्यावर न भिजता कुणीच राहू शकत नाही. फक्त पाय बुडवायचे, वाहवत जायचं, बुडायचं की कौशल्याने तरंगत राहायचं हे ठरवणं ज्याच्यात्याच्या हातात आहे.

**पुढे दिलेली विधाने उताऱ्यातील आशयाशी जुळतात की नाही ते होय किंवा नाही या स्वरूपात सांगा.**

उदा॰ विधान - ऑनलाइन असताना आपले खाजगीपण जपता येते.

उत्तर - **नाही**

**विधाने**

क. दूरसंचार क्रांतीमुळे विदेची निर्मिती आणि वाढ होत आहे.

ख. स्मार्टफोनमुळे तुमची माहिती तुमच्या नकळत दुसऱ्यांना मिळू शकते.



ग. समाजमाध्यमांवरील आपली माहिती नेहमीच सुरक्षित असते.

घ. समाजमाध्यमे किंवा अनुयोजनामध्ये नोंदणी करताना नियम व अटी वाचून मान्य करणे अपेक्षित असते.

च. विदेमध्ये तुमच्या वैयक्तिक माहितीचा समावेश नसतो.

छ. फेसबुक, गुगल या व्यावसायिक संस्था आहेत.

ज. समाजमाध्यमे किंवा महाजाल यांचा वापरकर्ता हा मोठ्या व्यवसायाचे एक मुख्य भांडवल झाला आहे.



## २ परीक्षेतील *श्रवण* भागासंबंधी सराव नमुना प्रश्न

**भाषातज्ज्ञ अशोक केळकर यांची पुढील ध्वनिफीत ऐका. त्यावर आधारित ४ वाक्ये दिली आहेत. त्यांना 'होय' किंवा 'नाही' असे प्रतिसाद द्या.**

क. भाषाविद असण्यासाठी भाषेबद्दल कुतूहलाची नाही, तर केवळ माहिती असण्याची गरज असते.

ख. संदेशवहनाचे साधन म्हणून भाषेचे चालणारे कार्य विश्लेषक भाषाविज्ञानात अभ्यासले जाते.

ग. भाषांमधील परस्परसंबंधांचा अभ्यास भाषाविज्ञानाच्या कक्षेत येत नाही.

घ. मराठी व काश्मिरी भाषेच्या तुलनेत मराठी व जपानी भाषेच्या वाक्यरचनेत साम्य आहे.



विभाग ब

व्याकरण उजळणी

**१ दूरचित्रवाणीवर निवडणूक आयुक्तांच्या मुलाखतीचे थेट प्रसारण सुरू होत आहे. तुम्ही तिथे हजर असून घडणाऱ्या घटनांचे वर्णन क्रमाने जसेच्या तसे आपल्या मित्रमैत्रिणींना सांगत आहात. ते सांगताना तुम्ही क्रियापदाचे कोणते रूप वापराल ते लिहा. कंसात दिलेल्या क्रियापदांचा आधार घ्या.**

**(जाणे, घेणे, सुरू होणे, प्रवेशणे, उतरणे, देणे, थांबणे, करणे, बसणे, बोलणे, सरकणे)**

उदा. दूरचित्रवाणीवरील निवडणूक आयुक्तांच्या मुलाखतीचे थेट प्रसारण आता **सुरू होत आहे.**

क. सूत्रसंचालिका दूरचित्रवाणीच्या चित्रीकरण स्टुडिओमध्ये ---------------



ख. निवडणूक आयुक्त चित्रीकरणस्थळी त्यांच्या गाडीतून खाली ---------------

ग. ते उतरल्यावर त्यांची गाडी पुन्हा बाहेर ---------------

घ. आयुक्तांबरोबर आलेला सुरक्षा ताफा प्रवेशद्वाराबाहेरच ---------------

च. स्टुडिओमधील ध्वनिचित्रमुद्रण व्यवस्थापक हाताने इशारे ---------------

छ. सूत्रसंचालिका व निवडणूक आयुक्त आपापल्या आसनावर ---------------

ज. दोघेही एकमेकांशी परिचय करून --------------- आणि मुलाखतीच्या मुद्द्यांबाबत ---------------

झ. मध्येच निवडणूक आयुक्त चलभाषावरून सूचना ---------------

ट. घड्याळाचे काटे पुढे ---------------

ठ. आता प्रत्यक्ष मुलाखत आणि प्रसारण ---------------

**२ पुढील उताऱ्यात मराठी वृत्तपत्रसृष्टीच्या इतिहासात घडून गेलेल्या घटना सांगितल्या आहेत. त्यानुसार कंसात दिलेल्या क्रियापदांचे किंवा नाम-क्रियापद जोड्यांचे योग्य रूप वापरा.**

उदा. मराठीतील पहिले वृत्तपत्र 'दर्पण' हे दि. ६ जानेवारी, १८३३ रोजी बाळशास्त्री जांभेकर यांनी मुंबईतून **प्रसिद्ध केले.** (प्रसिद्ध करणे)


THE BOMBAY DURPUN
दर्पण

क. 'दर्पण' प्रारंभी पाक्षिक --------------- (असणे)

ख. अंकात प्रत्येक पानावर दोन स्तंभ मजकूर असलेली आठ पाने --------------- (असणे)

ग. या पत्रात इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषांत मजकूर छापला --------------- (जाणे)

घ. विलायतेतील कला, विद्या व कौशल्ये यांचा वाचकांना परिचय व्हावा, त्यांचे मनोरंजन करावे व चालू काळाचे वर्तमान त्यांना कळवावे ही त्यांची --------------- (उद्दिष्टे असणे)

च. 'दर्पण'मध्ये त्यांनी कोणताही विषय वर्ज्य न मानता विविध विषयांचा --------------- (समावेश करणे)

छ. 'वाचकांची पत्रे' 'दर्पण'कारांनी आवर्जून --------------- (छापणे) मात्र, स्तुतीची पत्रे --------------- (टाळणे)

ज. सन १८४०मध्ये आर्थिक झळ बसून 'दर्पण' --------------- (बंद पडणे)

झ. पूर्णपणे मराठी भाषेतील मजकुराचे वृत्तपत्र म्हणून 'मुंबई अखबार'चा --------------- (उल्लेख होणे)

ट. 'दर्पण'च्या परंपरेतील 'प्रभाकर' हे वृत्तपत्र दि. २४ ऑक्टोबर, १८४१ रोजी --------------- (सुरू होणे)

ठ. भाऊ महाजन यांनी 'प्रभाकर'चे संपादकपद --------------- (भूषविणे)

ड. 'प्रभाकर'चे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे त्यात गोपाळ हरी देशमुख उर्फ 'लोकहितवादी' हे शतपत्रे --------------- (लिहिणे)

ढ. 'मित्रोदय' हे पुण्यातून प्रसिद्ध झालेले पहिले मराठी वृत्तपत्र --------------- (असणे), मात्र ते लवकरच --------------- (बंद पडणे)

ण. दि. १२ फेब्रुवारी, १८४९ रोजी 'ज्ञानप्रकाश' हे वृत्तपत्र --------------- (सुरू होणे) आणि पुण्यातील वृत्तपत्र व्यवसायाला व पत्रकारितेला खऱ्या अर्थाने --------------- (प्रारंभ होणे)



## ३ पुढील शब्दांच्या आधारे अर्थपूर्ण वर्तमानकाळी वाक्ये तयार करा.

उदा. बातम्या – दूरचित्रवाणी – आकाशवाणी – अधिक ताज्या – असणे
दूरचित्रवाणी आणि आकाशवाणीवरच्या बातम्या अधिक ताज्या असतात.

क. बातम्या – सांगणे – काम – वृत्तनिवेदक – करणे

---------------------------------------------------------------------------

ख. वृत्तनिवेदक – भाषाप्रभुत्व – आवश्यक – असणे

---------------------------------------------------------------------------

ग. वृत्तनिवेदक – उत्तम भाषाशैली – देहबोली – उत्तम आवाज – सामान्यज्ञान – अद्ययावत माहिती – प्रसंगावधान – गुण – आवश्यक असणे

---------------------------------------------------------------------------

घ. वृत्तसंपादन – माहितीची सत्यता – घटनाक्रम – योग्य शब्दरचना – व्यक्तिनाम – पदनामे – नियमानुसार शब्दलेखन – वाक्यरचना – काळजी – आवश्यक असणे

---------------------------------------------------------------------------

च. ऐनवेळ – पूर – अपघात – भूकंप – बातमी – प्राधान्य – बदल करणे

-----------------------------------------------------------------------

४ **पुढे वृत्तपत्रातील काही बातम्या दिल्या आहेत. या बातम्यांमधील अधोरेखित क्रियापदांच्या जागी कंसातील त्याच अर्थाची योग्य क्रियापदे भरा व त्यानुसार वाक्यरचनेत योग्य ते बदल करा.**

(बाजी जिंकणे, पडणे, महागणे, भांडण होणे, पदभार स्वीकारणे, अंदाज घेणे, घटणे, निर्णय घेणे, लढणे, काढणे, नष्ट होणे)

उदा॰ सोन्याचा दर दिवसेंदिवस कमी होत चालला आहे.
सोन्याचा दर दिवसेंदिवस **घटत चालला आहे.**

क. पंढरपूर महामार्गावरील पूल आज दुपारी कोसळला.

ख. सोलापूरच्या महापौर म्हणून अर्चना पाटील यांनी कारभार हाती घेतला.

ग. स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरच्या दरात दीडशे रुपयांची वाढ झाली.

घ. जमीन मालकीवरून दोघा भावांमध्ये वाद झाला.

च. पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांनी निवडणुकीपूर्वी कार्यकर्त्यांच्या तयारीची चाचपणी केली.

छ. सलामीवीर मार्टिन आणि हेन्री यांच्या झुंजार फलंदाजीच्या जोरावर न्यूझीलंडने सामन्यात विजय संपादन केला.

ज. नाणेफेक जिंकून भारताने प्रथम फलंदाजी करण्याचे ठरविले.

झ. 'सकारात्मक राहण्याशिवाय काहीच पर्याय नाही' – कर्करोगाशी झुंज देणाऱ्या अभिनेत्याचे मनोगत.

ट. मानहानीकारक मजकूर गुगलने हटवला.

ठ. नैसर्गिक आणि मानवनिर्मित संकटांचा सामना करताना पालघर जिल्ह्याच्या किनारपट्टीवरील मासेमारी व्यवसाय नामशेष झाला.

५ **पुढे दिलेले शब्द वापरून अर्थपूर्ण वाक्ये तयार करा.**



उदा॰ समाजमाध्यम – कसा वापर – तुमची प्रतिमा – अवलंबून असणे
समाजमाध्यमांचा कसा वापर करता यावर तुमची प्रतिमा अवलंबून आहे.

क. समाजमाध्यमे – समाज – चांगले – वाईट – परिणाम – होणे

-----------------------------------------------------------------------

ख. समाजमाध्यमे – लेखन – स्वातंत्र्य – मिळणे

ग. समाजमाध्यमे – लेखन – कधी तरी – १० लाख – वाचक – वाचले जाणे

घ. समाजमाध्यमे – माहिती – विचार – आदानप्रदान – वेगाने – होणे

च. अनेकजण – नियमित – संगणकाद्वारे – ब्लॉग – लिहिणे

छ. वर्तमानपत्रे – दूरचित्रवाणी – वाचक – प्रेक्षक – प्रतिसाद – मर्यादा – असणे

ज. समाजमाध्यमे – तरुण पिढी – वाया – जाऊ शकणे

झ. समाजमाध्यमे – माहिती – खरेखोटेपणा – पडताळणे – गरज असणे

ट. समाजमाध्यमे – वापरणे – कला – शास्त्र – असणे

ठ. नेतृत्व करणारे – समाजमाध्यमे – प्रभावी – वापर करत जाणे



## ६ पुढील उतारा वाचा आणि त्याखाली दिलेला सराव करा.

**आदेश!**

‘एऽ, पाणी दे!’, ‘पुस्तकं तिकडे ठेव!’, ‘जा! चहा घेऊन ये!’, ‘तिकडे जाऊन बैस!’, ‘सखू, दळण घेऊन ये!’ ह्या नि अशा आज्ञा सोडणारे महाभाग आपल्याला केवळ आपल्या समाजातच नव्हे, तर जगातल्या सर्वच समाजांमध्ये आढळतात. अशा आज्ञासोडू (आणि स्वत: मात्र अत्यंत आळशी असणाऱ्या) माणसांची संख्या कुठेही कमी नसते; पण असली वाक्यं ऐकायला आपल्यालाच नव्हे तर कोणालाच आवडत नाहीत. अशी वाक्यं समोरच्याला (सामान्यत:) तुच्छ लेखणारीच असतात. असं अरेरावीनं बोलणारा माणूस (इतरांच्या दुर्दैवानं) अधिकारावर असेल तरच लोक त्याचं ऐकतात (बिचारे), पण अशी व्यक्ती मानाच्या खुर्चीवरून खाली उतरल्यानंतर कोणी तिच्या वाऱ्यालाही उभं राहत नाही.

ह्या प्रकारच्या वाक्यांमधली बोच माहीत असल्यामुळेच सभ्य माणसं शक्यतो अशी वाक्यं उच्चारतच नाहीत. वाक्याचा तोच आशय ते वेगवेगळ्या पद्धतीनं सांगतात. आपल्याकडची अगदी साधी, सोपी पद्धत म्हणजे वाक्याच्या सुरुवातीला, शेवटी किंवा अधेमधे (आपल्या सोयीनं किंवा शैलीनं) ‘जरा’ (जरा/जऽरा

वगैरे) शब्द वापरणं. उदा॰ ‘अतुल, मला जरा ते पुस्तक दे!’ ‘अतुल, जरा तो पाण्याचा तांब्या इकडे कर!’ वगैरे.

पण हा प्रकारही तितकासा सभ्य, समोरच्याला काम करायला उद्युक्त करणारा होत नाही, हे पक्कं ठाऊक असल्यामुळे अनेक समंजस, विचारी माणसं हाच आशय भविष्यकाळाच्या उपयोगानं अधिक सौम्य करून, मार्दवाने सांगतात, ते असं –



‘अरे अनिल, मला जरा ते पुस्तक आणून देशील का?’, ‘अरे सुनील, जरा तो पाण्याचा तांब्या इकडे आणशील का?’, ‘अरुणा, जरा मस्तपैकी चहा करशील का?’ ‘सुनील, जरा इकडे येशील का?’ वगैरे.

अशा वाक्यांमध्ये भविष्यकाळ वापरलेला असतो तो अशासाठी की, बाबा रे, माझं काम सावकाशीनं कर, घाई नाही. केवळ काळ बदलून केलेली अशी रचना एकदम परिणामकारक होते. ऐकणाऱ्याला ती टोचत नाही नि आपलं काम होऊन जातं.

एकच आशय सांगणारी तीन प्रकारची वाक्यं आपण इथं पाहिली. त्यातला तिसरा प्रकार नक्कीच चांगला वाटतो की नाही? ह्या प्रकारची भाषा ऐकणाऱ्यालाही बरं वाटतं नि अशा प्रकारे काम सांगितलेलं असलं, तरी ऐकणारा फटकन् नाही म्हणत नाही. हेच तर असतं भाषेचं काम. आपल्या मनातली गोष्ट दुसऱ्याला चांगल्या प्रकारे सांगणं. [...]

चांगल्या भाषेचं फळ सत्वर, अगदी ह्याच जन्मी मिळतं. तुम्ही स्वतः प्रयोग करून पाहा.

अविनाश बिनीवाले

**वरील उताऱ्यात तीन प्रकारची वाक्यं दर्शविली आहेत. तुम्ही यातल्या कोणकोणत्या प्रकारची वाक्यं कधी आणि कुणाशी बोलता? कोणत्या प्रकारचं वाक्य तुम्ही जास्त वेळा बोलता? आपल्या मित्रमैत्रिणींबरोबर खेळीमेळीत अशा प्रकारच्या वाक्यांच्या संभाषणाचा सराव करा.**

उदा॰ क. “एऽ, पाणी दे!”

ख. “अतुल, मला जरा पाणी दे!”

ग. “अरे अतुल, मला जरा पाणी आणून देशील का?”



## ७ पुढील शब्द वापरून विधान / आज्ञार्थी / विध्यर्थी वाक्ये तयार करा.

उदा॰ मानसी – आज – कार्यालय – येणे.

विधान – मानसी आज कार्यालयात आली.

आज्ञार्थी – मानसी, आज कार्यालयात ये.

विध्यर्थी – मानसीने आज कार्यालयात यावे.

क. पुस्तक प्रकाशन संस्था – कार्यालय – वीस जण – कामे करणे

ख. मानसी – संपादन विभाग – काम – करणे

ग. मानसी – संपादन काम – अतिशय – जबाबदारी – करणे

घ. भाषा – पाककला – संगीत – असे – विविध – विषय – पुस्तके – प्रसिद्ध करणे

च. मजकूर लेखन – टंकन – मुद्रितशोधन – संपादन – मजकुराची मांडणी – कामाचे टप्पे – ठरवणे

## ८ 'जर-तर' वापरून किंवा 'जर' न वापरता फक्त 'तर' वापरून पुढील दोन वाक्यांचे एक संकेतार्थी वाक्य तयार करा.

उदा. घरात – सगळीकडे – पुस्तके – असणे.
कोणीतरी – येणे – वाचणे

वाक्य – जर घरात सगळीकडे पुस्तके असतील, तर कोणीतरी येऊन ती वाचतील.




क. वाचक – पुस्तक – वाचणे
वाचक – क्षितिजे – विस्तारणे

ख. वाचक – फुरसत – असणे
तो – पुस्तक – वाचणे

ग. पुस्तक – रंगीत – असणे
वाचक – आकर्षित – होणे

घ. पुस्तक – साद – घातली
मी – अव्हेरणे – नाही

च. पुस्तके – नसणे
पुस्तके – घरबसल्या – जगाची सफर न घडणे

## ९ पुढील क्रियापदांचा प्रत्येकी दोन बातम्यांमध्ये योग्य त्या काळात उपयोग करा.

(पडणे, मारणे, झेपावणे, सुटणे)

क. महाराष्ट्रामध्ये या वर्षी सरासरी ९८% पाऊस ----------------

ख. रवींद्रच्या गोलंदाजीवर अजिंक्यने ------------ षटकाराने आजच्या सामन्याला कलाटणी मिळाली.

ग. भारताची अव्वल फलंदाज स्मृती मानधना जागतिक क्रमवारीत चौथ्या स्थानावर ----------------

घ. प्रोटोपोरोस ही पहिली रो-रो बोट शुक्रवारी सकाळी अलिबागला जाण्यासाठी मुंबई बंदरातून बाहेर ----------------

च. शेअर बाजार निर्देशांकाने आज दोनशे अंशांची उसळी ----------------

छ. श्रीहरिकोटा येथून आत्ता चांद्रयान-२ अवकाशात ----------------

ज. आघाडीतील सर्व पक्षांनी एकमुखाने पाठिंबा दिल्यामुळे मुख्यमंत्रिपदासाठी निर्माण झालेला तिढा ----------------

झ. उद्या श्रीवर्धन बसस्थानकातून प्रथमच वातानुकूलित शिवनेरी बस ----------------

## १० जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| क) कानामागून येऊन तिखट होणे | अ) खूप मार देणे |
| ख) काळजाचा लचका तुटणे | आ) केलेले उपकार विसरणे, कृतघ्नपणा करणे |
| ग) खाल्ल्या घराचे वासे मोजणे | इ) मन अत्यंत व्यथित होणे |
| घ) खरडपट्टी काढणे | ई) मोठ्या प्रमाणावर आरंभ करून शेवटी अत्यल्प कर्तबगारी दाखवणे |
| च) चौदावे रत्न दाखवणे | उ) मागाहून येऊन वरचढ होणे |
| छ) जर्जर होणे | ऊ) रागावणे |
| ज) डोंगर पोखरून उंदीर काढणे | ए) अतिशय त्रासून जाणे |

## उत्तरसंच

### विभाग अ

१. क. होय ख. होय ग. नाही घ. होय च. नाही छ. होय ज. होय

२. क. नाही ख. होय ग. नाही घ. होय

### विभाग ब

१. क. सूत्रसंचालिका दूरचित्रवाणीच्या चित्रीकरण स्टुडिओमध्ये प्रवेशत आहेत.
   ख. निवडणूक आयुक्त चित्रीकरणस्थळी त्यांच्या गाडीतून खाली उतरत आहेत.
   ग. ते उतरल्यावर त्यांची गाडी पुन्हा बाहेर जात आहे.
   घ. आयुक्तांबरोबर आलेला सुरक्षा ताफा प्रवेशद्वाराबाहेरच थांबत आहे.
   च. स्टुडिओमधील ध्वनिचित्रमुद्रण व्यवस्थापक हाताने इशारे करत आहेत.
   छ. सूत्रसंचालिका व निवडणूक आयुक्त त्यांच्या आसनावर बसत आहेत.
   ज. दोघेही एकमेकांशी परिचय करून घेत आहेत आणि मुलाखतीच्या मुद्द्यांबाबत बोलत आहेत.
   झ. मध्येच निवडणूक आयुक्त चलभाषावरून सूचना देत आहेत.
   ट. घड्याळाचे काटे पुढे सरकत आहेत.
   ठ. आता प्रत्यक्ष मुलाखत आणि प्रसारण सुरू होत आहे.

२. क. 'दर्पण' प्रारंभी पाक्षिक होते.
   ख. अंकात प्रत्येक पानावर दोन स्तंभ मजकूर असलेली आठ पाने होती.
   ग. या पत्रात इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषांत मजकूर छापला जाई.
   घ. विलायतेतील कला, विद्या व कौशल्ये यांचा वाचकांना परिचय व्हावा, त्यांचे मनोरंजन करावे व चालू काळाचे वर्तमान त्यांना कळवावे ही त्यांची उद्दिष्टे होती.
   च. 'दर्पण'मध्ये त्यांनी कोणताही विषय वर्ज्य न मानता विविध विषयांचा समावेश केला होता.
   छ. 'वाचकांची पत्रे' 'दर्पण'कारांनी आवर्जून छापली. मात्र, स्तुतीची पत्रे टाळली.
   ज. सन १८४०मध्ये आर्थिक झळ बसून 'दर्पण' बंद पडले.
   झ. पूर्णपणे मराठी भाषेतील मजकुराचे वृत्तपत्र म्हणून 'मुंबई अखबार'चा उल्लेख होतो.
   ट. दर्पण'च्या परंपरेतील प्रभाकर हे वृत्तपत्र दि. २४ ऑक्टोबर, १८४१ रोजी सुरू झाले.
   ठ. भाऊ महाजन यांनी 'प्रभाकर'चे संपादकपद भूषविले.
   ड. 'प्रभाकर'चे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे त्यात गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी हे शतपत्रे लिहीत.
   ढ. 'मित्रोदय' हे पुण्यातून प्रसिद्ध झालेले पहिले मराठी वृत्तपत्र होते. मात्र ते लवकरच बंद पडले.
   ण. दि. १२ फेब्रुवारी, १८४९ रोजी 'ज्ञानप्रकाश' हे वृत्तपत्र सुरू झाले आणि पुण्यातील वृत्तपत्र व्यवसायाला व पत्रकारितेला खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला.

३. क. बातम्या सांगण्याचे काम वृत्तनिवेदक करतात.
   ख. वृत्तनिवेदकाकडे भाषाप्रभुत्व असणे आवश्यक आहे.
   ग. वृत्तनिवेदकाकडे उत्तम भाषाशैली, देहबोली, उत्तम आवाज, सामान्यज्ञान, अद्ययावत माहिती आणि प्रसंगावधान हे गुण असणे आवश्यक आहे.

घ. वृत्तसंपादन करताना माहितीची सत्यता, घटनाक्रम, योग्य शब्दरचना, व्यक्तिनाम, पदनामे, नियमानुसार शब्दलेखन, वाक्यरचना याबाबत काळजी घेणे आवश्यक आहे.

च. ऐनवेळी पूर, अपघात, भूकंप अशा घटना घडल्या तर बातम्यांमध्ये प्राधान्यानुसार बदल करतात.

४. क. पंढरपूर महामार्गावरील पूल आज दुपारी पडला.

ख. सोलापूरच्या महापौर म्हणून अर्चना पाटील यांनी पदभार स्वीकारला.

ग. स्वयंपाकाचा गॅस सिलिंडर दीडशे रुपयांनी महागला.

घ. जमीन मालकीवरून दोघा भावांमध्ये भांडण झाले.

च. पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांनी निवडणुकीपूर्वी कार्यकर्त्यांच्या तयारीचा अंदाज घेतला.

छ. सलामीवीर मार्टिन आणि हेन्री यांच्या झुंजार फलंदाजीच्या जोरावर न्यूझीलंडने सामन्यात बाजी जिंकली.

ज. नाणेफेक जिंकून भारताने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

झ. 'सकारात्मक राहण्याशिवाय काहीच पर्याय नाही' – कर्करोगाशी लढणाऱ्या अभिनेत्याचे मनोगत.

ट. मानहानीकारक मजकूर गुगलने काढला.

ठ. नैसर्गिक आणि मानवनिर्मित संकटांचा सामना करताना पालघर जिल्ह्याच्या किनारपट्टीवरील मासेमारी व्यवसाय नष्ट झाला.

५. क. समाजमाध्यमांचे समाजावर चांगले व वाईट परिणाम होत आहेत.

ख. समाजमाध्यमांमध्ये लेखनाचे स्वातंत्र्य मिळाले होते.

ग. समाजमाध्यमांमधील लेखन कधीकधी १० लाख वाचकांकडूनही वाचले जाईल.

घ. समाजमाध्यमांद्वारे माहिती व विचारांचे आदानप्रदान वेगाने होत असे.

च. अनेकजण संगणकाद्वारे नियमितपणे ब्लॉग लिहितील.

छ. वर्तमानपत्रे, दूरचित्रवाणी यांच्या वाचक-प्रेक्षक प्रतिसादाला मर्यादा आहेत.

ज. समाजमाध्यमांमुळे तरुण पिढी वाया जाऊ शकेल.

झ. समाजमाध्यमांवरील माहितीचा खरेखोटेपणा पडताळून पाहण्याची गरज असते.

ट. समाजमाध्यमे वापरणे ही कला आणि शास्त्र होते.

ठ. नेतृत्व करणारे समाजमाध्यमांचा प्रभावी वापर करत जातील.

७. क. विधान – पुस्तक प्रकाशन संस्थेच्या कार्यालयात वीस जण काम करतात.
आज्ञार्थी – पुस्तक प्रकाशन संस्थेच्या कार्यालयात तुम्ही वीस जण काम करा.
विध्यर्थी – पुस्तक प्रकाशन संस्थेच्या कार्यालयात वीस जणांनी काम करावे.

ख. विधान – मानसी संपादन विभागात काम करते.
आज्ञार्थी – मानसी, संपादन विभागात काम कर.
विध्यर्थी – मानसीने संपादन विभागात काम करावे.

ग. विधान – मानसी संपादनाचे काम अतिशय जबाबदारीने करते.
आज्ञार्थी – मानसी, संपादनाचे काम अतिशय जबाबदारीने कर.
विध्यर्थी – मानसीने संपादनाचे काम अतिशय जबाबदारीने करावे.

घ. विधान – भाषा, पाककला, संगीत अशा विविध विषयांवर पुस्तके प्रसिद्ध केली जातात.
आज्ञार्थी – भाषा, पाककला, संगीत अशा विविध विषयांवर पुस्तके प्रसिद्ध करा.
विध्यर्थी – भाषा, पाककला, संगीत अशा विविध विषयांवर पुस्तके प्रसिद्ध करावीत.

च. विधान – मजकूर लेखन, टंकन, मुद्रितशोधन, संपादन, मजकुराची मांडणी असे कामाचे टप्पे ठरवले जातात.
आज्ञार्थी – मजकूर लेखन, टंकन, मुद्रितशोधन, संपादन, मजकुराची मांडणी असे कामाचे टप्पे ठरवा.
विध्यर्थी – मजकूर लेखन, टंकन, मुद्रितशोधन, संपादन, मजकुराची मांडणी असे कामाचे टप्पे ठरवावेत.

८. क. जर वाचकांनी पुस्तके वाचली, तर वाचकांची क्षितिजे विस्तारतील.
ख. जर वाचकाला फुरसत असेल, तर तो पुस्तक वाचेल.
ग. जर पुस्तक रंगीत असेल, तर वाचक आकर्षित होईल.
घ. जर पुस्तकाने साद घातली, तर मी अव्हेरणार नाही.
च. जर पुस्तके नसती, तर घरबसल्या जगाची सफर घडली नसती.
(वरील सर्व उत्तरे ‘जर’ या अव्ययाशिवायही लिहिली जातात.)

९. क. महाराष्ट्रामध्ये या वर्षी सरासरी ९८% पाऊस पडला.
ख. रवींद्रच्या गोलंदाजीवर अजिंक्यने मारलेल्या षटकाराने आजच्या सामन्याला कलाटणी मिळाली.
ग. भारताची अव्वल फलंदाज स्मृती मानधना जागतिक क्रमवारीत चौथ्या स्थानावर झेपावली.
घ. प्रोटोपोरोस ही पहिली रो-रो बोट शुक्रवारी सकाळी अलिबागला जाण्यासाठी मुंबई बंदरातून बाहेर पडली.
च. शेअर बाजार निर्देशांकाने आज दोनशे अंशांची उसळी मारली.
छ. श्रीहरिकोटा येथून आत्ता चांद्रयान-२ अवकाशात झेपावत आहे.
ज. आघाडीतील सर्व पक्षांनी एकमुखाने पाठिंबा दिल्यामुळे मुख्यमंत्रिपदासाठी निर्माण झालेला तिढा सुटला.
झ. उद्या श्रीवर्धन बसस्थानकातून प्रथमच वातानुकूलित शिवनेरी बस सुटेल.

१०. क-उ ख-इ ग-आ घ-ऊ च-अ छ-ए ज-ई

२



# घे भरारी

विभाग अ

## १ परीक्षेतील *वाचन* भागासंबंधी सराव नमुना प्रश्न.

**पुढील शासकीय परिपत्रक वाचून त्यावर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**महाराष्ट्र शासन**
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक :- केव्हीबी-२०१७/प्र.क्र.१६/उद्योग-६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : १८ जून २०१९

**प्रस्तावना : -**

महाराष्ट्र राज्यात सुमारे ७०% टक्के लोकसंख्या शेतीव्यवसायावर उपजीविका करत आहे. त्यामुळे शेतीव्यवसाय अधिक फायदेशीर होण्यासाठी शासन विविध योजना राबवीत आहे. मधमाश्यांमुळे शेती उत्पन्नात भरघोस वाढ होत असल्याने मध उद्योगाला अधिक चालना देणे आवश्यक आहे. मध उद्योग हा केवळ शेतीपूरक व्यवसाय व जोडधंदा म्हणून न करता एक मुख्य उद्योग म्हणून केल्यास त्यातून ग्रामीण रोजगारनिर्मितीला चालना मिळेल. मधमाश्यांच्या मधपेट्या शेती, पिके व फळबागायतींच्या ठिकाणी तसेच जंगलात ठेवल्यास मधमाश्यांद्वारे पर-परागीभवन होऊन पिकांच्या उत्पादनात पिकांच्या प्रकारानुसार ५ ते ४५ टक्के उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता आहे. ही वाढ मधमाश्यांनी उत्पादित केलेल्या मधाच्या व मेणाच्या किमतीच्या १० ते १५ टक्के अधिक आहे.

मधमाश्यापालन हा एक वैशिष्ट्यपूर्ण बहुउद्देशीय उद्योग आहे. मधसंकलन, परागसंकलन, मधमाश्यांच्या वसाहतींची संख्या वाढविणे, या उद्योगातील उपउत्पादनांचे संकलन करणे, तसेच मराठवाडा विभागात तेलबियांच्या पिकांचे असणारे आधिक्य, पश्चिम घाट क्षेत्रात व विदर्भातील जिल्ह्यांत असणारे वनक्षेत्र, कोकण विभागातील जंगल व फळबागांचे क्षेत्र अशी वैविध्यपूर्ण निसर्गसंपदा असल्याने राज्यात मध उद्योगाच्या विकासाला मोठा वाव आहे. त्या दृष्टीने मधमाश्यापालन उद्योग हा सदर उद्दिष्टांशी सुसंगत असा उद्योग असल्याने मधमाश्यापालन उपक्रमास उद्योग म्हणून चालना देण्यासाठी राज्यात सर्व जिल्ह्यांत सदर योजना राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

वरील सर्व बाबींचा विचार करून मध केंद्र योजना (मधमाश्यापालन) संपूर्ण राज्यात राबविण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

**योजनेचा उद्देश :-**

राज्यातील सर्व घटकातील लाभार्थ्यांना मधमाश्यापालन व्यवसायातून उत्पन्न वाढीसाठी मदत करून त्यांचे जीवनमान उंचावणे आणि मध उद्योगाचा विकास करणे यासाठी पायाभूत सुविधा निर्मिती करणे, त्यांचा दर्जा वाढविणे इ॰ बाबींची आवश्यकता लक्षात घेऊन राज्यातील मध उद्योगाच्या विकासासाठी असणारे पोषक वातावरण लक्षात घेता व्यावसायिक तत्त्वावर मध उद्योगाचा व्यवसाय करणारे मधपाळ निर्माण करणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**यंत्रणा :-**

राज्यात विविध कार्यक्रमांतर्गत मधमाश्यापालन योजना महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत राबविण्यात येत असून यासाठी महाबळेश्वर येथे मध संचालनालय कार्यरत आहे. या संचालनालयामार्फत लाभार्थ्यांना प्रशिक्षण देणे, मधमाश्या वसाहतींसह मधपेट्या तसेच अन्य साहित्याचे वाटप करणे, मधसंकलन करून त्यावर प्रक्रिया करून विक्री करणे, ग्रामोद्योगी उत्पादनाची विक्री करणे इ॰ कामे करण्यात येत आहेत. तसेच जिल्हास्तरावर मंडळाची जिल्हा कार्यालये असून प्रस्तुत योजना महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ यांच्याकडून राबविण्यात येणार आहे.

**केंद्रचालक प्रगतीशील मधपाळ :-**

मधमाश्यापालन योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी राज्यात मोठ्या प्रमाणावर मधमाश्यांच्या वसाहतींची निर्मिती करणे, मधमाश्यापालन व्यवसाय करणाऱ्या लाभार्थ्यांना प्रशिक्षण देणे, मार्गदर्शन करणे, उत्पादित मध गोळा करणे इ. काम केंद्रचालक मधपाळ हे करतील. [...]

**क. परिपत्रकाआधारे पुढील विधाने योग्य की अयोग्य ते सांगा.**

अ. मध उद्योग हा एक मुख्य उद्योग म्हणून केल्यास त्यातून ग्रामीण रोजगार निर्मितीला चालना मिळेल असे या पत्रकात सांगितले आहे.

आ. राज्यात मध उद्योगाच्या विकासाला पूरक परिस्थिती नाही.

इ. मधमाश्यापालन व्यवसायातून सहभागींचे उत्पन्न वाढेल, असे पत्रकात म्हटले आहे.

ई. मधमाश्यांद्वारे पर-परागीभवन होऊन पिकांच्या उत्पादनात वाढ होण्याची शक्यता आहे.

**ख. उत्तराचा योग्य पर्याय निवडा.**

अ. जीवनमान उंचावणे

एक. उंच जागेवर वास्तव्य करणे — दोन. भरपूर आयुष्य असणे

तीन. अधिक चांगल्या प्रकारे जीवन व्यतीत करणे — चार. अनेक वर्षे जगवणे

आ. चालना देणे

एक. चाल करणे. — दोन. प्रोत्साहन देणे

तीन. मार्गदर्शन करणे — चार. चालवणे

इ. भरघोस वाढ

एक. फळांचे घड लागणे — दोन. भरपूर वाढ होणे

तीन. मोठा आवाज होणे — चार. वाढीत भर पडणे

ई. वाव असणे

एक. पाठिंबा असणे — दोन. मार्गात अडथळे असणे

तीन. आवड असणे — चार. एखादी गोष्ट घडून येण्यासाठी संधी असणे

**ग. पुढील शब्दसमूहांसाठी वरील परिपत्रकात कोणते शब्द वापरले आहेत?**

अ. गोळा करणे — आ. उचित आणि परस्परांशी जुळणारे

इ. एखाद्या गोष्टीवर / बाबीवर विचार चालू असणे — ई. अनेक हेतू असणारे

**घ. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

अ. मधमाश्यापालनाचा व्यवसाय शेतीला पूरक कसा आहे?

आ. महाराष्ट्र राज्य मधमाश्यापालनाच्या दृष्टीने जास्त चांगले असण्याची कारणे कोणती?

## २ वाचन भागासंबंधी सराव.

**तुम्हाला तुमच्या काही मित्र-मैत्रिणींसाठी पुस्तकांची खरेदी करायची आहे. पुढे दिलेल्या पुस्तकांच्या जाहिराती वाचा. खाली दिलेल्या कोणत्या विधानाशी कोणती जाहिरात जुळते ते लिहा. उदाहरणादाखल एक जाहिरात जुळवून दाखवली आहे.**

उदा०

विधान : सानियाला वन्य छायाचित्रणाची आवड आहे.

जाहिरात : पेरू देशाच्या आग्नेय भागात, अँडीज पर्वताच्या उतारावर वसलेल्या सदाहरित घनदाट जंगलात एका निसर्गप्रेमीने मनसोक्त भटकंती केली. या भटकंतीतून नजरेपुढे साकार झालेले, शब्द आणि छायाचित्रांमधून वाचकांनाही सफर घडवणारे हे पुस्तक. ही आहे अजित केळकर यांनी लिहिलेली जंगल डायरी.

क. हिंदी चित्रपटगीतांमधील उर्दूचा वापर हा रजनीच्या अभ्यासाचा विषय आहे.

ख. तिसरीतल्या प्रणवला सारखं कशात तरी गुंतवून ठेवावं लागतं.

ग. निकिता वास्तुशास्त्राच्या अखेरच्या वर्षाला आहे.

घ. राकेशला साहसी क्रीडाप्रकार खूप आवडतात.

च. अभिषेकला ‘महिला सबलीकरण’ या विषयावर व्याख्यान द्यायचं आहे.

छ. पहिली नोकरी सुटल्यामुळे चेतन चिंतेत आहे.

ज. छोट्या कियाराला टी.व्ही. वरच्या कार्टून्सकडून वाचनाकडे कसं वळवता येईल या विचारात तिचे बाबा आहेत.

अ. एखादा वास्तुविशारद काय काम करतो असं आपल्याला विचारलं तर आपण सहज सांगतो की तो घरांची, वास्तूंची रेखाटने बनवतो. पण वाटतं तितकं सोपं काम नाही ते. सांगलीचे प्रसिद्ध वास्तुविशारद विद्याधर भागवत आज तीन दशकांहून अधिक वर्षं घरं, अनेक सरकारी वास्तू, व्यावसायिक इमारती आणि स्मारकं साकार करत आहेत. आवड म्हणून त्यांनी अनेक जगप्रसिद्ध प्राचीन वास्तू, भारतातील महत्त्वाच्या वास्तू, शहरे, राजवाडे, प्राचीन मंदिरे यांचा खोलात जाऊन अभ्यास केला आणि त्यातून साकार झालं ‘वास्तुरचना’सारखं देखणं पुस्तक! कोल्हापूरचं अंबाबाईचं मंदिर पूर्वी कसं दिसत असेल याचं केलेलं कल्पनारम्य चित्र, जलस्रोतांवर बांधलेल्या जुन्या वास्तूंचा अभ्यास, तब्बल १५ प्रकरणं असलेलं, भरपूर फोटोंनी सजलेलं, २०० पानांचं रंगीत देखणं पुस्तक वाचणं आणि पाहणं हा एक सुखद अनुभव आहे! पुस्तक मागवण्यासाठी आजच संपर्क करा!

आ. कधीच न संपणारी कापूसकोंड्याची गोष्ट तुम्ही कधी ऐकलीय? उडणारी गाय तुम्हाला कधी भेटलीय? तुम्ही एखादा अगडबंब डोंगर पाहिलाय? ठेंगू-ठकीच्या करामती तुम्हाला ठाऊक आहेत का? वाघाच्या पोटात फुलपाखरू जातं... तेव्हा काय होतं? बबडूच्या तळहातावरचं कासव खरं खुरं असतं की स्वप्नातलं? हूं, फ्रू, गुर्र, फुर्र हे आपले कोण? समजा, बारा चौदा वर्षांच्या मुलानं आत्मचरित्र लिहायचं ठरवलं तर काय होईल? त्यात काय येईल? ऑनलाईन नाही, ऑफलाईन वाचायची धमाल पुस्तकं! आजच घरी मागवा.

इ. आपण सगळे एका संक्रमणाच्या काळातून जात आहोत. एकीकडे संकट आहे तर एकीकडे संधी आहेत! नोकऱ्या जाणार ही परिस्थिती आली, असे वाटेस्तोवर अनेकांना नव्या नोकऱ्या मिळाल्याच्याही बातम्या येत आहेत. संधी कायमच असतात. त्या संधी फक्त शिक्षणानेच मिळत नाहीत, त्यासाठी आवश्यक ती कौशल्ये आपल्याला शिकावी लागतात. बारकावे समजून घ्यावे लागतात. तुम्ही नोकरी मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहात का? व्यवसाय सुरू करता आहात का? मग हे पुस्तक तुमच्यासाठी नक्कीच उपयुक्त ठरेल! एका तज्ज्ञ व्यक्तीकडून घरबसल्या ही कौशल्ये शिकायची मिळत असलेली संधी सोडू नका. रोजगार कौशल्य शिका आणि खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर व्हा! तरुणांसाठी उपयुक्त : कॉर्पोरेट जगताचा राजमार्ग.




ई. मोबाईल हवा, असा हट्ट धरणाऱ्या मुलांना अभ्यासाकडे कसं वळवायचं, अभ्यास अधिक आनंददायी कसा करायचा, याचा विचार करून 'शिकू आनंदे' हा एक अभिनव प्रकल्प साकार झाला आहे. शिक्षणतज्ज्ञ डॉ. गौरी काळभोर यांच्या सखोल आणि अभ्यासपूर्ण लेखणीतून उतरलेली, पहिली ते आठवीच्या वयोगटातील मुलांसाठीची ही आठ पुस्तकं आहेत. भरपूर चित्रे, खेळ आणि कमी मजकूर असं स्वरूप असलेली ही पुस्तकं शास्त्रीय मार्गदर्शन करतात. ही पुस्तकं मुलांबरोबर त्यांच्या पालकांसाठीही उपयुक्त आहेत.



उ. भारतामध्ये पुराणकथांमध्ये स्त्रिया संख्येने कमी आढळतात हे खरं असलं, तरी त्यांच्या अंगी असलेल्या शक्ती, क्षमता आणि ऊर्जेचं वर्णन जुन्या ग्रंथांमध्ये पानोपानी आढळतं. देवीने राक्षसांचं निर्दालन करून आपल्या भक्तांचं रक्षण केल्याच्या कथा तर कितीतरी आहेत. लक्ष्मी, सरस्वती, पार्वती, मनोरमा, लीलावती, सागरकन्या... अशा पुराणांतल्या अनेक अद्भुत महिला, ज्यांच्या शौर्यकथा पुराणांमध्येच बंदिस्त राहिल्या. त्या येताहेत आपल्या भेटीला 'वीरकन्या' या पुस्तकातून. या कथासंग्रहामध्ये प्रसिद्ध लेखिका करुणा पेंडसे यांनी दाखवलेलं स्त्री-सामर्थ्याचं विराट रूप पाहताना आपल्यालाही प्रेरणा मिळेल हे नक्की.

ऊ. निसर्गाशी जुळवून घेताना आणि प्रसंगी दोन हात करताना पूर्वी मानवाने अनेक साहसे केली आहेत. त्यांचे स्मरण करून देणारे पुस्तक म्हणजे ‘परिक्रमा’. आठ वर्षे चाललेल्या या सागरी परिक्रमा मोहिमेची ही कहाणी वाचकांना खिळवून ठेवणारी आहे. विंग कमांडर संकेत कांबळे यांनी ही अविश्वसनीय पृथ्वीप्रदक्षिणा कशी पूर्ण केली आणि सागरी इतिहासात एका नव्या अध्यायाची कशी सुरुवात झाली, ते वाचू या त्यांच्याच शब्दांत.

ए. एक सुप्रसिद्ध उर्दू शायर. त्यांच्या गाजलेल्या गजला, त्यांची पत्रकारिता, तुरुंगवारी; त्यांची प्रेमप्रकरणं, आयुष्यातले असंख्य चढ-उतार... आणि त्या सर्वांपेक्षाही वरचढ ठरलेली त्यांची अर्धीमुर्धी स्वप्नं. जगावेगळं वलय लाभलेल्या एका प्रसिद्ध कवीचं चरित्र. प्रभाकर सोलकर लिखित ‘मुबारक’.

## ३ परीक्षेतील *संभाषण* भागासंबंधी सराव नमुना प्रश्न

***शिक्षण : रोजगाराभिमुख की ज्ञानाभिमुख?*** **या विषयावर तुम्हाला पाच मिनिटे सादरीकरण करायचे आहे. सादरीकरणासाठी पुढे दिलेल्या मुद्द्यांचा वापर करा.**

व्यक्तीला स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी शिक्षण रोजगाराभिमुख असणे आवश्यक आहे.

शिक्षण हे केवळ उपजीविकेचे साधन नसून व्यक्तीचा सर्वांगीण विकास हे शिक्षणाचे ध्येय असते.

ज्ञान आणि कौशल्यविकास यांची योग्य सांगड घालणे गरजेचे आहे.

विभाग ब


**व्याकरण उजळणी व शब्दसंपदा**

## १ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण

भारतामध्ये जाहीर झालेल्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील शालेय शिक्षणाशी निगडित असणाऱ्या काही मोजक्या शिफारशींचा अंमलबजावणीच्या दृष्टिकोनातून ऊहापोह करण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे.

**नवीन आकृतिबंध**

शिक्षण हक्क कायद्याची व्याप्ती तीन ते अठरा वर्षांपर्यंत (पूर्वप्राथमिक ते बारावी) वाढवावी, अशी अनेक शिक्षणतज्ज्ञ आणि स्वयंसेवी संस्था यांची मागणी होती. नवीन धोरणात ५+३+३+४ असा आकृतिबंध सुचवलेला आहे. पाच वर्षं पायाभूत शिक्षण (तीन वर्षं बालशिक्षण, इयत्ता पहिली आणि दुसरी), तीन वर्षं प्राथमिक शिक्षण (इयत्ता तिसरी ते पाचवी), तीन वर्षं उच्च प्राथमिक शिक्षण (सहावी ते आठवी) आणि चार वर्षं माध्यमिक शिक्षण (नववी ते बारावी) अशी ही विभागणी असेल. अंगणवाड्या आता शाळांचाच भाग होणार असल्यामुळे ही अडचण दूर होऊ शकेल. पहिली आणि दुसरी या इयत्ता हा बालशिक्षणाचाच भाग मानण्यात आला आहे, ही स्वागतार्ह बाब आहे. प्राथमिक शाळांमध्ये अंगणवाड्यांत शिक्षण देताना शालेय शिक्षण आणि महिला आणि बालकल्याण या दोन विभागांमध्ये उत्कृष्ट समन्वय असणं हे मात्र मोठंच आव्हान असेल. अंगणवाड्यांत शिक्षणाकडे पूर्णपणे दुर्लक्ष, तर खासगी शाळांना जोडून असलेल्या पूर्वप्राथमिक वर्गांत मुलांवर अत्याचार म्हणता येईल असं औपचारिक शिक्षण, असं दुसरं टोक, अशी सध्याची परिस्थिती आहे. बालशिक्षणासाठी त्यांचं वय, शारीरिक आणि मानसिक क्षमता लक्षात घेऊन त्यांच्या मेंदूचा विकास व्हावा या दृष्टीनं खेळ, गाणी, गोष्टी, कृती, कोडी यांच्या माध्यमांतून त्यांना आनंद वाटेल, असा अभ्यासक्रम तयार करून त्याचीच अंमलबजावणी सर्व ठिकाणी होईल हे कटाक्षानं पाहण्याची गरज आहे. दुसरीपर्यंत वाचन, संभाषण आणि सोपं अंकगणित एवढ्याच बाबी अपेक्षित असून, लेखनाची सुरुवात तिसरीपासून होईल. हा बदल मुलांच्या प्रगतीबाबत चुकीच्या कल्पना असणाऱ्या पालकांच्या गळी उतरवणं एक आव्हानच असेल. इयत्ता पाचवीपर्यंत साक्षरता आणि अंकज्ञान यावर भर असेल. शालेय शिक्षणाच्या सर्वच स्तरांवरची कौशल्यं विकसित करण्यासाठी खेळ, कृती, कोडी, दैनंदिन जीवनाशी सांगड, शोधक वृत्ती, चिकित्सकपणा, सौंदर्यदृष्टी आणि सर्जनशीलता वाढीला लागेल अशा उपक्रमांचा वापर करणं अपेक्षित आहे.



### भिंती निकाली

इयत्ता नववी ते बारावी या स्तरावर विज्ञान, कला, वाणिज्य अशा शाखा किंवा शालेय, सहशालेय, अभ्यासक्रमेतर उपक्रम अशा भिंती नसतील. सर्वच विषयांना सारखंच महत्त्व असेल. विद्यार्थ्यांना कोणतेही विषय निवडता येतील. भौतिकशास्त्र शिकताना विद्यार्थ्याला संगीत शिकणंही शक्य होईल. भारत, अमेरिका, जर्मनी आणि कोरिया या देशांत व्यवसायशिक्षण घेतलेल्या व्यक्तींचं प्रमाण अनुक्रमे ५, ५२, ७५ आणि ९६ टक्के आहे. या पार्श्वभूमीवर सर्वच माध्यमिक शाळांत व्यवसायशिक्षणाचे अभ्यासक्रम सुरू होतील अशा रीतीनं विस्तार करण्यात येईल. प्रत्येक विषयात संवादकौशल्यं, सॉफ्ट स्किल्स, अर्थसाक्षरता आणि उद्योजकता विकास ही कौशल्यंसुद्धा माध्यमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमाचा भाग असतील. आजवर व्यवसाय शिक्षणाच्या अभ्यासक्रमाला दुय्यम स्थानच दिलं गेलं आहे. आता नवीन धोरणात सहावीपासूनच विद्यार्थ्यांनी एका तरी व्यवसायात कौशल्य मिळवावं असं म्हटलं आहे. इंटर्नशिपचीसुद्धा तरतूद केली आहे.

भारतकेंद्री दृष्टिकोन हे नवीन शैक्षणिक धोरणाचं आणखी एक महत्त्वाचं वैशिष्ट्य आहे. गणित, खगोलशास्त्र, धातुकर्म, वैद्यक, वास्तुकला, शिल्पकला, संगीत या क्षेत्रांत भारतीयांनी केलेल्या अभिमानास्पद कामगिरीचा परिचय करून देण्यात येईल. भारतातल्या विविध भागांतल्या कला, साहित्य, चालू घडामोडी, भारतीय भाषांचा अभ्यास यांना अभ्यासक्रमात विशेष स्थान असेल. विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक स्वप्रतिमा निर्माण होण्यासाठी हे महत्त्वाचंच आहे; पण त्याचबरोबर प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरा खंडित का झाली, यापुढे तसं घडू नये यासाठी काय दक्षता घ्याव्या लागतील, हे सांगणंसुद्धा आवश्यक आहे.

### भाषाविषयक धोरण

शिक्षणाचं माध्यम 'शक्यतो' मातृभाषा असावं असं म्हटलं आहे. भाषामाध्यमाच्या निवडीचं पालकांचं स्वातंत्र्य मान्य करूनही मातृभाषा किंवा परिसरभाषा हेच शिक्षणाचं माध्यम असणं विद्यार्थ्यांची अभिव्यक्ती आणि शैक्षणिक प्रगती यांना पूरक असतं, हेच खरं आहे. प्रचंड पैसा खर्च करून मुलांचं नुकसान करून घेण्यात काय अर्थ? पालकांचं प्रबोधन करणं, इंग्रजी शाळांना कोणत्याही सवलती न देणं आणि भारतीय भाषा माध्यम असलेल्या शाळांना शक्य तेवढी मदत करून त्यांचा दर्जा उंचावणं गरजेचं आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळांप्रमाणेच मराठी माध्यमातसुद्धा अनेक विद्यार्थ्यांची घरची भाषा मराठी किंवा प्रमाण मराठी नसते. म्हणूनच नवीन धोरणात माध्यमभाषेबरोबरच विद्यार्थ्यांच्या घरात बोलल्या जाणाऱ्या भाषेचाही वापर शिकवताना करावा, असं अतिशय स्पष्ट शब्दांत नमूद केलं आहे.

धोरणात त्रिभाषा सूत्र मान्य केलं असलं, तरी कोणतीही भाषा लादली जाणार नाही, अशी निःसंदिग्ध ग्वाही दिलेली आहे. कोणत्या भाषा निवडायच्या याचा निर्णय राज्य सरकारांवर आणि विद्यार्थ्यांवर सोपवलेला आहे. तीनपैकी दोन भाषा भारतात बोलल्या जाणाऱ्या असतील. महाराष्ट्रात त्रिभाषा सूत्राची अंमलबजावणी कित्येक दशकांपासून सुरू आहे. बदललेल्या मसुद्यात बहुभाषिकत्वावर खूपच भर दिलेला आहे. भारतात इंग्रजी येणाऱ्या सुमारे १५ टक्के व्यक्तींचा आर्थिक आणि सामाजिक स्तर सर्वसाधारणपणे इतरांपेक्षा वरचा आहे. त्यामुळे आपल्या मुलांनाही चांगलं इंग्रजी यावं असं प्रत्येकालाच वाटणं साहजिकच आहे. त्यासाठी सर्वच शाळांमध्ये सुरवातीपासूनच चांगलं इंग्रजी शिकण्याची सोय हवी. जर्मन, फ्रेंच, जपानी अशा भाषांपेक्षा इंग्रजीत प्रकाशित झालेल्या विज्ञानाच्या क्षेत्रातल्या संशोधनाला लगेच व्यापक प्रसिद्धी मिळते. या पार्श्वभूमीवर इयत्ता सहावीपासून विज्ञान आणि गणित मातृभाषा आणि इंग्रजी अशा दोन भाषांमधून शिकता येण्याची सोय उपलब्ध करून देण्याची शिफारस केली आहे. असं झालं तर विद्यार्थी नववीपर्यंत या दोन्ही भाषांत सहजपणे संकल्पना मांडू शकतील.

### विद्यार्थ्यांचं मूल्यमापन आणि परीक्षा

यापुढे शिक्षकांनी केलेल्या आकारिक मूल्यमापनाच्या आधारे अध्ययन प्रक्रियेत गरजेनुसार बदल करण्यावर भर राहील. खरं तर प्रत्येक सत्राच्या अखेरीस एक याप्रमाणं मंडळामार्फत आयोजित होणाऱ्या आठ परीक्षांना विद्यार्थी बसू शकतील. परीक्षेसाठी कोणती मोड्यूल निवडायची याचं स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना असेल. पाठांतराला फाटा देणाऱ्या या परीक्षांत उपयोजन आणि तर्कशुद्ध विचार यांच्यावर भर असेल.

### शाळा-समूह योजना

छोट्या शाळांचं एकाकीपण दूर व्हावं, परिसरातल्या शाळांमध्ये सहकार्याचं वातावरण वाढावं, त्यांच्यात भौतिक आणि शैक्षणिक सुविधा आणि तज्ज्ञता यांची देवाण-घेवाण व्हावी, यासाठी कोठारी आयोगानं शिफारस केलेली शाळा-समूह योजना पुनरुज्जीवित करण्यात येईल. एक माध्यमिक शाळा आणि तिच्या परिसरातल्या इतर सर्व प्राथमिक शाळा यांचा एक शाळा-समूह बनेल. परिसरातले स्वयंस्फूर्तीनं सहभागी होऊ इच्छिणारे शिक्षित पालक, विविध व्यवसायांत असलेले नागरिक, माध्यमिक शाळांत आणि महाविद्यालयांत शिकणारे विद्यार्थी, सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षित युवक हे मागं पडणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती याबद्दल, तर शेतकरी, उद्योजक, व्यावसायिक, कारागीर हे आपापल्या क्षेत्राशी संबधित मार्गदर्शन अशा जबाबदाऱ्या स्वीकारू शकतील. शाळेतले हुशार विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांसाठी ट्युटर म्हणून काम करू शकतील. पूर्वीच्या राष्ट्रीय साक्षरता मिशनसारखाच हा कार्यक्रमही मिशन मोडमध्ये राबवावा लागेल.

### अंमलबजावणी

खुल्या शिक्षणव्यवस्थेचा पुरस्कार करणारं हे धोरण खूपच महत्त्वाकांक्षी आहे. परंतु, कोणत्याही समाजाची उंची त्याच्या आकांक्षांपेक्षा जास्त असू शकत नाही. कोणतंही धोरण त्याच्या अंमलबजावणीइतकंच चांगलं असतं. या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी ही तीव्र राजकीय इच्छाशक्ती, वाढीव आर्थिक तरतूद, सक्षम मनुष्यबळ, अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांमधला समन्वय आणि उत्कृष्ट टीम स्पिरीट यांवरच अवलंबून राहील.

**वसंत काळपांडे**

**क. लेखातील मांडणीनुसार पुढील विधाने चूक की बरोबर हे सांगा.**

उदा. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार पहिली आणि दुसरी या इयत्ता हा बालशिक्षणाचाच भाग मानण्यात आला आहे. - बरोबर

अ. लेखनाची सुरुवात पहिलीपासून होईल.

आ. इयत्ता नववी ते बारावी या स्तरावर विज्ञान, कला, वाणिज्य अशा शाखा निवडता येतील.

इ. सर्वच माध्यमिक शाळांत व्यवसायशिक्षणाचे अभ्यासक्रम सुरू व्हावे अशी अपेक्षा आहे.

ई. भारतातल्या विविध भागांतल्या कला, साहित्य, चालू घडामोडी, भारतीय भाषांचा अभ्यास यांना अभ्यासक्रमात विशेष स्थान असेल.

उ. शिक्षणाचं माध्यम मातृभाषा असणं बंधनकारक आहे.

ऊ. परीक्षेत पाठांतराला महत्त्व देण्यात आलं आहे.

ए. शाळा-समूह योजनेची यापूर्वी कोठारी आयोगानं शिफारस केलेली आहे.

ॲ. शेतकरी, उद्योजक, व्यावसायिक, कारागीर हेही शिक्षणप्रक्रियेमध्ये सहभागी असतील.



## २ 'चित्र' कथा

रुपारेल महाविद्यालयात शिकत असताना नाटकाच्या चमूमध्ये मला अनेक चित्रपटवेडे सहकारी आणि मित्र मिळाले. यात प्रामुख्याने चेतन दातार – ज्याच्याबरोबर चित्रपट पाहणं जितकं मनोरंजक असे तितकंच बोधप्रदही असे – आणि सचित पाटील, ज्याच्यासोबत मी त्या काळी रुपारेल महाविद्यालयाच्या बाजूला असलेल्या 'बादल-बिजली-बरखा' या चित्रपटगृहांमध्ये अनेक शुक्रवार 'पहिला दिवस-पहिला खेळ' या तत्त्वावर चित्रपट पाहिले आहेत. अगदी सलमान खान-करिश्मा कपूरच्या 'जागृती' नामक टाकाऊ चित्रपटापासून 'जो जीता वही सिकंदर' आणि 'खिलाडी' सारखे तद्दन व्यावसायिक पण खुर्चीला खिळवून ठेवणारे चित्रपट मी आणि सचितने नेमाने पाहिले.

मी महाविद्यालयात शेवटच्या वर्षाला असताना 'उन्मेष' या आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत मी लिहिलेल्या एकांकिकेला बक्षीस मिळालं आणि माझ्यात लेखक बनण्याची ऊर्मी दाटून आली. चित्रपट पाहणं चालूच होतं. एका शुक्रवारी आम्ही काही मित्र एका अतिसामान्य हिंदी चित्रपटाचा पहिलाच खेळ पाहून आल्यावर रुपारेल महाविद्यालयाच्या मैदानात बसून त्या चित्रपटाचं 'पोस्टमॉर्टेम' करत होतो.

"हे असे चित्रपट आपणही लिहू शकतो!" आपण नुकतंच आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत सर्वोत्कृष्ट लेखकाचं बक्षीस जिंकलो आहोत हा अहंभाव माझ्या वाक्यात होता हे खरंय; पण तो चित्रपट पाहून ही माझी प्रामाणिक प्रतिक्रिया होती हेही तितकंच खरंय.

"हे असे! आपण याच्यापेक्षा निश्चित चांगलं लिहू," सचित पाटील म्हणाला.

"अरे हो, पण चित्रपटाची कथा नको का काही?" आणखी एक मित्र म्हणाला.

रुपारेल महाविद्यालयाच्या कलाशाखेच्या इमारतीमध्ये त्याच वेळी एक दिवा लागला आणि काचेवर एका कर्मचाऱ्याची सावली पडली.

"ती सावली पाहा," मी म्हटलं, "या सावलीपासूनही एक चित्रपट सुरू होऊ शकतो."

पुढच्या एका तासात त्या सावलीवरून मी थरारपटाची एक कथा विणली.

ती ऐकून एक मित्र म्हणाला, "या कथेवर खरोखरच एक रंजक चित्रपट होऊ शकतो! तू ही कथा पटकथेच्या स्वरूपात लिहून का नाही काढत?"

शेवटच्या वर्षाची परीक्षा डोक्यावर होती, पण चित्रपटाचं भूत एकदा डोक्यावर बसलं की बाकी काही सुचत नाही. रोज कॉलेजच्या कँटीनमध्ये बसून मी पटापट लिहू लागलो. काही दिवसांत पटकथा पूर्ण झाली. त्या कथेमध्ये काही गाण्यांच्या जागा होत्या. आमची कुठल्याही गीतकाराशी ओळख नसल्याने मीच जमतील तशी ती गाणी लिहायची असं ठरलं. योगायोगाने जी गाणी लिहिली ती चाल घेऊनच जन्माला आली. आमच्या नाटकाच्याच ग्रुपमध्ये कमलेश भडकमकर आणि अजित परब होते. कमलेशने नुकताच नवीन सिंथेसाइझर



कौशल इनामदार

घेतला होता. मी त्याच्या साथीवर ती गाणी गाऊन पाहिली. असं वाटलं, की ही गाणी ध्वनिमुद्रित केली तर चांगली वाटतील. महाविद्यालयातलेच मित्र एकत्र आलो आणि एका लहानशा स्टुडियोमध्ये या गाण्यांचं ध्वनिमुद्रण केलं. [...]

संगीतकार म्हणून माझ्या कारकीर्दीला इथूनच सुरुवात झाली असं म्हणायला काही हरकत नाही.

महाविद्यालयातच असल्यामुळे आणि फारसं व्यावहारिक ज्ञान नसल्यामुळे मी लिहिलेला चित्रपट पटकथेच्या स्वरूपात कागदावरच राहिला. ध्वनिमुद्रित केलेली गाणीसुद्धा जुन्या आठवणी काढण्याचं एक साधन बनून राहिली. पण याच पटकथेने आणि गाण्यांनी चित्रपटाच्या क्षेत्रात येण्याचा आत्मविश्वास माझ्यात निर्माण केला. संगीतक्षेत्रात पदार्पण केल्यानंतरही खरी ओढ लागून राहिली ती चित्रपटाचं संगीत करायची. वयाच्या तिसऱ्या-चौथ्या वर्षी ज्या रुपेरी पडद्याशी ओळख झाली होती, आता त्याच रुपेरी पडद्यावरून आपले सूर उमटावेत अशी तीव्र इच्छा झाली.

ही इच्छा पूर्ण व्हायला पुढची दहा वर्षं जावी लागली. आता तो प्रवास सुरू झाला आहे.

कौशल इनामदार

**क. उताऱ्यामध्ये 'त्या कथेमध्ये काही गाण्यांच्या जागा होत्या.' असं वाक्य आलं आहे. जागा हा शब्द नामस्वरूपात ठिकाण आणि क्रियापदरूपात जागरुकता असणे अशा अर्थाने वापरला जातो. घरात जागा असणं, मनात जागा असणं, सावध या अर्थी जागं राहणं, न झोपता जागं राहणं, स्वाभिमान जागा होणं, बसायला जागा मिळणं अशा विविध प्रकारे आपण हा शब्द वापरतो. पुढील वाक्यांमध्ये सुरुवातीचा भाग वाचून त्यानुसार योग्य प्रकारे 'जागा' हा शब्द वापरून वाक्य लिहा. अशा प्रकारे वेगवेगळ्या प्रकारची वाक्ये होऊ शकतात.**

उदा॰ एवढं मोठं कपाट घरी कुठे ठेवणार? ------------------- -------------------
एवढं मोठं कपाट घरी कुठे ठेवणार? जागा असायला हवी ना!
एवढं मोठं कपाट घरी कुठे ठेवणार? घरात अजिबात जागा नाही.

अ. रात्र असली तरी बिबट्याचा हल्ला कधीही होऊ शकेल, -------------------

आ. काळजी करू नकोस, प्रवास सुरू झाल्यावर मला -------------------

इ. देशाच्या सीमांचे रक्षण करताना अखंड -------------------

ई. भिकारी समजून कुणीतरी त्याच्यासमोर पैसे टाकले, त्याबरोबर -------------------

उ. कितीही मोठा झाला तरी त्याच्या मनात शाळेसाठी खास -------------------

**ख. कंसात दिलेल्या सूचनांप्रमाणे वाक्यांमध्ये बदल करा.**

उदा॰ मी महाविद्यालयात शेवटच्या वर्षाला असताना 'उन्मेष' या आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत मी लिहिलेल्या एकांकिकेला बक्षीस मिळालं. (दोन वाक्ये करा.)
मी महाविद्यालयात शेवटच्या वर्षाला होतो. त्यावेळी 'उन्मेष' या आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत मी लिहिलेल्या एकांकिकेला बक्षीस मिळालं.

अ. चित्रपटाचं भूत एकदा डोक्यावर बसलं की बाकी काही सुचत नाही. (दोन वाक्ये करा.)

आ. त्या कथेमध्ये काही गाण्यांच्या जागा होत्या. आमची कुठल्याही गीतकाराशी ओळख नसल्याने मीच जमेल ती गाणी लिहायची असं ठरलं. (दोन वाक्यांऐवजी एक वाक्य करा)

इ. वयाच्या तिसऱ्या-चौथ्या वर्षी रुपेरी पडद्याशी ओळख झाली होती. रुपेरी पडद्यावरून आपले सूर उमटावेत अशी तीव्र इच्छा झाली. (ज्या ... त्या वापरा.)

ई. संगीत क्षेत्रात पदार्पण केल्यानंतरही खरी ओढ लागून राहिली ती चित्रपटाचं संगीत करायची. ('पण' वापरा)

उ. महाविद्यालयातलेच मित्र एकत्र आलो आणि एका लहानशा स्टुडियोमध्ये या गाण्यांचं ध्वनिमुद्रण केलं. ('आलो आणि' हे शब्द वगळून एक वाक्य तयार करा.)

**ग. पुढे दिलेली वाक्ये रीती काळाच्या सगळ्या रूपांत लिहा.**

उदा. कमलेशने गाण्यांचं संगीत नियोजन केलं.
कमलेश गाण्यांचं संगीत नियोजन करत असे / करायचा.



अ. आपण नुकतंच आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत सर्वोत्कृष्ट लेखकाचं बक्षीस जिंकलो आहोत, हा अहंभाव माझ्या वाक्यात होता.

आ. मी महाविद्यालयात असताना आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत मला बक्षीस मिळालं.

इ. मी त्याच्या साथीवर ती गाणी गाऊन पाहिली.


ई. जी गाणी लिहिली ती चाल घेऊनच जन्माला आली.

उ. आता त्याच रुपेरी पडद्यावरून आपले सूर उमटावेत अशी तीव्र इच्छा झाली.

**घ. पुढे दिलेल्या शब्दांचा वापर करून आपल्या कल्पनाशक्तीच्या मदतीने एक उतारा तयार करा. लक्षात ठेवा, शब्द ज्या क्रमाने दिले आहेत त्याच क्रमाने ते उताऱ्यात आले पाहिजेत.**

चित्रपट - पटकथा - महाविद्यालय - चित्रपटगृह - शुक्रवार - अतिसामान्य - अहंभाव - ध्वनिमुद्रण - गीतकार - चित्रपटप्रवास - आत्मविश्वास

**च. खालील उतारा वाचा आणि कंसात दिलेले वाक्प्रचारांचे अर्थही लक्षात घ्या.**



आजची ग्राहक सर्वेक्षणाची बैठक माझ्या **डोक्यावरून गेली**. हे कडकेसर आता आमच्या **डोक्यावरच बसले** आहेत. कितीही **डोकेफोड केली** तरी ही टक्केवारी काढणं मला अजिबात जमणार नाही बहुतेक. आज कडकेसरांनी बैठकीत अचानक मला उत्तर विचारल्यावर गोंधळून **डोकं सुन्नच झालं** माझं. माझं नाव तरी मला तेव्हा आठवलं असतं की नाही माहीत नाही. सतत कौतुक करून त्या सोहमला **डोक्यावर बसवलंत** ना! मग विचारा त्यालाच. अतिशहाणा झाला म्हणून आता तोही **डोईजड झाला** ना तुम्हाला! तुमचे वरिष्ठ दररोज तुमच्या **डोक्यावर मिऱ्या वाटत असतील,** म्हणून त्याचा राग आमच्यावर काढणे हा कुठला न्याय?

(डोक्यावरून जाणे = काहीही न समजणे, डोक्यावर बसणे = अनावश्यक अधिकार गाजवणे, डोकेफोड करणे = खूप विचार करणे, डोके सुन्न होणे = धक्का बसल्याने काहीही न सुचणे, डोक्यावर बसवणे = लाडावून ठेवणे, डोक्यावर मिऱ्या वाटणे = एखाद्याला त्रास देणे, डोईजड होणे = एखादी व्यक्ती त्रासदायक होणे)

**आता या वाक्प्रचारांचा स्वतःच्या वाक्यात उपयोग करा.**

## ३ पुढील उतारे वाचून कंसातील क्रियाविशेषणे योग्य जागी लिहा.

**क.** (आपल्याकडे, अखेर, चावडीवर, शिताफीने, मध्यरात्री)

एका श्रीमंत व्यापाऱ्याची फार इच्छा होती, की ---------- चोर शिरावा. आपणच त्याला पकडावे आणि कोतवालाच्या ---------- न्यावे. ---------- त्याची ही इच्छा पूर्ण झाली. एका ---------- त्याच्या खोलीत चोर शिरला. व्यापाऱ्याने त्याला ---------- पकडले. मग त्या दोघांमध्ये असा संवाद झाला.

**ख.** (आजच, कोतवालाकडे, माझ्याकडे, तेव्हापासून, महिन्यापूर्वी, जागेवरच)

व्यापारी - वा वा वा! लहान होतो, ---------- मी या क्षणाची वाट पाहत होतो. आता मी तुला कुठे नेणार आहे, ओळख!

चोर - ----------; आणखी कुठे?

व्यापारी - हुशार आहेस. पण काय रे, तू पहिली चोरी कधी केलीस?

चोर - ---------- केली. तेव्हादेखील असाच ---------- पकडला गेलो. ---------- सुटून आलोय.

व्यापारी - हात् तुझी! बरं, ---------- काय चोरणार होतास ?

चोर - कुठे काय! मी बायकोला भेटायला आलोय.

व्यापारी - कोणाच्या बायकोला?

**ग.** (इथेच, आत, अवेळी, एकट्यानेच, भिंतीवरून, पलीकडे, बाहेरच, सराईतपणे)

चोर - माझ्याच बायकोला भेटायला. ती ---------- कामाला आहे ना!

व्यापारी - अशा ----------?

चोर - संध्याकाळीच आलो; पण तुमचे नोकर ---------- जाऊ देईनात. मग ---------- थांबलो, अंधार पडण्याची वाट पाहिली, ---------- उडी मारली आणि आलो.

व्यापारी - कमाल आहे तुझी! एवढ्या उंच भिंतीवर ---------- चढलास? माझा नाही विश्वास बसत.

चोर - दाखवू का, कसा चढलो ते?

(असे म्हणून चोर ---------- भिंतीवर चढला. त्याने ---------- उडी मारली आणि तो पसार झाला.)

## ४ जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| क) तळी उचलणे | अ) मोठ्या अडचणीत येणे |
| ख) तिखट मीठ लावून सांगणे | आ) गरज आहे तिथे मदत करण्याऐवजी दुसरीकडे मदत करणे |
| ग) दगडाखाली हात सापडणे | इ) अतिशयोक्ती करून सांगणे |
| घ) उथळ पाण्याला खळखळाट फार | ई) झटपट निकाल लावावा, उगाच चर्चा करीत बसू नये |
| च) एक घाव दोन तुकडे | उ) अल्पज्ञानी फार बढाया मारतो |
| छ) आग सोमेश्वरी बंब रामेश्वरी | ऊ) अडचणीच्या वेळी मूर्खांचीही खुशामत करण्याची पाळी येते |
| ज) अडला हरी गाढवाचे पाय धरी | ए) समर्थन करणे |

# उत्तरसंच

## विभाग अ

१. **क.** अ. योग्य आ. अयोग्य इ. योग्य ई. योग्य

**ख.** अ. तीन आ. दोन इ. दोन ई. चार

**ग.** अ. संकलन करणे आ. सुसंगत इ. विचाराधीन ई. बहुउद्देशीय

२. क. ए ख. आ ग. अ घ. ऊ च. उ छ. इ ज. ई

## विभाग ब

१. **क.** अ. चूक आ. चूक इ. बरोबर ई. बरोबर उ. चूक ऊ. चूक ए. बरोबर ॲ. बरोबर

२. **क.** अ. रात्र असली तरी बिबट्याचा हल्ला कधीही होऊ शकेल, जागं राहायला हवं / जागा राहा.

आ. काळजी करू नको, प्रवास सुरू झाल्यावर मला लगेच बसायला जागा मिळाली.

इ. देशाच्या सीमांचे रक्षण करताना अखंड जागं राहायला हवं.

ई. भिकारी समजून कुणीतरी त्याच्यासमोर पैसे टाकले, त्याबरोबर त्याचा स्वाभिमान जागा झाला.

उ. कितीही मोठा झाला तरी त्याच्या मनात शाळेसाठी खास अशी जागा कायमच होती.

२. **ख.** अ. चित्रपटाचं भूत डोक्यावर बसलं होतं. अशावेळी बाकी काही सुचत नाही.

आ. त्या कथेमध्ये काही गाण्यांच्या जागा होत्या, पण आमची कुठल्याही गीतकाराशी ओळख नसल्याने मीच जमेल ती गाणी लिहायची असं ठरलं.

इ. वयाच्या तिसऱ्या-चौथ्या वर्षी ज्या रुपेरी पडद्याशी ओळख झाली होती, त्या रुपेरी पडद्यावरून आपले सूर उमटावे अशी तीव्र इच्छा झाली.

उ. आम्ही महाविद्यालयातल्याच मित्रांनी एकत्र येऊन एका लहानशा स्टुडियोमध्ये या गाण्यांचं ध्वनिमुद्रण केलं.

२. **ग.** अ. आपण नुकतंच आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत सर्वोत्कृष्ट लेखकाचं बक्षीस जिंकलो आहोत, हा अहंभाव माझ्या वाक्यात असे / असायचा.

आ. मी महाविद्यालयात असताना आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत मला बक्षीस मिळत असे / मिळे / मिळायचं.

इ. मी त्याच्या साथीवर ती गाणी गाऊन पाहत असे / पाही / पाहायचो.

ई. जी गाणी लिहिली ती चाल घेऊनच जन्माला येत असत / येत / यायची.

उ. आता त्याच रुपेरी पडद्यावरून आपले सूर उमटावेत अशी तीव्र इच्छा होत असे / होई.

३. **क.** एका श्रीमंत व्यापाऱ्याची फार इच्छा होती, की **आपल्याकडे** चोर शिरावा. आपणच त्याला पकडावे आणि कोतवालाच्या **चावडीवर** न्यावे. **अखेर** त्याची ही इच्छा पूर्ण झाली. एका **मध्यरात्री** त्याच्या खोलीत चोर शिरला. व्यापाऱ्याने त्याला **शिताफीने** पकडले. मग त्या दोघांमध्ये असा संवाद झाला.

**ख.** व्यापारी - वा वा वा! लहान होतो, **तेव्हापासून** मी या क्षणाची वाट पाहत होतो. आता मी तुला कुठे नेणार आहे, ओळख!

चोर - **कोतवालाकडे**; आणखी कुठे?

व्यापारी - हुशार आहेस. पण काय रे, तू पहिली चोरी कधी केलीस?

चोर - **महिन्यापूर्वी**. तेव्हादेखील असाच **जागेवरच** पकडला गेलो. **आजच** सुटून आलोय.

व्यापारी - हात् तुझी! बरं, **माझ्याकडे** काय चोरणार होतास?

चोर - कुठे काय! मी बायकोला भेटायला आलोय.

व्यापारी - कोणाच्या बायकोला?

**ग.** चोर - माझ्याच. ती **इथेच** कामाला आहे ना!

व्यापारी - अशा **अवेळी**?

चोर - संध्याकाळीच आलो; पण तुमचे नोकर **आत** जाऊ देईनात. मग **बाहेरच** थांबलो, अंधार पडण्याची वाट पाहिली, **भिंतीवरून** उडी मारली आणि आलो.

व्यापारी - कमाल आहे तुझी! एवढ्या उंच भिंतीवर **एकट्यानेच** चढलास? माझा नाही विश्वास बसत.

चोर - दाखवू का, कसा चढलो ते?

(असे म्हणून चोर **सराईतपणे** भिंतीवर चढला. त्याने **पलीकडे** उडी मारली आणि तो पसार झाला.)

४. क-ए ख-इ ग-अ घ-उ च-ई छ-आ ज-ऊ

३



# आस नित्य नव्याची

विभाग अ

## १ परीक्षेतील *लेखन* या भागासंबंधी सराव प्रश्न

**उताऱ्यामधील अधोरेखित केलेल्या शब्दांच्या जागी चौकटीत दिलेल्या शब्दांचा वापर करून उताऱ्याचे पुनर्लेखन करा.**

### सरावासाठी उतारा

आज अनेक क्षेत्रांत स्त्रिया विविध पदांवर **कार्यरत** आहेत. वैद्यकीय, अभियांत्रिकी, साहित्य, कला, क्रीडा, शिक्षण, मनोरंजन, वित्त, समाजकारण, राजकारण या **क्षेत्रांबरोबरच** आता सैन्यदलांतही स्त्रियांनी आपला **ठसा उमटवला आहे.** विज्ञान-संशोधन क्षेत्रातही त्या कार्यरत आहेत. परंतु आजही संशोधक, शास्त्रज्ञ असणाऱ्या स्त्रियांची संख्या **तुलनेनं कमी आहे.** १९३४ साली भारतात बंगलोर इथे 'इंडियन ॲकॅडेमी ऑफ सायन्स'ची स्थापना झाली. त्या काळातील प्रसिद्ध वनस्पतीशास्त्रज्ञ आणि मिशिगन विद्यापीठाच्या मानद डॉक्टरेटप्राप्त श्रीमती जानकी अमल ह्या तेव्हापासूनच ॲकॅडेमीच्या फेलो होत्या. केम्ब्रिज विद्यापीठातून डॉक्टरेट **मिळविलेली** पहिली भारतीय महिला अशी **ओळख असणाऱ्या,** भारतातील पहिल्या महिला जीवरसायनशास्त्रज्ञ डॉ॰ कमला सोहोनी या १९३९पासून इंडियन ॲकॅडेमी ऑफ सायन्समध्ये संशोधक म्हणून **काम** करत होत्या. त्यांच्या कामामुळे संशोधन क्षेत्राची दारं स्त्रियांसाठी **खुली** झाली. असं असलं तरी, आजही विशुद्ध विज्ञानात संशोधन करणाऱ्या स्त्रियांची संख्या कमी आहे.



जानकी अमल

बंगलोरच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समधील भौतिकशास्त्रज्ञ प्राध्यापक डॉ॰ रोहिणी गोडबोले यांच्या **मते** आज भारतात विज्ञान शाखेत पदवी व पदव्युत्तर पातळीवर **शिक्षण घेणाऱ्या** स्त्रियांची संख्या जरी खूप असली, तरी पुढे संशोधक म्हणून काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या त्या तुलनेत अत्यल्प आहे. यामागचं कारण शोधण्यासाठी त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी एक **पाहणी केली. त्या सर्वेक्षणात** असं दिसून आलं की, संशोधन क्षेत्रात स्त्रियांचं प्रमाण कमी असण्यासाठी काही प्रमाणात जरी कौटुंबिक कारणं जबाबदार असली, तरी मुख्यत: **सामाजिक** पातळीवर बरेच बदल घडून **येणं आवश्यक** आहे. स्त्रियांचा विज्ञान संशोधनातला **सहभाग वाढला तर** या क्षेत्रात संकल्पनांचे अधिक वैविध्य निर्माण होईल, **त्याचा** स्त्रियांबरोबरच वैज्ञानिक क्षेत्रालाही **लाभ** होईल.



काम नाही... तर भरीव योगदान
डोळ्यांत भरण्याएवढी मिळविणाऱ्या ठरलेल्या संशोधन
खुलं असं वाटतं शिकणाऱ्या पाहणीत समाजात गरज
वाढल्यास त्यामुळे प्रगती

## २ परीक्षेतील *संभाषण* या भागासंबंधी सूचना

**चर्चा करताना :**

- दोघा जणांनी चर्चा करावी. दोघांपैकी एक जण समर्थन करणाऱ्या विधानाच्या बाजूने, तर दुसरा विरोध दर्शविणाऱ्या विधानाच्या बाजूने बोलेल.
- तुम्ही जी बाजू निवडाल त्या बाजूचे समर्थन करा. चर्चेत सहभागी असणाऱ्या व तुमच्या विरोधी विधानाच्या बाजूने बोलणाऱ्या तुमच्या जोडीदाराला तुमच्या विधानांद्वारे स्वत:चे मत पटवून देण्याचा प्रयत्न करा. तुमच्या मताच्या पुष्ट्यर्थ योग्य उदाहरणेही द्या.
- तुमच्या जोडीदाराच्या मतांचे खंडन करा. त्याकरिता पुढे दिलेल्या सूचनांचा व चर्चेसाठी वापरण्यात येणाऱ्या वाक्यरचनांचा उपयोग करा.
- चर्चा करताना वापरल्या जाणाऱ्या विशिष्ट वाक्यरचनांचा सराव करा.

**सूचना**

- तुम्ही परीक्षकासमवेत एखाद्या विवादास्पद विषयावर चर्चा करत आहात. दिलेल्या विषयाचे समर्थन करणारे व विरोध दर्शविणारे असे दोन्ही बाजूंचे मुद्दे मांडणारी विधाने चर्चेत असतील. तुम्ही तुमची भूमिका प्रथम निश्चित करा.
- चर्चेसाठी तुम्ही स्वीकारलेल्या भूमिकेचे तुम्ही प्रभावीपणे समर्थन केले पाहिजे. त्याचबरोबर तुमच्या विरोधी मुद्दे मांडणाऱ्या सहकाऱ्याला तुमचे मुद्दे पटवून देण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न केला पाहिजे.
- जी भूमिका तुम्ही स्वीकारता, ती व्यक्तिगतरित्या तुम्हाला मान्य असलेली भूमिकाच असली पाहिजे असे नाही. परंतु जी भूमिका तुम्हाला ठोसपणे, मुद्देसूदपणे आणि समर्थपणे मांडता येईल तीच भूमिका निवडा.
- प्रक्षोभक आणि डिवचणाऱ्या विधानांना, मुद्द्यांना शांतपणे आणि योग्य प्रकारे सामोरे जा. त्यांचा प्रतिवाद करताना गोंधळून जाऊ नका. तसेच मुद्द्यांची व तुमच्या भूमिकेची गल्लत करू नका.

**१. चर्चेला सुरुवात करताना :**

- आजच्या चर्चेचा विषय आहे ...
- आजच्या चर्चेत मी ... या भूमिकेचे समर्थन करतो.

**२. स्वत:चे मत मांडताना :**

- माझ्या मते ...
- माझ्या दृष्टिकोनातून ...
- मला असं वाटतं की, ...
- मला मान्य आहे की, ...
- माझी खात्री आहे की, ...

**३. दुसऱ्याचे मत विचारताना :**

- ... याचा अर्थ तुमच्या मते काय आहे?
- ... याचं मूल्यमापन तुम्ही कसं करता?
- तुम्ही कसं मानता की, ...
- ... साठी तुमच्या मते सर्वांत महत्त्वाची काय कारणं आहेत?
- ... साठी तुमच्या दृष्टिकोनातून सर्वांत महत्त्वाची कारणं कोणती आहेत?

**४. चर्चेत मध्येच सहभागी होताना :**

- या संबंधात कृपया मला काही सांगायचं आहे.
- मला या संदर्भात आणखी असं म्हणायचं आहे की, ...
- मला याला पुस्ती जोडायचीय की, ...
- तुमच्या बोलण्यात क्षणभर व्यत्यय आणला तर चालेल का?

**५. दुसऱ्याचे मत खोडून काढताना :**

- परंतु मला तर वाटतं की, ...
- माझा दृष्टिकोन पूर्ण वेगळा आहे.
- या मुद्द्याबाबत माझं मत पूर्ण वेगळं आहे.
- मी कल्पनाच करू शकत नाही की, ...
- मला भीती वाटते की, ...
- यावर विचार करण्याची गरज आहे की, ...
- तुमच्या विधानांशी मी सहमत नाही होऊ शकत.
- तुम्ही म्हणता, हे असं असं आहे. पण प्रत्यक्षात मात्र ते अगदी निराळं आहे :
- तुमच्या मताला पुष्टी देणारा आणखी काही (वैज्ञानिक वगैरे) आधार आहे का?
- तुम्हाला खरंच असं वाटतं की, ...
- तुमचे मुद्दे माझ्या लक्षात येत नाहीत.

**६. समर्थन करणारे व विरोध दर्शविणारे मुद्दे मांडताना :**


- एकीकडे तुमचं म्हणणं मी समजू शकतो / शकते, पण दुसरीकडे ...
- ... समर्थन करतो / करते / ... याच्या विरोधात आहे.
- ... हा फायदा आहे, हे मी मान्य करतो / करते. पण तोटेसुद्धा अगदी स्पष्ट आहेत.
- याचे फायदे / तोटे दृष्टिआड करून चालणार नाहीत.

**७. चर्चेसाठी मुद्दे पुढे ठेवताना व त्यांची सुयोग्य मांडणी करताना :**

- यासंबंधी मला काही मुद्दे मांडायचे आहेत : ...
- सर्वप्रथम हे निश्चित केलं पाहिजे की, ...
- त्याशिवाय हेही विचारात घेतलं पाहिजे की, ...
- व्यापक दृष्टिकोनातून पाहिल्यास नक्कीच ...
- ... याचाही समावेश होतो.
- हे लक्षात ठेवलं पाहिजे की, ...
- शास्त्रशुद्ध अभ्यासाने हे सिद्ध केलं आहे की, ...
- अनुभवातून मला माहितेय की, ...

**८. उदाहरणे देताना :**

- मला या अनुषंगाने एक उदाहरण द्यायचंय : ...
- उदाहरण देऊन मला हा मुद्दा स्पष्ट करायचा आहे की, ...



## ३ परीक्षेतील *संभाषण* या भागासंबंधी सराव नमुना प्रश्न

**चर्चेसाठीचा विषय व चर्चा**

***भारतीय विद्यापीठांमध्ये विज्ञान शाखेतील पदव्युत्तर अभ्यासक्रम हे केवळ इंग्रजी भाषेतच चालवले पाहिजेत का?***



या विषयावर तुमच्या सहाध्यायीबरोबर चर्चा करा. पुढे दिलेल्या विधानांपैकी एक विधान समर्थन करणारे तर दुसरे विरोध दर्शविणारे आहे. त्यापैकी कोणतेही एक विधान निवडून तुम्ही निवडलेल्या बाजूचे समर्थन करत चर्चा करा.

| समर्थन करणारे विधान | विरोध दर्शविणारे विधान |
|---|---|
| जवळपास सर्वच वैज्ञानिक संशोधने, शोधनिबंध इंग्रजीत असतात. विद्यार्थ्यांना शास्त्रातील पारिभाषिक संज्ञांचे ज्ञान योग्य रीतीने होणे आवश्यक आहे. जागतिक पातळीवर यशस्वी होण्यासाठीही ते आवश्यक आहे. | विज्ञान संशोधन व लेखनात प्रादेशिक भाषेचा वापर करण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यामुळे प्रादेशिक भाषा ज्ञानभाषा होण्यास हातभार लागेल; तसेच सर्वसामान्य जनतेमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यास त्याचा उपयोग होईल. |

विभाग ब

व्याकरण उजळणी व शब्दसंपदा

## १ पुढील चित्रांसाठी किमान तीन वेगवेगळी विशेषणे निवडा आणि वाक्य तयार करा.

क. नदी ख. डोंगर ग. इमारत घ. वाहन च. रस्ता छ. स्वयंपाकघर ज. कपडे झ. झाड



## २ पुढे काही धातुसाधित विशेषणे दिलेली आहेत. नामानुसार विशेषणाचे योग्य रूप वापरा.

(विझणारा, हरवलेला, बोलका, पिकलेला, उडता, बुडता, पेटता, कमावणारा, फुलणारा, हसरा, वाहता, खाणारा)

उदा. वाऱ्याने **विझणारा** दिवा ती परोपरीने सांभाळत होती.

क. ------------- वासरू काल घरी आले.

ख. तिचा स्वभाव काही खास ------------- नाही.

ग. ------------- पक्षीसुद्धा त्याच्या नजरेतून सुटत नाही.

घ. ------------- मासाही टिपतो तो.

च. ------------- मशाल सेनापतीने हाती धरली होती.

छ. ------------- आंबा त्याच्या सुगंधाने मन ओढून घेतो.

ज. ------------- बाळाला कोण उचलून घेणार नाही?

झ. जरा पुढे गेलात तर एक ------------- झरा दिसेल.

ट. तिच्या घरात ------------- माणसे भरपूर आणि ------------- एकच.

ठ. कोपऱ्यावर एखादे नेहमी ------------- झाड लावायला हवे.

### ३ पुढील उताऱ्यातील विशेषणे लक्षात घ्या आणि त्याऐवजी दुसरी विशेषणे वापरून उतारा पुन्हा लिहा. यासाठी तुम्ही कंसातील विशेषणांची मदत घेऊ शकता. तसेच, उताऱ्यातील एखादे विशेषण पुन्हा दुसऱ्या नामासाठीही वापरू शकता.

(चमचमीत, किंचित, छोट्या, आवडतं, पातळ, डावभर, फक्कड, तळलेल्या, कुरकुरीत, मऊ, खमंग, आगळी, स्वादिष्ट, गरम, शांत, पेरभर, चार, दीड, गरमागरम, भरलेला, चवदार)

आज आईने खमंग चिवडा केला आहे. असा पातळ पोह्यांचा चिवडा मला खूप आवडतो. चुरचुरीत पोहे, त्यात शेंगदाणे, खोबऱ्याचे तळलेले काप, गोड बेदाणे आणि वरून कढीपत्त्याची झणझणीत फोडणी असेल तर चिवड्याला न्यारी चव येते. अशा चविष्ट चिवड्याबरोबर गरमागरम चहाचा कप म्हणजे दुधात साखरच म्हणायची. असा चिवडा-चहा योग कलत्या संध्याकाळी यावा. रेडिओ किंवा मोबाईलवर मधुर गाणं लावावं आणि गॅसवर चहाचं आधण ठेवावं. एवढंसं आलं, दोन काड्या गवती चहा आणि ते नसल्यास फक्त चमचाभर चहापावडर आणि हवी असल्यास चिमूटभर साखर घालावी. चहा मुरेपर्यंत दूध तापवावं आणि बेताच्या ताटलीत कुरकुरीत चिवडा काढावा. मुरलेला चहा, त्यात गरम दूध असा वाफाळता कप आणि सोबत मस्त चिवड्याची ताटली. सुख सुख म्हणतात ते हेच!

### ४ मूळच्या नामांपासून तयार झालेली विशेषणे म्हणजेच नामसाधित विशेषणे. पुढील वाक्यांतील रिकाम्या जागी कंसात दिलेली अशी नामांपासून तयार झालेली विशेषणे निवडा आणि ज्या नामांपासून ती तयार झाली ती नामेही सांगा.

(रुपेरी, खडकाळ, घरगुती, पुणेरी, जांभळे, सोनेरी)

उदा. समुद्रकिनाऱ्यावर रुपेरी (रूपे -चांदी) वाळू पसरली होती.

क. त्या ------------- डोंगरावर गवताचं एक पातं उगवेल तर शपथ!

ख. आजकाल उपाहारगृहात ------------- जेवण मिळेल अशी पाटी असते.

ग. ------------- पगडी हे पुण्याचे खास वैशिष्ट्य!

घ. उगवत्या सूर्यामुळे सर्वत्र ------------- आभा पसरलेली होती.

च. ते ------------- वेष्टण असलेले पुस्तक दे बरे!

## ५ क. पुढील वाक्यांतील विशेषणे ही विशेष्याच्या आधी आली आहेत. ती विशेष्याच्या नंतर येतील अशी वाक्यरचना करा.

उदा. अनेक खेडी नेहमी ताजी व टवटवीत रानफुलांसारखी असतात.
अनेक खेडी नेहमी रानफुलांसारखी **ताजी** व **टवटवीत** असतात.

अ. धान्याचे पीठ होताना जात्याचा सौम्य सूर येतो.

आ. ओसरीच्या अंधारात पिवळट प्रकाश दिसला.

इ. तिथे आईच्या मायेचा मुलायम स्पर्श असतो.

ई. धान्य घातल्यावर आधी जात्याचा भरडा आवाज येतो.



**ख. पुढील वाक्यांत अधोरेखित शब्दांऐवजी कंसात दिलेले शब्द वापरून वाक्य परत लिहा.**

उदा. खेड्यातला दिवस हा जणू आवाजांचे अलंकार लेवून जन्माला येत असतो.
(सुंदर आवाजांची साथ)
खेड्यातला दिवस हा जणू **सुंदर आवाजांची साथ** घेऊन जन्माला येत असतो.

अ. पहाटे या आवाजांनी अर्धवट जाग आलेली असते. (जागे)

आ. खेड्यांवर निसर्गाने सौंदर्याची लयलूट केलेली असते. (भरभरून सौंदर्य बहाल करणे)

इ. या संगीताला आईच्या गळ्यातल्या गोड ओव्यांची साथ दिलेली असते. (गात असते)

## ६ पुढील वाक्यांमध्ये विशेषण-विशेष्य जोड्या वापरल्या आहेत. त्याऐवजी विशेषणांचा नामांसारखा वापर करून वाक्ये पुन्हा लिहा.

उदा. लेखन करणं म्हणजे फक्त पांढऱ्या कागदावर काळ्या शाईने लिहिणं एवढंच आहे थोडंच!
लेखन करणं म्हणजे फक्त **पांढऱ्यावर काळं** एवढंच आहे थोडंच!

क. काळ्या मातीमधून दाणा दाणा उगवायचा पण केला आहे त्याने.

ख. वाईट स्वभावावर चांगल्या स्वभावाचा विजय होतोच.

ग. राज्यात साक्षर व्यक्तींपेक्षा निरक्षर व्यक्तींची संख्या कमी आहे.

घ. जुन्या लोकांची जागा नव्या लोकांनी घ्यायला हवी.



## ७ क. पुढील उताऱ्यातील विशेषणे अधोरेखित करा व आवश्यक तेथे काही विशेषणांचे रूप बदला.

### औदुंबर कवितेचे रसग्रहण

एखाद्या कुशल चित्रकाराने कुंचल्याच्या अवघ्या चार-सहा फटकाऱ्यांसरशी एखादे सुरेख चित्र निर्माण करावे तसे अवघ्या आठ ओळींत बालकवींनी एक सुंदर निसर्गचित्र शब्दांच्या कुंचल्याने या कवितेत रेखाटले आहे. निळीसावळी झरा, शेतमळ्यांची हिरवा गर्दी, पांढरे पायवाट, काळे डोह – मोजक्या रंगांनी

शब्दांच्या चौकटीत बसवलेले हे एक साधी व जिवंत चित्र आहे.

शेतमळ्यांच्या हिरवे गर्दीतून वाहणाऱ्या निळासावळा झऱ्यावरून जी नजर मागे जाते, ती चार घरांचे चिमुकली गाव ओलांडून पैल टेकडीपर्यंत पोहोचते. पुढील दोन ओळींत हिरवी कुरणांमधून काळी डोहापर्यंत आडवेतिडवे जाणारी पांढरे पायवाट दिसते. शेवटच्या दोन ओळींत त्या काळे डोहाच्या लाटांवर गोड कालिमा पसरून जळात पाय टाकून बसलेला औदुंबर दाखवला आहे.

मो॰ रा॰ वाळंबे

**ख. पुढील तीव्रतादर्शक विशेषणांचा वापर खाली दिलेल्या उताऱ्यातून समजून घ्या.**

पांढरा – पांढराफटक, पांढराशुभ्र

निळा – निळाशार, निळाजर्द, निळासावळा

काळा – काळाभोर, काळाकुट्ट, काळाकुळकुळीत

हिरवा – हिरवाजर्द, हिरवाकंच, हिरवागार

पिवळा – पिवळाजर्द, पिवळाधमक

लाल – लालभडक, लालबुंद, लालचुटुक

**ग. पुढील उतारा वाचा.**

**स्वप्न?**

नम्रताचा पांढराशुभ्र वेश तिला अगदी खुलून दिसत होता. पण तरी तिला पाहून भीतीने सुमित्राचा चेहरा पांढराफटक पडला. या वयातही नम्रताचे केस काळेभोर दिसत होते. तिला पाहून भीतीची एक लहर सुमित्राच्या अंगावरून गेली. सगळीकडे पसरला होता फक्त काळाकुट्ट अंधार. तेवढ्यात बाजूच्या हिरव्याजर्द पाण्यात कुणीतरी उडी मारल्याचा आवाज घुमला. ती धावणार तोच काळ्याकुळकुळीत तुळईवरून पिवळाजर्द साप फुत्कारला. ती जागीच थिजून गेली. अचानक हिरव्यागार गवतावरून पिवळेधमक हळदीचे पाय तिच्याकडे येऊ लागले. “कोण आहे?... कोण आहे?” .. ती किंचाळली. हिरव्याकंच पदराचं एक टोक फक्त वाऱ्याने हलत होतं. तिच्या तोंडून आता शब्दही फुटेना. तेवढ्यात लालभडक कुंकवाचं एक कपाळ तिच्यासमोर आलं. तिने भीतीने डोळे बंद करून घेतले. तिला ग्लानी आली. बऱ्याच वेळाने तिला हळूहळू जाग आली. कसलाच आवाज येत नव्हता. तिने डोळे उघडले. सगळं काही शांत झालं होतं. निळंशार आभाळ, निळंसावळं संथ पाणी आणि नाजूक लालचुटुक ओठांमधून येणारी गोड हाक : ‘आई, ऊठ ना!’

**घ. पुढील तीव्रतादर्शक विशेषणांचा स्वतःच्या वाक्यात उपयोग करा.**



काळाकुट्ट अंधार, पांढराफटक चेहरा,
पिवळेधमक सूर्यफूल, लालबुंद टोमॅटो,
हिरवेगार शेत, काळेभोर डोळे,
निळाशार समुद्र, लालभडक कपडे


## ८ कंसात दिलेली विशेषणे आवश्यक तेथे रूपात बदल करून योग्य नामांसाठी वापरा.

(आव्हानात्मक, अग्रगण्य, पहिला, अत्याधुनिक, सर्वांत मोठे, प्रचंड, अनेक)

उदा. भारतीय अंतराळ संशोधन संस्था ही जगातील एक **अग्रगण्य** संशोधन संस्था आहे.

क. आर्यभट्ट हा भारताचा ------------------ उपग्रह १९७५ मध्ये अवकाशात झेपावला.

ख. आज भारत ------------------ अवकाश तंत्रज्ञानामध्ये स्वयंपूर्ण आहे.




ग. भारतीय उपग्रहांचे जाळे हे जगातील ------------- जाळ्यांपैकी एक आहे.

घ. उपग्रहांद्वारे मिळणाऱ्या --------------- माहितीमुळे --------------- क्षेत्रांमधील प्रगतीला हातभार लागला.

च. अंतराळसंशोधन ही शाखा ------------- संशोधनासाठी तरुणांना प्रेरित करते.

## ९ पुढील संवादामध्ये योग्य तेथे तुम्हा, आम्हा, आपणा ही सार्वनामिक विशेषणे वापरा.

**शिक्षिका** - सर्वप्रथम मी (क) ----------------- मुलांचं स्वागत करते. (ख) ----------------- शिक्षकांनी (ग) ------------- मुलांसाठी एक मस्त विनोदी नाटक लिहिलं आहे. त्याची सुरुवात आता वाचू या.

**अमेय** – ताई, (घ) ------------- सर्वांना यात भाग घेता येईल ना?

**शिक्षिका** – हो. (च) ------------- सर्वांना आवडेल हे नाटक. अंजनी, तू पहिला संवाद वाचून दाखव बरं. तुझ्यानंतर सर्व जण आपापले संवाद क्रमाने वाचत जातील.

(शिक्षिका सर्वांना एकेक कागद देतात. अंजनी हातात कागद घेऊन वाचायला सुरुवात करते.)

**अंजनी** – मी हास्यपूरची राणी, इथे उपस्थित (छ) -------------सर्वांचं स्वागत करते.

(शर्वरी पुढे होऊन अमेय आणि अमृतला एकेक अर्धी टोपी घालण्याची कृती करते.)

**अमेय** – हा हा हा! (ज) ------------- सर्वांचे स्वागत टोपी घालून?

**शर्वरी** – हो. आम्ही इथे आलेल्या सर्वांना चांगलीच टोपी घालतो. (झ) ------------- सर्वांची तीच पद्धत आहे.

**अमृत** – हो, पण (ट) -------- सर्वांना टोपीच घालायची तर ती निदान पूर्ण तरी घालावी ना!

**प्रिया** – अहो, काल अर्ध्या दुपारी (ठ) ------------- सर्वांना तुमचा अर्धवट संदेश आला. मग गडबडीत अर्ध्याच टोप्या शिवून झाल्या. पण मी म्हटलं, अशा अर्ध्या टोप्या (ड) ------------- अर्धवटरावांचे स्वागत करायला अगदी योग्यच होतील.

**अमेय** – बरं ते असो. सगळ्यांना टोप्या घालून झाल्या असतील तर (ढ) ------------- सर्वांना तुमच्या हास्यपुरामध्ये एक फेरफटका मारायचा आहे.

**शर्वरी** – अहो, आधी थांबा. (ण) ------------सर्वांसाठी खाऊ म्हणून आम्ही खास भुईमुगाच्या शेंगा आणल्या आहेत.

**अमृत आणि अमेय** – वा वा! आणा इकडे लवकर. आम्हाला भूकच लागली होती. (शेंगा घाईने फोडतात) अरे, यात दाणेच नाहीत. नुसती टरफलं.

**शर्वरी** – अहो, असं कसं म्हणता! आमच्या कष्टांची कदरच नाही बाई! दाणे काढलेल्या अशा चांगल्या शेंगा तुम्हाला द्यायच्या, म्हणून सकाळपासून आम्ही किती कष्टाने दाणे काढले आहेत या टरफलातून. याचं काहीच कौतुक नाही.

**अमृत** – (डोक्यावर हात मारून) बाप रे! आता टरफले खावी लागतील की काय? मला वाटतं, आता (त) ------------- सर्वांनी लवकरात लवकर हा हास्यपूरचा दौरा अर्धवट ठेवून पळावं हेच बरं.

(अमेय आणि अमृत पळून जातात.)

## १० पुढील वाक्यांतील अर्थ लक्षात घेऊन अधोरेखित शब्दांऐवजी कंसातील शब्द, वाक्प्रचार वापरा.

(विकोपाला जाणे, पसार होणे, वधारणे, पडताळणी करणे, दिरंगाई करणे, अचंबित होणे, वाळून ठेवणे, गाशा गुंडाळणे, बस्तान बसवणे, वाळीत टाकणे, वक्रदृष्टी होणे)

उदा. बारावीच्या निकालाचा टक्का या वर्षी गेल्या वर्षीच्या तुलनेत वाढला.
बारावीच्या निकालाचा टक्का या वर्षी गेल्या वर्षीच्या तुलनेत **वधारला**.

क. राज्यातील सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष यांच्यातील संघर्ष टोकाला गेला.

ख. ग्राहकांच्या आंदोलनानंतर पथारी व्यावसायिकांनी पदपथावरची जागा सोडली.

ग. विनाकारण कुरबुरी करणाऱ्या सदस्यांवर अध्यक्षांची अवकृपा झाली नाही तरच नवल.

घ. कार्यालयात महत्त्वाचा व्यापारी करार करण्यासाठी आलेल्या प्रमुखांना चक्क कार्यालय बंद दिसल्याने ते आश्चर्यचकित झाले.

च. भांडखोर स्वभावामुळे रमेशच्या कुटुंबाशी गाववाल्यांनी संबंध तोडला.

छ. कागदपत्रांच्या छायाप्रतींची पूर्ण तपासणी केल्याशिवाय वाहन परवाना मिळत नाही.

ज. वाहतुकीच्या व्यवसायात आता तो चांगलाच स्थिरावला आहे.

झ. कामगारांची बाजू घेत असल्याने आपल्या नोकरीबाबत पुढे काय घडणार आहे याची कल्पना श्रीरामला लवकरच आली.

ट. गंभीर आजारी व्यक्तींवरच्या उपचाराला उशीर करून चालत नाही.

ठ. कार्यक्रमानंतर ऐच्छिक देणगी देण्यासाठी कुणी थांबले नाही. सगळे तिथून नाहीसे झाले.

## उत्तरसंच

### विभाग अ

१. आज अनेक क्षेत्रात स्त्रिया विविध पदांवर **काम करतात**. वैद्यकीय, अभियांत्रिकी, साहित्य, कला, क्रीडा, शिक्षण, मनोरंजन, वित्त, समाजकारण, राजकारण या **क्षेत्रांतच नाही तर** आता सैन्यदलांतही स्त्रियांनी **भरीव योगदान** दिलं आहे. परंतु आजही संशोधक, शास्त्रज्ञ असणाऱ्या स्त्रियांची संख्या **डोळ्यांत भरण्याएवढी नाही**. १९३४ साली भारतात बंगलोर इथे इंडियन ॲकॅडमी ऑफ सायन्सची स्थापना झाली. त्याकाळातील प्रसिद्ध वनस्पतीशास्त्रज्ञ मिशिगन विद्यापीठाच्या मानद डॉक्टरेट श्रीमती जानकी अमल ह्या तेव्हापासूनच ॲकॅडमीच्या फेलो होत्या. केम्ब्रिज विद्यापीठातून डॉक्टरेट **मिळविणाऱ्या** पहिल्या भारतीय महिला आणि भारतातील पहिल्या महिला जीवरसायनशास्त्रज्ञ **ठरलेल्या** डॉ॰ कमला सोहोनी या १९३९पासून इंडियन ॲकॅडमी ऑफ सायन्समध्ये **संशोधन** करत होत्या. त्यांच्या कामामुळे संशोधनक्षेत्र स्त्रियांसाठी **खुलं** झालं. असं असलं तरी आजही विशुद्ध विज्ञानात संशोधन करणाऱ्या स्त्रियांची संख्या कमी आहे.

बंगलोरच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समधील भौतिकशास्त्रज्ञ प्राध्यापक डॉ॰ रोहिणी गोडबोले **यांना असं वाटतं की**, आज भारतात पदवी, पदव्युत्तर पातळीवर विज्ञान शाखेत **शिकणाऱ्या** स्त्रियांची संख्या जरी खूप असली तरी पुढे संशोधक म्हणून काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या त्या तुलनेत अत्यल्प आहे. यामागचं कारण शोधण्यासाठी त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी **केलेल्या पाहणीत** असं दिसून आलं की, संशोधन क्षेत्रात स्त्रियांचं प्रमाण कमी असण्यासाठी काही प्रमाणात जरी कौटुंबिक कारणं जबाबदार असली तरी मुख्यत: **समाजात** बरेच बदल घडून **येण्याची गरज** आहे. स्त्रियांचा विज्ञान संशोधनातला **सहभाग वाढल्यास** या क्षेत्रात संकल्पनांचे अधिक वैविध्य निर्माण होईल, **त्यामुळे** स्त्रियांबरोबरच वैज्ञानिक **क्षेत्राचीही प्रगती** होईल.

### विभाग ब

१. क. **नदी** खळखळणारी, विशाल, वाहती, लहान, फेसाळती
   ख. **डोंगर** उंच, खडकाळ, हिरवागार, भलामोठा
   ग. **इमारत** बहुमजली, नवीन, रंगीत, जुनी, असुरक्षित, मोडकळलेली, भेगाळलेली
   घ. **वाहन** चारचाकी, दुचाकी, सार्वजनिक, मोडके
   च. **रस्ता** वाहता, गर्दीचा, खड्डेमय, चिखलाचा, जवळचा
   छ. **स्वयंपाकघर** लहानसे, मोठे, स्वच्छ, ऐसपैस, रंगवलेले
   ज. **कपडे** नीटनेटके, अस्वच्छ, अव्यवस्थित, सैल, तंग, फाटके, शिवलेले, मळके
   झ. **झाड** डेरेदार, खुरटे, सुकलेले, सावलीचे, फळांचे, आंब्याचे

२. क. हरवलेले वासरू काल घरी आले.
 ख. तिचा स्वभाव काही खास बोलका नाही.
 ग. उडता पक्षीसुद्धा त्याच्या नजरेतून सुटत नाही.
 घ. बुडता मासाही टिपतो तो.
 च. पेटती मशाल सेनापतीने हाती धरली होती.
 छ. पिकलेला आंबा त्याच्या सुगंधाने मन ओढून घेतो.
 ज. हसऱ्या बाळाला कोण उचलून घेणार नाही?
 झ. जरा पुढे गेलात तर एक वाहता झरा दिसेल.
 ट. तिच्या घरात खाणारी माणसे भरपूर आणि कमावणारे एकच.
 ठ. कोपऱ्यावर एखादे नेहमी फुलणारे झाड लावायला हवे.

३. आज आईने चमचमीत चिवडा केला आहे. असा तळलेल्या पोह्यांचा चिवडा मला खूप आवडतो. कुरकुरीत पोहे, त्यात शेंगदाणे, खोबऱ्याचे पातळ काप, मऊ बेदाणे आणि वरून कढीपत्त्याची खमंग फोडणी असेल तर चिवड्याला आगळी चव येते. अशा स्वादिष्ट चिवड्याबरोबर गरम चहाचा कप म्हणजे दुधात साखरच म्हणायची. असा चिवडा-चहा योग शांत संध्याकाळी यावा. रेडिओ किंवा मोबाईलवर आवडतं गाणं लावावं आणि गॅसवर चहाचं आधण ठेवावं. पेरभर आलं, चार काड्या गवती चहा आणि ते नसल्यास फक्त दीड चमचा चहापावडर आणि हवी असल्यास किंचित साखर घालावी. चहा मुरेपर्यंत दूध तापवावे आणि बेताच्या ताटलीत डावभर चिवडा काढावा. फक्कड चहा, त्यात गरमागरम दूध असा भरलेला कप आणि सोबत चवदार चिवड्याची ताटली. सुख सुख म्हणतात ते हेच!

४. क. त्या खडकाळ (खडक) डोंगरावर गवताचं एक पातं उगवेल तर शपथ!
 ख. आजकाल उपाहारगृहात घरगुती (घर) जेवण मिळेल अशी पाटी असते.
 ग. पुणेरी (पुणे) पगडी हे पुण्याचे खास वैशिष्ट्य!
 घ. उगवत्या सूर्यामुळे सर्वत्र सोनेरी (सोने) आभा पसरलेली होती.
 च. ते जांभळे (जांभूळ) वेष्टण असलेले पुस्तक दे बरे!

५. **क** अ. धान्याचे पीठ होताना जात्याचा सूर **सौम्य** येतो.
 आ. ओसरीच्या अंधारात प्रकाश **पिवळट** दिसला.
 इ. तिथे आईच्या मायेचा स्पर्श **मुलायम** असतो.
 ई. धान्य घातल्यावर आधी जात्याचा आवाज **भरडा** येतो.

५. **ख.** अ. पहाटे या आवाजांनी अर्धवट **जागे** झालेलो असतो.
 आ. खेड्यांना निसर्गाने **भरभरून सौंदर्य बहाल केलेले** असते.
 इ. या संगीताबरोबर आई गळ्यातल्या गोड ओव्या **गात असते.**

६. क. काळीमधून दाणा दाणा उगवायचा पण केला आहे त्याने.
 ख. वाईटांवर चांगल्यांचा विजय होतोच.
 ग. राज्यात साक्षरांपेक्षा निरक्षरांची संख्या कमी आहे.
 घ. जुन्यांची जागा नव्यांनी घ्यायला हवी.

७. एखाद्या कुशल चित्रकाराने कुंचल्याच्या अवघ्या चार-सहा फटकाऱ्यांसरशी एखादे सुरेख चित्र निर्माण करावे तसे अवघ्या आठ ओळींत बालकवींनी एक सुंदर निसर्गचित्र शब्दांच्या कुंचल्याने या कवितेत रेखाटले आहे. निळासावळा झरा, शेतमळ्यांची हिरवी गर्दी, पांढरी पायवाट, काळा डोह – मोजक्या रंगांनी शब्दांच्या चौकटीत बसवलेले हे एक साधे व जिवंत चित्र आहे.

शेतमळ्यांच्या हिरव्या गर्दीतून वाहणाऱ्या निळ्यासावळ्या झऱ्यावरून जी नजर मागे जाते, ती चार घरांचे चिमुकले गाव ओलांडून पैल टेकडीपर्यंत पोहोचते. पुढील दोन ओळींत हिरव्या कुरणांमधून काळ्या डोहापर्यंत आडवीतिडवी जाणारी पांढरी पायवाट दिसते. शेवटच्या दोन ओळींत त्या काळ्या डोहाच्या लाटांवर गोड काळिमा पसरून जळात पाय टाकून बसलेला औदुंबर दाखवला आहे.

८. क. आर्यभट्ट हा भारताचा पहिला उपग्रह १९७५मध्ये अवकाशात झेपावला.

ख. आज भारत अत्याधुनिक अवकाश तंत्रज्ञानामध्ये स्वयंपूर्ण आहे.

ग. भारतीय उपग्रहांचे जाळे हे जगातील सर्वांत मोठ्या जाळ्यांपैकी एक आहे.

घ. उपग्रहांद्वारे मिळणाऱ्या प्रचंड माहितीमुळे अनेक क्षेत्रांमधील प्रगतीला हातभार लागला.

च. अंतराळसंशोधन ही शाखा आव्हानात्मक संशोधनासाठी तरुणांना प्रेरित करते.

९. क. तुम्हा ख. आम्हा ग. तुम्हा घ. आम्हा च. तुम्हा छ. आपणा / तुम्हा
ज. आम्हा झ. आम्हा ट. आम्हा ठ. आम्हा ड. तुम्हा ढ. आम्हा
ण. तुम्हा त. आपणा

१०. क. राज्यातील सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष यांच्यातील संघर्ष **विकोपाला गेला.**

ख. ग्राहकांच्या आंदोलनानंतर पथारी व्यावसायिकांनी पदपथावरून **गाशा गुंडाळला.**

ग. विनाकारण कुरबुरी करणाऱ्या सदस्यांवर अध्यक्षांची **वक्रदृष्टी झाली नाही** तरच नवल.

घ. कार्यालयात महत्त्वाचा व्यापारी करार करण्यासाठी आलेल्या प्रमुखांना चक्क कार्यालय बंद दिसल्याने ते **अचंबित झाले.**

च. भांडखोर स्वभावामुळे रमेशच्या कुटुंबाला गाववाल्यांनी **वाळीत टाकले.**

छ. कागदपत्रांच्या छायाप्रतींची योग्य **पडताळणी केल्या**शिवाय वाहन परवाना मिळत नाही.

ज. वाहतुकीच्या व्यवसायात आता त्याने चांगलेच **बस्तान बसवले आहे.**

झ. कामगारांची बाजू घेत असल्याने आपल्या नोकरीबाबत पुढे **काय वाढून ठेवले आहे** याची कल्पना श्रीरामला लवकरच आली.

ट. गंभीर आजारी व्यक्तींवरच्या उपचाराला **दिरंगाई करून** चालत नाही.

ठ. कार्यक्रमानंतर ऐच्छिक देणगी देण्यासाठी कुणी थांबले नाही. सगळे तिथून **पसार झाले.**

४



# कोणे एके काळी

विभाग अ

## १ परीक्षेतील *वाचन* भागासंबंधी सराव नमुना प्रश्न

**वाचन प्रश्न : पुढे एका उताऱ्यातील परिच्छेद दिले आहेत. दिलेल्या १० विधानांपैकी ८ विधाने ८ परिच्छेदांतील आशयाशी जुळणारी आहेत. २ विधाने न जुळणारी आहेत. योग्य ते विधान योग्य त्या परिच्छेदाबरोबर जुळवा.**

**उदाहरणादाखल एक विधान एका परिच्छेदाशी जुळवून दाखवले आहे.**

### वाडा

***आयुष्यातील पहिली काही वर्षे जिथे गेली ते पारवा या गावातील घर पुन्हा पाहावे या ओढीने लेखक महेश एलकुंचवार अनेक वर्षांनी आपल्या भावाबरोबर गावी पोहोचले. ते घर पाहताना लेखकाच्या मनात लहानपणाच्या दाटून आलेल्या आठवणी वाडा या उताऱ्यातील परिच्छेदांत वाचायला मिळतात.***



**विधान - ठ.** *घर आणि घराचा परिसर एखाद्या शांत स्वप्नाप्रमाणे दिसत होता.*

**परिच्छेद ऐ**

एखादे स्वप्न गोठून तसेच राहावे तसे ते घर व अवतीभोवतीचा परिसर अडतीस वर्षे जणू माझी वाट पाहत होता. अवतीभवती कोणी नव्हते. तळ्यातल्या प्रतिबिंबासारखे ते दृश्य शांत, स्तब्ध, स्वप्नवत वाटत होते. काही क्षण आम्ही गाडीत तसेच बसले राहिलो व मग दीर्घ श्वास घेऊन गाडीबाहेर येऊन पाहू लागलो. दोन अडीच हजार वस्तीचे गाव. भर दुपारी दोनची वेळ – सर्व माणसे आपापल्या कवाडांआड विश्रांती घेत असणार – त्यामुळे गाव विलक्षण शांत होते. माझे भाऊ सोडले तर माझी व माझ्या घराची पुनर्भेट पाहायला दुसरे कोणीही नव्हते. त्या परिसराच्या आतुर ओंजळीत आपण अलगद उडी घेतली आहे व त्यानेही मला हलकेच झेलून माझ्याभोवती कमळासारख्या पाकळ्या अलगद मिटून घेतल्या आहेत असा मन भरून येणारा भास मला झाला व मला बोलवेना. वाटले, आता दारावर थाप मारायचा अवकाश, की चेहऱ्यावर आनंद मावेनासा झालेली आई लगबगीने येऊन दार उघडेल.

**विधाने**

क. घर आणि सभोवतालचा परिसर जसाच्या तसा होता.
ख. आठवणीतले घर म्हणजे फक्त हेच घर.
ग. घर सोडण्याच्या आठवणी जाग्या होण्यापूर्वीच मी तो कप्पा मिटला.
घ. माझी कुसुमाग्रजांशी या घरी प्रत्यक्ष भेट झाली होती.
च. वडलांच्या अनेक गुणांची आठवण झाली.
छ. घराच्या परिसरात काही पडझड झाली होती तर काही भागात बदल झाला होता.
ज. स्वयंपाकघरातला तो विशिष्ट वास मला पुन्हा आला.
झ. माझा वाचनाचा छंद इथेच बहरला.
ट. झोपाळ्यावरच्या अनेक आठवणींनी गर्दी केली.
ठ. घर आणि घराचा परिसर एखाद्या शांत स्वप्नाप्रमाणे दिसत होता.

**परिच्छेद अ**

---------------------------------------------------------------------------------------------------

मग स्वतःला सावरून मी अवतीभवती पाहिले व मला चमत्कार वाटला. भावंडांच्या सांगण्यावरून खूप पडझड पाहण्याची तयारी करून मी आलो होतो. डॉक्टर पडाळकरांचे घर पूर्ण पडले. कासलीकरांचे घर पूर्ण पडले. विहिरीजवळची इंग्रजी चिंचांच्या झाडांची वीतभर खूण उरलेली नाही, अशा बातम्या त्यांनी मला दिल्या होत्या आणि मी पाहत होतो की डॉक्टर पडाळकरांच्या घराच्या जागी तसलेच एक घर उभे आहे. कासलीकरांच्या घराजागी नवीन भाग बांधला आहे. चिंचेचे वृक्ष होते तिथेच आता गुलमोहराची तितकीच डौलदार झाडे होती व अगदी समोर प्रयागराव देशमुखांचा वाडा तर एखाद्या त्रिकालाबाधित सत्यासारखा जसाच्या तसा उभा होता. इतका की, त्यातून कोणत्याही क्षणी रमाकांत म्हणून त्यांचा भाचा, जो माझा मित्र होता तो, दप्तर घेऊन बाहेर येईल असे मला वाटले. बदल होता तो अगदी थोडा – जवळजवळ नाहीच. हे कसे झाले? मी कधीतरी येणार म्हणून हे घर, हा परिसर माझ्यासाठी जसाच्या तसा राहिला व माझी इतकी वर्षे मूक प्रतीक्षा करीत राहिला अशी एक कल्पना मनात आली व त्या कल्पनेने अंगावर रोमांच उठले. [...]

**परिच्छेद आ**

---------------------------------------------------------------------------------------------------

मी घरात शिरलो म्हणण्यापेक्षा चाळीस वर्षे मागे टाकून पुन्हा बालपणात गेलो. मी मागच्या दाराने शिरून आधी स्वयंपाकघराशी आलो. त्याच्या भिंती वाढवून ते थोडे मोठे केलेले दिसले. इथे एक जाळीचे कपाट भिंतीत – त्यात दूधदुभते असे. त्याच्या दारांचा सुळसुळीत ओशट स्पर्श माझ्या हातांना जाणवला. ह्याच्याचसमोर देवाचा कोनाडा व जरा पलीकडे चूल, उदबत्ती, कापूर, शिजणारे अन्न व दूधदुभत्याचा संमिश्र गंध स्वयंपाकघरात नेहमी तरंगत असे. तो मला आजही अगदी स्पष्टपणे आला. प्रत्येक घराला त्या त्या घराचा म्हणून एक विशिष्ट वास, गंध असतो. तसेच नुसत्या आठवणीने कित्येक गंध आपण पुन्हा अनुभवतो ते काही फक्त मानसिक पातळीवर नाही, तर तो अगदी खरा, शारीरिक अनुभव असतो. गेल्या अडतीस वर्षांत त्या स्वयंपाकघरात अन्न शिजले नसणार की उदबत्ती लागली नसणार. पण मला आला तो वास मात्र अगदी खरा होता.

**परिच्छेद इ**

मग आतल्या अंगणात गेलो. आमच्या घरामधे व शेजारच्या घरामधे मातीची भिंत होती; ती पडलेली दिसली. कढीलिंबाचे झाडपण नाही. त्याची लालसर करवंदासारखी फळे बहिणी केसांमध्ये माळत. त्याच्यासमोर तुळशीवृंदावन होते तेही नाही व बाजूलाच तीसचाळीस गुलाबाच्या कुंड्या होत्या, त्याही नाहीत. गुलाबांची निगा वडील स्वतः जातीने राखत. हे काम नोकरांवर त्यांनी कधी सोपवले नाही. खूप वर्षांनी मला वडलांची तीव्रतेने आठवण झाली. हातातल्या पंपाने गुलाबांवर फवारा मारताना ते मला दिसले. त्यांना किती गोष्टींत रस होता, व किती गोष्टी येत होत्या! ते अत्तरे, सुगंधी तेले करीत. त्यांना उत्तम रत्नपरीक्षा होती. माझ्या डोळ्याला भिंग लावून तळहातावरचा हिरा मग अंगठा व तर्जनीमधे घेऊन गोलगोल फिरवत कसा पारखायचा ते मला त्यांनी एकदा दाखवल्याचे आठवले. ह्याच अंगणात गोवऱ्यांचे जगरे लावून परातीत केक भाजली जाई ती त्यांच्या सूचनांनुसार. अंडे नसलेली ती गावठी केक. पुढे अगदी 'ला पातिसेरी' मधल्या व युरोपात तर किती प्रकारच्या डोळ्यांना सुखावणाऱ्या, जिभेवर विरघळणाऱ्या केक्स व पेस्ट्रीज खाल्ल्या. पण आता पुन्हा नाकाशी दरवळत आला तोच तपकिरी रंगाचा घरगुती खमंग वास.



**परिच्छेद ई**




अंगण ओलांडून आतल्या ओसरीत आलो. इथे झोपाळा होता. विलक्षण गोड आवाजाची माझी चुलतबहीण इथे बसून कधी गाणे म्हणे तेव्हा सगळे घर तर स्तब्ध होईच, पण रस्त्याने जाणारेयेणारेसुद्धा खिळल्यासारखे तिथल्यातिथे थांबत. नवे कापडचोपड उलगडून सगळ्यांना दाखवले जायचे, ते ह्याच झोपाळ्यावर. उन्हाळ्याच्या सुटीत गेलो असता पहाटे चारला उठवून कंदिलाच्या मंद प्रकाशात वडिलांनी मला गीतेचे अध्याय शिकवले, ते ह्याच झोपाळ्यावर. बाराव्या अध्यायातल्या 'क्लेशोऽधिकतरस्तेषाम्' ह्या श्लोकापाशी मी कारण नसताना वारंवार अडायचो आणि वारंवार मला ते सगळा अध्याय पहिल्यापासून म्हणायला लावायचे. मला एक कधी कळले नाही – आम्हां पाच भावंडांपैकी इतर कोणालाही त्यांनी कधी काही शिकवल्याचे आठवत नाही. पण मी सुटीत आलो की गीता माझ्या एकट्याच्या बोकांडी बसायचीच. [...]

**परिच्छेद उ**



इथून वर जायला लाकडी जिना. तो होता तसा होता. काही खोडी केली म्हणून माझे व धाकट्याचे हात मोठ्या भावाने ह्या कठड्याला बांधले होते व आम्ही बेशरमासारखे हसत होतो. त्या जिन्याने मी वर गेलो व सुटीनंतर पारवा सोडण्याचा व आपल्याच घरचे पाहुणपण संपण्याचा दिवस जवळ आला, म्हणजे खिन्न होऊन ज्या खिडकीतून मी बाहेर दूरवर दिसणाऱ्या आम्रवृक्षांवर नजर लावत असे, त्या खिडकीशी गेलो व पाहिले. आंब्याची ती झाडे अजून होती. ती ओळखीचे हसली व लहानपणच्या उदासीची लाट पुन्हा जागी होऊन अंगावर येणार असे वाटल्याबरोबर मी बाजूला झालो.

**परिच्छेद ऊ**



इथे एक सुंदर नक्षीदार छप्परपलंग तेव्हा होता. बाजूला पुस्तकांचे कपाट. त्यात मला न कळणारे अनेक इंग्लिश व संस्कृत ग्रंथ होते. बाजूलाच 'वसंत' मासिकाचे जुने गठ्ठे असत. ते उपसून त्यांतल्या कथा वाचताना माझे वेळकाळाचे भान हरपत असे. पु॰ भा॰ भाव्यांची 'वैरी' कथा मी इथेच वाचली. ती लक्षात राहिली, कारण त्यातल्या लहान मुलाशी मी अगदी एकरूप व्हायचो वाचताना. आणखी वि॰ वा॰ शिरवाडकरांची 'अगतिक' नावाची कथा आठवते. (ती त्यांना आठवत असेल का?) कुसुमाग्रज मला दहावीअकरावीत कवितेची गोडी लागल्यावर भेटले. आधी भेटले ते शिरवाडकरच. मी अवतीभोवती, वर पाहिले. त्याच तुळया, कदाचित तीच कौले. ह्या छतावर बागेतला मोर कधीकधी उडून यायचा व मग मींड घेतल्यासारखा खाली तरंगत उतरायचा. त्याची अगदी अंधूक आठवण मला आहे. मी पहिला शब्द उच्चारला तो 'मोऽ' असे आई म्हणायची. रात्री केका कानांवर पडल्याबरोबर अंथरुणात उठून बसून मी 'मोऽ मोऽ' केल्याची आठवण ही माझी आयुष्यातली सर्वात पहिली आठवण. तेव्हा मी दीड वर्षाचा असणार. त्याआधीचे काहीच आठवत नाही व नंतर विसरावे असे पुष्कळच आहे.

**परिच्छेद ए**

आम्ही खाली आलो. इकडेतिकडे फिरून बाहेरच्या ओसरीत येऊन गावात फेरफटका मारायला निघालो. गावाला निघालो की आई ह्याच ओसरीत आम्हांला मूकपणे निरोप देत असे. हे तिने शेवटपर्यंत केले. शिरपूरला तर सर्व घर, ओसऱ्या, अंगण ओलांडून, दिंडीदरवाजा पार करून मी दिसेनासा होईपर्यंत ती स्तब्धपणे पाठमोऱ्या माझ्याकडे पाहत राहत असे. निरोप देणारे तिचे डोळे माझ्या पाठीला कायमचे चिकटले आहेत.

आज त्या ओसरीत निरोप द्यायला कुणी नव्हते. संबंध संपला. साठसत्तर वर्षांचे जुने घर. किती घटना ह्या घरात घडल्या! त्यांतल्या फार थोड्या घटनांचा मी भागीदार व साक्षीदार होतो. मी इथे नसताना इथे काय

काय घटना घडल्या असतील? चांगल्या, वाईट. माझी आठवण या घरात निघत असेल का? माझे नाव माझ्या पश्चात प्रेमाने, काळजीने उच्चारले जात असेल? असेलच. ते क्षण कुठे आहेत? त्या घरात कुठेतरी ते रेंगाळत आहेत व आपण आपल्या मुठीत त्यांना पकडून आणायला हवे होते अशी वेडी कल्पना मनात आली व मग हसू आले. संपले ते सगळे. [...]

आयुष्यात इतक्या घरांमधून निवास केला. प्रत्येकाची आठवण वेगळी आहे. पण घर म्हटले की हेच आठवत असे. ते आता उरले नाही. वडील गेले. मग आई गेली. आता घर.

महेश एलकुंचवार

**शब्दार्थ :**

कवाड = दार

तर्जनी = अंगठ्याशेजारचे हाताचे बोट

ला पातिसेरी = केक व त्यासारख्या पदार्थांचे दुकान

त्रिकालाबाधित = कधीही न बदलणारे

जगरे = निखाऱ्यांचा, पेटत्या गोवऱ्यांचा ढीग



## २ लेखन या भागासंबंधी सराव नमुना प्रश्न

**मराठी लेखनविषयक काही महत्त्वाचे नियम**

**१. एकाक्षरी शब्दांसह सर्व मराठी शब्दांच्या शेवटी येणारा इकार किंवा उकार दीर्घ लिहावा. (अपवाद - आणि, नि, परंतु)**

उदा॰ आई, वाटी, टोपी, चेंडू, गिरणी, सुपारी, मी, ही, तू, धू

**२. मराठी शब्दांतील अकारांतापूर्वीचे इकार व उकार दीर्घ असतात. (अपवाद - गुण, विष, मुख, कुसुम, मधुर असे काही संस्कृत भाषेमधून मराठीत आलेले शब्द)**

उदा॰ खीर, पीठ, फूल, सून, गरीब, विहीर, बहीण

**३. मराठी शब्दांतील अकारांतापूर्वीचे इकार व उकार दीर्घ असले तरी त्याचे सामान्यरूप करताना ते ऱ्हस्व लिहावे.**

उदा॰ खिरीला, पिठात, फुलाला, सुनेला, गरिबाला, विहिरीत, बहिणीला

**४. मराठी शब्दांतील अंत्य (शेवटचे) अक्षर दीर्घ असेल तर उपांत्य अक्षर ऱ्हस्व असते व अंत्य (शेवटचे) अक्षर ऱ्हस्व असेल तर उपांत्य अक्षर दीर्घ असते. (अपवाद - गुण, विष, मुख, कुसुम, मधुर असे काही संस्कृत भाषेमधून मराठीत आलेले शब्द)**

उदा॰ पाहिजे – जे – दीर्घ – हि – ऱ्हस्व, लिहिले – ले – दीर्घ – हि - ऱ्हस्व

पाहील – ल – ऱ्हस्व – ही – दीर्घ, लिहील – ल – ऱ्हस्व – ही – दीर्घ

**लेखनाचे नियम लक्षात घेऊन खालील उताऱ्याचे मुद्रितशोधन करा.**

### निसर्ग आणि उत्सव



कुठल्याहि विशिष्ट देवतेचि पूजा नाही, कुठल्याही एका धमाचा-पंथाचा संबंध नाहि असे केवळ निर्सर्गप्रवण उत्सव आपल्या भारतीय परंपरेत सर्वांत ज्यास्त आहेत. वेगवेगळ्या ऋतूंचे उत्सव आहेत. कोजागिरी पौर्णिमेची कोणी विशिष्ट उपास्य देवता नाही, तरि या शरद ऋतूतील चांदण्याला आपल्या सामाजिक जीवनात मोठे स्थान आहे. वसंत ऋतूचे आगमन सांगणारा वसंतपंचमीचा उत्सव आहे. पंजाबात लोकप्रिय असणारा भांगडा आहे. ज्या वेळेला थंडीचा शेवट होतो आणी वसंत ऋतूचा प्रारंभ होतो, त्या वेळेला उफाळून येणारा ती सहज आविष्कार आहे. होळी हे आपला उत्सवसुद्धा वसंत ऋतूचा प्रारंभ आणि थंडीची सांगता व्यक्त करण्यासाठी आपण साजरा करतो. सूर्याचे राशीभ्रमण दर्शवणारा मकरसंक्रांतीचा



म्हणजेच; रथसप्तमीचा उत्सव आहे कीवा सूर्य लवकर मावळणार म्हणून दिव्याची अमावास्या आहे. हे सगळी उत्सव भारतीय परंपरेमध्ये खोल रुजलेले आहेत. आपले निसर्गाशि, ऋतुचक्राशि, हवामानाशि, चंद्राच्या कलांशी असणारे नाते या उत्सवांमधून आपण व्यक्त करतो.

माधवराव चितळे



विभाग ब

## १ काळ – एक कल्पना



वर्षाचे दिवस तीनशेपासष्ट. प्रत्येक दिवसाला कालगणनेप्रमाणे एक दिनांक अथवा तारीख निर्दिष्ट असते. मोठ्या शहरांमध्ये तरी चालू शालिवाहन शक कोणता आणि आजची तिथी कोणती असं विचारलं तर दिनदर्शिका पाहिल्याशिवाय फारसं कुणाला सांगता येईल, असं मला वाटत नाही. मात्र जर तारीख विचारली तर ती एकूणएकांना माहीत असते. त्यातून काही तारखा तर वर्षभर चातकासारखी वाट पाहावी अशा – २६ जानेवारी, १५ ऑगस्ट, २ ऑक्टोबर. निदान सार्वजनिक सुटीचे दिवस म्हणून तरी हे दिनांक सर्वांना तोंडपाठ असतात. मकरसंक्रांत नेमाने १४ जानेवारीला येते म्हणून ती तारीखही लक्षात राहणारी. १ एप्रिल चकव्याचा दिवस म्हणून ध्यानात राहतो. मित्रमंडळीत फसगंमत करायला ऊत येतो त्या दिवशी. २५ डिसेंबर नाताळचा दिवस म्हणून संस्मरणीय. १ जानेवारी 'न्यू इयर डे' म्हणून महत्त्वाचा. फार फार तर ३० जानेवारी आणि १ ऑगस्ट या महापुरुषांच्या पुण्यतिथी म्हणून आठवणीत असतात. सर्वसामान्यांच्या स्मरणात पक्के रूतून बसलेले हे काही तिथीविशेष. ही यादी याहून अधिक ताणता नाही यायची. यात भर पडते व्यक्तिपरत्वे आणि व्यवसायपरत्वे विशिष्ट ठरणाऱ्या तारखांची. कुटुंबीयांचे जन्मदिनांक, प्रियजनांचे वाढदिवस, लग्नाची वर्षगाठ, मातापित्यांच्या श्राद्धतिथी, तशी प्रत्येकच तारीख काही ना काही कारणांनी स्मरणीय असते. याबाबत 'अतिथी' अशी नसतेच! प्रत्येक तिथीला जगाच्या बखरीतील बरे-वाईट दाखले पुष्कळ वाढवता येतील. एका घटनेचा दुसऱ्या घटनेशी संबंध नाही. दुसरीचा तिसरीशी लागाबांधा नाही. केवळ एक तारीख हाच समान धागा. तेवढ्याशा सुतावरून स्वर्ग गाठता येणार नाही.

काळ हे मोठं अजब परिमाण आहे. कवी कार्ल संडबर्गनं 'काळाचा भस्मकलश' अशा आशयाची ओळ लिहिली. जे काळाच्या भक्ष्यस्थानी पडलं, ज्याची राख झाली त्याच्या आठवणीत रमण्याचा मनुष्यस्वभाव तरी किती विचित्र! वर्षाचे तीनशे पासष्ट कप्पे कल्पायचे नि प्रत्येक कप्प्यात पुन्हा निरनिराळे देशवार, भाषावार, व्यक्तिवार कोनाडे करायचे! आयुष्याचा हरघडी नाश होतो आहे. यौवन तिळातिळाने झरत आहे, गेलेले दिवस काही पुन्हा परतून येत नाहीत, खरोखर काळ हा जगभक्षक आहे. काळ ही एक कल्पना, त्याला अटक घालता येईल ही सवाई कल्पना आणि त्यासाठी वेगवेगळे रकाने राखून ठेवण्याची कल्पना तर पावभर



अधिकच अजब. गतकाळ अनादी होता. आपल्या स्मृतीच्या आणि संचित विद्याबुद्धीच्या वीतभर गजाने त्याची मापे घेणे हा पोरखेळ ठरेल. पण मार्क व्हान डोरेन या अमेरिकन उदारमतवादी विचारवंताने म्हटल्याप्रमाणे 'स्मृतिशक्ती माणसासाठी अशक्य ते शक्य करुन दाखवते, भूत आणि वर्तमान याची सांगड घालते, मानवी जीवनाला सातत्य आणि संस्कृतीचं देणं देते. स्मरण म्हणजे साथ-संगत. स्मरण म्हणजे शिकवण, स्मरण म्हणजे कवी, स्मरण म्हणजे प्रवासातील पाथेय असे ग्रंथालय.' वारंवार मनन करावं असं

हे वचन आहे. काळाचे कप्पे करणं मग हास्यास्पद वाटेनासं होतं. माणसाच्या धडपडीला मग अर्थ लाभतो. सारं नश्वर आहे, सारं नाशिवंत आहे, या पराभूत विचारांची राख अंगाला फासून बैरागी बनण्याची हुक्की मग येत नाही.

इतिहासाच्या चाळणीतून पडणारं सत्त्व तेवढं घेऊन कोंडा-कणी फुंकरून टाकण्याचं वळण माणसाला अनादी कालापासून लागलं आहे. कधीमधी एखादा हेगेल बोटं मोडतो की, 'इतिहास वाचून आपण हेच शिकतो की, इतिहास वाचूनही आपण काहीच शिकत नाही.' एखादा सांतायाना इशारा देतो की, 'जे भूतकाळाची आठवण ठेवत नाहीत, त्यांना तो भूतकाळ पुन्हा गिरवण्याची शिक्षा भोगावी लागते.' शहाणी माणसे सारासार विचार करतात, आजचा शुभसंकल्प करताना गतकाळाचा आढावा घेतात, काळाचा चक्रनेमिक्रम उमगतात.

श्री॰ बा॰ जोशी

**क. उताऱ्यात आलेल्या वाक्प्रचार किंवा शब्दकल्पनांचा अर्थ लक्षात घेऊन स्वतःच्या वाक्यात उपयोग करा.**

**चातकासारखी वाट पाहणे** - चातक हा पक्षी फक्त पावसाचे थेंब चोचीत घेऊन आपली तहान भागवतो अशी कल्पना आहे. त्यामुळे तो पावसाची खूप ओढीने वाट पाहतो. अशी खूप ओढीने वाट पाहणे.

**सुतावरून स्वर्ग गाठणे** - लहानसा दुवा धरून एखादी अशक्य वाटणारी गोष्ट करू पाहणे.

**अटक घालणे** - थांबवणे, पायबंद घालणे.

**पावभर अधिकच अजब** - कल्पनेपेक्षा अधिक वेगळे.

**वीतभर गजाने मापे घेणे** - छोट्या गोष्टीने एखाद्या गोष्टीच्या मोठेपणाचे वर्णन करणे.

**सत्त्व घेऊन कोंडा-कणी फुंकरणे** - धान्य निवडताना धान्याचे दाणे घेऊन कोंडा किंवा कणी अशा कचऱ्यासारख्या इतर गोष्टी टाकून देणे. महत्त्वाच्या गोष्टी घेणे, अनावश्यक काढून टाकणे.

**एखाद्याच्या नावाने बोटे मोडणे** - दुसऱ्याला दोष देणे.

**ख. उताऱ्यात आलेल्या पुढील शब्दांचे अर्थ लक्षात घेऊन जोड्या लावा. आवश्यकतेनुसार शब्दकोशाची मदत घ्या.**

| शब्द | अर्थ |
|---|---|
| अ. सार्वजनिक | एक. शिदोरी |
| आ. दिनदर्शिका | दोन. साठवलेले |
| इ. व्यक्तिपरत्वे | तीन. प्रत्येक व्यक्तीनुसार |
| ई. लागाबांधा | चार. वरचढ |
| उ. सवाई | पाच. संबंध |
| ऊ. पाथेय | सहा. सर्व जणांचे |

| | | | |
|---|---|---|---|
| ए. | चक्रनेमिक्रम | सात. | सलगता |
| अॅ. | सातत्य | आठ. | मागे गेलेला काळ |
| ऐ. | गतकाळ | नऊ. | दिनांक, तिथी, वर्ष दर्शविणारी |
| ओ. | संचित | दहा. | ठराविक नेमाने येणारा क्रम |

## २ पुढील उताऱ्यात गाळलेल्या जागी योग्य ती उभयान्वयी अव्यये भरा. एक अव्यय अनेक जागी येऊ शकते, तसेच काही जागी एकापेक्षा जास्त अव्ययेसुद्धा योग्य ठरू शकतील हे लक्षात घ्या.

(म्हणून, तरी, म्हणजे, की, आणि, शिवाय जर, पण, तर, जरी, त्यावेळी, यासाठी)

मराठी शिकावं (अ) ------------- आयेशाने मराठी भाषक मैत्रिणींशी मराठीतच बोलायला सुरूवात केली. शिकायचं ठरवलं (आ) ------------- लगेच शिकता थोडंच येतं! तिचं तोडकंमोडकं मराठी ऐकून काही जणी हसायच्या, (इ) ------------- सोनिया आणि गौरी कधीच हसल्या नाहीत. त्यांना तिचं कौतुक वाटायचं (ई) ------------- तिला मदतही करावीशी वाटायची. (उ) ------------- कुणी मदत केली नाही (ऊ) ------------- ती शिकणार कशी? अशा विचाराने त्या दोघी तिची वाक्यं दुरुस्त करायच्या. (ए) ------------- त्या दोघींची मदत असली (अॅ) ------------- आयेशाला स्वतःलापण लक्षपूर्वक अभ्यास करावा लागायचा. आयेशाला सराव व्हावा (ऐ) ------------- सोनिया आणि गौरी तिच्याशी आवर्जून मराठी बोलायच्या. आयेशा सगळीकडे (ओ) ------------- शेजारी, दुकानदार, भाजीवाले, लोकलमधले सहप्रवासी अशा सर्वांशी मराठीतच बोलायची. हळूहळू ती आत्मविश्वासाने मराठी बोलायला लागली. आधी तिला हसणाऱ्या मैत्रिणीसुद्धा तिचं कौतुक करायला लागल्या. महाविद्यालयात मराठी दिन साजरा झाला (ऑ) ------------- प्रमुख पाहुण्यांकडून तिचं खास कौतुक झालं. प्रयत्नपूर्वक मराठी भाषा शिकली (औ) ------------- सर्वांनी तिचं अभिनंदन केलं.

## ३ कंसात दिलेले उभयान्वयी अव्यय वापरून आवश्यक असल्यास इतर बदल करून वाक्य तयार करा.

उदा॰ उद्या पाऊस येईल पण, स्वच्छ पाणी मिळणार नाहीच. (तथापि)
उद्या पाऊस येईल **तथापि,** स्वच्छ पाणी मिळणार नाहीच.

क. मोगऱ्याच्या कळ्या उमलल्या आणि तुला संध्याकाळी गजरा मिळाला. (जर ... तर)

ख. जर तुम्हाला वाहन चालवता आले तर चाचणी उत्तीर्ण झाल्याशिवाय वाहन चालवण्याचा परवाना मिळणार नाही. (जरी तरी)

ग. खोदून खोदून विचारले तेव्हा तो बोलला. (म्हणून)

घ. तुम्ही उद्या किंवा परवा या. (अथवा)

च. तो घरी आला नाही, मला त्याचे खरे मत कळणार नाही. (कारण)

## ४ पुढे दिलेली दोन वाक्ये कंसातील एकेक उभयान्वयी अव्यय वापरून जोडून दाखवा.

(सबब, कारण, म्हणून, त्यामुळे, आणि, शिवाय)

क) बाहेर संसर्गजन्य रोगाची धास्ती आहे.

ख) वाहतूक बंद आहे.

उदा. बाहेर संसर्गजन्य रोगाची धास्ती आहे, **सबब** वाहतूक बंद आहे.

## ५ पुढील संवादामध्ये अर्थ लक्षात घेऊन योग्य केवलप्रयोगी अव्यय वापरा.

(अरेरे! बाप रे! छे! श्शू! अहाहा! चूप! घ्या!)

**आकांक्षा** - (अ) ------------- केवढं थंड पाणी आहे हे!

**आदित्य** - (आ) ------------- एवढं नाही गं! थंडी असो की उन्हाळा, आम्ही धडाधड उड्या मारून पोहायचो या तळ्यात.

**आकांक्षा** - (इ) ------------- बोलू नकोस. एका पक्ष्याचा आवाज येतोय. ऐक जरा.

**आदित्य** - (ई) ------------- कुठे? कुठे?

**आकांक्षा** - (उ) ------------- तू बोलत राहिलास तर कसं ऐकू येईल रे!

**आदित्य** - (ऊ) ------------- मी आपला बोलतो आणि तू अगदी गप्पच आहेस जशी.

**आकांक्षा** - (ए) ------------- उडालाच तो पक्षी शेवटी.

## ६ पुढील म्हणींचा अर्थ लक्षात घेऊन स्वतःच्या वाक्यात उपयोग करा.

**बुडत्याला काडीचा आधार** - पाण्यात बुडणाऱ्या व्यक्तीला लहानशी काडी हाताला लागली तरी तिच्या आधारे तरंगता येईल असं वाटतं. त्याचप्रमाणे मोठ्या संकटात असणाऱ्याला थोड्या मदतीचाही आधार वाटतो.



**खाल्ल्या मिठाला जागणे** - एखाद्याने आपले आतिथ्य केले तर त्याच्याबद्दल कृतज्ञता बाळगणे. त्यामुळे त्याची फसवणूक न करणे.

**गरज सरो आणि वैद्य मरो** - आजारपणात गरज असते तेव्हा उपचार करणाऱ्या वैद्याची गरज वाटते. गरज संपल्यावर मात्र त्याचा विसर पडतो.



**काळ्या दगडावरची रेघ** - काळ्या दगडावरची रेघ पुसता येत नाही, कायम राहते. यामुळे एखादी गोष्ट नेहमी कायम राहील, बदलणार नाही, हे सांगण्यासाठी ही म्हण वापरतात.

**दुधाने तोंड भाजले म्हणून ताकही फुंकून पिणे** - गरम दूध पिताना तोंड भाजते. त्या धसक्याने थंड ताकही फुंकून पिणे. म्हणजेच एखादा वाईट अनुभव घेतल्यानंतर गरज नसतानाही अतिकाळजीने वागणे.

**७ पुढे काही शब्दसमूहाबद्दल वापरण्यात येणारे शब्द दिले आहेत. अर्थ लक्षात घेऊन अधोरेखित शब्दसमूहाच्या जागी हे शब्द वापरा. आवश्यकतेनुसार शब्दकोश वापरा.**

(नियतकालिक, निरभ्र, अवर्णनीय, निरक्षर, आपादमस्तक, आगंतुक, आंतरराष्ट्रीय, प्रतिगामी, अष्टावधानी, आधुनिक, अगणित, अपूर्व)

उदा. हा एक ठरावीक काळाने प्रसिद्ध होणारा अंक आहे. अक्षरे लिहितावाचता न येणाऱ्यालाही समजेल असा चित्रमय अंक आहे हा.
हे एक **नियतकालिक** आहे. **निरक्षरा**लाही समजेल असा चित्रमय अंक आहे हा.

क. हिमराशींचे सौंदर्य केवळ वर्णन न करता येण्यासारखे!

ख. जुन्या मूल्यांना धरून चालणाऱ्या त्या समाजात एका स्त्रीची प्रमुखपदी होणारी नेमणूक ही पूर्वी कधीही न घडलेली घटना होती.

ग. आजच्या काळातल्या स्त्रीला एकाच वेळी अनेक गोष्टी कराव्या लागतात.

घ. राष्ट्राराष्ट्रांतील संबंध हा विषय त्याच्या आवडीचा होता.

च. घरात अचानकपणे शिरलेल्या व्यक्तीला सुधीरने पायापासून डोक्यापर्यंत न्याहाळले आणि तो ओरडला - बाबा!

छ. आज ढग नसलेल्या आकाशात मोजताही येणार नाहीत असे तारे दिसत आहेत.

**८ थोड्याशा वेगळेपणामुळे गोंधळात टाकणाऱ्या काही शब्दजोड्या पुढे दिल्या आहेत. वाक्यात योग्य ठिकाणी त्या वापरा.**

उदा. **आव्हान, आवाहन**
मतदानासाठी प्रत्येक नागरिकाने घराबाहेर पडावे असे **आवाहन** सरकारतर्फे करण्यात आले.
मतदानासाठी प्रत्येक नागरिकाला घराबाहेर काढण्याचे **आव्हान** सरकारपुढे होते.

क. परिमाण, परिणाम
भाषेतील कौशल्ये मोजण्याचे (अ) ------------- काय असावे ?
भाषेतील कौशल्ये प्राप्त केल्याचा (आ) ------------- काय असेल ?

ख. भराभर, भाराभर
ती (अ) ------------- वजन घेऊन (आ) ------------- चालत होती.

ग. व्याप, उपद्व्याप
विविध (अ) ------------- करून त्याने उद्योगाचा (आ) ------------- जगभर वाढवला होता.

घ. सून, सुनं
लाडकी (अ) ------------- प्राजक्ता माहेरी गेल्यामुळे मोहिनीताईंना घर अगदी (आ) ------------- वाटत होतं.

च. युद्धसदृश, युद्धजन्य
(अ) ------------- परिस्थितीत वस्तूंचा तुटवडा होणार ही गोष्ट स्वीकारली पाहिजे.
सीमेवर दोन्ही बाजूंनी जमलेले सैन्य पाहता ही (आ) ------------- स्थिती दिसत होती.

छ. सदर, सादर

त्या मुलीने सर्वांसमोर नृत्य (अ) ------------- केले.

(आ) ------------- मुलगी पंचवीस वर्षांची असून तिचा रंग गव्हाळ आहे.

## उत्तरसंच

### विभाग अ

१. परिच्छेद अ. छ. घराच्या परिसरात काही पडझड झाली होती तर काही भागात बदल झाला होता.

परिच्छेद आ. ज. स्वयंपाकघरातला तो विशिष्ट वास मला पुन्हा आला.

परिच्छेद इ. च. वडलांच्या अनेक गुणांची आठवण झाली.

परिच्छेद ई. ट. झोपाळ्यावरच्या अनेक आठवणींनी गर्दी केली.

परिच्छेद उ. ग. घर सोडण्याच्या आठवणी जाग्या होण्यापूर्वीच मी तो कप्पा मिटला.

परिच्छेद ऊ. झ. माझा वाचनाचा छंद इथेच बहरला.

परिच्छेद ए. ख. आठवणीतले घर म्हणजे फक्त हेच घर.

२. दुरुस्त केलेला उतारा -

कुठल्याही विशिष्ट देवतेची पूजा नाही, कुठल्याही एका धर्माचा-पंथाचा संबंध नाही असे केवळ निसर्गप्रवण उत्सव आपल्या भारतीय परंपरेत सर्वांत जास्त आहेत. वेगवेगळ्या ऋतूंचे उत्सव आहेत. कोजागिरी पौर्णिमेची कोणी विशिष्ट उपास्य देवता नाही, तरी या शरद ऋतूतील चांदण्याला आपल्या सामाजिक जीवनात मोठे स्थान आहे. वसंत ऋतूचे आगमन सांगणारा वसंतपंचमीचा उत्सव आहे. पंजाबात लोकप्रिय असणारा भांगडा आहे. ज्या वेळेला थंडीचा शेवट होतो आणि वसंत ऋतूचा प्रारंभ होतो, त्या वेळेला उफाळून येणारा तो सहज आविष्कार आहे. होळी हा आपला उत्सवसुद्धा वसंत ऋतूचा प्रारंभ आणि थंडीची सांगता व्यक्त करण्यासाठी आपण साजरा करतो. सूर्याचे राशिभ्रमण दर्शवणारा मकरसंक्रांतीचा म्हणजेच रथसप्तमीचा उत्सव आहे किंवा सूर्य लवकर मावळणार म्हणून दिव्याची अमावास्या आहे. हे सगळे उत्सव भारतीय परंपरेमध्ये रुजलेले आहेत. आपले निसर्गाशी, ऋतुचक्राशी, हवामानाशी, चंद्राच्या कलांशी असणारे नाते या उत्सवांमधून आपण व्यक्त करतो.

### विभाग ब

१. **ख.** अ - सहा आ - नऊ इ - तीन ई - पाच उ - चार ऊ - एक

ए - दहा ॲ - सात ऐ - आठ ओ - दोन

२. अ. म्हणून / यासाठी आ. की / तरी / म्हणून इ. पण ई. आणि / शिवाय

उ. जर ऊ. तर ए. जरी ॲ. तरी ऐ. म्हणून / यासाठी

ओ. म्हणजे ऑ. त्यावेळी औ. म्हणून / यासाठी

३. क. **जर** मोगऱ्याच्या कळ्या उमलल्या, **तर** तुला संध्याकाळी गजरा मिळेल.

ख. **जरी** तुम्हाला वाहन चालवता आले **तरी** चाचणी उत्तीर्ण झाल्याशिवाय वाहन चालवण्याचा परवाना मिळणार नाही.

ग. खोदून खोदून विचारले **म्हणून** तो बोलला.

घ. तुम्ही उद्या **अथवा** परवा या.

च. मला त्याचं खरं मत कळलं नाही **कारण** तो घरी आला नाही.

४. क. वाहतूक बंद आहे, **कारण** बाहेर संसर्गजन्य रोगाची धास्ती आहे.

ख. बाहेर संसर्गजन्य रोगाची धास्ती आहे, **म्हणून** वाहतूक बंद आहे.

ग. बाहेर संसर्गजन्य रोगाची धास्ती आहे, **त्यामुळे** वाहतूक बंद आहे.

घ. वाहतूक बंद आहे **आणि** बाहेर संसर्गजन्य रोगाची धास्ती आहे.

च. वाहतूक बंद आहे; **शिवाय,** बाहेर संसर्गजन्य रोगाची धास्ती आहे.

५. अ. बाप रे! आ. छे! इ. श्शू! ई. अहाहा! उ. चूप!

ऊ. घ्या! ए. अरेरे!

६. क. हिमराशींचे सौंदर्य केवळ **अवर्णनीय!**

ख. त्या **प्रतिगामी** समाजात एका स्त्रीची प्रमुखपदी होणारी नेमणूक ही **अपूर्व** घटना होती.

ग. **आधुनिक** स्त्रीला **अष्टावधानी** असावे लागते.

घ. **आंतरराष्ट्रीय** संबंध हा विषय त्याच्या आवडीचा होता.

च. घरात शिरलेल्या त्या **आगंतुकाला** सुधीरने **आपादमस्तक** न्याहाळले आणि तो ओरडला - बाबा!

छ. आज **निरभ्र** आकाशात **अगणित** तारे दिसत आहेत.

७. **क.** अ. परिमाण आ. परिणाम

**ख.** अ. भाराभर आ. भराभर

**ग.** अ. उपद्व्याप आ. व्याप

**घ.** अ. सून आ. सुनं

**च.** अ. युद्धजन्य आ. युद्धसदृश

छ. अ. सादर आ. सदर





# हे जग सुंदर आहे

विभाग अ

## १ *संभाषण* सराव नमुना प्रश्न

**'पर्यावरण संतुलन' या विषयावरील परिसंवादात तुम्ही सहभागी झाला आहात. त्यामध्ये तुम्हाला पाच मिनिटांचे सादरीकरण करायचे आहे. या विषयाशी संबंधित विविध पैलूंचा आढावा घ्या. त्यासाठी पुढे दिलेल्या विधानांचा / मुद्द्यांचा आधार घ्या. उदाहरणेही द्या.**

**विधाने :**

प्रदूषण कमी करणे आणि तापमानवाढ रोखणे एवढे केल्यास पर्यावरण संतुलित राहील.

पर्यावरणाचे संतुलन निसर्ग राखतो.
माणसाने फक्त त्यात ढवळाढवळ केली नाही म्हणजे झाले.

बिघडलेला पर्यावरणाचा तोल आत्ताच सावरला नाही तर भविष्यात त्याची फार मोठी किंमत संपूर्ण मानवजातीलाच चुकवावी लागेल.



## परीक्षेतील *संभाषण* या भागासंबंधी सूचना

**संभाषण परीक्षेच्या पहिल्या भागात एका विषयावर तुम्ही पाच मिनिटे सादरीकरण करायचे असते. त्या विषयाशी संबंधित तीन विधाने देण्यात येतात. त्या विधानांच्या आधारे आणि स्वत:ची उदाहरणे देऊन तुम्ही संबंधित विषयावर विस्ताराने बोलायचे असते. तुमच्या सादरीकरणाच्या अखेरीस परीक्षकांबरोबर त्या विषयावर चर्चा करायची असते.**

- तुमच्या सादरीकरणात मुद्द्यांची सुस्पष्ट विभागणी असावी. तयारीकरिता तुम्हाला मिळालेल्या वेळात तुम्ही मुद्देसूद मांडणीवर विचार करा आणि तुमच्या सादरीकरणाच्या आरंभीच सादरीकरणाचे टप्पे थोडक्यात सांगा.
- तयारीसाठी मिळालेल्या वेळात विषयाशी निगडित विविध मुद्दे, कल्पना यांवर विचार करा. सादरीकरणातील शब्दरचना, वाक्यरचना कशी करायची ते ठरवण्यात तेव्हा वेळ घालवू नका.
- दिलेल्या सर्व विधानांचा सादरीकरणात अंतर्भाव करा. त्यातल्या कोणत्या विधानाला अधिक महत्त्व द्यायचे ते तुम्ही अर्थातच ठरवू शकता.
- संबंधित विषयाबाबत तुमची भूमिका काय आहे, हे स्पष्ट करा.

- सादरीकरण करताना भाषेच्या दृष्टीने पुरेशी शब्दसंपदा वापरली जात आहे ना, त्याकडे लक्ष द्या. शक्यतो प्रमाणभाषेचा वापर करा. बोलभाषेचा वापर टाळा.
- व्याकरणदृष्ट्या अचूक बोलण्याबरोबरच भाषेतील वैविध्यपूर्ण वाक्यरचनांचा, संयुक्त वाक्यांचा आवर्जून अंतर्भाव करा.
- तुमच्या सादरीकरणासाठी उपयुक्त ठरतील अशा काही वाक्यरचना पुढे दिल्या आहेत.

**सादरीकरणाची सुरुवात करताना :**

आजच्या आपल्या चर्चेच्या अनुषंगाने मी ... या विषयावर सादरीकरण करत आहे.
... विषयावर माझं आजचं सादरीकरण आहे / ... हा विषय मी हाताळत आहे.
सर्वप्रथम मी तुम्हाला माझ्या सादरीकरणाचे टप्पे सांगतो / सांगते.
प्रारंभी ... या मुद्द्यावर मी बोलेन.
प्रथम ... या मुद्द्यांबाबत मी विवेचन करेन.
यानंतर ... या मुद्द्याकडे वळू.
त्यानंतर मी ... या मुद्द्यांवर प्रकाश टाकेन.
अखेरीस ... या मुद्द्याला मी थोडक्यात स्पर्श करेन.

**विषयाचे महत्त्व अधोरेखित करताना / विषयाची माहिती देताना / विषयाशी संबंधित संकल्पना स्पष्ट करताना :**

काही काळापासून हा विषय चर्चेत आहे / या विषयावर बरीच चर्चा सुरू आहे.
हा विषय खासकरून ... साठी विशेष महत्त्वपूर्ण आहे.
हे सर्वांना माहीत आहे की, ...
आत्तापर्यंत केवळ एवढंच माहीत आहे की, ...
सर्वसामान्यपणे असं मत प्रचलित आहे की, ...
नुकतंच वर्तमानपत्रात आलं होतं की, ...
अगदी अलीकडच्या / ताज्या माहितीनुसार ...
संशोधनातून सिद्ध झाल्यानुसार ...
संशोधनाने हे दाखवून दिलं आहे की, ...
शास्त्रज्ञांनी शोधून काढलं आहे की,
... याचा अर्थ माझ्या दृष्टीने ... असा आहे.
... याचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून असा अर्थ आहे की, ...
... याचा अर्थ खरंच नक्की काय?
... ही संकल्पना स्पष्ट करणे शक्य आहे / नाही. त्यातून प्रतीत होतं की ...

### विचार एका सूत्रात बांधणे / संबंध शोधणे

मी आता ... मुद्द्याकडे वळतो / वळते.

माझा पुढचा मुद्दा आहे ...

आता मी ... प्रश्नाकडे वळतो / वळते.

याव्यतिरिक्त असा विचार केला पाहिजे की, ...

या विषयाचा एक पैलू मांडणं माझ्याकडून राहून गेलं / या विषयाच्या आणखी एका पैलूबाबत मला विचारायचं / सांगायचं आहे की, ...

मी आधी मांडलेल्या मताच्या पुष्ट्यर्थ / मताला जोडून मला आणखी असं सांगायचं आहे की, ...

याचा मथितार्थ हा आहे की, ...

यातून असं निष्पन्न होतं की, ...

याचा तार्किक निष्कर्ष हा निघतो की, ...

त्यानुसार ...

त्याउलट ...

असं असलं तरीही ...

तरीसुद्धा ...

### उद्धरणे / अवतरणे वापरताना

मी जे पहिलं / दुसरं / तिसरं उद्धरण / अवतरण वाचलं, ...

पहिलं उद्धरण / अवतरण मला अतिशय भावतं / समर्पक वाटतं.

दुसरं उद्धरण / अवतरण जणू माझंच असावं, इतकं मला पटलेलं आहे.

या उद्धरणाशी / अवतरणाशी मी अजिबात सहमत होऊ शकत नाही.

### उदाहरणे देताना

यासंदर्भात काही उदाहरणं देणं योग्य ठरेल : ...

आणखी एक उदाहरण देता येईल, ...

पुढील उदाहरणांच्या आधारे हे अधिक विस्तृतपणे मांडता येईल / सिद्ध करता येईल / खोडून काढता येईल : ...

**स्वत:चे मत स्पष्टपणे मांडताना**

माझ्या अनुभवानुसार / माझ्या मते ...
माझ्या दृष्टिकोनातून ...
माझ्यासाठी सर्वांत महत्त्वाचं हे आहे की, ...
मी आणखी एका पैलूकडे लक्ष वेधू इच्छितो / इच्छिते की, ...
मी तुमच्या / तुझ्या मताशी पूर्णतया सहमत आहे / नाही.
... च्या बाजूने / च्या विरुद्ध आहे.
या मताशी मी सहमत होऊ शकत नाही.
याच्या विरोधात असं म्हणता येऊ शकतं की, ...
परिस्थिती पुढीलप्रमाणे आहे : ...
हे विसरून चालणार नाही की, ...
... आणि ... यांची तुलना केल्यास, असे दिसून येते की, ...
... याच्याशी तुलना केल्यास ...

**सल्ला / सूचना देताना**

मी असे सुचवतो / सुचवते की, ...
कदाचित असं केलं तर ...
एक शक्यता / पर्याय असा असू शकतो की, ...

**सादरीकरणाचा समारोप करताना**

समारोप करताना सारांशरूपाने असे म्हणता येईल की, ...
यातून असा निष्कर्ष निघतो की, ...
परिणामी ...
भविष्यात हे / याचा अर्थ असा होऊ शकतो की, ...

२ **परीक्षेतील *लेखन* या भागावरील सराव नमुना प्रश्न. 'निसर्गस्नेही जीवनशैली आणि शहरीकरण' या विषयावर प्रसिद्ध झालेला एक लेख तुम्ही वर्तमानपत्रात वाचला आहे. त्यावर प्रतिक्रिया मागवण्यात आल्या आहेत. खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सुमारे ३५० शब्दांमध्ये तुम्ही तुमची प्रतिक्रिया लेख या स्वरूपात लिहा.**

**विषय :**
निसर्गस्नेही जीवनशैली आणि शहरीकरण

**मुद्दे :**

विकास आणि शहरीकरण

निसर्गस्नेही जीवनशैलीची गरज

शहरे निसर्गस्नेही कशी होऊ शकतात?

**परीक्षेतील लेखन या भागासंबंधी सूचना :**

- ६० मिनिटांच्या कालावधीत मुद्देसूद मांडणी करत तुम्हाला दिलेल्या विषयावर लेखन करायचे आहे.
- लेखाचा साधारण आराखडा मनात तयार करून लवकरात लवकर लिहायला सुरुवात करा. मुद्द्यांवर विचार करण्यात खूप जास्त वेळ घालवू नका; परंतु त्याच वेळी दिलेल्या सर्व मुद्द्यांचा लेखनात समावेश होईल याची काळजी घ्या.
- प्रस्तावना, मुख्य भाग व समारोप अशा तीन भागांत लेखाची स्पष्टपणे विभागणी करा. प्रस्तावनेमध्ये लेखाच्या विषयाचा थोडक्यात परिचय करून द्या. मुख्य भागामध्ये दिलेल्या मुद्द्यांवर विवेचन करा. त्यासंबंधीची तुमची मते मांडताना तुमच्या मतांची कारणमीमांसा करा, उदाहरणे द्या, आवश्यक तिथे तुलनात्मक पद्धतीने विषय मांडा. समारोपामध्ये लेखाचा अगदी थोडक्यात आढावा घेऊन लेखाचे सार किंवा तुमचे निष्कर्ष मांडा.
- लेखाच्या विषयानुरूप शब्दसंपदेचा व लेखनशैलीचा वापर करा. बोलभाषेतील वाक्प्रचार शक्यतो टाळा.
- व्याकरणातील अचूकता व विविध वाक्यरचनांचा वापर यांकडे लक्ष द्या.

**लेखनासाठी उपयुक्त ठरतील अशा काही वाक्यरचना :**

**लेखाची सुरुवात करताना :**

- तुमचा लेख / ... दिवशी प्रसिद्ध झालेला लेख मी अतिशय उत्सुकतेने वाचला.
- तुमचा लेख वाचून त्या अनुषंगाने काही मुद्द्यांवर भाष्य केलेच पाहिजे असे मला वाटले, म्हणून हा लेखनप्रपंच.
- ... विषय गेला काही काळ बराच चर्चेत आहे. / विशेषतः ... च्या पार्श्वभूमीवर हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे.

**मुख्य मुद्द्यांचे विवेचन करताना :**

- हे सर्वांनाच माहितेय की, ...
- सर्वसामान्यपणे यासंबंधी असे मत आहे की, ...
- नवीन संशोधनानुसार ... / नव्याने उपलब्ध झालेल्या माहितीनुसार ...
- यावरील सर्वेक्षणातून / संशोधनातून ही बाब पुढे आली आहे की, ... / शास्त्रज्ञांनी दाखवून दिले आहे की, ...
- ... याचा अर्थ मी असा लावतो / लावते. / शास्त्रीय परिभाषेत ... याचा अर्थ ... होतो.
- ... म्हणजे नक्की काय?
- ... ही संकल्पना नेमक्या शब्दांत मांडणे अवघड आहे. त्याचा अर्थ साधारणपणे असा होतो की, ...

**मुद्द्यांची सांगड घालताना :**

- ... या मुद्द्यापासून मी सुरुवात करतो / करते.
- सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ...
- त्याबरोबरच ... हाही मुद्दा आपण विचारात घेतला पाहिजे.
- यापुढे जाऊन विचार करता ... / या बाबतीत असे निदर्शनास येते की, ...
- या संदर्भात आणखी एक बाब लक्षात घेणे आवश्यक आहे, ती म्हणजे : ...
- यालाच जोडून असे म्हणता येईल की, ...
- आता पुन्हा मूळ / आधीच्या मुद्द्याकडे वळू.
- यातून असा निष्कर्ष निघतो की, ... / याचा मथितार्थ असा ...
- याउलट ...

**स्वत:ची भूमिका स्पष्ट करताना :**

- बारकाईने या गोष्टींचा विचार केल्यास पुढील प्रश्न उपस्थित होतात :
- मला जाणवलेले काही प्रमुख मुद्दे असे :
- ... ही गोष्ट मला अवघड वाटते.
- माझ्या अनुभवावरून मी असे सांगू शकतो / शकते की, ...
- माझ्या मते / माझ्या दृष्टिकोनातून ...
- माझ्यासाठी ... हे विधान / हा मुद्दा सर्वाधिक महत्त्वाचा आहे.
- माझ्यासाठी ... हे विधान / हा मुद्दा फारसा महत्त्वपूर्ण नाही / तितकासा महत्त्वाचा नाही.
- ... च्या विरुद्ध पुढील उदाहरण देणे योग्य ठरेल. / पुढील उदाहरणावरून हे स्पष्ट होईल की, ...
- अन्य एका महत्त्वाच्या मुद्द्याकडे मला लक्ष वेधायचे आहे, तो म्हणजे ...

**तुलना करताना :**

- ... शी तुलना करता
- ... च्या अनुषंगाने
- यासंदर्भात ...
- याउलट / याविरुद्ध ...

**समारोप करताना :**

- थोडक्यात आपण असे म्हणू शकतो की, ... / असे म्हणता येईल की, ...
- यावरून हा निष्कर्ष निघतो की, ...
- परिणामस्वरूप असे दिसते की, ...
- भविष्यात याचा अर्थ ...
- भविष्यात याचे महत्त्व निश्चित असेल, कारण ...

## विभाग ब
## व्याकरण उजळणी व शब्दसंपदा

### १ काझिरंगा

*आसाममधील काझिरंगा हे अभयारण्य गेंड्यांसाठी प्रसिद्ध आहे. व्यंकटेश माडगूळकर यांना हत्तीवर बसून फिरताना झालेलं गेंड्याचं दर्शन आणि अभयारण्याचं चित्रदर्शी वर्णन यातील हा अंश.*



जाता जाता बरंच उंच गवत पुन्हा लागलं. उसाच्या मळ्यातून जात आहोत, असं वाटलं. मध्येच हत्ती थांबवून माहुतानं खाली बोट दाखवलं. वाघाची अगदी ताजी पावलं चिखलात उमटली होती. कदाचित हरणाच्या कळपावर डोळा ठेवून तो इथंच कुठं जवळपास बसून असावा. समोरचं, आजूबाजूचं काही दिसत नव्हतं. काळोखातून वाट काढीत जावं, तसा हत्ती जात होता. वाघाचा माग लागल्यामुळे आम्ही गप्प होतो.

एवढ्यात मोठ्यानं गुरगुराट झाला आणि चढावरून मागं लोटला जावा, तसा हत्ती पाच-पंधरा पावलं सरसर मागं सरला. आम्ही हिंदकळलो. सावरून एकमेकांना घट्ट धरून बसलो. माहुतानं अंकुश लावून काही इशारा केला. हत्ती पुन्हा थोडा वेगानं पुढं सरला. पुन्हा गुरगुराट! पुन्हा हत्ती वेडावाकडा मागं गवतात सरला, बराच मागं; दिसत काहीच नव्हतं. समोर होतं काय?

मारलेलं हरीण पुढ्यात असलेला आणि त्याच्या उष्ण, लालभडक रक्तानं तोंड, मिश्या माखलेला वाघ?

हा हत्ती काही पोरसवदा, कच्चा नव्हता. चांगला अनुभवी, प्रसंगी खंबीरपणाने जाग्यावर रुतून उभा राहणारा होता. तो एवढा विलक्षण घाबरून मागं का सरत होता? आता मात्र माहूतही चिडला. पुन:पुन्हा इशारा करून 'पुढे हो! पुढे भीड!' असं सांगू लागला.

मग हत्ती मोठ्यांदा चीत्कारला आणि सोंड उभारून आवेशानं पुढं झाला. मला वाटलं, आता काही दंगा होणार.

आवेशानं हत्ती पुढं झाला आणि चिखल-पाण्यात धाड धाड आवाज करीत एक प्रचंड गेंडा पाठमोरा जाताना दिसला. म्हणजे गेंडाच होता; वाघ नव्हे. हे सगळं अगदी थोडक्या वेळात घडून गेलं, पण माझी छाती बराच वेळ धडधडत होती. म्हणजे गेंडा हत्तीवरसुद्धा धावून येतो आणि हत्ती माघार घेऊन पळतो, हे खरंच!

या दाट गवतात पुढच्या डबक्यात बसलेला गेंडा हत्तीला दिसलाच नसावा आणि शांतपणे समाधी लावून थंड पाण्यात उभ्या राहिलेल्या गेंड्यालाही हत्ती आला, हे कळलं नसावं. एकदम दचकून त्यानं चार्ज केला आणि बेसावध हत्ती सरासरा मागं सरला. काही का असेना, काझिरंगात क्वचित घडणारा नाट्यपूर्ण प्रसंग घडला होता. त्याची थोडी चुणूक मला अनुभवायला मिळाली होती.

काही घडलंच नाही, अशा थाटात हत्ती पुन्हा चालू लागला. जाता जाता दोन्ही बाजूंचं गवत ओरबाडू लागला. मधूनच एखादा घास तोंडात घालत होता, मधूनच डास-माश्या वारीत होता.

समोर विस्तृत असा पाणथळ भाग आला. सूर्यप्रकाशात पाणी लखलखत होतं. बोरूच्या बेटांतून बदकं पोहत होती. ढोक, बगळे सावध होऊन, माना काढून आमच्याकडे बघत होते.

एवढ्यात उथळ पाण्यात बसलेली दोन हरणं दिसली. स्वम्प डिअर्स. एक मादी आणि तिचं एक पोर. मोठाले कान टवकारून बघत होती.

हत्ती त्यांच्या दिशेनं पुढं पुढं येत होता.

हा नक्की काही धोका आहे का? आपण सुखानं बसलो आहोत, हे सोडून उधळावं का? काही क्षणांतच आई उठून उभी राहिली. एकटक बघू लागली. पोरही उठलं. चित्रासारखी ती दोन्ही बघू लागली. लव्हाळ्यांची, बोरूच्या पात्यांची आणि त्यांची प्रतिबिंब पाण्यात पडली होती.

मी हरखून हे निसर्गचित्र बघत होतो.

हत्तीचं धूड आपल्या दिशेनं पुढं पुढंच येत आहे, हे ध्यानी येताच ती मायलेकरं आमच्यावरची नजर न काढता सावकाश उजव्या बाजूला पुढे पुढे सरकू लागली.

आणि उजव्या बाजूला काही अंतरावर, ढळत्या सूर्याच्या प्रकाशानं लखलखीत झालेल्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर हरणांचा कळप दिसला. हे सारेच तरुण नर असावेत. बोरूच्या रेषांमागे त्यांच्या काळपट आकृत्या दिसत होत्या. सगळ्यांच्या माना वर आणि मोठमोठे कान टवकारलेले होते. म्हणजे ही आई आणि पोर काटकोनात त्यांच्या दिशेनं पुढं सरकत होते. काही वेळ अंदाज घेऊन बारा-पंधरा नरांचा तो कळपही हळूहळू पुढं सरळ दिशेनं सरकू लागला.

आणि या दोहोंच्या मध्ये एका मोठ्या झुडपाच्या सावलीला बसलेला भव्य शिंगांचा एकच एक बारशिंगा आम्हाला दिसला. या सगळ्या कळपाचा तो स्वामी असावा. पसरल्या कानांनी तो एकटक आमच्याकडं बघत होता. डाव्या बाजूला पुढं पुढं सरकत जाणारी आई आणि तिचं लेकरू पुढं, थेट समोर हा बारशिंगा आणि उजव्या बाजूला तो कळप असं मनोहारी दृश्य होतं.

दलदलीच्या भागात राहणारी ही हरणं 'शाळा' करून वावरतात. एका वयाची पंधरा-वीस हरणं दंगाधोपा न करता चरतात. मुलांची शाळा वेगळी, मुलींची वेगळी. पोरांच्या शाळेत कधीकधी एकदम दोन नर हातघाईवर येतात. शिंगाला शिंग भिडवून रेटारेटी सुरू होते; पण हे भांडण नसतं. तू मोठा की मी मोठा ठरवण्यासाठी हे ताकदीचं प्रदर्शन असतं. यात उजवा ठरेल, तो विजेता! लगेच त्याचं वडीलपण

मान्य करून दुसरा प्रतिस्पर्धी माघार घेतो. पुन्हा गुण्यागोविंदानं दोघं चरू लागतात. अशी रेटारेटी होऊन नंबर ठरतात. एक, दोन, तीन, चार. मोठ्या बापाचा म्हणून कोणी मोठा मानला जात नाही. कळपात राहून आपण नंबर ठरवून घ्यावा लागतो.

अशा शाळांपैकी ही एक 'शाळा' होती. चकचकीत प्रकाशामुळे मी मोजू शकलो नाही, पण एकूण पंधरा-वीस पोरं असावीत. आणि हा भव्य शिंगाचा नर म्हणजे नंबर एकचा असावा. त्या मादीचा धनी आणि पोरांचा बाप.



मादी आणि पोर, ती तिकडची तरुण पोरं सगळी सावध झाली होती; पण हा नंबर एकचा बारशिंगा अजून जागच्या जागी स्थिर होता. हत्ती जवळजवळ जाऊ लागला तसा तो केवळ उठून उभा राहिला आणि त्या क्षणी ती तरुण पोरं उधळली. ती आई आणि ते पोर उधळलं. पाण्यातून आवाज करत पंधराएक यार्डांवर जाऊन थांबलं. पुन्हा माना वळवून कान पसरून बघत राहिलं.

नर मात्र जागीच उभा होता.

पळून जाणं त्याला शोभण्यासारखं नव्हतं. खरोखरीच हा धोका होता, याची पूर्ण खात्री झाल्याशिवाय तो पळणार नव्हता. ते त्याचं ब्रीद नव्हतं. तो कळपाचा शास्ता होता. आम्ही त्याच्या वडीलकीचा मान राखला. हत्ती उलट्या दिशेला फिरवून निघालो. पाण्यातून, गाळातून, वनस्पतींच्या दाट तवंगातून वाढ काढत हत्ती विरुद्ध दिशेला दूर दूर जात होता. मी मागं वळून बघत होतो.

कळपाचा शास्ता बारशिंगा अजून जागी ठाम उभा होता.

व्यंकटेश माडगूळकर

**क. 'जाता जाता बरंच उंच गवत पुन्हा लागलं.' या वाक्यात 'जाता जाता' म्हणजे जाताना. अशाच प्रकारे हसता हसता, पळता पळता, खाता खाता अशा अजूनही काही क्रियापदांचा दोनदा वापर करून वाक्ये तयार करा.**

उदा॰ हसता हसता त्याची पुरेवाट झाली.

**ख. पुढील परिच्छेदातील क्रियापदे रिती भूतकाळामध्ये बदलून लिहा.**

उदा॰ दलदलीच्या भागात राहणारी ही हरणं 'शाळा' करून वावरतात.

दलदलीच्या भागात राहणारी ही हरणं 'शाळा' करून **वावरत असत.**



एका वयाची पंधरा-वीस हरणं दंगाधोपा न करता (अ) चरतात. मुलांची शाळा वेगळी, मुलींची वेगळी. पोरांच्या शाळेत कधीकधी एकदम दोन नर हातघाईवर (आ) येतात. शिंगाला शिंग भिडवून रेटारेटी सुरू (इ) होते; पण हे भांडण (ई) नसतं. तू मोठा की मी मोठा ठरवण्यासाठी हे ताकदीचं प्रदर्शन (उ) असतं. यात उजवा

(ऊ) ठरेल, तो विजेता! लगेच त्याचं वडीलपण मान्य करून दुसरा प्रतिस्पर्धी माघार (ए) घेतो. पुन्हा गुण्यागोविंदानं दोघं चरू (ॲ) लागतात. अशी रेटारेटी होऊन नंबर (ऐ) ठरतात. एक, दोन, तीन, चार. मोठ्या बापाचा म्हणून कोणी मोठा मानला (ओ) जात नाही. कळपात राहून आपण नंबर ठरवून घ्यावा (ऑ) लागतो.

**ग. शब्दयोगी अव्ययांचा वापर करून रिकाम्या जागा भरा. काही अव्यये एकापेक्षा जास्त ठिकाणीही योग्य ठरू शकतील.**

समुद्रकिनारा-------------- (अ) जाणे हा माझ्या अपार आनंदाचा एक भाग आहे. लहानपणी मी किनारा-------------- (आ) किती खेळले, बागडले याला सुमारच नाही. फेसाळत्या लाटा-------------- -------------- (इ) तासन्‌तास बसले. वाळू-------------- (ई) किल्ले बांधले. शंखशिंपले गोळा केले. सूर्यास्त-------------- (उ) रेंगाळत राहिले. किनारा-------------- (ऊ) दिसणाऱ्या सूर्यास्तासारखा रमणीय सूर्यास्त मी कुठेही पाहिला नाही. सूर्यास्त पाहणे -------------- (ए) माझे पाय कधीच घर-------------- (ॲ) वळले नाहीत. समुद्राच्या या आवड -------------- (ऐ) मी कुठला-------------- (ओ) किनारी गावात गेले की समुद्राला भेटण्याची संधी सोडत नाही. या आवड-------------- (ऑ) समुद्र-------------- (औ) बोलताना मला थांबावंसं वाटत नाही.

## २ पुढील उताऱ्यातील अधोरेखित शब्द व प्रत्यय पाहा आणि शब्दाचे योग्य सामान्यरूप करा.

उदा. बर्फ त - बर्फात

### गोठवलेलं दूध

दूध - (अ) हवा च्या संपर्कातही येऊ नये अशा तऱ्हेनं निर्मिती आणि वितरण होणारा (आ) निसर्ग तला एक चमत्कार! (इ) माता च्या स्तनातून अपत्याच्या मुखात जाणारं एक पूर्णान्न! पण (ई) माणूस ला निसर्गाची ही रचना मान्य नाही. म्हणून तो दूध (उ) भांडी त काढतो. लवकर खराब होतं म्हणून बर्फात ठेवतो. पुन:पुन्हा तापवतो. आटवून बासुंदी-पेढे करतो आणि कहर म्हणजे गोठवून आईस्क्रीम करतो. (ऊ) ऊर्जा च्या अनावश्यक (ए) वापर चं आणि (ॲ) चैन साठी होणाऱ्या (ऐ) उधळपट्टी चं आईस्क्रीम हे मूर्त स्वरूप आहे. दूध (ओ) गोठवणे साठी प्रचंड ऊर्जा खर्च करायची. गोठलेल्या स्थितीतच त्याची वाहतूक करण्यासाठी ऊर्जा वापरायची. (ऑ) दुकान त, (औ) उपाहारगृह त ते विकलं जाईपर्यंत (अं) शून्य खालील तापमानात ठेवायचं! किती प्रचंड प्रमाणात ऊर्जा लागत असेल या सगळ्यासाठी! केला आहे आपण कधी याचा विचार आईस्क्रीम खाताना? (अः) दूध चा प्रतिलिटर भाव आणि आईस्क्रीमचा प्रतिलिटर भाव यांची तुलना करून पाहा. भावामध्ये असणारा तिपटीचा फरक ही या ऊर्जेची किंमत असते.

दिलीप कुलकर्णी

## ३ पुढील वाक्यांमध्ये कंसात दिलेल्या शब्दाचे योग्य सामान्यरूप करून व योग्य प्रत्यय जोडून लिहा.

उदा. गेल्या दोन **दशकांत** हवामान बदल, तापमान बदल हे शब्द सर्रास कानावर पडत आहेत. (दशक)

क. गेल्या वर्षी -------------- उडवलेली दैना अजूनही आठवते. (पाऊस)

ख. काही -------------- -------------- --------------अचानक एका दिवसात सात ते आठ अंश सेल्सिअसने वाढ झाली. (दिवस, मुंबई, तापमान )

ग. -------------- सर्वत्रच कमाल तापमान जास्त राहिले. (राज्य)

घ. यानंतर -------------- काही -------------- --------------तडाखा बसला. (मराठवाडा, जिल्हा, गारपीट )

च. अंदाज --------------हवामानशास्त्र विभाग सध्या अनेक वेगवेगळ्या प्रणालींचा वापर करते. (वर्तवणे)

छ. --------------तीव्र --------------विचार केला तर सद्य --------------अनेक मर्यादा जाणवतात. (हवामान, बदल, अंदाजपद्धत)

ज. येत्या -------------- -------------- -------------- -------------- पूर्वानुमान दिले जाणार आहे. (पावसाळा, मुंबई, पूर, धोका)

झ. हवामान --------------असे अनेक उपाय केले जातात. (विभाग)

ट. महाराष्ट्र ------------------ हवामान ------------------ एक कृती आराखडा तयार केला आहे. (शासन, बदल)

ठ. --------------येत्या -------------- पावसाचे प्रमाण वाढणार आहे. (अहवाल, वर्ष)

## ४ पुढील उतारा वाचून त्याखाली दिलेली विधाने बरोबर की चूक ते लिहा.

### बचत : साबणाची आणि पाण्याची

कपडे धुण्यासाठी कपड्यांना साबण लावला जातो किंवा पाण्यात साबणचुरा घालून त्यात कपडे भिजवले जातात. साबणामुळे कपड्यांचा मळ निघतो हे खरं आहे. पण सगळ्या प्रकारचा मळ निघण्यासाठी साबणाची काहीच गरज नसते.

म्हणून कपडे भिजवताना ते दोन पायऱ्यांमध्ये भिजवावेत. पहिली पायरी म्हणजे कपडे प्रथम साध्या गार पाण्यात थोडा वेळ भिजवून ठेवावेत. बरीचशी धूळ किंवा माती यामुळे निघून जाईल. मग दुसरी पायरी असेल साबणाच्या पाण्यात कपडे भिजवून ठेवणे.

आपल्या असं लक्षात येईल की, अशा पद्धतीमुळे साबण कमी वापरून चालेल. त्यामुळे वैयक्तिक

बचतीबरोबरच रसायनांचा वापर कमी होऊन पर्यावरणाचं प्रदूषणही कमी होईल. साबण कमी वापरला तर धुण्यासाठी पाणीही कमी लागेल आणि पाण्याचीही बचत होईल.

दिलीप कुलकर्णी

उदा. कपड्यांचा मळ काढण्यासाठी साबण आवश्यक नसतो. - **चूक**

क. साध्या गार पाण्यात बुडवून ठेवलेल्या कपड्यांवरील धूळ किंवा माती निघून जाते. ----------

ख. साबण कमी वापरला तर धुण्यासाठी पाणी जास्त लागेल. ----------

ग. साबण कमी वापरला तर पर्यावरणातील प्रदूषण कमी होईल. ----------

घ. सर्वसाधारण साबण हा रासायनिक पदार्थ आहे. ----------

ट. साबण कमी वापरला तर पाण्याचीही बचत होईल. ----------

## ५ क. खालील उताऱ्यातील परिच्छेद योग्य क्रमाने लावा.

### सहभोजन

**परिच्छेद १**

यात दोन तोटे होतात : एक म्हणजे पदार्थ पुनःपुन्हा गरम करण्यासाठी इंधन खर्ची पडतं आणि यामुळे पदार्थातलं सत्त्व कमीकमी होत जातं.

**परिच्छेद २**

आधुनिकीकरण, औद्योगिकीकरण, शहरीकरण यांमुळे 'सर्वे जन्तु रुटीना:' झालेले आहेत, हे मर्ढेकरांचं म्हणणं शब्दशः खरं आहे. प्रत्येकाचा दिनक्रम वेगळा असल्याने कुटुंबातल्या सगळ्यांचं एकत्र जेवण क्वचितच होतं. ज्याचं जेवण सर्वांत आधी, त्याच्या वेळेला शक्यतो स्वयंपाक तयार असतो. त्याला गरमागरम, वाफाळते पदार्थ आस्वादता येतात.

**परिच्छेद ३**

यावर उपाय म्हणजे पदार्थ ताजे असतील, तर पुन्हा गरम न करणं आणि दुसरं म्हणजे ताजा स्वयंपाक तयार असताना सर्वांनी एकाच वेळी जेवायला बसणं. अशा कौटुंबिक संमेलनाचे अनेक भावनिक लाभही असतात. कुटुंबाला एकत्र बांधून ठेवणारं हे सहभोजन असतं.

**परिच्छेद ४**

नंतर जेवणाऱ्यांना असंच गरम जेवण हवं असतं. मग प्रत्येक जण आपल्या वेळी आमटी गरम करतो, भाजी पुन्हा एकदा परततो आणि भात दोन मिनिटं कुकरमध्ये गरम करतो.

दिलीप कुलकर्णी

**ख. वरील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

उदा॰ खरं x **खोटं**

अ. एकत्र x ----------

आ. आधी x ----------

इ. गरमागरम x ----------

ई. तोटे x ----------

उ. कमीकमी x ----------

ऊ. सत्त्व x ----------

ए. ताजे x ----------

ॲ. एकाच वेळी x ----------

ऐ. लाभ x ----------

ओ. खर्च x ----------

**ग. उताऱ्यातील पुढील शब्दांचा अर्थ काय असेल हे लक्षात घेऊन योग्य पर्याय ओळखा.**

उदा॰ आधुनिकीकरण

१. आधुनिक नसणे **२. आधुनिक करणे** ३. अत्याधुनिक असणे

अ. शहरीकरण

१. शहर बांधणे २. शहरात रूपांतर होणे ३. शहरात जाणे

आ. गरमागरम म्हणजे ----------

१. गरम २. खूप गरम ३. गरम नसलेले

इ. कौटुंबिक

१. कुटुंबाशी संबंधित असलेले २. अनेक कुटुंबे ३. कुटुंब नसलेले

ई. भावनिक

१. भावनेविषयी असलेले २. भावना नसलेले ३. अनेक भावना

उ. सहभोजन म्हणजे ----------

१. सह (सोबत) केलेले भोजन २. सहा वेळा केलेले भोजन ३. सह (सोबत) असलेले भोजन

६ **खालील उतारा वाचा आणि अधोरेखित शब्दांऐवजी कंसातील शब्द वापरा. आवश्यक असेल तर वाक्यातही बदल करा.**

(गरमागरम, भरपेट, हातखंडा, सांगता होणे, वाफाळणारी, शिळे, संमेलन, ताजं, तिखट, रुचकर)

बाबाच्या हातची (अ) अगदी गरम भाकरी आणि त्यावर (आ) नुकतंच काढलेलं लोणी म्हणजे खासच नाश्ता. असं (इ) पोटभर खाऊन झालं की दुपारपर्यंत काळजी नाही.



दुपारी आई आणि मी आमटी, भात, भाजी करतो. (ई) झणझणीत आणि (उ) चविष्ट आमटी आणि कधीतरी (ऊ) रात्री उरलेल्या भाताला खमंग फोडणी देणं हे आईचं (ए) विशेष कौशल्य. मी भाजी करतो. महिन्यातून एकदा तरी आम्ही, आजी-आजोबा, मावशी-काका आणि सर्व भावंडं जेवणासाठी (ॲ) एकत्र येतो. गरम, (ऐ) वाफा येणाऱ्या कॉफीने आमचं हे एकत्र जेवण (ओ) संपतं.

## ७ पुढील उतारा वाचून त्याचे मुद्रितशोधन करा. यामध्ये ऱ्हस्व-दीर्घ, सामान्यरूप इ॰ प्रकारच्या दुरुस्त्या करा आणि उतारा पुन्हा लिहा.

फेब्रुवारीचा महीना पुढे सरकतो आहे. रस्ताच्या दोन्ही बाजूंना उंचच उंच वाढलेली ही शिरीषाची झाडे पाहा. दाटदाट हीरवी पाने. त्या पानांमुळे झाडाच्या माथ्याला घुमटासारखा डोलदार आकार येतो. ती पाने सपासप गळून पडताहेत. मुंबईच्या भुरकट नीळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर याच्या फांद्या आणि डहाळ्या उघडा काळसर असल्या तरी उठूनच दिसत आहेत. कारण एकीकडे जूनी पाने गळताहेत तरी दुसरिकडून लालसर रंगाची सुंदर कोवळी पालवी त्या झाडाच्या अंगाअंगावर फुलते आहे.

मार्च महिना लागला. पालविचा रंग आता पोपटी झाला. कोवळा पाने आता झपाट्याने वाढत आहेत. त्यामुळे झाडाची शोभा अवणनीय वाढली आहे. अप्रिल महिन्यामध्ये ही शिरीषाची झाडे जांभळट, गुलाबि, नाजूक फुलांनी बहरून जातील. पण कोवळ्या पालवीचे सौंदय त्या फुलांच्या शोभेलाही मागे टाकणारे आहे. आता आजूबाजूची आंब्याची झाडे दाट पानांनी भरून गेली आहेत.

दुर्गा भागवत

## ८ वाक्याच्या अर्थानुसार 'देणे' या क्रियापदाबरोबर योग्य नाम वापरा.

(सुट्टी, आनंद, संदेश, आशीर्वाद, फोडणी, नाव, काम, दूषणे, दुःख, आदेश, सल्ला)

उदा॰ प्लास्टिकमुळे पर्यावरणाचे होणारे नुकसान पाहता शासनाने प्लास्टिकबंदीचा आदेश दिला.

क. अहाहा! आईने काय खमंग ...

ख. कार्यालयाला सुट्टी असल्याने तिने आज अंघोळीलापण ...

ग. दूरध्वनी बंद असल्याने त्याने मला घरी येऊन ...

घ. शिक्षणासाठी परगावी निघालेल्या कुमारने नमस्कार केल्यावर माईनी तोंडभरून ...

च. लहान मुलांचा निरागस सहवास कोणालाही भरभरून ...

छ. पं॰ जितेंद्र अभिषेकी यांच्या निवासस्थानासमोरील रस्त्याला महापालिकेने त्यांचे ...

ज. कर्जमाफी न दिल्याने संतप्त शेतकऱ्यांनी शासनाला ...

झ. लाडक्या बोक्याच्या अचानक मृत्यूच्या बातमीने सौरभला अत्यंत ...

ट. दिवसभर मोकळा वेळ असल्याने आईने सुरभीला आवडते विणण्याचे ...

ठ. प्रकृतीच्या कारणाने सुदेशने घरून काम करणेच जास्त योग्य ठरेल असा डॉक्टरांनी ...

**वाक्प्रचारांच्या गोष्टी**

**उचलबांगडी करणे** - यातील बांगडी हा शब्द हातातली बांगडी या अर्थाने नसून पांगडी या शब्दाचा अपभ्रंश आहे. पांगडी म्हणजे मासे पकडण्याचे जाळे. कोळी जाळे टाकतो आणि मासे त्यात आले की दोघे चौघे मिळून ते एकदम उचलतात. म्हणजे एखाद्याला त्याच्या स्थळावरून किंवा जागेवरून त्याच्या मनाविरूद्ध बळाचा वापर करून हलवणे हा त्याचा मूळ अर्थ आहे.
एखाद्याला त्याच्या पदावरून हटवणे यासाठी उचलबांगडी करणे हा वाक्प्रचार वापरतात. मात्र, वरच्या पदावर नेमणूक झाली म्हणजे – पदोन्नती झाली – तर हा वाक्प्रचार वापरत नाहीत.

[संदर्भ - मराठी भाषेचे संप्रदाय व म्हणी, वा॰ गो॰ आपटे]
उदा॰ भ्रष्टाचाराचे आरोप होताच आरोग्यखात्याच्या सचिवांची पदावरून **उचलबांगडी करण्यात आली.**

## उत्तरसंच

### विभाग ब

१. **ख.** अ. चरत असत आ. येत असत इ. होत असे ई. नसे
उ. असे ऊ. ठरत असे ए. घेत असे ॲ. लागत असत
ऐ. ठरत असत ओ. जात नसे ऑ. लागत असे

१. **ग.** अ. समुद्रकिनाऱ्यावर आ. किनाऱ्यावर इ. लाटांसमोर ई. वाळूमध्ये
उ. सूर्यास्तापर्यंत ऊ. किनाऱ्यावरून ए. पाहिल्याशिवाय ॲ. घराकडे
ऐ. आवडीमुळे ओ. कुठल्याही ऑ. आवडीमुळे औ. समुद्राविषयी

२. अ. हवेच्या आ. निसर्गातला इ. मातेच्या ई. माणसाला
उ. भांड्यात काढतो ऊ. ऊर्जेच्या ए. वापराचं ॲ. चैनीसाठी
ऐ. उधळपट्टीचं ओ. गोठवण्यासाठी ऑ. दुकानात औ. उपाहारगृहात
अं. शून्याखालील अः. दुधाचा

३. अनेक उत्तरे शक्य. क. पावसाने ख. दिवसांपूर्वी, मुंबईच्या, तापमानात
ग. राज्यात घ. मराठवाड्यातील, जिल्ह्यांना, गारपिटीचा च. वर्तवण्यासाठी
छ. हवामानातील, बदलाचा, अंदाजपद्धतीच्या ज. पावसाळ्यापूर्वी, मुंबईसाठी, पुराच्या, धोक्याबद्दल झ. विभागाकडून ट. शासनाने, बदलाबाबत
ठ. अहवालानुसार, वर्षामध्ये

४. क. बरोबर ख. चूक ग. बरोबर घ. बरोबर ट. बरोबर

५. **क.** योग्य क्रम (परिच्छेद २, ४, १, ३)

५. **ख.** अ. स्वतंत्र, वेगवेगळे आ. नंतर इ. थंडगार ई. फायदे उ. जास्तजास्त
ऊ. निसत्त्व ए. शिळे ॲ. वेगवेगळ्या वेळी ऐ. हानी ओ. बचत

५. **ग.** अ. २ आ. २ इ. १ ई. १ उ. १

६. अ. गरमागरम आ. ताजं इ. भरपेट ई. तिखट उ. रुचकर
ऊ. शिळ्या ए. हातखंडा ॲ. संमेलन भरते ऐ. वाफाळणाऱ्या
ओ. सांगता होते

७. फेब्रुवारीचा महिना पुढे सरकतो आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उंचच उंच वाढलेली ही शिरीषाची झाडे पाहा. दाटदाट हिरवी पाने. त्या पानांमुळे झाडाच्या माथ्याला घुमटासारखा डौलदार आकार येतो. ती पाने सपासप गळून पडताहेत. मुंबईच्या भुरकट निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर याच्या फांद्या आणि डहाळ्या उघड्या काळसर असल्या तरी उठूनच दिसत आहेत. कारण एकीकडे जुनी पाने गळताहेत तरी दुसरीकडून लालसर रंगाची सुंदर कोवळी पालवी त्या झाडाच्या अंगाअंगावर फुलते आहे.

मार्च महिना लागला. पालवीचा रंग आता पोपटी झाला. कोवळी पाने आता झपाट्याने वाढत आहेत. त्यामुळे झाडाची शोभा अवर्णनीय वाढली आहे. एप्रिल महिन्यामध्ये ही शिरीषाची झाडे जांभळट, गुलाबी, नाजूक फुलांनी बहरून जातील. पण कोवळ्या पालवीचे सौंदर्य त्या फुलांच्या शोभेलाही मागे टाकणारे आहे. आता आजूबाजूची आंब्याची झाडे दाट पानांनी भरून गेली आहेत.

८. क. फोडणी दिली ख. सुट्टी दिली ग. संदेश दिला घ. आशीर्वाद दिला
च. आनंद देतो छ. नाव दिले ज. दूषणे दिली झ. दुःख दिले
ट. काम दिले ठ. सल्ला दिला

६



# तिसरी घंटा

विभाग अ

## १ परीक्षेतील *लेखन* या भागासंबंधी माहिती :

**साहित्यकृतीशी संबंधित विषय**

*लेखन* या विभागातील प्रश्नासाठी जर तुम्ही साहित्यकृतीशी संबंधित विषय निवडला असेल, तर सुचविलेल्या निवडक दोन पुस्तकांपैकी एका पुस्तकाची समीक्षा तुम्हाला करावी लागेल. साहित्यकृतीशी संबंधित विषयावरील प्रश्न सोडवण्यासाठी दोन्हीपैकी तुम्हाला हव्या त्या एका पुस्तकाचे वाचन तुम्ही परीक्षेपूर्वीच केलेले असणे आवश्यक आहे. परीक्षेच्या वेळी तयारीसाठी तुम्हाला केवळ ६० मिनिटांचा वेळ मिळेल.

**हा प्रश्न सोडविताना पुढील गोष्टी लक्षात ठेवा :**

१. साहित्यकृतीवर आधारित प्रश्न सोडविण्याचा फायदा असा होतो की, त्याची तयारी अगोदरच चांगल्या प्रकारे करून ठेवता येते. या प्रश्नाचे स्वरूप मूलत: पुढे दाखविल्याप्रमाणेच असते. साहित्यकृतीचा सारांश देऊन तुम्ही त्या साहित्यकृतीची शिफारस करायची असते. त्याशिवाय, साहित्यकृतीतील एखाद्या विशिष्ट पैलूचा अधिक सखोल विचार करायचा असतो. उदा॰ साहित्यकृतीतील मुख्य पात्रांचे व्यक्तिचित्रण, मध्यवर्ती कल्पना किंवा शैली.

२. ज्या साहित्यकृतीवर तुम्ही परीक्षेत प्रश्न सोडविणार आहात, तिच्यावरील समीक्षा वाचा.

३. निवडलेल्या साहित्यकृतीची आशयाच्या व शैलीच्या दृष्टीने कोणती ठळक वैशिष्ट्ये आहेत यावर विचार करा. त्या अनुषंगाने तुमच्या लक्षात आलेल्या किंवा तुम्हाला महत्त्वपूर्ण वाटलेल्या वैशिष्ट्यांची नोंद करा.

४. साहित्यकृतीची समीक्षा लिहिताना प्रस्तावना, मुख्य भाग व समारोप अशी रचना ठेवा. प्रस्तावनेमध्ये लेखकाविषयी व निवडलेल्या पुस्तकाविषयी थोडक्यात माहिती द्या. कथानकाचा सारांश / गोषवाराही थोडक्यात द्या. तुम्ही प्रस्तुत साहित्यकृती का निवडलीत त्याबद्दलही थोडक्यात स्पष्टीकरण द्या. मुख्य भागामध्ये कथानकातील मध्यवर्ती कल्पनेविषयी / कथावस्तूविषयी लिहा. समारोपात पुस्तकाविषयीचे तुमचे स्वत:चे मत मांडून पुस्तकाची शिफारस करा. तुम्ही शिफारस का करत आहात त्याची कारणमीमांसा करा.

५. या प्रश्नाच्या तीनही भागांकडे पुरेसे लक्ष देऊन त्यांना यथोचित न्याय दिला आहे ना, ते पाहा. सविस्तर कथानक देणे टाळा. तुमची समीक्षा अशा रीतीने लिहा की, ज्या वाचकांना हे पुस्तक माहीत नाही, त्यांनाही समीक्षा वाचून तुम्ही पुस्तकाविषयी काय सांगत आहात व त्याच्या शिफारशीच्या समर्थनार्थ कोणते मुद्दे मांडत आहात ते कळेल.

६. समीक्षा लिहिताना भाषेच्या दृष्टीने समृद्ध शब्दसंपदेचे दर्शन घडवा. बोलभाषेचा फार वापर करू नका. तुमच्या समीक्षेचा वाचक कोण असणार आहे, याचा लिहिताना विचार करा. व्याकरणाच्या अचूकतेकडे लक्ष देतानाच काही जटिल वाक्यरचना तसेच वाक्प्रचार यांच्या वापराकडे विशेष लक्ष द्या.

**समीक्षा लिहिताना उपयुक्त ठरतील अशा काही वाक्यरचना, वाक्प्रचार पुढे दिले आहेत. त्यांचा वापर तुम्ही करू शकता. तुम्हाला आवडलेली साहित्यकृती निवडा.**

**समीक्षेला सुरुवात करताना :**

- ... ही ... यांची साहित्यकृती आहे.
- यात ... हा विषय हाताळण्यात आला आहे.
- साहित्यकृतीची / पुस्तकाची ठळक वैशिष्ट्ये सांगायची तर ...
- या पुस्तकातील सर्वात लक्षवेधी गोष्ट म्हणजे ...
- मला यातील ... ही गोष्ट / हा भाग अतिशय वैशिष्ट्यपूर्ण वाटली / वाटला. माझ्या मते यातील सर्वात वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट / भाग म्हणजे ...

**कथानकाचा सारांश देताना :**

- या पुस्तकात ... विषय केंद्रस्थानी आहे.
- ... हा कथानकाचा मुख्य विषय आहे.
- प्रस्तुत कादंबरीचा कथाविषय आहे ...
- कथानकाची मध्यवर्ती कल्पना अशी आहे ...
- ही कादंबरी ... या प्रश्नाचा वेध घेते.
- ... ही कथानकातील मध्यवर्ती व्यक्तिरेखा / मुख्य पात्र आहे.

**कथानकातील मुख्य / मध्यवर्ती विषयाबाबत विवेचन करताना :**

- आता आपण मुख्य विषयापर्यंत येऊन पोहोचलो आहोत. ... या पुस्तकाचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ...
- हे समजून घेण्यासाठी अगोदर हे लक्षात घेतलं पाहिजे, की ...
- ह्या संदर्भात याचा अर्थ असा होतो, की ...
- कथानकातील मध्यवर्ती व्यक्तिरेखेच्या साहाय्याने असे दाखवण्यात आले आहे, की ...
- कथानकातील मुख्य पात्र इथे ... चे प्रतिनिधित्व करते. / कथानक ... च्या दृष्टीने प्रातिनिधिक स्वरूपात समजून घेता येईल.
- या विषयाच्या / संकल्पनेच्या आधारे लेखकाला हे स्पष्ट करायचे आहे / दाखवून द्यायचे आहे, की ...
- हा प्रश्न ... च्या भूमिकेतून लेखकाने हाताळला आहे.
- हा परिणाम साधण्यासाठी लेखकाने ... चा वापर केला आहे.

**निवडलेल्या साहित्यकृतीच्या वाचनाची शिफारस करताना / समीक्षेचा समारोप करताना :**

- प्रस्तुत पुस्तक अनेक वादग्रस्त गोष्टींसाठी चर्चेत आहे / होते.
- आत्तापर्यंत एकमुखाने पुस्तकाची प्रशंसा झाली आहे / पुस्तकावर टीका झाली आहे.
- या पुस्तकाबद्दल मतमतांतरे आहेत.
- माझ्या मते ही कादंबरी / हे पुस्तक ...
- माझ्या दृष्टिकोनातून हे पुस्तक याकरता खास आहे / नाही कारण ...
- ... कारणांमुळे मी ह्या पुस्तकाची शिफारस करतो / करत नाही / या संदर्भातच शिफारस करतो.
- म्हणूनच ... करणाऱ्या / शिकणाऱ्या प्रत्येकाला मी हे पुस्तक वाचण्याची शिफारस करतो / करते.
- काही असलं तरी हे पुस्तक नक्कीच वाचलं पाहिजे, कारण ...
- ज्या कुणाला ... मध्ये रस असेल, त्याने हे पुस्तक अवश्य वाचावं.
- दुर्दैवाने पुरेशा क्षमतेनं विषय हाताळण्यात लेखक कमी पडला आहे.
- पुस्तकाची शिफारस करण्याच्या आड येणारा मुख्य मुद्दा म्हणजे : ...
- ... असं असलं तरी मी प्रत्येकाला हे पुस्तक वाचण्याची शिफारस करतो / करते.
- जेव्हा ... तेव्हाच हे पुस्तक समजू शकेल.
- लेखकाला ... अत्यंत समर्पकरित्या जमले आहे.
- ... चे ही कादंबरी /... हे पुस्तक हे एक ठळक उदाहरण आहे.
- ... मुळे हे पुस्तक शिफारस करण्यायोग्य झाले आहे / या पुस्तकाचे वाचन आनंददायी झाले आहे.
- पुस्तकाची जमेची बाजू सांगायची झाली तर ...
- पुस्तकातील त्रुटी सांगायची झाली तर ...

**साहित्यकृतीशी संबंधित विषयावरील प्रश्नाचे नमुन्यादाखल एक उदाहरण :**

उमा कुलकर्णी यांच्या 'केतकरवहिनी' या कादंबरीवरील समीक्षा पुढे दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे तुम्हाला लिहायची आहे. मराठी साहित्याविषयीच्या ब्लॉगवर / संकेतस्थळावर ही समीक्षा लिहायची आहे असे समजून लिहा. समीक्षेसाठी ३५० शब्द ही शब्दमर्यादा असेल.

१. कादंबरीची कथावस्तू थोडक्यात सांगा.
२. विपरीत परिस्थितीला ठामपणे तोंड देताना अधोरेखित होणारा कथेतील नायिकेचा कणखरपणा अन्य स्त्रियांना कसा प्रेरणादायी ठरू शकतो, ते पुस्तकातील निवडक भाग किंवा व्यक्तिरेखांच्या आधारे स्पष्ट करा.
३. हे पुस्तक वाचण्याची वाचकांना शिफारस करा.

**... या पुस्तकाची मी केलेली समीक्षा :**




--------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------

## २ परीक्षेतील *वाचन* या भागासंबंधी सराव प्रश्न

**पुढील मूळ उताऱ्याचे १४ भाग केले असून ते एकूण १४ चौकटींमध्ये दिले आहेत. प्रत्येक अंक लिहिलेल्या चौकटीनंतर अक्षरे लिहिलेल्या चौकटीतील एक भाग जुळतो. तुम्हाला मजकूर लक्षात घेऊन त्यानुसार अंक लिहिलेली चौकट व त्यापुढे सुसंगतपणे जुळणारी अक्षर लिहिलेली चौकट यांच्या जोड्या लावून सलग उतारा तयार करायचा आहे. उदाहरणादाखल चौकट १ची जोडी चौकट 'इ'बरोबर जुळवून दाखवली आहे.**

*मराठी रंगभूमीवरील उत्कृष्ट अभिनेत्री आणि प्रतिभासंपन्न दिग्दर्शिका विजया मेहता यांच्या 'झिम्मा' या आत्मचरित्रातील हा भाग. नाट्यक्षेत्रात नवखी असताना विजूची म्हणजे त्यांची स्वतःची मुंबई मराठी साहित्य संघ या प्रथितयश संस्थेच्या 'झुंझारराव' या नाटकात 'कमळजा' या झुंजाररावाच्या पत्नीची भूमिका करण्यासाठी निवड होते. त्यानंतरच्या घटना यात वर्णन केल्या आहेत. 'झुंझारराव' हे शेक्सपिअरच्या 'ऑथेल्लो' या नाटकाचे गो. ब. देवल यांनी केलेले मराठी रूपांतर. या नाटकात त्यावेळी मराठी नाट्यक्षेत्रातील अनेक नामवंत अभिनेते, अभिनेत्री काम करत होते तर अनेकांचा नाटक उभं करण्यात मोलाचा सहभाग होता. डॉ. अ. ना. भालेराव, नानासाहेब फाटक, केशवराव दाते, देवलमास्तर (गो. ब. देवल), दुर्गाबाई खोटे, के नारायण काळे, राजा परांजपे, स्नेहप्रभा प्रधान या त्यांपैकी काही नावाजलेल्या कलाकारांचा उल्लेख या उताऱ्यात आला आहे.*

### तालमीला सुरुवात

उदा. १ - इ

१

तालमीचा पहिला दिवस. विजू मालूबरोबर साहित्य संघात गेली. चिंचोळ्या केळेवाडीत ती पहिल्यांदाच जात होती. अशा अरुंद गल्लीत आत मोठं थिएटर असेल यावर विश्वास बसणं अवघड. मोटारगाडी, घोड्याची गाडी, ट्रक आत जाणं अशक्य. थोडं अंतर आत चालून गेलं, की केळेवाडी रुंद होत जाते, असं लक्षात येतं. उजव्या बाजूला संघाचं उघडं प्रेक्षागृह. बाजूबाजूनं किंतानाचं कुंपण. वर मात्र उघडंवाघडं आकाश. रंगमंच तेवढा पक्का बांधलेला.
मातीची जमीन. चार-पाच गडी पाणी शिंपत होते.

इ

मग एका बाजूला नीट रचून ठेवलेल्या घडीच्या खुर्च्या गड्यांनी काढल्या अन् रांगेत लावल्या. खड्डुखट्ट अशा लयीत हे काम सुरू होतं. तो खुर्च्यांचा आवाज आणि ओल्या मातीचा गंध इतक्या वर्षांनंतर आजही माझ्या स्मरणात आहे. साहित्य संघ वर्षानुवर्षं आपलं एका अर्थी माहेर म्हणून असणार आहे, भोज्याला शिवावं त्याप्रमाणे आपण सतत साहित्य संघात येत राहू आणि काही काळ तिथे विसावा घेऊन पुन्हा नाट्यसृष्टीत जाऊ अशी सुतराम कल्पना तेव्हा विजूला नव्हती.

---

२

विजू कपडेपटात गेली. कपडेपटावर सिमेंटचं पक्कं बांधलेलं छप्पर होतं. भिंतीला मोठाले आरसे टेकून ठेवलेले. आरशांसमोर घडीची टेबलं. कपड्यांचे हँगर टांगण्यासाठी सुंभाच्या दोऱ्या.

कपडेपटात कुठल्यातरी संगीत नाटकाची तयारी सुरू होती. बहुधा रात्री प्रयोग असावा. काचेच्या रंगीबेरंगी बांगड्या रचून ठेवण्याचं काम एकीकडे सुरू होतं, तर दुसरीकडे ऑर्गनच्या सुरावर तबला लावला जात होता.

---

३

तालमीसाठी सुमनताई विजूला रंगमंचावर घेऊन गेली. नाटकाचा पडदा खाली पडलेला होता. दोन्ही बाजूला विंगा होत्या आणि मागे महालाचा रंगवलेला पडदा. तालमीची वेळ होताच डॉक्टर भालेराव नानासाहेब फाटकांना घेऊन आले. विजू नानासाहेबांकडे पाहतच राहिली. दोन-तीन दिवसांपूर्वी डॉक्टरांच्या घरी भेटलेले वयस्कर गृहस्थ हेच काय?

---

४

रंगमंचावर कलावंत कसे अन् कुठे कुठे फिरतील त्याचा एक आराखडा तयार करायचा असतो. नाटकाच्या परिभाषेत याला ब्लॉकिंग म्हणतात – कधी यायचं, कुठे बसायचं, उठायचं, फिरायचं वगैरे. सगळ्या तालीम प्रक्रियेतला हा एकदम सोपा भाग. पाठांतर झालं, की मग आशयाच्या अंगानं तालमी होतात. नानासाहेबांनी विजूकडून ब्लॉकिंग करून घेतलं. दोन-अडीच तासांत सगळा आराखडा पक्का झाला.
तालीम संपल्यावर डॉक्टर भालेराव आणि नानासाहेब विजूला साहित्य संघाच्या ऑफिसात घेऊन गेले. रंगमंचाला लागूनच ऑफीस होतं. गरमागरम चहा आणि दिवाडकरांचे खमंग बटाटेवडे आले अन् गप्पा सुरू झाल्या. नानासाहेब 'झुंझारराव' आणि 'कमळजा' या दोन मुख्य पात्रांबद्दल विस्तारानं बोलत होते.
'ऑथेल्लो'च्या तालमी देवलमास्तर घेत असत. खरं तर दात्यांचं सगळं व्यवस्थित सुरू होतं, परंतु एका ठिकाणी घोडं चांगलंच अडलं. एका प्रसंगात झुंजारराव कमळजेला 'जारिणी' म्हणतो. ते ऐकल्यावर कमळजेच्या अंगाचा थरकाप झाला पाहिजे असं देवलमास्तर पुन:पुन्हा सांगत होते. सोळा वर्षांचे दाते फेफरं आल्याप्रमाणे शरीर हलवायचे, की देवलमास्तर ओरडायचे, "खोटं...खोटं. खरा थरकाप हवा. उद्यापर्यंत मेहनत कर. नीट जमलं नाही तर नाटकातून काढून टाकीन." केशवराव दात्यांची पंचाईत झाली.

---

५

'झुंजारराव'च्या तालमी सलग आठ दिवस सुरू होत्या. विजू रोज घरी अभ्यास केल्याप्रमाणे नक्कल पाठ करत होती आणि ब्लॉकिंगवर विचार करत होती. सातव्या दिवशी रंगीत तालीम झाली. [...] दुर्गाबाईंनी 'मोगले आजम'मधून विजूच्या मापाचे बरेच कपडे साहित्यसंघात पाठवून दिले. बारीकसारीक सुधारणा करत डॉ॰ भालेरावांनी सगळे कपडे पसंत केले. शेवटच्या, म्हणजे मरणाच्या सीनमधले कपडे मात्र विजूला जरा झगमगीत वाटले. अतिशय दु:खी मनानं कमळजा सारजाच्या मदतीनं सगळे दागिने काढते, कपडे बदलते आणि झोपायची तयारी करते असा एक पूर्ण सीन 'झुंझारराव'मध्ये आहे. ती झोपते आणि झुंजारराव येतो, कमळजेवर अद्वातद्वा आरोप करतो आणि गळा दाबून तिला मारून टाकतो असा नाटकाचा शेवट आहे. झोपताना कमळजा जरीचे नक्षीकाम केलेले भरजरी कपडे कशाला घालेल असा विजूला प्रश्न पडला. पण विचारायचं कोणाला?

---

६

'किंकाळी'ची चर्चा मात्र अधिक तापदायक ठरली. विजूच्या अगोदर 'झुंजारराव'मध्ये कमळजेची भूमिका स्नेहप्रभा प्रधान करत. शेवटच्या प्रवेशात त्या किंकाळ्या फोडत पलंगाभोवती धावत असत आणि त्यांचा गळा दाबण्याच्या आवेशात झुंजारराव त्यांच्यामागे धावत असे. अशी पकडापकडी झाल्यानंतर कमळजेचं मरण 'स्लो-मोशन'मध्ये होत असे. म्हणजे कमळजा हाताला झटके देते, मग तिची मान लुळी पडते, वगैरे. बहुतेक रसिकांच्या मते शेवटचा सीन म्हणजे 'झुंजारराव'चा अतिशय नाट्यमय आणि परमोत्कर्षाचा प्रसंग – स्नेहप्रभाबाईंची आर्त किंकाळी आणि 'स्लो-मोशन' मरण. विजूला हे काही पटत नव्हतं. तालमीच्या वेळी ती नानासाहेबांना म्हणाली, "झुंजारराव काही मारेकरी नाही. तो शेक्सपिअरचा ट्रॅजिक हीरो आहे. आपण काय करतो आहोत हे समजण्याअगोदरच त्याच्या हातून हत्या घडते, म्हणून तर तो पश्चात्तापानं आत्महत्या करतो. पकडापकडी आणि किंकाळी वगैरे नाही केलं तर चालेल काय?" नानासाहेब धड 'हो' म्हणत नसत किंवा विजूची सूचना नाकारतही नसत. रंगीत तालमीपर्यंत असंच सुरू होतं.

---

७

सफेद कपड्यांतली कमळजा शेवटच्या सीनमध्ये फुलासारखी कोमेजली. नितळ आणि शांत. पकडापकडी नाही की किंकाळी नाही. आधीचे प्रयोग पाहिलेल्या नट-नट्यांना वाटलं, की गोंधळून गेल्यामुळे ही नवी मुलगी किंकाळी विसरली. रंगीत तालमीनंतर ऑफिसमध्ये गरमागरम चर्चा सुरू होती. त्रस्त विजू मेकअप काढत होती. डॉ॰ भालेराव तिला बोलवायला आले आणि ऑफिसमध्ये घेऊन गेले. सगळे दिग्गज तिथे बसले होते. विजूला वाटलं, बहुधा आपल्याला 'बाय बाय' मिळणार. तेवढ्यात डॉक्टर म्हणाले, "उद्याच्या पहिल्या प्रयोगात तू किंकाळी न फोडता मरायचं असं ठरलंय." काळे आणि राजा परांजप्यांनी हसून विजूकडे पाहिलं. [...]

'झुंजारराव'मुळे तीन गोष्टी झाल्या. विजूच्या कामाचं खूप कौतुक झालं. दोन, के॰ नारायण काळ्यांसारखा एक ज्येष्ठ मार्गदर्शक-स्नेही तिला लाभला. रंगायनच्या सगळ्या उपक्रमांना काळ्यांचा सक्रिय पाठिंबा असायचा. रंगायनचे एक प्रमुख चाहते म्हणून पुण्यात ते आपल्या परीनं आमच्या कामाला हातभार लावत असायचे.

---

अ

दुसऱ्या दिवशी तालमीला उभे राहिले ते घाबरत घाबरतच. झुंजारराव कमळजेला 'जा-रि-णी' असं म्हणतो म्हटल्यावर केशवरावांना क्षणार्धात सगळं आठवलं. आता देवलमास्तर 'खोटं खोटं...' असा आरडाओरडा करतील. 'नाटकातून काढून टाकीन' या त्यांच्या धमकीची केशवरावांना आठवण झाली आणि कमळजेच्या अंगाला खरंच थरकाप सुटला.

विजू केशवरावांकडे भारावल्यासारखी पाहत राहिली. अद्भुत होतं सगळं. तिनं स्टॅनिस्लावस्कीची भावनिक स्मृतीची थिअरी थोडीबहुत समजून घेतली होती; परंतु केशवरावांच्या रसरशीत, जिवंत अनुभवापुढे स्टॅनिस्लावस्कीचा सिद्धान्त बोजड आणि पुस्तकी वाटला तिला. पहिल्याच दिवशी आणि पहिल्याच तालमीत विजू साहित्य संघाची मुलगी झाली. [...]

---

आ

नानासाहेब एकदम वेगळे दिसत होते. आवाज बुलंद. नानासाहेबांचा आवाज तीन सप्तकांत सहज फिरतो, असं तेव्हा म्हटलं जाई. उभं राहण्याचा, स्टेजवर फिरण्याचा आगळा डौल. [...] स्वत:चा असा संपूर्ण कायापालट करणं याला काय म्हणायचं? कलागुणांची निसर्गदत्त देणगी? प्रतिभा? की निखळ ऊर्जा?

---

ई

रंगीत तालमीला सगळे अतिरथी, महारथी पहिल्यांदाच रंगमंचावर आले. [...] शेवटच्या सीनसाठी पांढरे कपडे घालून ती विंगेत उभी होती. शेजारी डॉक्टर भालेराव होतेच. के॰ नारायण काळे अचानकसे आले अन् म्हणाले, “चांगलं होतंय तुझं काम. आणि या सफेद कपड्यांचीही कल्पना तुझी, असं नानासाहेब म्हणाले. उत्तम. मरणापूर्वी तुला किंकाळी फोडायची नाहीये असं ऐकलं. नको फोडूस.”

---

उ

अन् तिसरी गोष्ट म्हणजे, काही वर्षांतच स्नेहप्रभाबाई आणि विजया जयवंत (विजू) यांची छान गट्टी जमली. परंतु, याहीपेक्षा महत्त्वाची घटना म्हणजे आजवर बाहेरूनच अवतीभोवतीचा झिम्मा पाहणारी विजू आता त्यात स्वत: सामील झाली. तालावर पावलं टाकायचं आस्ते आस्ते शिकू लागली.

---

ऊ

बांगड्यांची किणकिण, ऑर्गनचे सूर, तबल्याचे लयदार बोल... सगळे ध्वनी एकमेकांत मिसळून गेलेले. मोगऱ्याचे गजरे आणि वेण्यांची टोपली नुकतीच कपडेपटात दाखल झाली होती. फुलांचा सुगंध, दुरून येणारा धुपाचा दरवळ, पडदे आणि विंगा रंगवण्यासाठी वापरलेल्या सरसाचा उग्र दर्प... साहित्य संघाची पहिली तोंडओळख म्हणजे स्वर आणि गंध यांची जुगलबंदी. हे समीकरण आजही माझ्या मनात पक्कं आहे.

---

ए

शेवटी, जरा घाबरत घाबरतच तिनं नानासाहेबांकडे विषय काढला. त्यांना विजूचं म्हणणं पटलं. त्यांनी तडक डॉ॰ भालेरावांना कपडेपटात बोलावून घेतलं आणि “या बेबी म्हणतायेत ते मला पटतंय,” असं म्हणाले. नानासाहेब फाटक विजूला नेहमी ‘अहो बेबी’ असं म्हणत. “मग तुला शेवटच्या सीनसाठी कसले कपडे हवेत?” डॉ॰ भालेरावांनी विजूला विचारलं. “फक्त सफेद,” ती म्हणाली. आश्चर्य म्हणजे डॉक्टरांनाही तिचं म्हणणं पटलं आणि कमळजाला पांढरेशुभ्र कपडे मिळाले. [...]

---



विजया मेहता

**शब्दार्थ :**

किंतान = गोणपाट, जाड धाग्यांचे खरखरीत कापड

भोज्या = काही खेळांमध्ये सर्वांनी येऊन ज्याला स्पर्श करायचा असतो असा मनुष्य, दगड किंवा खांब

विभाग ब

**व्याकरण उजळणी**

## १ पुढील उतारा वाचून त्यात अधोरेखित शब्दांऐवजी योग्य तेथे नामाऐवजी सर्वनामे वापरा. काही ठिकाणी वेगवेगळ्या सर्वनामांचा पर्याय योग्य ठरू शकतो हे लक्षात घ्या.

(आपल्या, त्याच्या, तो, मला, त्याची, तुझ्या, माझा, मी, त्याने)

सदू मधूला म्हणाला, "मधू, तू क) सदूचा मित्र आहेस म्हणून सांगतो, पण अनंता सदैव कफल्लकच असतो बरं का. ख) अनंताच्या पैशांचं ग) अनंता काय करतो हे घ) सदूला तरी बुवा कळत नाही. काल च) अनंताजवळ पैसे नव्हते. आजही छ) अनंताची पैशाच्या नावाने ओरडच."
"का रे बुवा? असं असायचं कारण नाही! ज) सदूजवळ पैसे मागितले का झ) अनंताने ?" मधू म्हणाला.
"अं हं, ट) सदूनेच ठ) अनंताजवळ मागितले होते," सदू म्हणाला.

## २ पुढील उताऱ्यातील गाळलेल्या जागी कंसात दिलेली सर्वनामे जशीच्या तशी किंवा त्यांचे योग्य रूप लिहा. एक सर्वनाम एकापेक्षा जास्त जागीसुद्धा योग्य ठरू शकते.

**क.**

(तू, तो, ते, काय, ह्या)

दुकानदार नवीन नोकरावर ओरडत म्हणाला "अरे, गिऱ्हाइकाशी कसं वागायचं हे अ) ------------ समजत नाही का? उगीचच आ) ------------ वादावादी करत राहिलास. इ) ------------ दुकानात येणारं गिऱ्हाईक कधीही खोटं बोलू शकत नाही. बरं, ई) ------------ म्हणत होते उ) ------------?"
नोकर शांतपणे म्हणाला, "काही नाही, ऊ) ------------ म्हणत होते की ए) ------------ मालक हा भलताच बेरकी आणि बदमाश आहे. ॲ) ------------वर थोडाही विश्वास ठेवू नकोस."

**ख.**

(तुम्ही, मी, आपण, तो)

अंकिता - डॉक्टर, अ) ---------------- आ) ---------------- नवऱ्याच्या आजाराबद्दल सांगायचं आहे. इ) --------- सारखं वाटतं की ई) --------- रेफ्रिजरेटर आहोत. यावर काही उपाय आहे का?

डॉक्टर - उ) ------------ तसं वाटलं म्हणून काही बिघडत नाही. ऊ) ------------ त्या गोष्टीचा काही त्रास होतो का?

अंकिता - तसा फार नाही. पण ए) ------------ तोंड उघडं ठेवून झोपतो आणि तेव्हा ॲ)------------ तोंडातून येणाऱ्या उजेडामुळे ऐ) ------------ झोप येत नाही.

**ग.**

(तुम्ही, तो, त्या, मी)

मुलगा - बाबा, अ) ------------ माणसाने आ) ------------ बुडत असताना बाहेर काढून तुमचा प्राण वाचवला. इ) ------------ मी शंभर रुपये बक्षीस देतो.

वडील - अरे! शंभर रुपये! छे छे! ई) ----------- फक्त पन्नास रुपये दे. उ) ----------- ऊ) ----------- बाहेर काढलं तेव्हा ए) ------------ फक्त अर्धमेला झालो होतो.

### ३ पुढील वाक्यात काही शब्दांऐवजी भाववाचक नामे वापरून व त्यानुसार आवश्यक ते बदल करून वाक्ये पुन्हा लिहा.

क. तिच्या चांगल्या स्वभावाचा सर्व जण गैरफायदा घेतात. (चांगुलपणा)

ख. दुष्काळग्रस्तांना माणूस म्हणून सर्वतोपरी मदत पोहोचायला हवी. (माणुसकी)

ग. ताईने आपण मोठी असल्याचे भान ठेवून माघार घेतली. (मोठेपणा)

घ. क्षणात दोघांना लोळवणाऱ्या त्या सरदाराचा शूरपणा पाहून त्याच्या जिवात जीव आला. (शौर्य)

च. मी मानसीकडे केवळ मैत्रीच्या नात्याने पाहत होतो. (मित्रत्व)

छ. त्याचा आवाज किती मधुर आहे. (माधुर्य)

ज. देशकार्यासाठी तरुण असणे ही अट कधीच नव्हती. (तारुण्य)

झ. कोणत्याही मार्गाने संपत्ती मिळवण्यासाठी तो वेडा झाला होता. (वेड)

ट. प्रामाणिक असल्यानेच त्याची एवढ्या वरिष्ठ पदावर नेमणूक झाली. (प्रामाणिकपणा)

ठ. इमानदार वृत्ती ही त्याची मोठी जमेची बाजू. (इमानदारी)

### ४ पुढे दिलेल्या नामांचे प्रकार लक्षात घेऊन त्या प्रकारानुसार ती नामे योग्य जागी लिहा.

**(विशेषनामे** - विवेक, भक्ती, नगर

**सामान्यनामे** - घरजावई, लक्ष्मी, वाडा, रूप, जमीन, पावले, परिस्थिती, नजर, खर्च

**भाववाचक नामे** - विवेक, पाटीलकी, लोभ, हाव, आळशीपणा, विश्वास**)**

क) ------------ या गावामधील तो चौसोपी ख) ------------, वीस एकरांची बागायती ग) ------------ आणि गावाची घ) ------------ यांचा च) ------------ कुणाला सुटणार नाही? छ) -------------- सारख्या ज) ----------------- नसलेल्या तरुणाकडून तर अशी अपेक्षाच ठेवणे चुकीचे होते. पाटलांची लेक झ) ------------ हिचा त्याच्या गोड बोलण्यावर ट) ------------ बसला आणि तिच्याशी लग्न करून त्याने पाटलांच्या वाड्यात ठ) ------------ म्हणून पाऊल टाकलं.

काही दिवसांतच त्याने मारलेल्या मोठमोठ्या बढाया खोट्या असल्याचे कळून आले, पण आता उशीर झाला होता. घरजावई म्हणून पाटलांकडून मिळणारी ड) ------------ त्याला हवी होती. पैशाची त्याला ढ) ------------ होती. एकीकडे त्याचा ण) ------------ ऐषारामी वृत्ती वाढतच चालली होती. पाटलांचे लक्ष नाही हे पाहून बागायतीचे उत्पन्न तो परस्पर खर्च करू लागला. अनागोंदी कारभारामुळे वाड्याच्या खानदानी त) ------------ ला अवकळा आली.

थ) ------------ दागदागिन्यांकडे त्याची द) ------------ जाताच तिला जाग आली. अजून परिस्थिती हाताबाहेर गेली नव्हती. तिने विचारपूर्वक ध) ------------ टाकायचे ठरवले. कागदोपत्री सारी मालमत्ता पाटलांच्या आणि तिच्या नावावर होती. तिने व्यवहारात लक्ष घातले. त्याच्या अनाठायी न) ------------ कात्री लावली. हळूहळू प) ------------ सुधारू लागली.

**५ पुढील उताऱ्यामध्ये गाळलेल्या जागी योग्य ती सर्वनामे भरा. काही ठिकाणी वेगवेगळ्या सर्वनामांचा पर्यायही योग्य ठरू शकेल.**

(हे, जे, हा, ते, कोणी, स्वतःच्या, ह्या, तो, त्या, काय)

क) ------------ घर किती छान आहे. ख) ------------ शांत आणि समाधानी असतं ग) ------------ आपलंसंही वाटतं. घ) ------------ परिसरसुद्धा नवागताला आपलंसं करणारा. दारातलं च) ------------ सोनचाफ्याचं झाड कुणाच्याही स्वागताला उत्साहाने उभं असलेलं. कुंपणावरचे छ) ------------ मधुमालतीचे रंगीत तुरे, जणू ज) ------------ सुगंधाची ललकारी देऊन आपल्याला इथल्या हवेची गंधवार्ता सांगतात. झ) ------------ जास्वंदी, ट) ------------ मोगरा, ठ) ------------ गुलाब ड) ------------ हसतात म्हणून सांगू. हासत डोलत एकमेकांच्या गमतीजमती पटकन सांगून टाकतात. अशा परिसराच्या प्रेमात पडणार नाही असं ढ) ------------ असेल का?



**६ पुढील वाक्यांमधील अधोरेखित शब्दांचे सूचनेनुसार लिंग किंवा वचन बदलून आणि त्यानुसार वाक्यात इतर बदल करून संपूर्ण उतारा पुन्हा लिहा.**



सूर्याची शेवटची किरणे (वचन बदला) लुप्त झाली होती. पिवळे केशरी ढग (वचन बदला) पश्चिमेच्या क्षितिजावर पसरले होते. मधूनच वाऱ्याची झुळूक (वचन बदला) मन उल्हसित करून जाई. माणूस (वचन बदला) कामावरून घराकडे धावत होता. पक्षी (वचन बदला) पिल्लाच्या (वचन बदला) ओढीने घरट्याकडे निघाला होता. बागेतल्या हिरवळीवर एका कोपऱ्यात तो (लिंग बदला) बसला होता. मध्यम उंची, सावळा वर्ण, धारदार नाक असे कुणालाही मोहित करणारे रूप होते त्याचे (लिंग बदला). निळे कपडे त्याच्या (लिंग बदला) वर्णाला अगदी खुलून दिसत होते. त्याची (लिंग बदला) नजर मात्र भिरभिरत इकडेतिकडे काहीतरी शोधत होती. मधूनच तो (लिंग बदला) उठायचा, दूरवर नजर टाकायचा आणि हिरमुसला होऊन पुन्हा खाली बसायचा. तिच्या (लिंग बदला) भेटीची अनिवार ओढ त्याच्या (लिंग बदला) हालचालींतून ओसंडे आणि दर क्षणाला वाढे. एवढ्यात बाजूच्या झुडुपामधून (वचन बदला) कसलातरी आवाज आला. तीच (लिंग बदला) असेल म्हणून तो (लिंग बदला) वळला आणि त्याचा (लिंग बदला) चेहरा एकदम उजळला.

## ७ पुढील उताऱ्यात कंसात दिलेल्या क्रियापदांची योग्य रूपे लिहून उतारा पुन्हा लिहा.

मनात हेतू ----------- की ते पूर्ण ----------- अपेक्षित ----------- आणि ते जर पूर्ण ----------- नाहीत, तर लेखकाला नैराश्य ----------- च. (बाळगणे, होणे, असणे, होणे, येणे) जेव्हा लेखनाची सुरुवात -----------, पहिली एक-दोन पुस्तकं प्रकाशित -----------, तोवर विविध भ्रम बहुतेक लेखकांच्या मनात -----------. (असणे, होणे, असणे) नंतर हळूहळू भ्रमनिरास व्हायला सुरुवात ----------- (होणे). काही लेखकांना ते ----------- (स्वीकारता न येणे). मग आपलं साहित्यविश्व कसं एखाद्या डबक्याप्रमाणे ----------- आणि त्यात स्वत:तच मश्गूल असलेले आपले साहित्यिक कसे बेडूकउड्या मारण्यात रममाण -----------, असं ते उपरोधानं बोलायला सुरुवात ----------- (असणे, होणे, करणे). समीक्षकांचं दुर्लक्ष, पुरस्कार न -----------, प्रकाशकांकडून मिळणारी वाईट वागणूक असे अनेक मुद्दे त्यांच्या विचारांमागे ----------- (लाभणे, असणे). पण या वेळी ते हे पार विसरून गेलेले ----------- की, आपलं लेखन हे केवळ स्वानंदासाठी -----------, असं विधान एकेकाळी आपणही केलेलं -----------. (असणे, असणे, असणे)



## ८ पुढील उतारा वाचा.

*शंकर काशिनाथ गर्गे म्हणजेच दिवाकर यांनी स्वगताप्रमाणे रचना असणारा नाट्यछटा हा साहित्यप्रकार मराठीमध्ये निर्माण केला. त्यांची एकेक नाट्यछटा म्हणजे मानवी दोषांवर आणि विसंगतीवर घातलेला घाव आहे. दिवाकरांनी मानवी स्वभावाचा खोलात जाऊन अभ्यास केला होता. त्याचमुळे त्यांच्या नाट्यछटा हृदयाला भिडत.*

*स्वर्गामध्ये अखंड सुख मिळते अशी धारणा आहे. पण सतत आनंदात राहून कंटाळा आला तर काय होईल, अशी कल्पना करून त्यांनी ही नाट्यछटा रचली आहे.*

### स्वर्गातील आत्मे

"... कंटाळा आला बोवा आपल्याला इथचा! हो तर काय! रोज तेच तेच! अगं, काडीइतकासुद्धा फरक नसावा? उठल्याबसल्या ते अमृत ढोसावे आणि खुशाल टोळासारखे भटकावे! काही उद्योग दुसरा? छे छे छे!! ओकारी आली बोवा आपल्याला येथची! असार... असार आहे हा स्वर्ग निव्वळ! तेच की! सदा म्हणे आपला आनंद हीच एक वृत्ती! केव्हा संपते आहे कुणास ठाऊक! आता थोडी का वर्षे झाली असतील इथे येऊन; पण काही आहे का फरक? हे आपले नंदनवन होते तस्से आहे! नादी लागलो आणि फुकट इथे तडफडायला आलो! चोर कुठले! म्हणे, 'स्वर्गात जा म्हणजे शांती मिळेल!' वा, काय छान शांती मिळते आहे इथे! एकाला म्हणून करमत असेल तर शपथ! नकोसे झाले आहे अगदी! हे गं काय? तू तर रडायला लागलीस! ... जाऊ; लवकरच आपण मृत्युलोकात जाऊ बरे! तिथे मग आपल्याला सुंदर सुंदर देह मिळतील! आणि मग काय महाराज! ... हसली रे हसली! अगं, ते काही पुसू नकोस! देहलोकाची मजा

काही और आहे. घटकेत आनंद आहे, तर घटकेत दुःख आहे! चालले आहे! ... वृत्तीत जिवाला बागडायला सापडते! आणि हे कशामुळे? तर हे सगळे देहामुळे बरे का! आणि हो, सगळेच तिथे अस्थिर! अशी माणसाची परीक्षा होते की ज्याचे नाव ते! चांगला तावूनसुलाखूनच निघतो! उगीच नाही मृत्युलोक! बरे का! म्हटले, खरी मुक्ती तेथे आहे माझे बाई! नाही तर इथे! पडा सदा आनंदात कुजत! मृत्युलोकाशिवाय नाहीच ते! सुख खरे तिथेच! अगं, आपलेच काय, कंटाळा आला की देवसुद्धा जातो तिथे! उगीच नाही तो अवतार घेत! ...”

दिवाकर

**वरील नाट्यछटेमध्ये एका पुरुषाचा संवाद असून तो आपल्या पत्नीशी बोलत आहे अशी कल्पना केलेली आहे. विषय लक्षात घेऊन या नाट्यछटेमध्ये पत्नीने संवादात भाग घेतला तर ती काय बोलेल ते लिहा.**



## ९ पुढील नाम-क्रियापद जोड्यांचा स्वतःच्या वाक्यात उपयोग करा.

जोड्या जुळवणे, पर्याय निवडणे, दुर्लक्ष करणे, नैराश्य येणे, भ्रम बाळगणे, सामोरे जाणे, हेतू बाळगणे, माहिती पुरवणे, दिशाभूल करणे, उपहास करणे

उदा. पुरस्कार मिळणे - पु. ल. देशपांडे यांना मानाचा महाराष्ट्रभूषण **पुरस्कार मिळाला होता.**

## १० पुढील वाक्यांमध्ये नाम + सोडणे अशी रचना आहे. गाळलेल्या जागी नामाचे योग्य ते रूप वापरा. काही नामे अयोग्य असू शकतात तर काही दोन वाक्यांत वापरता येऊ शकतात.

(रुमाल, भात, सवय, पाणी, घड्याळ, किनारा, घर, पक्षी, गाडी, उपवास)

क) स्थानकातून आधीच ------------ सोडल्याचे कळताच आता गावाला जाता येणार नाही हे कळून अपर्णाचा जीव खंतावला.

ख) मी माझ्या वाईट ------------ सोडून चांगल्या मार्गाला लागण्याचे ठरवले आहे.

ग) तब्येत ठीक नसल्याने अमृतने लवकर ------------ सोडावा म्हणून तिने आग्रह धरला.

घ) धरणातून ------------ सोडण्याची वेळ झाली की ते दृश्य पाहण्यासाठी आर्या धावत जायची.

च) ऊन कमी झाल्यावर कार्तिकीने डोक्याचा ------------ सोडला आणि ती झाडाखाली बसली.

छ) जहाजाने ------------ सोडला आणि ते वेगाने पाणी कापत पुढे जाऊ लागले.

ज) आईवडिलांशी मतभेद झाल्यामुळे कमलने अखेर ------------ सोडले आणि ती स्वतंत्रपणे राहण्यासाठी जागा शोधू लागली.

झ) सततचा कलकलाट ऐकून त्याने न राहवून शेवटी ------------ आभाळात सोडलं.

ट) कोर्टकचेरी केल्याशिवाय जमीन ताब्यात घेता येणार नाही हे कळल्यावर सुजयने जमिनीच्या मालकीवर ------------ सोडले.

ठ) वजन कमी करण्यासाठी कुणी ------------ सोडतं, कुणी पोळी.

**लक्षात घ्या.**

पुरस्कार मिळणे आणि पुरस्कार करणे

१ शासन विविध संस्थांना सामाजिक कार्याबद्दल पुरस्कार देते. (पारितोषिक देणे)

२ शासन संपूर्ण साक्षरता धोरणाचा पुरस्कार करते. (पाठिंबा देणे, सहमती दर्शवणे)

## उत्तरसंच

### विभाग अ

**२.** २. ऊ ३. आ ४. अ ५. ए ६. ई ७. उ

### विभाग ब

**१.** क. माझा ख. आपल्या / त्याच्या ग. तो घ. मला च. त्याच्याजवळ
छ. त्याची ज. तुझ्याजवळ झ. त्याने? ट. मीच ठ. त्याच्याजवळ

**२. क.** अ. तुला आ. त्याच्याशी इ. ह्या ई. काय उ. ते ऊ. ते
ए. तुझा ॲ. त्याच्या

**ख.** अ. तुम्हाला आ. माझ्या इ. त्याला ई. आपण उ. त्याला
ऊ. तुम्हाला ए. तो ॲ. त्याच्या ऐ. मला

**ग.** अ. त्या आ. तुम्हाला इ. त्याला ई. त्याला उ. त्याने ऊ. मला ए. मी

**३.** क. तिच्या चांगुलपणाचा सर्व जण गैरफायदा घेतात.
ख. दुष्काळग्रस्तांना माणुसकीने / माणुसकी म्हणून सर्वतोपरी मदत पोहोचायला हवी.
ग. ताईने आपल्या मोठेपणाचे भान ठेवून माघार घेतली.
घ. क्षणात दोघांना लोळवणाऱ्या त्या सरदाराचं शौर्य पाहून सुटकेच्या आशेने त्याच्या जिवात जीव आला.
च. मी मानसीकडे केवळ मित्रत्वाच्या नात्याने पाहत होतो.
छ. त्याच्या आवाजात किती माधुर्य आहे.
ज. देशकार्यासाठी तारुण्य ही अट कधीच नव्हती.
झ. कोणत्याही मार्गाने संपत्ती मिळवण्याचे त्याला वेड लागले होते.
ट. प्रामाणिकपणामुळेच त्याची एवढ्या वरिष्ठ पदावर नेमणूक झाली.
ठ. स्वभावातली इमानदारी ही त्याची मोठी जमेची बाजू होती.

**४.** क. नगर ख. वाडा ग. जमीन घ. पाटीलकी च. लोभ छ. विवेक ज. विवेक
झ. भक्ती ट. विश्वास ठ. घरजावई ड. लक्ष्मी ढ. हाव ण. आळशीपणा
त. रूपा थ. भक्तीच्या द. नजर ध. पावले न. खर्चाला प. परिस्थिती

५. क. हे / ते   ख. जे   ग. ते   घ. हा / तो   च. हे / ते   छ. हे / ते
ज. स्वतःच्या   झ. ही / ती / ह्या / त्या   ट. हा / तो   ठ. हा / तो
ड. काय   ढ. कोणी

६. सूर्याचा शेवटचा किरण लुप्त झाला होता. पिवळा केशरी ढग पश्चिमेच्या क्षितिजावर पसरला होता. मधूनच वाऱ्याच्या झुळुका मन उल्हसित करून जात. माणसे कामावरून घराकडे धावत होती. पक्षी पिल्लांच्या ओढीने घरट्याकडे निघाले होते. बागेतल्या हिरवळीवर एका कोपऱ्यात ती बसली होती. मध्यम उंची, सावळा वर्ण, धारदार नाक असे कुणालाही मोहित करणारे रूप होते तिचे. निळे कपडे तिच्या वर्णाला अगदी खुलून दिसत होते. तिची नजर मात्र भिरभिरत इकडेतिकडे काहीतरी शोधत होती. मधूनच ती उठायची, दूरवर नजर टाकायची आणि हिरमुसली होऊन पुन्हा खाली बसायची. त्याच्या भेटीची अनिवार ओढ तिच्या हालचालींतून ओसंडे आणि दर क्षणाला वाढे. एवढ्यात बाजूच्या झुडुपांमधून कसलातरी आवाज आला. तोच असेल म्हणून ती वळली आणि तिचा चेहरा एकदम उजळला.

७. मनात हेतू बाळगले की ते पूर्ण होणे अपेक्षित असते आणि ते जर पूर्ण झाले नाहीत, तर लेखकाला नैराश्य येणारच. जेव्हा लेखनाची सुरुवात असते, पहिली एक-दोन पुस्तके प्रकाशित होतात तोवर विविध भ्रम बहुतेक लेखकांच्या मनात असतातच, नंतर हळूहळू भ्रमनिरास व्हायला सुरुवात होतो. काही लेखकांना ते स्वीकारता येत नाही. मग आपले साहित्यविश्व कसे एखाद्या डबक्याप्रमाणे आहे आणि त्यात स्वत:तच मश्गूल असलेले आपले साहित्यिक कसे बेडूकउड्या मारण्यात रममाण झालेले असतात, असे ते उपरोधाने बोलायला सुरुवात करतात. समीक्षकांचे दुर्लक्ष, पुरस्कार न लाभणे, प्रकाशकांकडून मिळणारी वाईट वागणूक असे अनेक मुद्दे त्यांच्या विचारांमागे असतात. पण यावेळी ते हे पार विसरून गेलेले असतात की, आपले लेखन हे केवळ स्वानंदासाठी असते, असे विधान एकेकाळी आपणही केलेले होते.

९. वेगवेगळी वाक्ये तयार होऊ शकतात. उदाहरणादाखल काही वाक्ये - क. जोड्या जुळवणे - इतिहासाच्या प्रश्नपत्रिकेतील जोड्या जुळवण्याचा प्रश्न मला खूप आवडायचा. ख. पर्याय निवडणे - पुण्यातील घरात कोंडून राहणे किंवा गावी जाणे यातला एकच पर्याय तिला निवडायचा होता. ग. दुर्लक्ष करणे - तिच्या सततच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करायला तो शिकला. घ. नैराश्य येणे - वारंवार मागणी करूनही निवृत्तिवेतनाचा प्रश्न न सुटल्याने आबांना नैराश्य आले. च. भ्रम बाळगणे - राज्यात नेहमी आपलीच सत्ता येणार असा भ्रम कोणत्याही पक्षाने बाळगणे योग्य नाही. छ. सामोरे जाणे - असेल त्या परिस्थितीला सामोरे जाण्याशिवाय आपल्या हातात काय आहे? ज. हेतू बाळगणे - वरवर प्रेमाचा आव आणला तरी मनात वाईट हेतू बाळगूनच तो आला होता. झ. माहिती पुरवणे - गावात काय चालले आहे याची नानांकडून अमोलला सर्व माहिती पुरवली जात असे. ट. दिशाभूल करणे - अंकिताला परीक्षेचे चुकीचे वेळापत्रक देऊन मित्रांनी तिची दिशाभूल केली. ठ. उपहास करणे - स्वतःच्या ज्ञानाचा अवाजवी गर्व बाळगून सतत दुसऱ्याचा उपहास करणे ही अण्णांची वृत्ती होती.

१०. क. गाडी   ख. सवयी   ग. उपवास   घ. पाणी   च. रुमाल   छ. किनारा
ज. घर   झ. पक्ष्यांना   ट. पाणी   ठ. भात

७



# कलांच्या प्रांगणात

विभाग अ

## १ परीक्षेतील *वाचन* या भागासंबंधी सराव प्रश्न

**खालील उतारा वाचून त्यावर आधारित प्रश्न सोडवा.**

### चित्रकला : एक आनंदयात्रा

जन्मापासून मृत्यूपर्यंतचा प्रवास सुसह्य होण्यात मूलभूत गरजांची पूर्तता जर निर्णायक ठरत असेल, तर आपला हा प्रवास आनंददायी बनवण्यात कलात्मक अभिरुची महत्त्वाची भूमिका बजावते. आज जग आपल्याकडे आदरानं पाहतं, ते कलात्मक अभिरुची जपणाऱ्या प्राचीन संस्कृतीचे वारसदार म्हणून. जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी कलात्मक सौंदर्यदृष्टीने साकारल्या गेलेल्या चित्र-शिल्पांचा फार मोठा वारसा आपल्याला लाभला आहे. अर्थात ती निर्माण करणारे कलाकार, त्या कलाकृतींचा आशय, उद्देश यांविषयी मात्र आपण बरेचदा अनभिज्ञ असतो. अगदी आपल्याला माहीत असलेल्या देशी आणि विदेशी चित्रकारांची नावं घ्यायची झाली, तर सर्वसामान्यपणे राजा रविवर्मा, एम॰ एफ॰ हुसेन, लिओनार्दो दा विंची आणि पिकासो इथवर येऊन आपली गाडी थांबते. चित्रकलेशी आपलं नातं हे बहुधा असं 'सुरक्षित अंतर' ठेवून असतं.

पण थोडा बारकाईने विचार केला तर लक्षात येईल, की हे नातं तर आपल्या कळत्या वयाच्या आधीच जुळलेलं आहे. बालपणी, जेव्हा डोळे उघडून आपण आपल्या आजूबाजूला पाहायला सुरुवात केली, जे पाहतोय ते आपल्याला उमजायला लागलं, अगदी तेव्हापासून चित्रांनी आपलं जीवन व्यापून गेलेलं दिसतं. फरक असलाच तर एवढाच की, चित्रं व आपण यांच्यातील नात्याची भिंतींवरच्या रेघोट्यांपासून झालेली सुरुवात बऱ्याच जणांच्या बाबतीत चित्रकलेच्या वह्यांमध्ये जाऊन थांबते तर काहींची कॅनव्हासपर्यंत जाऊन पोचते.

आज असंख्य चित्रं आपल्या नजरेसमोर येत असतात, ती छापील प्रतिमा आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून. पण तरीही इलेक्ट्रॉनिक माध्यमातील किंवा छापील चित्र-प्रतिमांव्यतिरिक्त एखाद्या चित्रकारानं साकारलेलं मूळ अस्सल चित्र 'याचि देही याचि डोळा' प्रत्यक्ष पाहण्याचा आनंद आपणापैकी सर्वांनी कधीतरी नक्की अनुभवलेला असतो. चित्रकाराच्या मूळ चित्राचा आनंद घेताना त्या चित्राचा आकार, चित्राचे माध्यम, रचना, रेषा, रंग, विविध छटा, पोत आणि एकंदर संयोजन हा सारा दृक्-अनुभव इलेक्ट्रॉनिक माध्यमांतील छापील चित्रांपेक्षा विलक्षण प्रत्ययकारी असतो.

चित्रांची आजमितीला दोन प्रमुख प्रकारांत वर्गवारी करता येते. १) मूर्त चित्रशैलीतील चित्रं आणि २) अमूर्त चित्रशैलीतील चित्रं. जेव्हा चित्रांमधल्या सजीव-निर्जीव वस्तू, आकृती, निसर्गदृश्य वा घटना आपण प्रत्यक्ष जीवनात पाहिलेल्या वा अनुभवलेल्या गोष्टींशी साधर्म्य दर्शवतात, तेव्हा अशा चित्रांकडे मूर्त शैलीतील चित्रं म्हणून पाहिलं जातं. आपण अशीही काही चित्रं पाहतो, ज्यांमध्ये वास्तव जीवनातील वस्तू, आकार, निसर्गदृश्य वा घटना यांच्याशी साधर्म्य सांगणारं काहीच नसतं. केवळ रेषा, रंग, आकार, छटा, पोत यांना प्राधान्य देणारी रचना असते. तेव्हा अशा चित्रांना अमूर्त शैलीतील चित्रं म्हटलं जातं. जुन्या काळातील चित्रं प्रामुख्याने मूर्त शैलीत, तर तुलनेने नंतरच्या काळातील चित्रं मूर्त आणि अमूर्त अशा दोन्ही शैलींत काढलेली दिसतात.

अश्मयुगीन गुहाचित्रं, आदिवासी जमातींच्या पारंपरिक चित्रशैलीतील चित्रं, प्रांतीय लोककलेतील चित्रं, विविध देशांतील वैशिष्ट्यपूर्ण चित्रं, तसेच पौराणिक, धार्मिक विषयांवरील चित्रं, ऐतिहासिक

घटनांवर आधारित चित्रं, राजाश्रय मिळालेल्या चित्रकारांची दरबारी चित्रं आणि सर्वसामान्य लोकजीवनावर आधारित चित्रं या सर्वांतूनच तत्कालीन जीवनपद्धतीचं दर्शन होत असतं.

अश्मयुगीन मानवाने चितारलेल्या गुहाचित्रांमध्ये त्याचा भोवताल, प्राणी, शिकारीसारख्या त्याच्या जगण्यातील मध्यवर्ती घटना रेखाटलेल्या दिसतात. त्यांची चित्रं आजही त्यांच्या जीवन-मृत्यूच्या कष्टप्रद संघर्षाशी आपलं नातं जोडू शकतात. ती चित्रं जिथे काढलेली आहेत, त्या ठिकाणी जाऊन आपण प्रत्यक्ष जरी पाहू शकलो नाही, तरी विविध माध्यमांतून प्रतिमांच्या स्वरूपात, विशेषतः चलचित्रांतून आपल्याला त्या चित्रांची कल्पना येते. आदिमानवाने ही चित्रं काळोख्या गुहेत का आणि कशी चितारली असावीत? त्याचे रंग त्याने कसे तयार केले असतील? ही चित्रं काढण्यामागे त्याची भावना किंवा उद्देश नेमका काय असू शकेल? बहुतांशी चित्रं प्राण्यांची वा शिकारीच्या दृश्यांची का असावीत? असे अनेक कुतूहलजनक प्रश्न मनात उत्पन्न होतात. आपण ज्याला अप्रगत म्हणतो, त्या आदिमानवाच्या निरीक्षणशक्तीची प्रचिती त्याने चितारलेल्या एकेका वन्यप्राण्याच्या चित्रातून येते. हाताच्या पंजाचे ठसे रंगवण्याचं त्याचं तंत्र तर विलक्षण कल्पक आहे. गुहेच्या भिंतीवर स्वतःच्या हाताचा ठसा मिळवण्यासाठी तोंडात भरलेल्या रंगाच्या फवाऱ्याचं तंत्र त्याच्या प्रयोगशीलतेची ओळख करून देतं. ती सारी चित्रं पाहताना आणि समजून घेताना अश्मयुगातील आदिमानवाचा जीवनपट उलगडत जातो.

मानवी इतिहासात जगाच्या पाठीवर जिथे जिथे मानव पोहोचला, तिथे तिथे चित्रकला जोपासली गेली. नानाविध संस्कृती, प्रदेश आणि त्यात सातत्याने घडत गेलेले बदल या सर्वांचा परिणाम म्हणून वैविध्यपूर्ण चित्रशैली आणि तंत्रं विकसित झाली. माध्यमातील प्रयोगशील बदलांमुळेही चित्रकला बहरली. भारतीय, चिनी, मेसापोटेमियन, पर्शियन, इजिप्शियन, ग्रीक, रोमन, मायन संस्कृतींतील चित्रं आज तत्कालीन इतिहास जाणून घेण्यात मोलाची भूमिका बजावतात. गुहाचित्रांपासून मातीची भांडी, वस्त्रं, भित्तिचित्रं आणि लघुचित्रांपर्यंत अनेक रूपांतून चित्रकला जोपासली गेली. भौमितिक घटकांव्यतिरिक्त पक्षी, प्राणी, निर्जीव वस्तू, निसर्गदृश्य, एखादी घटना आणि मानवाकृती असे विषय हाताळणाऱ्या चित्रांना मूर्त शैलीतील चित्रं म्हणतात. मध्ययुगीन कालखंडात जगभरातील चित्रांचे विषय हे प्रामुख्याने पौराणिक, धार्मिक, ऐतिहासिक, तसेच सत्ताधीशांच्या जीवनाशी निगडित होते. या सर्व चित्रांच्या निर्मितीमागे या घटकांच्या उदात्तीकरणाचा हेतूही होता. ती चित्रं तत्कालीन समाजातील उच्चभ्रू वर्गाच्या अभिरुचीचं प्रतीक व त्यांच्या सामाजिक वर्चस्वाचं द्योतक ठरली.

पंधराव्या शतकात युरोपात मुद्रणकलेचा शोध लागला आणि चित्रं छापील चित्रप्रतिमांच्या स्वरूपात उपलब्ध झाल्यामुळे उच्चवर्गापुरतीच मर्यादित न राहता समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचणं शक्य झालं. त्यामुळे पाश्चिमात्य देशांमध्ये चित्रकलेविषयीची सामाजिक अभिरुची वाढीला लागली. मूळ चित्रं विकत घेणं जरी सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेरचं असलं तरी, छापील चित्रांमुळे त्यांना चित्रकलेचा मुक्तपणे आस्वाद घेता येणं शक्य झालं. या मुक्ततेला पुढे औद्योगिक क्रांतीची अशी जोड लाभली की, चित्रांमधून सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनातील विषयही चितारले जाऊ लागले. चित्रांसाठी तो एक अमर्याद विषयस्रोतच ठरला. चित्रं अधिकाधिक लोकाभिमुख होऊ लागली. तंत्रज्ञानामुळे रंगद्रव्य ट्यूबमधून उपलब्ध झाल्याने चित्रकार स्टुडिओबाहेरील समाजामध्ये मिसळून जनसामान्यांच्या जीवनाचं तसंच निसर्गदृश्यांचं चित्रीकरण करू लागले. व्यक्तिचित्र, स्थिरचित्र, निसर्गदृश्य, पौराणिक, धार्मिक, ऐतिहासिक आणि त्या जोडीला लोकजीवनावर आधारित चित्रनिर्मितीचा प्रभावी प्रसार झाला. औद्योगिक क्रांतीमुळे लाभलेल्या प्रगतिशील आणि सुखकर जीवनामुळे प्रत्यक्ष चित्रं संग्रही ठेवणं अगदी जनसामान्यांनाही शक्य होऊ

लागलं. मानव, पशू, पक्षी, वनस्पतींच्या रचनेचा सखोल अभ्यास, त्याच्या जोडीला यथार्थदर्शनाचा (पर्स्पेक्टीव्ह ड्रॉईंगचा) गाढा अभ्यास आणि त्या जोडीला रंगशास्त्राचा अनुभव पणाला लावून चित्रकारांची चित्रनिर्मिती चालू होती.

चित्रकलेविषयीच्या समाजातील वाढत्या आस्थेमुळे चित्रकारांचं यश आणि अर्थार्जनाचा आलेखही चढता होता. परंतु एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी कॅमेऱ्याचा शोध लागला आणि चित्रकारांसमोर मोठंच आव्हान उभं राहिलं.



भौतिकदृष्ट्या अस्तित्वात असणाऱ्या आणि डोळ्यांना दिसणाऱ्या गोष्टींचं, अगदी दिसतं तसं चित्रण अवघ्या क्षणार्धात करणारा कॅमेरा एका अद्भुत क्रांतिपर्वाचा घटक बनला. निसर्गचित्रण, व्यक्तिचित्रणापलीकडे जात एकाच वेळी क्षणार्धात मोठा मानवसमूह छायाचित्रित करू शकणं, कुठेही घेऊन जाता येणं, वैविध्यपूर्ण अशा, पूर्वी कधीही चित्रित न झालेल्या 'आय-लेव्हल'मधून दृश्य छायाचित्रित करता येणं अशा बाबी कॅमेऱ्याची उपयुक्तता सिद्ध करणाऱ्या ठरल्या. त्यात भर म्हणून छायाचित्र अत्यंत स्वस्त असणं, त्याच्या अनेक प्रती सहज उपलब्ध होऊ शकणं, स्टुडिओतील चित्राच्या तुलनेत खूपच लवकर छायाचित्र मिळणं या कारणांमुळे अगदी श्रमजीवी वर्गापर्यंत छायाचित्रांची लोकप्रियता आणि मागणी वाढली.

हे आव्हान पचवून चित्रकारांनी असे विषय रंगवायला सुरुवात केली, जे छायाचित्रित करण्यास कॅमेरा असमर्थ ठरतो! समोर जे दिसतं तेच छायाचित्रित करू शकण्याची कॅमेऱ्यांची मर्यादा चित्रकारांच्या अमर्याद सृजनशीलतेला नवसंजीवनी देणारी ठरली. भोवतालचं जग डोळ्यांना जसं दिसतं तसंच रंगवण्यापलीकडे, चित्रकार मानवी भाव-भावना, अनुभव, कल्पना आपल्या चित्रांतून साकारू लागले. मूर्त शैलीतून चित्रं साकारताना कॅमेऱ्याच्या आवाक्याबाहेरील चित्रप्रसंग चितारले जाऊ लागले. त्यामध्ये ऐतिहासिक, पौराणिक विषयांचाही समावेश होता, कारण ते कॅमेऱ्याने चित्रित करणं अशक्यप्राय होतं!

मोठ्या जिद्दीने मूर्त चित्रशैलीतूनच चित्रकारांनी नव्या युगाची चित्रनिर्मिती सुरू केली. विरूपीकरण म्हणजे वस्तूंचे आकार, रंग, पोत, त्यांचे दृश्य स्वरूप हे वास्तववादी न रंगवता त्यांचे भौतिक स्वरूप स्वेच्छेनुसार बदलण्याचं स्वातंत्र्य चित्रकारांनी घेण्यास सुरुवात केली. भौमितिक मूलभूत आकारांच्या स्वरूपात सारे विषय रंगविण्यात आले. निसर्गदृश्य, स्थिरचित्रं, व्यक्तिचित्रं हे सर्व आकार-रंग-रेषांच्या सुलभीकरणातून रंगविले जाऊ लागले. रंग, रेषा, आकार, छटा, पोत यांचा वापर भावाभिव्यक्तीबरोबरच वैयक्तिक अभिव्यक्ती सादर करण्याच्या दृष्टीने केला जाऊ लागला. रंगलेपनातील वैविध्यपूर्ण तंत्रं, रंगद्रव्यातील प्रयोगशीलता, चित्रांसाठी निवडलेले नानाविध पृष्ठभाग यांच्या मुबलकतेमुळे अभिव्यक्ती सादर करण्यासाठी अभूतपूर्व वाव मिळाला. एकीकडे मूर्त चित्रशैलीतून चित्रनिर्मिती चालू असतानाच, दुसरीकडे अमूर्त चित्रशैलीने जोम धरला. अमूर्त चित्रशैलीतील अमर्याद अभिव्यक्तिस्वातंत्र्यामुळे चित्रकार मनसोक्तपणे अशी चित्रं साकारू शकतात, ज्यांमध्ये मूर्त चित्राप्रमाणे मापदंडाचं जाचक बंधन नसतं. अमूर्त चित्रकार मानवी तसंच वैयक्तिक मनोविश्वाची आपल्या चित्रांतून ओळख करून देत असतात. त्या चित्रांत प्राधान्य असतं ते रेषा, रंग, आकार, छटा आणि पोत यांना!

आज प्रगत छपाई तंत्रज्ञान आणि संगणकीकरण यांच्या युगातही चित्रकला अखंडपणे मानवी जीवन समृद्ध आणि आनंदी करते आहे. अमूर्त चित्रशैलीतील चित्रांबरोबरच मूर्त चित्रशैलीतील कलानिर्मितीही

जगभर अखंडपणे चालू आहे. कलाशिक्षणामुळे चित्रकलेविषयीची सामाजिक जाण वृद्धिंगत होण्यास अधिकच मदत झाली आहे. एकापाठोपाठ एक आलेल्या मुद्रणकला, कॅमेरा, दृक्-श्राव्य चित्रपट, टेलिव्हिजन, कम्प्युटर ॲनिमेटेड चित्रपट अशा दृक्-कलेतील क्रांतिकारी आव्हानांना सामोरे जात जगभरातील चित्रकारांनी समाजातील चित्रकलेविषयीची अभिरुची जोपासायचा प्रयत्न सुरू ठेवला आहे. आधुनिकतेच्या प्रवाहात मानवी संवेदनशीलता आणि कलेविषयीची अभिरुची यांत्रिक आणि साचेबद्ध होऊ न देण्यात चित्रकला, चित्रकार आणि चित्ररसिक या सर्वांचं योगदान अत्यंत मोलाचं आहे. कारण या कलेचं बोट धरून केलेला प्रवास जगण्याची आनंदयात्रा करणारा आहे.

विशाल वाड्ये

**क. पुढील विधाने चूक की बरोबर ते लिहा.**

अ) आपण आणि चित्रं यांच्यातील नात्याची सुरुवात चित्रकलेच्या वह्यांपासून होते.

आ) चित्रं इतिहास समजण्याचं माध्यम आहेत, कारण पूर्वी लढायांची खूप चित्रं काढली जात.

इ) मुद्रणकलेच्या शोधामुळे चित्रकलेचा लाभ झाला, कारण त्यामुळे चित्रं सामान्य लोकांपर्यंत सहज पोचू लागली.

ई) आधुनिक काळात चित्रकलेसमोर नवी आव्हाने निर्माण झाली आहेत, कारण लोकांना चित्रकलेत फारसा रस राहिलेला नाही.

**ख. पुढील विधानांसाठी उत्तराचा अचूक पर्याय निवडा.**

अ. छापील चित्र पाहणे तुलनेने कमी आनंददायी वाटते, कारण
- एक) छापील चित्र मूळ चित्राची प्रतिकृती असते.
- दोन) मूळ चित्र संपूर्ण चित्राचा समग्र अनुभव देते.
- तीन) छापील चित्र कृत्रिम वाटते.
- चार) छापील चित्र कॅनव्हासवर नसते.

आ. पंधराव्या शतकानंतर चित्रांचे विषय बदलले, कारण
- एक) सर्वसामान्य जनतेची कलेतील अभिरुची वाढली.
- दोन) सर्वसामान्यांचे जगणे सुकर झाले.
- तीन) सर्वसामान्य कुटुंबांमधील चित्रकार यशस्वी होऊ लागले.
- चार) सर्वसामान्यांचे जगणे चित्राचा विषय ठरू लागले.

इ. अमूर्त चित्रशैली चित्रकारांमध्ये लोकप्रिय झाली, कारण
- एक) या शैलीने अभिव्यक्तीत अधिक मोकळेपणा दिला.
- दोन) मानवी भावभावना चित्रित करण्यासाठी ती अधिक योग्य ठरली.
- तीन) मूर्त शैलीत नव्या प्रयोगांना वाव नव्हता.
- चार) अमूर्त शैलीत चित्रं काढणं सोपं होतं.

ई. विरूपीकरण म्हणजे पुढीलपैकी कोणती गोष्ट नाही?

एक) भौतिक घटकांच्या स्वरूपात बदल

दोन) चित्रकाराचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य

तीन) रेखाटनाच्या मर्यादा

चार) मूर्त शैलीकडून अमूर्त शैलीकडे प्रवास

**ग. पुढे दिलेल्या वाक्प्रचारांच्या त्यांच्या अर्थाशी योग्य जोड्या जुळवा व वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा.**

| | |
|---|---|
| अ) वाव मिळणे | एक) प्रत्यक्ष अनुभवणे |
| आ) अनभिज्ञ असणे | दोन) जास्तीत जास्त प्रयत्न करणे |
| इ) पणाला लावणे | तीन) संधी मिळणे |
| ई) याचि देही याचि डोळा | चार) माहीत नसणे |

**घ. कंसातील सूचनेनुसार बदल करा.**

अ) केवळ रेषा, रंग, आकार, छटा, पोत यांना प्राधान्य देणारी रचना असते. तेव्हा अशा चित्रांना अमूर्त शैलीतील चित्रं म्हटलं जातं. (दोन वाक्यांचे एक वाक्य करा)

आ) पंधराव्या शतकात युरोपात मुद्रणकलेचा शोध लागल्याने चित्रे छापील प्रतिमांच्या स्वरूपात उपलब्ध झाली. (एका वाक्याची दोन वाक्ये करा)

**च. पुढील उतारा भविष्यकाळात लिहा.**

मोठ्या जिद्दीने मूर्त चित्रशैलीतूनच चित्रकारांनी नव्या युगाची चित्रनिर्मिती सुरू केली. भौमितिक मूलभूत आकारांच्या स्वरूपात सारे विषय रंगवण्यात आले. निसर्गदृश्य, स्थिरचित्र, व्यक्तिचित्र हे सर्व सुलभीकरणातून रंगवले जाऊ लागले.

**छ. चित्र या शब्दाला योग्य ठरणारी विशेषणे पुढील यादीतून ओळखा.**

राजाश्रय, अमूर्त, पारंपरिक, छापील, आज, चित्रकार, धार्मिक, नातं, वैशिष्ट्यपूर्ण, द्योतक, पौराणिक, भौमितिक, मुद्रणकला, पोत, प्रत्ययकारी

**ज. उताऱ्यात आलेल्या पुढील शब्दांचे अर्थ लक्षात घेण्यासाठी आणि समानार्थी शब्द शोधण्यासाठी कोशाची मदत घ्या.**

पोत, प्रत्ययकारी, साधर्म्य, आजमितीला, द्योतक, अनभिज्ञ, अनुभवगम्य, लोकाभिमुख, नवसंजीवनी, अशक्यप्राय, अश्मयुगीन, भावाभिव्यक्ती, साचेबद्ध

**झ. थोडक्यात उत्तरे लिहा.**

अ) संस्कृतींच्या अभ्यासासाठी पुरातन चित्रं कशी उपयुक्त ठरतात?

आ) एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी चित्रकारांसमोर कोणते आव्हान उभे राहिले? चित्रकारांनी त्यावर कशाप्रकारे मात केली?

## २ परीक्षेतील *श्रवण* या भागासंबंधी सराव प्रश्न

**तरुण पिढीतील अष्टपैलू गायक राहुल देशपांडे यांचे संगीतप्रवासाविषयीचे मनोगत पुढे ऐका.**

**क. त्यावर आधारित प्रश्नांसाठी दिलेल्या पर्यायातून योग्य उत्तराचा पर्याय निवडा.**

अ. राहुल देशपांडे लहानपणी शास्त्रीय संगीत शिकले, ते
एक) खूप हौशीने  दोन) घरच्यांच्या आग्रहाखातर  तीन) जबरदस्तीने

आ. राहुल देशपांडे शास्त्रीय संगीताकडे वळले, ते
एक) निर्गुणी भजन ऐकून  दोन) वसंतराव देशपांड्यांचे गाणे ऐकून  तीन) भजन ऐकून

इ. राहुल देशपांडे पु. लं. ना हाक मारायचे, ते
एक) काका म्हणून  दोन) आजोबा म्हणून  तीन) भाईकाका म्हणून

ई. राहुल देशपांडे यांना पु. लं. कडून सल्ला मिळाला, तो
एक) सी. ए. करण्याचा  दोन) गाणं करण्याचा  तीन) रियाज करण्याचा

उ. राहुल देशपांडे कॉलेजात भाग घेत, तो
एक) शास्त्रीय संगीताच्या स्पर्धांमध्ये  दोन) सिनेसंगीताच्या स्पर्धांमध्ये  तीन) ऑर्केस्ट्रांमध्ये

**ख. राहुल देशपांडे यांचा शास्त्रीय संगीताच्या रियाजापर्यंतचा प्रवास सात ते आठ ओळींत तुमच्या शब्दांत लिहा.**



विभाग ब

**व्याकरण उजळणी**

## १ पुढील उतारा वाचा.

### रेषेचे लाघव

दिवाळीला आम्ही सख्खी आणि मावसभावंडे आजोळी जात असू. तेव्हा दारापुढल्या अंगणात सकाळ-संध्याकाळ सडा घालून तिथे सुरेख रांगोळ्या काढणे हा माझ्या आईचा अन् मावशीचा आवडता छंद होता. बोटांच्या चिमटीतून अलगद सुटल्यासारखे वाटणारे, एका हारीने* उमटत जाणारे रांगोळीचे पांढरेशुभ्र ठळक ठिपके शेणाचा सडा शिंपडलेल्या न्याहार* जमिनीवर उठून दिसत. ते ठिपके बघणे हा एक सुंदर, मन उमलवणारा अनुभव होता.



ठिपके काढून झाले की भराभर रेघा ओढल्या जायच्या. ठिपक्यांना जोडणाऱ्या, उभ्या-आडव्या-तिरप्या जाणाऱ्या, छेद देणाऱ्या, लवचिकपणे मध्येच मुरडून मागे वळणाऱ्या, एकमेकींत गुंतणाऱ्या रेषांचा एक भूलभुलैयाच माझ्यासमोर निर्माण होई. वर्तुळे, अर्धवर्तुळे, त्रिकोण, चौकोन, शंकरपाळ्याच्या आकाराचे चौकोन अशा अनेक मूलभूत आकारांतली गंमत मला रांगोळ्यांतून प्रथम जाणवली. स्वस्तिक,

सात ठिपक्यांचे कासव अशा सोप्या रांगोळ्यांपासून तो एकमेकांना विळखे घालीत जाणारे नाग, बारव*, झेला*, कारल्याचा वेल, बिल्वपत्र, ज्ञानकमळ अशा अवघड रांगोळ्यांपर्यंत कितीतरी सुरेख चित्राकृती आई आणि मावशी सहज काढायच्या. संध्याकाळी अंगण झाडताना सकाळची रांगोळी पुसली जाणार म्हणून मन खिन्न होई. रेषेचे पहिले भान मला आईने पाटीवर काढून दिलेल्या चित्रांतून आणि नंतर त्या रांगोळ्यांतून आले. तेव्हापासून रेषेचे जे आकर्षण मला वाटत राहिले आहे ते आजतागायत कायम टिकून राहिले आहे. रंगांचे सौंदर्य मला कळते, पण त्यांनी मला कधी भुलवले नाही. रेषा मात्र मला केवळ अद्भुत वाटते. तिचे लाघव मनाला भुरळ घालते.

शांता शेळके

**शब्दार्थ :**

हारीने = ओळीने

बारव = विहीर

न्याहार = गुळगुळीत, सपाट

झेला = फुलांचा गुच्छ

**क. पुढे दिलेल्या शब्दांच्या पुढे योग्य क्रियापदे लिहा. त्यासाठी तुम्ही उताऱ्याची मदत घेऊ शकता. तुम्ही एकापेक्षा जास्त क्रियापदेही लिहू शकता. कधीकधी वेगवेगळी क्रियापदे वापरल्यावर व्यक्त होणाऱ्या वेगवेगळ्या अर्थांचीही नोंद घ्या.**

उदा० उठून

उठून + दिसणे, जाणे

अ. रांगोळ्या आ. ओढले इ. मागे ई. अनुभव उ. विळखा

ऊ. खिन्न ए. भुरळ ॲ. अद्‌भुत ऐ. छंद ओ. रेघा

**ख. पुढील वाक्यांमधील संयुक्त क्रियापद लिहा आणि त्यांचा स्वतःच्या वाक्यात उपयोग करा. वाक्यात त्याचा भिन्न अर्थ आला तरी हरकत नाही. दोन्ही अर्थांमधील फरक समजून घ्या.**

उदा० अभिनयातही दिव्यत्वाची प्रचीती एखादा जन्मजात नटच देऊ शकतो.

देऊ + शकतो = देऊ शकतो

वाक्य - मी तुम्हाला फक्त एक दिवस वेळ देऊ शकतो.

अ. विधात्याने नटाची सामग्री नानासाहेबांच्या पदरात टाकताना कसलीच कसूर केली नव्हती.

आ. नानासाहेबांनी स्वतःची तंदुरुस्तीही उत्तम राखली होती.

इ. रंगमंचावरील त्यांची हालचाल कधीही बोजड वाटली नाही.

ई. त्यांचा आवाज खर्जापासून तारस्वरापर्यंत लीलेने फेकला जाऊ शके.

उ. नाटकाचा प्रेक्षक सुजाण असायला पाहिजे.

ऊ. अशा ताकदीची भूमिका दुसरा कोण करू धजेल?

ए. तरी माझ्यासारख्या सामान्य अभिनेत्याने ती भूमिका करून पाहिली.

ॲ. खाडिलकरांच्या या राघोबाचे दर्शन ते नेटकेपणाने घडवत गेले.

ऐ. पल्लेदार वाक्ये आवाज चढवून म्हटली जात.

ओ. संवादांचे पक्के पाठांतर केले जायचे.

**ग. पुढील वाक्यातील क्रियापदे संयुक्त आहेत की नाही ते ओळखा व नसल्यास त्याचे कारण लिहा.**

उदा० तू एकदा नाटक पाहून ये आणि मग मला सांग. (नाही. दोन स्वतंत्र क्रिया)

अ. तू नाटक पाहू शकलास तर मला सांग.

आ. रंगमंचावरील त्यांच्या हालचालीत एक वेगळाच ताल असायचा.

इ. रंगमंचावरील त्यांच्या हालचालीत एक वेगळाच ताल राखला जायचा.

ई. आवाजाची फेक शेवटच्या प्रेक्षकालासुद्धा तेवढीच भारून टाकायची.

उ. आवाजाच्या फेकीमुळे शेवटचा प्रेक्षकसुद्धा तेवढाच भारला जायचा.

ऊ. रंगमंचावर एक गर्द निळा पडदा सोडलेला असायचा.

ए. रंगमंचावरील एक गर्द निळा पडदा सोडून बांध.

अॅ. शताब्दी महोत्सवात त्याला पहिले बक्षीस मिळाले.

ऐ. शताब्दी महोत्सवात त्याला पहिले बक्षीस मिळाले आहे.

ओ. नाटक संपताच टाळ्यांचा कडकडाट झाला.

## २ सराव

**क. पुढील वाक्यांमधील अर्थ लक्षात घेऊन शक्य क्रियापदे आणि प्रयोजक क्रियापदे ओळखा.**

उदा० चैत्रवैशाखाचं कडक ऊन मला सोसवत नाही. (शक्य क्रियापद)
बाहेरच्या खोलीत बांधलेल्या कुत्र्याला मुलांनी सोडवले. (प्रयोजक क्रियापद)

अ. मला आता दळणाची जड पिशवी आणवते.

आ. काकू मात्र संजयकडून दळणाची जड पिशवी आणवते.

इ. आई आजीला रोज फिरायला नेऊन बागेत बसवते.

ई. सुमुखीने मुलींकडून सुंदर नाच बसवला.

उ. माळरानावर आज पहिल्यांदाच त्याने गाई चारल्या.

ऊ. त्याला या वयात मैदानावर जाऊन क्रिकेटचा सामना खेळवत नाही.

ए. आम्हाला थंडीत रात्रीचे अंगणात निजवत नाही.

अॅ. मला व्यायामासाठी इतक्या लवकर उठवत नाही.

ऐ. महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी काल झाड तोडले.

**ख. रिकाम्या जागी आवश्यकतेनुसार शक्य किंवा प्रयोजक क्रियापद वापरा.**

(वेधून घेणे, बोलणे, न करणे, न सांगणे, बसणे, खुलणे, हसणे, पळणे, उठवत नसणे, नाचणे)

आज काय झाले माहीत नाही, पण सकाळी मला अजिबात उठवत नव्हते. अगदीच उत्साह वाटत नव्हता. कुणालाही माझी उदासी अ) ------------. गरम चहा घ्यावा तर तोही आ) ------------. थोडा वेळ गॅलरीत इ) ------------ का ते पाहू म्हणून गॅलरीत आले आणि झोपाळ्यावर बसले. तोच समोरून

कुणीतरी अचानक पिवळ्याधमक रंगाने माझे लक्ष ई) ------------. वाऱ्यावर हसून डोलून माझ्या मनाला उ) ------------ आणि जवळ ऊ) ------------. होय, खूप वाट पाहायला लावून शेवटी आज कुंडीतले माझे लाडके रोप पिवळ्या फुलांनी बहरले होते. सोनेरी सूर्यकिरणांमध्ये फुलांना ए) ------------ ते मला. ॲ) ------------. त्याच्या प्रसन्न दर्शनाने माझी उदासी कुठल्याकुठे ऐ) ------------.

## ३ सराव

**क. धातूला ऊ, णे, ताना, ऊन, त, ला असे प्रत्यय लागून त्याची धातुसाधिते किंवा कृदन्ते तयार होतात. पुढील उताऱ्यातील धातुसाधिते किंवा कृदन्ते ओळखा. उताऱ्याच्या आधारे तुमच्या आवडत्या गायक / गायिकेबद्दल दहा ते बारा ओळींत उतारा लिहा. उताऱ्यात जसा धातुसाधिते किंवा कृदन्तांचा वापर केला आहे तसाच तुमच्या उताऱ्यातही करा.**

त्यांचे गाणे मोठे मनमोहक. डाव्या हाताची तर्जनी आणि मध्यमा जुळवून गातागाता सूर दाखवण्याची पद्धत. बैठकीत प्रवेश करताना अत्यंत सहज प्रवेश.

हिराबाई म्हणजे गाण्याच्या अंगणातली तुळसच आहे. फुलताना मंजिऱ्यांचा सात्विक फुलोरा घेऊन फुलणारी. स्वतःचा गाजावाजा न करणे ही त्यांची सवय.

एकेकाळी गाणेवाजवणे हे प्रतिष्ठेचे लक्षण नव्हते. भारतीय संगीतकलेवरचे हे लांच्छन पुसून हिराबाईंनी तिला प्रतिष्ठा दिली. माणसे लेकीसुनांना घेऊन प्रथम बायकांच्या गाण्यांच्या मैफिलीला गेली ती हिराबाईंच्या. हिराबाईंच्या सोज्वळ सुरांचे आणि त्याहूनही सोज्वळ वागण्याचे शिंपणे ह्या वाटेवर झाले आणि वाट मऊ झाली. हिराबाईंचा स्वभाव आणि त्यांचे गाणे-त्यांचे दिसणे ह्यांत अभेदच आहे.

पु. ल. देशपांडे

**ख. वरील उताऱ्यात आलेले पुढील शब्द आणि त्यांचे अर्थ यांच्या योग्य जोड्या लावा.**

| | |
|---|---|
| अ. मनमोहक | एक. सत्त्व असलेले |
| आ. प्रवेश | दोन. भेद नसणे, सारखेच असणे |
| इ. तर्जनी | तीन. मधले बोट |
| ई. मध्यमा | चार. हाताचे अंगठ्यानंतरचे बोट |
| उ. सात्त्विक | पाच. मनोहर, मनाला मोहून टाकणारे |
| ऊ. गाजावाजा | सहा. मान |
| ए. प्रतिष्ठा | सात. विनाकारण मोठेपणा सांगणे, खोटा डामडौल |
| ॲ. सोज्वळ | आठ. आत जाणे |
| ऐ. अभेद | नऊ. शुद्ध, निर्मळ |

## ४ सराव

**क. दिलेले शब्द व योग्य अकर्तृक/भावकर्तृक क्रियापदे वापरून वाक्ये तयार करा. वाक्य तयार करताना आवश्यकतेनुसार अजून काही शब्दही वापरू शकता.**

(सांजावले, गरगरले, प्रकाशले, मळमळले)

उदा॰ सूर्य – उगवला – अचानक – सगळीकडे
सूर्य उगवला आणि अचानक सगळीकडे प्रकाशले.

अ. सकाळ – प्रवास – तिला

आ. चालताना – ऊन – तडाखा – तिला

इ. भरदुपार – ढग – काळोखी – जणू

**ख. पुढे दिलेल्या शब्दांच्या मदतीने व दिलेल्या धातूपासून धातुसाधिते तयार करून प्रत्येक धातूची २ वाक्ये करा.**

(पळ, थांब, विसर, झोप, घाबर, उठ)

उदा॰ पळ – पळू, पळत
मांजराला बघून उंदीर **पळू** लागला.
मी पोचले तेव्हा तो **पळत** येताना दिसला.

अ. थांब

आ. विसर

इ. झोप

ई. घाबर

उ. उठ



## ५ पुढील उतारा वाचा.

### म्हणींची लज्जत

लग्न झाल्यावर सुरुवातीच्या दिवसांत वैताग आणला तो सासूबाईंच्या भाषेने; म्हणजे त्यांच्या भाषावैभवाने! वाक्यागणिक येणारे ते वाक्प्रचार, म्हणी, ते वक्रोक्ती अलंकार असलेले शब्द... कितीदा तरी त्याचा अर्थच कळायचा नाही, म्हणजे त्यातला गर्भितार्थच कळायचा नाही. त्यांचा उद्देश कळायचा नाही. मी मख्ख चेहऱ्याने उभी असायचे. तसं तर शाळेत असताना वाक्प्रचार, म्हणी शिकले होते. पण त्यांचा बोलण्यात इतका सढळपणे वापर मी पहिल्यांदाच ऐकत होते. शिवाय त्यांचा तो कोल्हापुरी ठसका.

एकदा मला रात्री माझं काही काम आठवलं, ते करत बसले. त्या लगेच म्हणाल्या, "हे काय? आता काम करत बसलीस? **दिवस गेला रेटारेटी आणि चांदण्यात कापूस वेची."**

मी येडपटासारखी बघत बसले. एकदा मी काहीतरी पदार्थ केला, थोडासाच केला होता. बरा झाला. सासूबाईंना बहुतेक आवडला असावा. कारण त्यांनी तो परत मागितला. 'संपला' म्हटल्यावर त्या बोलल्या, "हं, एवढंसंच करायचं, तोंडाला चव लागते, पण **'आडजीभ खाई अन् पडजीभ बोंबलत जाई."**

शेजारीण म्हणाली मला, "छान केलास हो पदार्थ, सुगरण आहेस." तर लगेच त्या म्हणाल्या, "तर तर! **एका पिसानं कधी मोर होता येत नाही."**

माहेरच्या दूरच्या नात्यातल्या लग्नाचं निमंत्रण आलं, म्हणून मी अगदी मोहरून गेले. जायच्या तयारीला लागले. तर त्या म्हणाल्या लगेच, "हं, देशस्थी नातं... **आऊचा काऊ तो माझा मावसभाऊ. आधीच कामाचा कंटाळा त्यात माहेरचा सांगावा...** कामं राहिली बाजूला आणि ही लागलीय नाचायला."

एक बरं होतं, मला त्या काय म्हणताहेत ते काहीच कळत नव्हतं आणि मला जाणून घ्यायची आवश्यकताही वाटली नव्हती.

आम्ही एकदा ओळखीच्यांकडे गेलो होतो – म्हणजे सासूबाईंच्या मैत्रिणीकडे. त्यांची सून भलतीच जाड झाली होती. आम्ही गेलो तर जाड सुनेला काही काम करवत नव्हतं. लगेच धापा टाकत होती. हाश्श हुश्श करत होती. मग तिच्या चटपटीत सासूनेच छानपैकी भजी केली, चहा केला. सासूबाई मला हळूच म्हणतात, **"तरण्या झाल्या बरण्या आणि म्हाताऱ्या झाल्या हरण्या."**

हे मात्र लगेच कळलं हं. मला हसूच आलं एकदम. गंमत म्हणजे सासूबाईंची मैत्रीणही त्यांच्यासारखीच छान म्हणी वापरत होती. त्यांची सून मुलाला शाळेतून आणायला गेली होती, तोपर्यंत मैत्रिणींचं मन मोकळं करणं चाललं होतं.

"काय सांगायचं, **आपलंच नाणं खोटं**. माझा लेक आधी मला किती विचारायचा आणि आता... **अगं अगं बायले, तुला सारं वाहिले.** नुसता बाईलबुद्ध्या झालाय. तरी बरं, कामं सगळी मीच करते. तिचं काम म्हणजे **सहा महिन्यांची जांभई... हळूबाई नुसती**. नुसतं गोरं कातडं! पण म्हणतात ना, **रंगाने गोरी, हजार गुण चोरी."**

मग त्या दोघींच्यात तिसऱ्या मैत्रिणीचा विषय निघाला. तिला मूलबाळ नव्हतं, पण एकाला मुलगा समजून वाढवलं होतं. पण त्याला तिच्याबद्दल इतकी काही जवळीक वाटत नव्हती. त्याच्याबद्दल बोलताना म्हणाल्या, **"किती झालं तरी मातीचे कुल्ले... सुकल्यावर गळून पडणारच.** ही मानलेली नाती काय खरी असतात? **जाळाशिवाय कढ नाही, मायेशिवाय रड नाही.** पण खरं तर **आधी गुंतू नये, मग कुंथू नये."**

माझ्या हातात कुठलं तरी साप्ताहिक होतं. त्यातल्या 'पेज थ्री टाइप' चविष्ट बातम्यांपेक्षा मला त्या दोघींचं संभाषण – म्हणजे त्यातली भाषा – त्या क्षणी जास्त इंटरेस्टिंग वाटत होती.

सासूबाईंबरोबर घरी यायला निघाले. मध्येच महिला मंडळातल्या एकजण भेटल्या. त्यांना माझं व्याख्यान ठेवायचं होतं. सासूबाई पुटपुटल्याच, **"गाढव्या गावात गाढवी सवाष्ण."**

एकदा माझा भाऊ आला होता. तो गप्पिष्ट आहे. घरी जायला निघेपर्यंत परत काही छान विषय निघायचा. मग चपला काढून ठेवायचा आणि परत गप्पांत सामील. सासूबाई म्हणाल्या, "तुझं म्हणजे अगदी **जातो जातो, साळीचा भात खातो,** असं चाललंय." एकच हशा. माझा भाऊ हसत म्हणाला, "तुमचा म्हणींचा संग्रह आवडतो बरं का!" तर त्या ठसक्यात म्हणतात कशा, **"कुणाला कशाचं तर बोडकीला केसांचं कौतुक!** तुला नाहीय उद्योग. उगा माझ्या मागे लागलाय. **काम नाही घरी अन् सांडून भरी."**

अशी सासू गोड बाई, भाषेला नटवते.

शैलजा भा. शेवडे

**क. पुढे वरील उताऱ्यातील काही म्हणी व त्यांचे अर्थ दिले आहेत. ते लक्षात घेऊन दिलेल्या वाक्यांमध्ये योग्य म्हण वापरा.**

आऊचा काऊ तो माझा मावसभाऊ = खूप लांबचं नातं

सहा महिन्यांची जांभई = अतिशय मंदगतीचं काम

आधी गुंतू नये, मग कुंथू नये = एखादी गोष्ट स्वीकारण्यापूर्वी विचार करावा, स्वीकारल्यावर तक्रार करू नये

काम नाही घरी अन् सांडून भरी = काही काम नसेल तर विनाकारण काम निर्माण करून ते करत बसणे

एका पिसानं कधी मोर होता येत नाही = छोट्या यशाने यशस्वी म्हणवून घेता येत नाही

दिवस गेला रेटारेटी आणि चांदण्यात कापूस वेची = आधीचा वेळ वाया घालवणे आणि नंतर घाईने काम करणे

उदा॰ "ही ना माझ्या भाच्याच्या मेव्हणीची आत्येबहीण आहे हो." काकू ठसक्यात म्हणाली. "म्हणजे **आऊचा काऊ तो माझा मावसभाऊ." वहिनी कुजबुजली.**

अ. "समीरा, एकदा टंकन केलेला मजकूर पुन्हा पुन्हा काय टंकित बसली आहेस! ---------------------
--------------------------------------------------------------------------------

आ. "आता मला कार्यालयातल्या लोकांच्या तक्रारी सांगू नकोस. मी नोकरीला लागण्याआधीच तुला कल्पना दिली होती. पण तेव्हा ऐकलं नाहीस! ------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------

इ. "नरेंद्र, सकाळपासून काहीच कामं केली नाहीस, ही पाव किलो भाजीसुद्धा सगळी चिरली नाहीस. किती रे हळू काम तुझं! -----------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------

ई. गाडीचे गियर कुठे असतात, एवढं कळलं म्हणजे लगेच गाडी चालवता येत नाही. ----------------
--------------------------------------------------------------------------------

उ. "सगळे दिवस उनाडक्या करत घालवता आणि मग काम संपवायची वेळ आली, की जागरणं करता! ----------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------

**ख. पुढील वाक्यांत समर्पक म्हण किंवा वाक्प्रचार वापरला आहे की नाही ते अर्थावरून लक्षात घ्या आणि नसल्यास दुसरी कोणती म्हण किंवा वाक्प्रचार तिथे समर्पक ठरेल तो निवडा.**

हातच्या काकणाला आरसा कशाला = जी गोष्ट स्पष्ट दिसते ती सिद्ध करायला दुसऱ्या कशाची गरज नसते.

काखेत कळसा आणि गावाला वळसा = जवळ असलेली वस्तू शोधायला विनाकारण लांब जाणे

रात्र थोडी आणि सोंगे फार = थोड्या वेळात खूप गोष्टी / कामे असणे

रात्रीचा दिवस करणे = खूप कष्ट करणे

शंख करणे = नाव घेऊन जोराने ओरडणे, हाका मारणे

खडे फोडणे = नावे ठेवणे

खाई त्याला खवखवे = ज्याची चूक असते त्याला ती टोचत राहते

उदा. टीव्हीचा रिमोट शोधायला अख्खं घर पालथं घातलं आणि मिळाला मात्र टीव्हीच्या शेजारी! म्हणतात ना, **हातच्या काकणाला आरसा कशाला?**
टीव्हीचा रिमोट शोधायला अख्खं घर पालथं घातलं आणि मिळाला मात्र टीव्हीच्या शेजारी! म्हणतात ना, **काखेत कळसा आणि गावाला वळसा.**

अ. तीन दिवसांच्या सुट्टीत पाच भावंडांच्या घरी जाऊन, लग्नाच्या कपड्यांची खरेदी करून पुन्हा नवीन घरं पाहणं म्हणजे सौमित्र आणि सुजातासाठी **शंख करणे.**

आ. पहाटे लवकर उठून दुकान उघडणं, व्यवसाय वाढवण्यासाठी उन्हातान्हातून शहरभर फिरणं, अशाप्रकारे कामासाठी दररोज **खडे फोडणे** ही अथर्वची दैनंदिनी होती.

इ. अगं, किती मोठ्याने हाक मारतेस! सतत माझ्या नावाने **खाई त्याला खवखवे** तुला आवडते.

ई. मनाली आणि सौम्या एकत्र आल्या की सुरूचीच्या नावाने **रात्रीचा दिवस करणे** हा त्यांचा एकच उद्योग असायचा.

उ. हरीने काकांच्या झाडाचे सगळे आंबे चोरून विकले. मात्र, नंतर काका भेटल्यावर त्याला त्यांच्याशी बोलायला लाज वाटू लागली. म्हणतात ना, **रात्र थोडी आणि सोंगे फार.**

## उत्तरसंच

### विभाग अ

१. **क.** अ. चूक आ. चूक इ. बरोबर ई. चूक

**ख.** अ. तीन आ. दोन इ. चार ई. एक

**ग.** अ. तीन आ. चार इ. दोन ई. एक

**घ.** अ. केवळ रेषा, रंग, आकार, छटा, पोत यांना प्राधान्य देणारी रचना असणाऱ्या चित्रांना अमूर्त शैलीतील चित्रं म्हटलं जातं.

आ. पंधराव्या शतकात युरोपात मुद्रणकलेचा शोध लागला. चित्रे छापील प्रतिमांच्या स्वरूपात उपलब्ध झाली.

**च.** मोठ्या जिद्दीने मूर्त चित्रशैलीतूनच चित्रकार नव्या युगाची चित्रनिर्मिती सुरू करतील. भौमितिक मूलभूत आकारांच्या स्वरूपात सारे विषय रंगवण्यात येतील. निसर्गदृश्य, स्थिरचित्र, व्यक्तिचित्र हे सर्व सुलभीकरणातून रंगवले जाऊ लागेल.

**छ.** अमूर्त, पारंपरिक, छापील, धार्मिक, पौराणिक, वैशिष्ट्यपूर्ण, भौमितिक, प्रत्ययकारी

२. **क.** अ. तीन आ. एक इ. तीन ई. दोन उ. तीन

### विभाग ब

१. **क.** अ. रांगोळ्या + काढणे, रेखाटणे आ. ओढले + जाणे इ. मागे + वळणे, होणे, सरकणे, येणे, लागणे, पडणे ई. अनुभव + असणे, मिळणे, विसरणे, आठवणे

उ. विळखा + घालणे, सुटणे, सोडणे, सोडवणे ऊ. खिन्न + होणे, वाटणे, भासणे

ए. भुरळ + घालणे, पडणे ॲ. अद्‌भुत + भासणे, वाटणे

ऐ. छंद + असणे, लागणे ओ. रेघा + ओढणे, आखणे, पुसणे

१. **ग.** अ. संयुक्त क्रियापद आहे आ. नाही. नाम + क्रियापद जोडी

इ. संयुक्त क्रियापद आहे ई. संयुक्त क्रियापद आहे

उ. संयुक्त क्रियापद आहे ऊ. संयुक्त क्रियापद आहे

ए. नाही. दोन स्वतंत्र क्रिया ॲ. नाही. नाम + क्रियापद जोडी

ऐ. संयुक्त क्रियापद आहे ओ. नाही, नाम +क्रियापद जोडी

२. **क.** अ. शक्य क्रियापद आ. प्रयोजक क्रियापद

इ. प्रयोजक क्रियापद ई. प्रयोजक क्रियापद

उ. प्रयोजक क्रियापद ऊ. शक्य क्रियापद

ए. शक्य क्रियापद ॲ. शक्य क्रियापद

ऐ. प्रयोजक क्रियापद

२. **ख.** अ. सांगवत नव्हती आ. करवत नव्हता इ. बसवते ई. वेधून घेतले

उ. खुलवले ऊ. बोलावले ए. नाचवत ॲ. हसवत होते ऐ. पळवली

३. **क.** अ. गाणे आ. गातागाता इ. करताना ई. करणे उ. गाणेवाजवणे

ऊ. पुसून ए. शिंपणे ॲ. दिसणे

३. **ख.** अ. पाच आ. आठ इ. चार ई. तीन उ. एक ऊ. सात ए. सहा
ॲ. नऊ ऐ. दोन

४. अनेक उत्तरे शक्य.
**क.** अ. सकाळी केलेल्या प्रवासात तिला बरेचदा मळमळते.
आ. चालताना उन्हाच्या तडाख्याने तिला गरगरले.
इ. भरदुपारी ढगांनी अशी काळोखी केली की जणू सांजावले.

४. **ख.** अनेक उत्तरे शक्य.
अ. थांबणे, थांब. पावसाची वाट बघत थांबणे त्याच्या पथ्यावरच पडले. सुमितच्या भेटीसाठी अपरात्री इमारतीखाली थांबताना तिने कसलाही विचार केला नाही.
आ. विसरून, विसरण्याला. एवढ्यात विसरून कसे चालेल? तुझ्या विसरण्याला हसावे की रडावे?
इ. झोपत, झोपताना. अशा छान प्रवासात सतत झोपत जाऊ नकोस. झोपताना औषध घेत जा.
ई. घाबरू, घाबरताना. पुराच्या बातम्या पाहून अजिबात घाबरू नका. मी त्याला नेहमीच वडिलांसमोर घाबरताना पाहिलं आहे.
उ. उठून, उठत. मला पाहताच तिने उठून बसायला जागा दिली. तब्येत ठीक नसल्याने माझे कसेतरी उठत-बसत काम चालले आहे.

५. **क.** अ. काम नाही घरी अन् सांडून भरी. आ. आधी गुंतू नये, मग कुंथू नये.
इ. सहा महिन्यांची जांभई. ई. एका पिसानं कधी मोर होता येत नाही.
उ. दिवस गेला रेटारेटी आणि चांदण्यात कापूस वेची.

५. **ख.** अ. रात्र थोडी आणि सोंगे फार. आ. रात्रीचा दिवस करणे
इ. शंख करणे ई. खडे फोडणे उ. खाई त्याला खवखवे.

# प्रश्नपत्रिका १

**परीक्षेचे स्वरूप**

| | |
|---|---|
| वाचन : ६० गुण | ८० मिनिटे |
| श्रवण : ५० गुण | ६० मिनिटे |
| लेखन : ४० गुण | ८० मिनिटे |
| संभाषण : ५० गुण | २० मिनिटे |
| परीक्षेचे एकूण गुण : २०० | एकूण वेळ : २४० मिनिटे (४ तास) |

## वाचन

**एकूण कालावधी : ८० मिनिटे**

**एकूण गुण ६०**

**वाचन प्रश्नप्रकारात चार भाग आहेत. यात तुम्हाला वेगवेगळ्या विषयांवरील उतारे वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे द्यायची आहेत. सर्व उत्तरे उत्तरपत्रिकेवरच नोंदवायची आहेत, हे लक्षात ठेवा.**

**भाग १**

**कालावधी : २५ मिनिटे** **[गुण २०]**

**खालील उतारा वाचून त्यावर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या.**

प्रार्थना समाजाच्या संस्थापकांपैकी मामा परमानंद व माझे पणजोबा, म्हणजे आजीचे वडील भास्कर हरी भागवत, हे परममित्र होते. आमच्या दोन घराण्यांतला स्नेह मामांचे सुपुत्र डॉक्टर परमानंद व त्यांच्या पत्नी काकी दिवंगत होईपर्यंत, म्हणजे मामांच्या मृत्यूनंतर साठ वर्षांहून अधिक काळ टिकला. परमानंदांचे ते कुटुंब काळाच्या उदरात रिचले आणि आमचे एक जिव्हाळ्याचे घर; नव्हे आमच्याच विशाल कुटुंबाची एक शाखा कायमची नष्ट झाली. सुंदर शिल्प एका रात्रीत भग्न व्हावे आणि मग हळूहळू त्याच्या साऱ्या खाणाखुणादेखील उद्ध्वस्त होऊन उरावी केवळ दुखरी आठवण, तसेच या बाबतीतही झाले. या आठवणींच्या थडग्यावर जर अरेबियन नाईट्स या कल्पित कथांच्या पुस्तकाचा कोरीव लेख नसता, तर हे नुसते मातीचे अवशेष राहिले असते. कुटुंबच सबंध मरते, तेव्हा अखेर धपापणारी मातीच उरते.

मामांचे धाकटे चिरंजीव डॉक्टर होते. आमच्या आजीच्याच वयाचे व तिच्याशी बालपणी खेळलेले. तेव्हा त्यांना 'बाबू' याच नावाने घरातली वडील माणसे हाक मारीत. आम्हा मुलांना ते आपली नातवंडे मानीत. तरीही आम्ही सर्व जण त्यांना 'काका', 'आजोबा' वगैरे न म्हणता 'बाबू डॉक्टर'च म्हणत असू. डॉक्टर अतिशय कर्तबगार, करडे पण प्रेमळ व परोपकारी होते. साऱ्यांनाच त्यांचा धाक वाटे. पण मला इथे त्यांच्याबद्दल सांगायचे नाही. सांगायचे आहे ते काकींबद्दल नि अरेबियन नाईट्सबद्दल.

काकीला कुणी कधी पुस्तक वाचताना बघितलंच नाही. आडवं कुंकू लावलेली, ठेंगणीठुसकी, अंगाने जाड पण प्रसन्न गोऱ्या चेहऱ्याची काकी सदैव पदर बांधून स्वयंपाकघरात काहीतरी करत असायची. स्वयंपाकघराबाहेर सहसा ती दिसायचीच नाही. खटले मोठे, आवडी-नावडी अमूप. लहरी वारेमाप. बाकीची माणसे पाहुणेरी. कष्टकरी काकीच. इतकी कष्टाळू, की तिला कष्ट केल्याशिवाय चैनच पडायचे नाही. कोणी काम केले तर ते तिच्या पद्धतीने नसल्याने पुष्कळदा मनाला यायचे नाही. म्हणून मग घरात

लेकीबाळी, दूरच्या सुना, मुलींच्या मुली असूनही काकी आपली कामात मग्न झालेली असायची. त्यामुळे अबोल झालेली. बोलताना वाक्ये तुटक यायची. मन मानेल तशा गप्पा तिला कधी मारताच आल्या नाहीत. कुणी म्हणायचे, 'ती कुढी आहे.' कुणी म्हणायचे, 'ती मट्ठ आहे.' पण तिच्या मिटलेल्या मनात कुठेतरी निखळ भावनेचा झरा आहे आणि त्याचा शोध घ्यायला हवा असे मात्र कुणालाच वाटले नाही. खुद्द तिलाही या झऱ्याची जाणीव नव्हती. ती जाणीव तिला झाली नि मला ती दिसली. पण केव्हा? अगदी विपरीत परिस्थितीत. काकीचा एकुलता एक मुलगा प्रभाकर डॉक्टरच होता. देखणा, हुशार, परोपकारी नि एककल्ली. अविवाहित होता. चाळिशी उलटली होती. घरात खटके होत बापलेकांचे. वातावरण तंग असे. एकमेकांबद्दल मनात प्रेम फार; पण बाहेर अढी.

दोघेही आमचे कुटुंब-डॉक्टर. आमच्या घरात एकरूप झालेले. दोघांच्याही परोपकाराला जणू ऊत आलेला. पैशाची कदर नाही. कामाला विराम नाही. असे दिवस चालले होते. त्यात कंटाळाच होता. तो संपत नव्हता. पण त्यातून जीवनाची एकसूत्री कळाही लपत नव्हती. पण तो दाट कंटाळा एक दिवस फुटला. फुटला तो दुसऱ्या प्रचंड दुःखाच्या भग्नतेला निर्माण करून. विषमज्वराने प्रभाकर एकाएकी वारला. मध्यरात्री म्हातारा बाप काळीज घट्ट करून सगळ्या सग्यासोयऱ्यांना, मित्रमंडळींना ही दारुण वार्ता फोनवरून स्वतः कळवीत होता. स्वर शांत होता, पण त्यातून आतली होळी लपली नाही.

आणि काकी? तिचे वर्णन काय करावे? केस सुटलेले, कुंकू फराटलेले. मुलाच्या प्रेताजवळ बसून ती आक्रोश करीत होती. म्हणत होती, "कुणी करणी केली. काल रात्री माझी चोळी रक्ताने भरली नि आज हे अघटित घडलं." डॉक्टर तिला अडवत होते. धीर देत होते. स्वतः डोळे पुशीत होते. वैऱ्यावर न येणारा प्रसंग या देवमाणसांवर आला होता.

अंत्यविधी झाला. दिवस लोटत होते. काकी मात्र सैरभैर झाली होती. कुणाकरता नांदायचे? कुणाकरता वाढायचे? कोण येऊन विचारणार होते? कोण आता रागवणार होते? कुणाची आशा होती? पण या घोर निराशेने काकीच्या वाणीला मुक्त केले. ती बोलू लागली. हवे ते नि नको ते. मला म्हणाली, "तुमचं घर ते माझं माहेर. तुझ्या पणजोबांनी माझं लग्न ठरवलं. साऱ्यांनी छळलं. सुख तुम्ही मंडळी देता. आतासुद्धा छळतात. कुणी म्हणतं, 'तू देवळात जा.' ... प्रार्थना समाजाचे माझे सासरे. आम्हाला देवळात जायची सवय नाही. आता कुठे जाऊ? समाजाचे लोक म्हणतात, 'आम्ही इथे उपासना करतो.' मी म्हणते, 'कशाला तुमची बाटगी उपासना? मला नको.' तोच तसं म्हणायचा नि मारुतीला जायचा. 'माझा मारुती, माझा मारुती' म्हणत प्राण सोडला. पण मारुतीने तरी काय केलं? दुसरे म्हणतात, 'काकी, तुम्ही पोथी वाचा. तुकाराम वाचा.' आणून दिली पोथी. छी:! माझं मन नाही लागत. सारखी आग पडली आहे." काकी रडत होती. बडबडत होती. घरच्यांचा आजवरचा इतिहास सांगून झाला. संताप अनावर झाला. फिरून फिरून मन आवरून म्हणाली, "तरी हे आहेत. सारी आपलीच आहेत. उठलं पाहिजे. उठेन. करीन मी सारं. पहिल्यासारखं करीन. सारं विसरून करीन. पण विसरायचं कसं? एक सांग मला. मला पोथी वाचून विसरायला होत नाही. पूजेत मन लागत नाही. तू बुकं वाचतेस नि बुकं लिहितेस. मला असं बुक आणून दे, की मला घटकाभर तरी सारं विसरायला होईल. देशील ना? उद्याच दे."

मी 'हो' म्हटले नि काळजीत बुडून गेले. या अशिक्षितातच गणल्या गेलेल्या म्हातारीला मी या अवस्थेत कुठलं मराठी पुस्तक वाचायला देऊ? धर्मग्रंथ? छे! ते तर उघड निकामी होते. रामायण? महाभारत? तेही नको. मग मला एक कल्पना सुचली. अरेबियन नाइट्स द्यावा का? घरात अरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टींचा जाडजूड ग्रंथ होता. तोच द्यावा असे वाटले. मी वडिलांना विचारले,

तेव्हा ते म्हणाले, “तेच पुस्तक काकींना दे. अवश्य दे.” आणि मी ते पुस्तक भीत भीत दिले. कुणी मला म्हणालेसुद्धा की, “काय, म्हातारीची चेष्टा करतेस की काय?” पण मी लक्ष दिले नाही. काकीने अधाशीपणे ते पुस्तक घेतले. माझ्यासमोरच तिने उघडून वाचायला सुरुवात केली. पाच मिनिटांत ती वाचण्यात गढून गेली. काकी वाचते हा अपूर्व देखावा होता. मी उठून गेले. तिच्या एकांताचा भंग मला करायचा नव्हता.

आणि काय नवल! सात-आठ दिवसांनी गेले, तेव्हा प्रफुल्ल चेहऱ्याची काकी चहाचा कप माझ्यापुढे ठेवून म्हणाली, “ये, बाई ये. तुझं बुक छान आहे गं! मला सारं विसरायला झालं. पण मी ते ठेवणार आहे. तुला परत देणार नाही.” डॉक्टर मिस्कीलपणे म्हणाले, “पारायणं चालली आहेत त्याची नि काय. चला!” त्या ‘चला’मध्ये जे कारुण्य होते ते काय वर्णावे!

अरेबियन नाईट्स तेव्हापासून माझ्या स्मृतीत, ग्रंथधर्मपोथीत जाऊन बसले आहे. बायबलसारखे. तुकारामाच्या गाथेसारखे. गीतेसारखे. किंबहुना त्याहूनही आगळे स्थान त्याने घेतले आहे. आता जेव्हा जेव्हा मी ते वाचते, तेव्हा तेव्हा ते वाचताना मग्न झालेली काकी प्रथम माझ्या डोळ्यांपुढे येते आणि ती काकी ‘जनी’सारखी असते. ज्याची-त्याची ‘पोथी’ अखेर वेगळीच असते तर. आणि ती तशी असते म्हणून तर वेदना बुजतात.

दुर्गा भागवत

**क. खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा.** **(५)**

अ. काकीचे पती प्रार्थना समाजाच्या संस्थापकांपैकी एक होते.

आ. मानसिक आघातामुळे काकी अबोल झाली होती.

इ. बाबू डॉक्टर पैशासाठी काम करत नसत.

ई. प्रभाकर व त्याच्या वडिलांमधील नाते सौहार्दाचे नव्हते.

उ. गाथावाचन हा काकीसाठी मनाला उभारी देण्याचा अयशस्वी प्रयत्न नव्हता.

**ख. अचूक पर्याय निवडा.** **(५)**

**अ. ‘पण तिच्या मिटलेल्या मनात कुठेतरी निखळ भावनेचा झरा आहे आणि त्याचा शोध घ्यायला हवा असे मात्र कुणालाच वाटले नाही. खुद्द तिलाही या झऱ्याची जाणीव नव्हती. ती जाणीव तिला झाली नि मला ती दिसली.’ या वाक्यांमध्ये उल्लेख झालेली जाणीव कोणती होती?**

१. काकी खूप बोलू शकतात.

२. काकींना अद्भुतरम्य कथांच्या वाचनाची आवड होती.

३. काकींचे त्यांच्या मुलावर खूप प्रेम होते.

**आ. ‘या घोर निराशेने काकीच्या वाणीला मुक्त केले. ती बोलू लागली. हवे ते नि नको ते.’ म्हणजे काय?**

१. काकी काय हवे आणि काय नको ते सांगू लागल्या.

२. काकी सगळ्यांशी मोकळेपणे गप्पा मारू लागल्या.

३. बोलावे आणि बोलू नये असे सगळेच काकी बोलू लागल्या.

**इ. 'परमानंदांचे ते कुटुंब काळाच्या उदरात रिचले आणि आमचे एक जिव्हाळ्याचे घर; नव्हे आमच्याच विशाल कुटुंबाची एक शाखा कायमची नष्ट झाली.' या वाक्यांशाचा योग्य अर्थ निवडा.**

१. परमानंद कुटुंबाशी लेखिकेच्या कुटुंबाचे खूप आपुलकीचे स्नेहसंबंध होते. प्रभाकर, डॉक्टर आणि काकी या सर्वांच्या मृत्यूनंतर परमानंद कुटुंब नष्ट झाले.

२. परमानंद कुटुंबीय हे लेखिकेचे नातलग होते. ते लेखिकेच्याच घरात राहत असल्याने सगळे मिळून एक मोठे कुटुंब होते.

३. परमानंद कुटुंबाचे घर लेखिकेच्या घराला अगदी लागून होते. काळाच्या ओघात परमानंदांचे घर नष्ट झाले.

**ई. डॉक्टर मिस्कीलपणे म्हणाले, "पारायणं चालली आहेत त्याची नि काय. चला!" - 'पारायणं चालली आहेत' म्हणजे कोण काय करत होते?**

१. डॉक्टर काकींची थट्टा करत होते आणि काकी मात्र त्यांच्याकडे दुर्लक्ष करत होत्या.

२. काकी पोथ्या आणि गाथा सतत वाचत होत्या आणि घरातल्या कामांकडे लक्ष देत नव्हत्या.

३. काकी 'अरेबियन नाईट्स' या पुस्तकाचे पुन्हापुन्हा वाचन करत होत्या.

**उ. डॉक्टर मिस्कीलपणे म्हणाले, "पारायणं चालली आहेत त्याची नि काय. चला!" त्या 'चला'मध्ये जे कारुण्य होते ते काय वर्णावे! - या वाक्यात डॉक्टरांच्या बोलण्यात कारुण्य का होते?**

१. कामं सोडून काकी पुस्तकाची पारायणं करत होत्या म्हणून.

२. अखेर एकुलत्या मुलाच्या मृत्यूचे दु:ख विसरून वाचनात रमल्या म्हणून.

३. डॉक्टरांच्या थट्टेकडे दुर्लक्ष करून काकी वाचत राहिल्या म्हणून.

**ग. पुढे दिलेल्या अर्थाची उताऱ्यातील वाक्ये लिहा. (२)**

अ. मोठे कुटुंब असल्याने काकींना खूप कामे पडत.

आ. प्रभाकर आणि त्याचे वडील इतरांसाठी कष्ट करत.

**घ . खालील वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा. (३)**

| | | |
|---|---|---|
| अ. सैरभैर होणे | आ. काळीज घट्ट करणे | इ. मग्न असणे |
| ई. खटके उडणे | उ. मन लागणे | ऊ. गढून जाणे |

**च. थोडक्यात उत्तरे लिहा. (४-८ वाक्ये) (५)**

१. 'एक कुटुंबवत्सल स्त्री' अशी काकीची प्रतिमा लेखिकेने कशी उभी केली आहे?

२. 'ज्याची-त्याची 'पोथी' अखेर वेगळीच असते', असे लेखिका का म्हणते?

भाग २

**कालावधी : १५ मिनिटे** **[गुण १२]**

**खालीलपैकी '१-९' ही नऊ विधाने 'वारली चित्रकला' ह्या उताऱ्यातील वाक्यसमूहांचा आशय वेगळ्या शब्दांत मांडतात. प्रत्येक विधानाचा 'क, ख, ग, घ, च, छ, ज' या सातांपैकी एका वाक्यसमूहाशी योग्य मेळ घालून जोडी जुळवा. '१' हे एक विधान आणि त्याच्याशी जुळणारा वाक्यसमूह 'क' उदाहरणादाखल जुळवून दाखवला आहे. खालीलपैकी दोन विधाने ही उताऱ्यातील वाक्यसमूहाशी मिळतीजुळती नाहीत.**

उदा॰ १ - क

**विधाने**

१. ती चित्रे आदिवासींच्या कहाण्यांवर आधारलेली आहेत.

**(क)** ठाणे जिल्ह्यातील वारली आदिवासींची चित्रकला ही त्यांच्या आयुष्याचं एक अविभाज्य अंग आहे. आदिवासींच्या कथा हा त्या चित्रांचा गाभा आहे. त्यांचं वेगळं जग, रीतिरिवाज, सण, उत्सव, दैनंदिन जीवनातील अनेक प्रसंग नकळत हळुवारपणे त्यांच्या कुडाच्या भिंतींवर साकार होत जातात. ही सारी संवेदनाक्षम मनाची प्रतिक्षिप्त क्रिया आहे. मुळात वारली चित्रे स्त्रियाच चितारीत. या चितारणाऱ्या स्त्रियांना धवलेरी म्हणतात. शेणामातीनं सारवलेल्या कुडाच्या भिंती तयार करण्यासाठी झाडाच्या फांद्या, माती आणि शेण यांचे मिश्रण वापरले जाते. भिंत लाल गेरूने रंगवली जाते. वारली चित्रकलेत तांदुळाची पिठी आणि डिंक यांचे मिश्रण असलेला पांढरा रंग वापरतात. कुंचला म्हणून दातांनी चावलेली बांबूची लवचीक काडी वापरतात.

२. निसर्गातील इतर सजीवांच्या हालचाली पाहून वारली चित्रकाराची प्रतिभा जागृत होते.
३. वारली संस्कृती, पारंपरिक समृद्धी आणि भवतालचा निसर्ग ह्यातून वारली चित्रकला बहरली आहे.
४. आदिम काळात तयार झालेल्या दृश्यरचना जीवित असल्याचे वारली चित्रे हे उदाहरण आहे.
५. साध्या रेषा आणि सोपे आकार ह्यांतून वारली चित्रकला उदयाला आली आहे.
६. वारली लोक झाडाचे चित्र काढताना उगवणाऱ्या झाडाप्रमाणे मुळापासून वर रेषा ओढत जातात.
७. वारली चित्रांत त्रिकोण, वर्तुळे आणि रेषा ह्यांचा उपयोग केला जातो.
८. वारली स्त्रियांच्या वैविध्यपूर्ण अलंकारांचे दर्शन ह्या चित्रकलेत होते.
९. वारली कला ही साधे जीवन रेखाटणारी निरागस अभिव्यक्ती आहे.

वारली चित्रकला

(ख) त्यांनी रंगवलेलं प्रत्येक चित्र हे त्यांच्या भाबड्या मनावर उमटलेलं त्यांचं स्वत:चं जग आहे. या चित्रांचा मध्यवर्ती भाग विशेषत: शिकार, मासेमारी आणि शेती, उत्सव आणि नृत्य, झाडे आणि प्राणी अशा दृश्यांचा असतो. एका विशिष्ट प्रकारची अमूर्तवादी चित्रं इथं आपल्याला आढळतात. वारली चित्रकलेत धार्मिक विधी, लग्नविधी, देवदेवता, दैनंदिन जीवन, लोकजीवन व त्याबरोबर आजूबाजूचा परिसर, परिसरातील पशुपक्षी, वृक्षवेली, नदीनाले, डोंगर, पहाड, वने, नाचनृत्ये, घरदार, शेतीचे हंगाम, शिवार, परिसर, जत्रा इ॰ विषयांना धरून भित्तिचित्रे रेखाटलेली दिसतात.

(ग) वारली चित्रातील आकार व रेषा प्रमाणबद्ध नसल्या तरी वारली चित्रकाराच्या निरीक्षणाची व कल्पनाशक्तीची दाद ही चित्रे बघत असताना द्यावी लागते. कलेचे कोणतेही औपचारिक शिक्षण या लोकांनी घेतले नसताना इतकी अप्रतिम चित्रे त्यांना सुचतात कशी?

(घ) साध्या साध्या रेषांच्या माध्यमातून संकेत व्यक्त केले जातात. बऱ्याच आकारांची पुनरावृत्ती होत असते. पण त्यातही वेगवेगळया सौंदर्याकृतींची जाणीव कलात्मक पातळीवर कलाकाराला होत असते.

(च) वारली चित्रकार ही झाडे रंगविताना नेहमीच मुळाकडून शेंड्यापर्यंत रंगवितो. तशा आकारालाही सोपेपणा प्राप्त होतो. वारल्यांच्या मते खाली भूमीकडून वर उगवणारे झाड म्हणजे जीवनाचा विकास करणारे उदयोन्मुख जीवन असते. वारली चित्र रेखाटणीचे विशेष म्हणजे चित्र काढताना चित्रकार सुरुवातीला चित्र किती मोठे काढावयाचे ते प्रथम निश्चित करतो आणि त्या अनुरोधाने बाहेरील नक्षीकाम व मध्यवर्ती चित्राभोवतालच्या आकृत्या व नक्षी क्रमाक्रमाने काढत जातो. मनुष्य अगर प्राणी काढण्यासाठी सुरवातीस त्रिकोण काढून त्याला शरीर किंवा धड समजून हातपाय, डोके, शेपूट हे अवयव जोडले जातात. ही कलाकृती प्रथम रेषाकृतीने तयार केली जाते.

(छ) वारली चित्रकार भौमितिक आकाराची चित्रे काढत असतात. चंद्राच्या गरगरीत वाटोळ्या आकारातून त्याने गोल घेतला. पानाच्या आकारातून त्याने गोल, त्रिकोण, अंडाकृती आकार घेतले. पाकळ्या आणि फांद्यांच्या आकारातून बाक आणि वळणे घेतली. चंद्रकला व इंद्रधनुष्य यात त्याने कमानी व अर्धवर्तुळ पाहिले.

(ज) तसंच पक्ष्यांच्या भराऱ्या व माशांच्या पोहण्याच्या निरीक्षणाने समांतर व उभेआडवे रेषांचे आकार तो शिकला. जवळजवळ असलेले पाच तारे पाहताना ते एखाद्या रेषेने जोडले गेल्याचा आभास निर्माण होऊन त्याला पंचकोन मिळाला. निसर्ग आणि सृष्टीला समजून घेण्याची व ती चित्राकृती प्रकट करण्याची त्याची ही सांकेतिकता विचार करण्यासारखी आहे.

**भाग ३**

**कालावधी : १५ मिनिटे** **(गुण १२)**

**खालील उताऱ्याचे एकूण १४ भाग केले असून ते दोन गटांत विभागले आहेत.**

**गट १ : १ - ७ भाग (७)**

**गट २ : क - ज भाग (७)**

**१ - ७ या क्रमवार अंकांनी दर्शविलेल्या प्रत्येक भागानंतर आशयाशी जुळणारा अक्षराने दर्शविलेला एक भाग निवडायचा आहे व त्यातून एक सलग अर्थपूर्ण उतारा तयार करायचा आहे. उत्तरपत्रिकेवर योग्य पर्याय नोंदवा.**

उदाहरणादाखल १ ह्या भागापुढे जुळणारा ‘क’ हा भाग जोडून दाखवला आहे.

उदा. **१ - क**

(१) “मला अनेक गोष्टींबद्दल अपराधी वाटतं. शाळेत असताना आम्ही काही मित्र वर्गातल्या एका मुलाची खिल्ली उडवायचो. तेव्हा मजा यायची, पण आता आठवून अपराधी वाटतं. मी इंजिनीअरिंगला जावं अशी माझ्या आईवडिलांची खूप इच्छा होती पण आवश्यक तेवढे गुण न मिळाल्यामुळे मला ‘बीएस्सी’चं शिक्षण घ्यावं लागलं.

(क) त्यांच्या अपेक्षा मी पूर्ण करू शकलो नाही, याबाबतही मला अपराधी वाटतं. माझं जास्त असलेलं वजन आटोक्यात आणण्यात माझी इच्छाशक्ती कमी पडते म्हणूनही मला अपराधी वाटतं. ऑफिसमधलं काम नीट पार पाडूनही ते वरिष्ठांसमोर मला सफाईदारपणे सादर करता येत नाही. मला त्याबद्दलही अपराधी वाटतं. त्यामुळे माझ्या चुका वाढत जातात.

**गट १**

(१) "मला अनेक गोष्टींबद्दल अपराधी वाटतं. शाळेत असताना आम्ही काही मित्र वर्गातल्या एका मुलाची खिल्ली उडवायचो. तेव्हा मजा यायची, पण आता आठवून अपराधी वाटतं. मी इंजिनीअरिंगला जावं अशी माझ्या आईवडिलांची खूप इच्छा होती. पण आवश्यक तेवढे गुण न मिळाल्यामुळे मला 'बीएस्सी'चं शिक्षण घ्यावं लागलं.

(२) मग चुका केल्याबद्दल मला अपराधी वाटतं. त्या का घडत आहेत हे माहीत असूनही त्या मी टाळू शकत नाही म्हणूनही अपराधी वाटतं. ही यादी वाढतच चालली आहे. आता तर सतत स्वत:ला अपराधी ठरवल्याबद्दलही अपराधी वाटतं," तन्मय सांगतो.

(३) त्यामुळे ती अधिकाधिक वाढत जाते. आपण तिच्यात इतके होरपळून निघतो, की आपलं मानसिक स्वास्थ्य ढवळून निघतं. किती काळ लोटला तरी त्या वेदनांचं ठुसठुसणं चालूच राहतं.

(४) चुकीचं वर्तन न करताही नुसता मनात चुकीचा विचार आला म्हणूनही अपराधी वाटतं. इतकंच काय, तर ज्या चांगल्या गोष्टी आपल्याला मिळाल्या आहेत त्या इतरांना न मिळाल्यामुळे चांगल्या गोष्टींचा आनंद घेण्याबाबतही काहींना अपराधी वाटतं.

(५) अपराध-भावनेकडे कल असलेल्या व्यक्तीची संवेदनशीलता व नीरक्षीरविवेकबुद्धी उच्च असते. अयोग्य वर्तनाबाबत ते इतरांना किंवा परिस्थितीला दोषी ठरवत नाहीत, तर स्वत:च्या हातून घडलेल्या चुकांची जबाबदारी स्वत: घेतात. अपराध-भावना त्यांना घडलेल्या चुकांची जाणीव करून देते आणि काही प्रमाणात ते वर्तन भविष्यात परत करण्यास प्रतिबंधही करते.

(६) एखाद्या किंवा काही कृत्यांवरून स्वत:ला वाईट ठरवणं हे अवास्तव तर आहेच; पण अतिशयोक्तिपूर्णही आहे.

(७) असा शिक्का तन्मय स्वत:वर मारून घेत असल्यामुळे तो स्वत:ला सांगतो, 'माझ्या हातून केवढ्या घोडचुका घडल्या आहेत! या चुका म्हणजे माझ्या व्यक्तिमत्त्वावर घोर कलंक आहे.

**गट २**

(क) त्यांच्या अपेक्षा मी पूर्ण करू शकलो नाही, याबाबतही मला अपराधी वाटतं. माझं जास्त असलेलं वजन आटोक्यात आणण्यात माझी इच्छाशक्ती कमी पडते म्हणूनही मला अपराधी वाटतं. ऑफिसमधलं काम नीट पार पाडूनही ते वरिष्ठांसमोर मला सफाईदारपणे सादर करता येत नाही. मला त्याबद्दलही अपराधी वाटतं. त्यामुळे माझ्या चुका वाढत जातात.

(ख) मी कितीही प्रयत्न केले तरी तो पुसला जाणार नाही.' त्यामुळे त्याच्या मनात स्वत:बद्दल कमीपणाची भावना निर्माण होते आणि स्वत:त सुधारणा होण्याचा आत्मविश्वास तो गमावून बसतो. आपण दोषी किंवा वाईटच आहोत, असं ठरवल्यामुळे स्वत:च्या हातून घडलेली चांगली कृत्यंही त्याला दिलासा देत नाहीत. व्यक्तिमत्त्वावरचा कलंक धुऊन काढण्यासाठी तो स्वत:ला पदोपदी आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करून कडक शिक्षा देतो. स्वत:ला कमी लेखून आसूड मारण्यातच त्याची ऊर्जा खर्च होते. थोडक्यात, अपराध-भावना

चुकीच्या वर्तनाची पुनरावृत्ती भविष्यात न करण्यास तन्मयला फारशी मदत करत नाही. उलट त्याच्या मानसिक आरोग्याचं नुकसान करते. हे नुकसान टाळण्यासाठी तन्मयनं सर्वप्रथम अपराध-भावनेबद्दल अपराधी वाटणं थांबवलं पाहिजे. तरच स्वत:च्या मनावर चढलेली अपराधीपणाची अनेक पुटं बाजूला करून मूळ अपराध-भावनेवर त्याला लक्ष केंद्रित करता येईल.

(ग) असं असलं, तरी तन्मयप्रमाणे अपराध-भावनेच्या आहारी गेलेल्या व्यक्तींचं मात्र या भावनेमुळे फायद्यापेक्षा मानसिक आरोग्याचं अपरिमित नुकसान होतं हे निश्चित. हे नुकसान का होतं याचं उत्तर शोधण्यासाठी अपराध-भावनेच्या थोडं खोलात जावं लागेल. ते तन्मयच्या उदाहरणातून पाहू. तन्मयला अपराधी वाटतं म्हणजे नेमकं काय होतं? तर स्वत:च्या हातून घडलेल्या चुकीच्या वर्तनापाशी तो थांबत नाही, तर ते वर्तन घडल्याबद्दल तो स्वत:च्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वावर 'वाईट' असा शिक्का मारतो.

(घ) समजा, एका फळांच्या करंडीत अनेक फळं ठेवली आहेत. त्यातील काही पिकलेली आहेत, काही रसरशीत आहेत, रसाळ आहेत, काही नासकी, खराब आहेत. या करंडीला एकच नाव द्यायचं असेल तर आपण फक्त 'खराब फळांची करंडी' असं म्हणू शकतो का? तसं म्हणणं वस्तुस्थितीला धरून होणार नाही, कारण तिच्यात खराब फळांबरोबर चांगली फळंही आहेत. आपलं व्यक्तिमत्त्वही या फळांच्या करंडीप्रमाणे आहे. त्यामध्ये जसा काही योग्य वर्तनांचा समावेश आहे, तसा काही अयोग्य वर्तनांचाही आहे. त्यामुळे फक्त अयोग्य वर्तन शोधून काढून 'वाईट' असल्याचा शिक्का संपूर्ण व्यक्तिमत्त्वावर मारणे योग्य नाही.

(च) काहींना तर आपल्यात अपराध-भावना वास करून आहे याची जाणीवही नसते. उदाहरणार्थ, काहींना वाटत असतं की, आपण दानशूर आहोत म्हणून दानधर्म करत आहोत. पण वास्तविक आपल्या हातून घडलेल्या चुकीच्या कृत्यांची भरपाई करण्याच्या भावनेपोटी आपण दानधर्म करत आहोत याचा त्यांना पत्ताही नसतो. अपराधी वाटण्याकडे कल असणाऱ्या व्यक्ती स्वत:चं वर्तन अयोग्य आहे एवढ्यावर थांबत नाहीत, तर त्याला नैतिकतेच्या तराजूत तोलतात. त्यामुळे आपल्या हातून पाप घडलं आहे आणि त्याची कठोर शिक्षा आपण आयुष्यभर भोगलीच पाहिजे याचं सततचं ओझं मनावर बाळगतात. याचा परिणाम म्हणजे सतत दिलगिरी व्यक्त करणं, परत परत माफी मागणं, आत्मनिर्भर्त्सना करणं, स्वत:ला कमी समजणं, चुकांबाबत अतिसंवेदनशील होणं, असे अनेक वर्तनप्रकार दर्शवले जातात.

(छ) अपराधीपणाच्या विळख्यात सापडलेला तन्मय एकटा नाही. आपल्यापैकी कित्येकांच्या मनात अपराध-भावना दबा धरून बसलेली असते. स्वत:च्या हातून घडलेल्या छोट्यामोठ्या चुकांच्या वेळी ती फणा काढून बाहेर येते; पण ती तेवढ्यावर थांबत नाही. मग ह्या अपराधीपणाबद्दलचीही अपराध-भावना तयार होते. हे कळूनही ती कमी होण्यासाठी आपण काहीच करत नसल्याबद्दलची अपराध-भावना... असे अपराध-भावनांचे अनेक थर सुरुवातीच्या अपराध-भावनेवर चढत जातात.

(ज) या वेदना स्वत: ओढवून घेतल्या आहेत असं वाटून आपण स्वत:ला इतके बोल लावतो आणि इतकी कठोर निर्भर्त्सना करतो, की अपराध-भावनांतून बाहेर पडण्याऐवजी तिच्या विळख्यात अधिकच अडकत जातो. अपराध-भावनेची व्याप्ती इतकी प्रचंड आहे, की आपल्याला केवळ चुकीच्या वर्तनाबाबतच अपराधी वाटतं असं नाही, तर एखादं वर्तन हातून न घडल्याबद्दलही अपराधी वाटतं.

डॉ. अंजली जोशी

भाग ४

**कालावधी : २५ मिनिटे** **[गुण १६]**

**पुढे दिलेले शासकीय परिपत्रक वाचून त्यावर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**प्रसिद्धी पत्रक क्र. ८२**

**बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम**

(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)

बेस्ट भवन, पत्र पेटी क्र॰ १९२.

मुंबई – ४०० ००१

दिनांक : १६.०३.२००१

घरांवर सौर ऊर्जानिर्मिती

महाराष्ट्र राज्य नियामक आयोगाने दिनांक १० सप्टेंबर २०१५ पासून म॰वि॰नि॰आ॰ (छपरावरील सौर ऊर्जा व्होल्टॅक यंत्रणाकरिता नक्त मापन) विनिमय, २०१५ अंमलात आणला आहे.

या विनिमयानुसार एक मेगावॅटपेक्षा कमी मागणी असलेला वीजग्राहक त्याच्या घराच्या छपरावर / गच्चीवर सौर फोटो व्होल्टॅक यंत्रणा बसवून सौर ऊर्जा निर्मिती करू शकतो आणि त्याद्वारे त्याचा वीजवापर कमी होत असल्याने त्याच्या मासिक विद्युत देयकामध्ये घट येऊ शकते. यासाठी वीजग्राहकाने आपल्या प्रभागाशी संलग्न असलेल्या बेस्ट उपक्रमाच्या ग्राहक सेवा विभागात उपलब्ध असलेला नोंदणी अर्ज भरून सादर करावा. सदर अर्ज बेस्ट उपक्रमाच्या संकेतस्थळावर www.bestundertaking.com देखील उपलब्ध आहे. हा अर्ज सादर करताना वीजग्राहकास बेस्ट उपक्रमाकडे रु. ५००/- (मंजूर भार ५ किलोवॅट्सपर्यंत) किंवा रु. १,०००/- (मंजूर भार ५ किलोवॅट्सपेक्षा जास्त) असे नोंदणी शुल्क भरावे लागेल.

प्रत्येक महिन्यात वीज ग्राहकाने सौरऊर्जेद्वारे निर्माण केलेली युनिट्स ग्राहकाच्या खात्यात जमा केली जातील आणि वीजग्राहकाने वापरलेल्या एकूण वीजेतून ही सौर ऊर्जा युनिट्स वजा करून ग्राहकास त्याचे महिन्याचे देयक पाठविले जाईल. ग्राहकाने जर त्याच्या वापरापेक्षा अधिक सौर ऊर्जा युनिट्सची निर्मिती केली असेल तर ती युनिट्स वीजग्राहकाच्या पुढील विद्युत देयकात समायोजित करण्यात येतील. बेस्ट उपक्रम प्रत्येक आर्थिक वर्षाच्या अखेरीस असमायोजित नक्त जमा युनिट्स (Credit Units) पुढील वर्षातील पहिल्या महिन्यात वीजग्राहकाकडून खरेदी करेल.

अधिक माहितीसाठी वीजग्राहकांनी आपल्या प्रभागाशी संलग्न असलेल्या ग्राहक सेवा विभागात संपर्क साधावा.

**क. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(४ गुण)**

१. नवा विनिमय अंमलात आल्यावर वीजग्राहकांचा कोणता फायदा होईल?

२. ग्राहकाच्या जास्तीच्या ऊर्जानिर्मितीची कशी व्यवस्था लावली जाणार आहे?

**ख. कंसातील सूचनेनुसार पुढे दिलेल्या वाक्यांमध्ये बदल करा.** **(४ गुण)**

१. वीजग्राहक आपल्या घराच्या छपरावर ऊर्जानिर्मिती करू शकतो. (धातू + ता + ये ही रचना वापरा.)

२. ग्राहकाने जर त्याच्या वापरापेक्षा अधिक सौरऊर्जा युनिट्सची निर्मिती केली असेल, तर ती युनिट्स वीजग्राहकाच्या पुढील विद्युत देयकात समायोजित करण्यात येतील. ('जर तर' काढून वाक्य तयार करा.)

३. वीजग्राहकांनी ग्राहक सेवा विभागाशी संपर्क साधावा. (या वाक्यात 'पाहिजे' चा वापर करा.)

४. अर्ज सादर करताना वीजग्राहक नोंदणी शुल्क भरेल. (वाक्य भूतकाळात लिहा.)

**ग. पुढे दिलेल्या क्रियापदांपासून नाम + क्रियापद तयार करा.** **(४ गुण)**

१. वजा करणे  २. मंजूर करणे  ३. सादर करणे  ४. अंमलात आणणे

**घ. पुढे दिलेल्या शब्दांचा अर्थ स्पष्ट करा.** **(४ गुण)**

१. सौर  २. देयक  ३. समायोजित  ४. संलग्न

**श्रवण**

**एकूण कालावधी : ६० मिनिटे**

**एकूण गुण ५०**

श्रवण या विभागात एकूण तीन भाग आहेत.

**भाग १**

**कालावधी : २५ मिनिटे** **[गुण ३०]**

**तुम्हाला एकूण ५ ध्वनिफिती ऐकवल्या जातील. प्रत्येक ध्वनिफितीवर आधारित ३-३ वाक्ये दिली आहेत. त्यांना 'होय' किंवा 'नाही' असे प्रतिसाद द्यायचे आहेत. प्रत्येक ध्वनिफीत ऐकवण्याआधी त्यावर आधारित वाक्ये वाचायला दिली जातील. प्रत्येक ध्वनिफीत एकदाच ऐकवली जाईल.**

**ध्वनिफीत १**

**अरुणा ढेरे - काळाशी जोडून घेताना**

१. अरुणा ढेरे यांना भाषेची गोडी वाचनातून लागली.

२. वाचन हे मन रमवण्याचे साधन आहे असे अरुणा ढेरे यांना वाटते.

३. त्यांच्या वडलांच्या घरी केवळ सुशिक्षित आणि बुद्धिमान माणसे येत असत. त्यामुळे त्यांची बौद्धिक वाढ होऊ शकली.

**ध्वनिफीत २**

**अरुणा ढेरे - साहित्यसंमेलन**

१. आपल्या भाषेवरील प्रेम म्हणजे इतर भाषांचा द्वेष नव्हे.

२. जागतिकीकरणामुळे समाजमन आणखी भंगले आहे.

३. केवळ आवड आणि मनोरंजनासाठी वाचले पाहिजे.

**ध्वनिफीत ३**

**शासकीय अनुवाद**

१. भाषा संचालनालय फक्त भाषांतराचे काम करते.

२. शासकीय भाषांतर करणाऱ्या अनेक शासनमान्य संस्था आहेत.

३. भाषा संचालनालयाची दिशा आणि भूमिका सतत परिवर्तनशील राहिली आहे.

**ध्वनिफीत ४**

**शासकीय अनुवाद**

१. तांत्रिक, शासकीय आणि विधी क्षेत्रातील अनुवाद करताना योग्य अर्थ पोहोचावा याची खबरदारी घेतली पाहिजे.

२. तांत्रिक भाषांतर करताना मराठी पारिभाषिक शब्द वापरण्याऐवजी लॅटिन शब्द वापरावेत.

३. वाक्यांच्या कठीण रचनेमुळे कायद्यांची भाषा सामान्यांना समजत नाही.

**ध्वनिफीत ५**

**चिन्मय धारूरकर**

१. कोणतीही साहित्यव्यवस्था ही अनेक संस्कृतींवर आधारित असते.

२. सगळ्या कलाविष्कारांवर वेगवेगळ्या संस्कृतींचा प्रभाव दिसतो.

३. मल्याळम चित्रपटांवर इटालियन चित्रपटांचा प्रभाव अधिक आढळतो.

**भाग २**

**एकूण कालावधी - १० मिनिटे** **(गुण १०)**

**पूर्ण संभाषण लक्षपूर्वक ऐकून त्याआधारे संकेत आणि मयुरेश यांचे एकमत आहे की मतभेद आहेत ते ओळखून योग्य पर्यायासमोर बरोबरची खूण (✓) करा.**

| क्र. | विधाने | एकमत | मतभेद |
|---|---|---|---|
| १. | मैत्री आणि चहाची चव यांच्यात बदल झाला नाही. | | |
| २. | महाविद्यालयीन शिक्षण संपल्यावरच खऱ्या अर्थाने बाहेरच्या जगात आपण पाऊल ठेवतो. | | |
| ३. | चांगले शिक्षण घेतले तर भरपूर पगाराची नोकरी मिळते. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | मुलाखतीत फक्त विशिष्ट क्षेत्राशी संबंधितच प्रश्न विचारले जातात असे नाही. | | |
| ५. | आपण जे काम करतोय त्यातून भरपूर पैसे मिळायला हवेत. | | |

**भाग ३**

**कालावधी : २५ मिनिटे** **(गुण १०)**

**ध्वनिफीत**

**आकाशवाणीवरील कार्यक्रम अधिकारी उमा दीक्षित ह्यांची मुलाखत तुम्ही ऐकणार आहात. हे संभाषण लक्षपूर्वक ऐका. त्यावर विचारलेल्या प्रश्नांसाठी उत्तरांचे पर्याय दिले आहेत. त्यातील योग्य पर्याय निवडा.**

टीप : जागतिक रेडिओ दिन १३ फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो.

१. जगभरात एकूण --------- तर भारतभरात --------- रेडिओ केंद्र आहेत.

अ) चारशे वीस, चव्वेचाळीस हजार

आ) चाळीस हजार, चारशे वीस

इ) चव्वेचाळीस हजार, चारशे वीस

२. ---------, --------- आणि --------- ही आकाशवाणीची मुख्य उद्दिष्टे आहेत.

अ) संगीत, मनोरंजन, भाषण

आ) मनोरंजन, माहिती, हितगुज

इ) वृत्तनिवेदन, संगीत, दृश्य

३. आकाशवाणी काही काळ मागे का पडली?

अ) एफ॰ एम॰ वाहिन्या, दूरदर्शन यांचा प्रभाव

आ) कार्यक्रमांचा दर्जा चांगला नसल्याने

इ) आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध नसल्याने

४. आकाशवाणी कशामुळे तग धरून राहिली असे उमा दीक्षित म्हणतात?

अ) मनोरंजक कार्यक्रमांमुळे

आ) तत्त्वांशी प्रामाणिक राहिल्यामुळे

इ) माहितीपर कार्यक्रम वाढवल्यामुळे

५. आकाशवाणी कोणत्या वयोगटाशी जोडलेली आहे?

अ. तरुण

आ. वयोवृद्ध

इ. सर्व वयोगट

६. कोणकोणत्या कार्यक्रमांची नावे यात आली आहेत?
   अ) वनिता मंडळ, कामगार सभा, कॉफीहाउस
   आ) गीतसरिता, शेतकरी सभा, श्रीमंती
   इ) जयमाला, शुभप्रभात, बातम्या

७. उमा दीक्षित या आकाशवाणीवरील कोणत्या कार्यक्रमाच्या निर्मात्या आहेत?
   अ) कामगार सभा
   आ) वनिता मंडळ
   इ) कॉफीहाउस

८. श्रोत्यांशी जोडलेलं राहण्यासाठी आकाशवाणीने कोणती गोष्ट केली?
   अ) सर्व कार्यक्रम दररोज दोनदा प्रसारित केले.
   आ) कार्यक्रमांमध्ये तोचतोचपणा आणला.
   इ) काळानुसार स्वतःला बदललं.

९. दूरदर्शन पाहण्याच्या तुलनेत आकाशवाणी ऐकणे जास्त सोपे आहे, कारण ...
   अ) आकाशवाणी ऐकताना काम सोडून ती ऐकावी लागते.
   आ) इतर कामे करताना दूरदर्शन पाहता येते.
   इ) इतर कामे करताना आकाशवाणी ऐकता येते.

१०. प्रसिद्ध कलाकार मच्छिंद्र कांबळी ह्यांनी मानधन हा विषय महत्त्वाचा नाही असे का म्हटले?
   अ) त्यांच्याकडे खूप पैसे आहेत म्हणून
   आ) आकाशवाणी ऐकत ते घडले म्हणून
   इ) ते कलाकार आहेत म्हणून

## लेखन

**एकूण कालावधी : ८० मिनिटे**

**एकूण गुण ४०**

लेखन ह्या प्रश्नप्रकारात दोन भाग आहेत.

**भाग १**

**कालावधी : २० मिनिटे** **(गुण २०)**

**खालील उतारा वाचा. डाव्या रकान्यात मजकुरातील काही विशिष्ट शब्द वेगळ्या रंगात दिले आहेत. उजव्या बाजूच्या रकान्यात दिलेले शब्दप्रयोग काहीही बदल न करता वापरून उतारा पुन्हा लिहा. रकान्यातील शब्दप्रयोग वापरताना आवश्यकतेनुसार वाक्याची पुनर्रचना करा. अशा रीतीने तयार केलेला नवीन उतारा उत्तरपत्रिकेत लिहा. उदाहरणादाखल (०) पुनर्रचना केलेले एक वाक्य खाली दिले आहे.**

विषय : खिडकीतून पाहिलेली बाजारपेठ

उदा॰ कुठल्याही बाजारपेठेत गेले की (०) माझा थकवा पळून जातो.

कुठल्याही बाजारपेठेत गेले की, मला नेहमी (०) ताजेतवाने वाटते. कितीही मरगळ आली असली, तरी बाजारपेठेतील एक चक्कर ती मरगळ घालवून एक (१) आनंदी वातावरण निर्माण करते. मग त्यासाठी (२) पैसेच खर्च करावे लागतात असे काही नाही. एखाद्या प्रेक्षणीय स्थळाप्रमाणे ह्या बाजारपेठेला मारलेली चक्करही मन प्रसन्न करते.

काही दिवसांपूर्वी बाजारपेठेलगत असलेल्या हॉस्पिटलमध्ये किरकोळ आजारामुळे एक दिवस (३) राहण्याचा प्रसंग आला. मी ज्या खोलीमध्ये होते, त्या खोलीच्या खिडकीतून बाहेर बाजारपेठेत चाललेली वर्दळ, खरेदी-विक्री, भाज्या, फळे पाहणे हा (४) विरंगुळा होता.

दुसऱ्या दिवशी पहाटे उठले आणि खिडकीजवळ गेले, तर (५) बाजारपेठ अगदी भकास दिसत होती. फक्त कोरडा रस्ता दिसत होता. ना फळे, फुले, ना भाज्या, ना लोकांची गर्दी. पहिल्यांदाच बाजारपेठेला असे बिनाअलंकार पाहिले आणि अस्वस्थ वाटले. पण ही अस्वस्थता थोडयाच वेळात दूर झाली. हळूहळू दुकानदार, रस्त्यावरचे गाडीवाले, भाजीच्या टोपल्या घेऊन बसणाऱ्या बायका असे लोक (६) भराभर आपआपल्या जागी जमू लागले. स्वतःच्या जागेची झाडलोट चालू झाली, रस्त्यावर पाणी शिंपडणे चालू झाले. धंदा चांगला व्हावा म्हणून अगरबत्त्या लावून प्रार्थनापूर्वक पूजाही होत होत्या. त्या अगरबत्त्यांचा धूर हवेत (७) तरळत होता. हे सगळे दृश्य पाहून मला सकाळची भूपाळी आठवत होती. आता प्रसन्न वाटू लागले होते. सगळा (८) थकवा हळूहळू कमी होत होता. कुठे पिवळ्या केळ्यांची गाडी, तर कुठे कांदे-बटाटे, कुठे लाल लाल टोमॅटो तर कुठे सगळ्या हिरव्या पालेभाज्या, कुठेतरी मध्येच डोकावणारी फुले, शेंदरी गाजर, मोत्यासारखे दाणे असलेली मक्याची अर्धवट सोलून ठेवलेली कणसे, डाळिंब, संत्री, पेरू, चिकू अशा विविधरंगी फळांनी, भाज्यांनी रस्त्यावर (९) रंगीबेरंगी साजशृंगार चढला. थोड्याच वेळात गिऱ्हाइकेही येऊ लागली. खरेदी-विक्री करतानाची (१०) संभाषणे चालू झाली आणि हळूहळू बाजारपेठ नेहमीसारखी आपलीशी वाटू लागली.

**(०) थकवा पळून जाणे**

(१) उत्साहाचे भरते येणे

(२) खिशाला तोशीस लागणे

(३) निवास करणे

(४) वेळ मजेत जाणे

(५) उजाड वाटणे

(६) लगबग सुरू होणे

(७) तरंगणे

(८) शिणवटा दूर होणे

(९) नटून थटून बसणे

(१०) घासाघीस आणि वाद होणे

**भाग २**

**कालावधी : ६० मिनिटे** **(गुण २०)**

**खालील चार विषयांपैकी एका विषयावर तुमचे विचार व्यक्त करा. (शब्दमर्यादा : ३५०)**

गुण देताना खालील बाबींचा विचार केला जाईल :

- दिलेल्या विषयाचा सर्वंकष विचार करून तुम्ही त्याला न्याय दिला आहे का?
- तुम्ही तुमच्या मताबाबत योग्य युक्तिवाद केला आहे का व पुष्टीदाखल योग्य उदाहरणे दिली आहेत का?
- तुमचे लेखन विषयाशी सुसंगत आहे का व तुम्ही साऱ्या मुद्द्यांची योग्य मांडणी केली आहे का?
- तुमची शब्दयोजना आणि लेखनशैली विषयानुरूप आहे का?

**विषय १ : बाहेरगावचे विद्यार्थी भाडेकरू म्हणून नकोच!**

बाहेरगावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांना भाडेतत्त्वावर जागा देण्यावरून झालेली वाचकांची चर्चा तुम्ही एका दैनिकात वाचलीत. तुम्ही स्वतः बाहेरगावाहून शिक्षणासाठी आलेले आहात आणि तुम्हाला ह्या विषयावर 'जनमानस' ह्या सदरात वाचक म्हणून एक पत्र लिहायचे आहे. ह्यासाठी तुम्ही खालील तीन मुद्द्यांचा आधार घेऊ शकता व तुमचे मत मांडू शकता.

- वास्तविक विद्यार्थ्यांना राहण्यासाठी वसतिगृह हेच योग्य ठिकाण आहे. परंतु, वसतिगृहांची संख्या अपुरी असल्यामुळे बरेच विद्यार्थी सदनिकांमध्ये राहतात.
- काही विद्यार्थ्यांच्या बेताल व बेशिस्त वर्तनाचा इमारतीतील आजूबाजूच्या कुटुंबांना खूप त्रास होतो.
- गृहनिर्माण संस्थांनी भाडेकरू विद्यार्थ्यांसाठी नियमावली तयार करावी.

**विषय २ : द्विभाषिक शिक्षण : नव्या दिशा**

दूरदर्शनवर 'द्विभाषिक शिक्षणपद्धती' ह्या विषयावर आयोजित केलेली चर्चा तुम्ही ऐकली. चर्चेनंतर प्रेक्षकांना त्यांची भूमिका मांडण्याचे आवाहन करण्यात आले. तुम्ही दूरदर्शनच्या संचालक मंडळाला ह्याबाबत एक सविस्तर ईमेल लिहा. त्यासाठी खालील मुद्द्यांचा आधार घ्या.

- शिक्षणाच्या सुरुवातीपासूनच दोन भाषा शिकणे हे आजच्या जागतिकीकरणाच्या काळात ज्ञानाच्या कक्षा रुंदावणारे व मेंदूला चालना देणारे आहे.
- दोन भाषा शिकत मोठी होणारी मुले संवादकुशल होतात.
- लहानपणापासून दोन भाषांचा वापर करणाऱ्या मुलांना मोठेपणी आणखी काही भाषा शिकणे तुलनेने सोपे जाते व त्यामुळे त्यांना नोकरीची जास्त चांगली संधी मिळू शकते.

**विषय ३ : पुस्तकाचे अंतरंग**

पुस्तक : अनवट - शब्द, सूर, डोंगरवाटा

तुम्ही साहित्यविषयक ब्लॉग लिहीत आहात. 'अनवट - शब्द, सूर, डोंगरवाटा' ह्या मिलिंद गुणाजी यांच्या पुस्तकात उल्लेख केलेली विविध स्थळे आणि तेथील संगीत ह्याबद्दल एक टिपण लिहा. त्यासाठी खालील मुद्द्यांचा आधार घ्या.

- पुस्तकाच्या अंतरंगाची मांडणी कशी केली आहे हे थोडक्यात सांगा.
- पुस्तकातील संगीत मुशाफिरीची काही उदाहरणे द्या.
- सध्याच्या काळात तुम्हाला हे पुस्तक महत्त्वाचे वाटते का? कारणे स्पष्ट करा.
- हे पुस्तक तुमच्या मते वाचनीय का आहे याबद्दल मुद्दे मांडा.

**विषय ४ : पुस्तक परीक्षण**

पुस्तक : प्रकाशवाटा

एका नियतकालिकासाठी तुम्ही एक पुस्तक परीक्षण लिहिणार आहात. डॉ॰ प्रकाश आमटे यांच्या 'प्रकाशवाटा' या आत्मचरित्राचे सुमारे ३५० शब्दांत परीक्षण करा. त्यासाठी खालील मुद्द्यांचा आधार घ्या.

- ह्या पुस्तकाचा सारांश लिहा.
- ह्या पुस्तकातील प्रमुख व्यक्तींचा परिचय करून द्या.
- ह्या पुस्तकाचे शीर्षक अर्थपूर्ण आहे असे म्हणता येईल का?

## संभाषण

**एकूण कालावधी : २० मिनिटे**

**एकूण गुण ५०**

यात प्रत्येकी दहा मिनिटांचे दोन भाग असतील.

**भाग १ : सादरीकरण**

**कालावधी : १० मिनिटे** **(गुण २५)**

**दिलेल्या दोन विषयांपैकी एका विषयावर तुम्हाला सुमारे पाच मिनिटे सादरीकरण करायचे आहे. त्यानंतर पाच मिनिटे प्रश्नोत्तरे होतील. खालील दोन विषयांपैकी एक विषय निवडा. सादरीकरण करताना पुढील बाबींकडे विशेष लक्ष द्या.**

- सादरीकरणाच्या उताऱ्याची उचित मांडणी करा.
- प्रमाणभाषा, म्हणी, वाक्प्रचार आणि वैशिष्ट्यपूर्ण शब्दयोजना करा.
- तुमचा स्वतःचा दृष्टिकोन स्पष्टपणे मांडा.

**विषय १ : हे जीवन सुंदर आहे**

'सकारात्मक विचारपद्धती' ह्या विषयावरील चर्चासत्रात तुम्ही सहभागी होणार आहात. ह्या सत्रात 'हे जीवन सुंदर आहे' ह्या विषयावर तुम्हाला पाच मिनिटे सादरीकरण करायचे आहे आणि त्यानंतर प्रश्नोत्तरे होतील. ह्या विषयावर मुद्दे तयार करा. योग्य ती उदाहरणे द्या. त्यासाठी तुम्ही पुढील मुद्द्यांचा आधार घेऊ शकता.

- रोजच्या साध्या आयुष्यात घडणाऱ्या घटनांतून मिळणारे आनंददायी अनुभव
- निसर्गातील सौंदर्य व त्यातून मिळणारी सकारात्मक ऊर्जा
- दृश्यकलांमधील सौंदर्याची अनुभूती आणि साहित्यातील जीवनाचे प्रतिबिंब

**विषय २ : मुलगी शिकली प्रगती झाली**

'स्त्रीशिक्षण : काळाची गरज' ह्या विषयावरील चर्चासत्रात तुम्ही सहभागी होणार आहात. त्यात तुम्हाला 'मुलगी शिकली प्रगती झाली' ह्या विषयावर पाच मिनिटे सादरीकरण करायचे आहे आणि त्यानंतर प्रश्नोत्तरे होतील. ह्या विषयावर मुद्दे तयार करा. योग्य ती उदाहरणे द्या. त्यासाठी तुम्ही पुढील मुद्द्यांचा आधार घेऊ शकता.

- स्त्रीशिक्षण : शहरातील आणि ग्रामीण भागातील प्रत्यक्ष परिस्थिती
- विसाव्या शतकातील स्त्रीशिक्षणाचे पुरस्कर्ते आणि कर्तृत्ववान महिलांचे योगदान
- आर्थिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून स्त्रीशिक्षण व स्त्री-सक्षमीकरण

**भाग २ : चर्चा**

**कालावधी : १० मिनिटे** **(गुण २५)**

**दिलेल्या विषयावर परीक्षकांबरोबर सुमारे १० मिनिटे चर्चा करा.**

**दोन्ही भागांच्या पूर्वतयारीसाठी तुमच्याकडे एकूण १५ मिनिटे वेळ असेल. परीक्षेदरम्यान तुम्हाला उत्स्फूर्तपणे बोलायचे आहे. परीक्षेदरम्यान व पूर्वतयारीसाठी तुम्हाला कुठलेही मुद्रित साहित्य, शब्दकोश अथवा भ्रमणध्वनी वापरायची परवानगी नाही. खालील दोन विषयांतील एक विषय निवडा. निवडलेल्या विषयाची एक बाजू घेऊन तुम्हाला परीक्षकांबरोबर त्या विषयावर चर्चा करायची आहे. चर्चेचा अनुक्रम खालीलप्रमाणे असावा :**

- तुमचे मत मांडा व योग्य उदाहरणे द्या.
- तुमच्या विरोधी बाजूच्या विधानांचा परामर्श घ्या.
- तुमच्या विरोधात बाजू मांडणाऱ्याला तुमची बाजू पटवून देण्याचा यथायोग्य प्रयत्न करा.

**विषय १ : समाजमाध्यमे - शाप की वरदान?**

खालीलपैकी समर्थन करणाऱ्या किंवा विरोध दर्शविणाऱ्या विधानाची निवड करून तुम्ही निवडलेल्या विधानाच्या बाजूने चर्चा करा.

| समर्थन करणारे विधान | विरोध दर्शविणारे विधान |
|---|---|
| समाजमाध्यमे हे ज्ञानार्जन आणि विविध क्षेत्रांत ज्ञानसंवर्धन करण्याची व संपूर्ण जगभराशी सहजगत्या जोडून घेण्याची संधी देणारे व्यासपीठ आहे. | समाजमाध्यमांवरील माहिती विश्वासार्ह नसते. त्यातून अफवा पसरू शकतात व समाजविघातक प्रवृत्ती इतरांच्या व्यक्तिगत माहितीचा दुरुपयोग करू शकतात. |

**विषय २ : 'ल' लग्नाचा की लिव-इन नात्याचा?**

खालीलपैकी लग्नाच्या नात्याचे समर्थन करणाऱ्या किंवा लिव-इन नात्याचे समर्थन करणाऱ्या बाजूची निवड करून तुम्ही निवडलेल्या बाजूने चर्चा करा.

| लग्नाच्या नात्याचे समर्थन करणारी बाजू | लिव-इन नात्याचे समर्थन करणारी बाजू |
|---|---|
| • लग्नामुळे दोन कुटुंबांचे नाते जुळते व स्नेहसंबंध निर्माण होतात.<br>• लग्नामुळे परस्पर साहचर्याचे अनुबंध जुळून जबाबदारी वाटून घेतली जाते.<br>• लग्नाचे नाते भारतीय संस्कृतीत दृढ आणि अतूट मानले जाते. | • लिव-इन नात्यात दोन्ही जोडीदारांना जीवनात परस्पर सामंजस्याने समान वाव मिळू शकतो.<br>• लिव-इनमध्ये स्त्री-पुरुष नाते समान पातळीवर ठेवणारा एक परिपक्व दृष्टिकोन असतो.<br>• अर्थहीन नात्यात होणारी कुतरओढ केवळ नाते निभावण्यासाठी म्हणून सहन करत राहणे लिव-इनमध्ये सहजगत्या टाळता येते. |

# प्रश्नपत्रिका २

### परीक्षेचे स्वरूप

| | |
|---|---|
| वाचन : ६० गुण | ८० मिनिटे |
| श्रवण : ५० गुण | ६० मिनिटे |
| लेखन : ४० गुण | ८० मिनिटे |
| संभाषण : ५० गुण | २० मिनिटे |
| परीक्षेचे एकूण गुण : २०० | एकूण वेळ : २४० मिनिटे (४ तास) |

### वाचन

**एकूण कालावधी : ८० मिनिटे** **एकूण गुण ६०**

वाचन प्रश्नप्रकारात चार भाग आहेत. यात तुम्हाला वेगवेगळ्या विषयांवरील उतारे वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे द्यायची आहेत. सर्व उत्तरे उत्तरपत्रिकेवरच नोंदवायची आहेत, हे लक्षात ठेवा.

**भाग १**

**कालावधी : २५ मिनिटे** **[गुण २०]**

**खालील उतारा वाचून त्यावर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या.**

**निसटलेले क्षण...**

आठवणी साठवून ठेवायला माणसाच्या स्मरणशक्तीएवढं प्रभावी दुसरं साधन नाही. कॅमेरा क्षणार्धात दृश्य पकडतो; पण त्यातून तो क्षण निसटला की कायमचा निसटतो. मात्र, असे क्षण डोक्यात पक्के बसतात. अगदी कायमचे...

मदुमलाईतला माझा तो पहिलाच पंधरवडा होता. मी आणि अरुण थेप्पाकडूला गेलो. थेप्पाकडूचं वनखात्याचं कार्यालय आणि आदिवासी पाडा मागे टाकून आम्ही जंगलात शिरलो. बरोबर कुणी मागकाढ्या नव्हता. रविवारी त्यांना सुट्टी. अरुण पुढे आणि मी मागे असे चाललो होतो. जंगलात थोडं अंतर गेल्यावर आम्ही मोयार नदीच्या दिशेनं जाऊ लागलो. उतार होता, मग नदीकाठचा गवताळ पट्टा आणि त्याला लागून घाणेरीची दाट झुडपं होती.

मी आपला पक्षी बघ, फुलपाखरं बघ असं करत चाललो होतो. इकडे तिकडे करताना एकदम नजर नदीच्या दिशेला वळली. पायवाटेवरून अरुण खाली चालला होता. त्याच्यापासून २५-३० फुटांवर, वाटेला लागूनच एक उंच झुडुप होतं. झुडपाच्या मागून कुठल्यातरी काळ्या प्राण्याची पाठ वर आलेली दिसली. आधी वाटलं, म्हैस असेल. वयस्कर नर गवे काळेकुट्ट असतात; पण आम्ही वस्तीच्या इतके जवळ होतो, की इथे गवा येईल असं वाटलं नाही. मात्र, पाठ उतरती होती, भरभक्कम स्नायूंनी गच्च भरलेली होती. तो गवाच होता.

अरुणच्या हे लक्षातच आलं नव्हतं. तो तंद्रीत तसाच चालत राहिला. माझी मती कुंठित वगैरे झाली. मला समोर दिसत होतं, की अरुण गव्याच्या अगदी जवळ चालला आहे आणि मी काहीच करू शकत नव्हतो. अरुणला सावध करावं तर आवाज करावा लागणार आणि तोच आवाज गव्यालाही ऐकू जाणार.

गव्यानं आवाजाच्या दिशेनं बघितलं असतं, तर त्याला आधी अरुण दिसणार होता. तोही अगदी जवळ. मग त्यानं काय केलं असतं, हे सांगणं कठीण होतं. न ओरडावं, तर अरुण या महाकाय गव्याच्या नाकावर पाय द्यायला चाललेला!

इकडे आड तिकडे विहीर अशा कचाट्यात मी सापडलो. सुदैवानं चालताना अरुणला एकदम गवा दिसला; पण कधी? गवा त्याच्यापासून मोजून दहा पावलांवर असताना! यावर अरुणची प्रतिक्रिया बघण्यासारखी होती. तो आश्चर्यानं, आणि धक्क्यानं मागे कोसळलाच! मग पाठीवरची पिशवी, नाकावर घसरलेला चष्मा सावरत तो उठला आणि पळत मी उभा होतो तिथं आला. तिकडे अरुण पडला आणि इकडे मी हसू न आवरल्यानं हसून 'पडलो'. कितीही गंभीर प्रसंग घडला, तरी कुणाचा असा पोपट झालेला बघितला, की मला हसू आवरत नाही. अरुण मात्र हसण्याच्या परिस्थितीत नव्हता. "गवा हल्ला करणार, गवा हल्ला करू शकेल", म्हणत त्यानं थरथरत्या हातानं पाठीवरच्या पिशवीतून व्हिडिओ कॅमेरा काढला. मी हसू आवरून माझा कॅमेरा सज्ज केला.

या सर्व प्रसंगाचा कळस म्हणजे, इकडे एवढं झालं तरी त्या गव्याला आम्ही त्याच्या इतके जवळ आलोय याचा पत्ताच नव्हता! तो हिरवंगार गवत खाण्यात पार तल्लीन झाला होता. चरताना तो झुडपामागून उघड्यावर आला आणि एकदम त्याला दोन आकृत्या त्याच्यावर काळी नळकांडी रोखून उभ्या राहिलेल्या दिसल्या. वळणदार शिंगांखालचे कान एकदम टवकारले. गवा स्तब्ध उभा राहिला. मी कॅमेऱ्याला डोळा लावला. फोटो काढायला बटण दाबणार, इतक्यात गव्यानं मान झाडली, नाकातून मोठा फुत्कार टाकला आणि खुरांखाली जमीन तुडवत, हादरवत तो पळून गेला. अनपेक्षितपणे फुत्कार ऐकून लेन्सला आधार दिलेला हात हलला. स्लाइड्स आल्या तेव्हा एकाच स्लाइडमध्ये दोन गवे आले होते!

अभ्यासविषय म्हणून रानकुत्र्यांची टोळी सापडली, की मी आणि अरुण जमेल तेवढा वेळ टोळीचं निरीक्षण करत बसायचो. सप्टेंबरमध्ये एकदा सिद्धा निरोप घेऊन आला, की कुत्री कारगुडीला पिकॉक डॉर्मिटरीमागे बसली आहेत. मी आणि अरुण कारगुडीला पोचलो, तेव्हा दुपारचे ३-३॥ वाजले होते. रानकुत्र्यांची टोळी वस्तीपासून मागे अक्षरशः हाकेच्या अंतरावर बसली होती. एकूण अकरा कुत्री होती. त्यांच्यापैकी ७-८ पूर्ण वाढलेले नर आणि माद्या व बाकीची आदल्या वर्षीची पिल्लं होती. विश्रांती घ्यायला बसलेली कुत्री आळसावल्यागत ठिकठिकाणी गवतामध्ये पहुडली होती. मधूनच एखादं कुत्रं उठायचं आणि दुसऱ्याजवळ जायचं. शेपटी हलवत दुसऱ्याला हुंगायचं आणि त्याच्याशेजारी लोळण घ्यायचं.

आम्ही कुत्र्यांसमोर येऊन स्थिरस्थावर झालो, तेव्हा सिद्धा एका पडलेल्या धावड्याच्या झाडावर फाट्यामध्ये बसला. मी आणि अरुण खालीच गवतात बसलो होतो. रस्ता सोडून आपण प्राण्यांच्या दिशेनं सरळ गेलो तर प्राणी लगेच दूर जातात. पण थांबत, सहजपणे गेल्यासारखं गेलो तर ते बरेच जवळ येऊ देतात. या पद्धतीचा वापर करत मी आणि अरुण हळूहळू पुढं सरकत होतो. पाच-एक पावलं गेलो, की थांबत होतो. उगीचच इकडे तिकडे बघत होतो, बसत होतो. थोड्या वेळानं परत पुढे जात होतो. असं करत आम्ही कुत्र्यांपासून पन्नास फुटांवर जाऊन थांबलो.

आता मात्र कुत्री सावध झाल्यासारखी सावरून बसली. मग आम्ही तिथंच थांबलो. पाठीवरच्या सगळ्या गोष्टी गवतात ठेवल्या आणि मांडी घालून बसलो. व्हिडीओ कॅमेरा काढून अरुण कुत्र्यांच्या हालचाली टिपत होता. त्याच्या कामाच्या दृष्टीनं तो महत्त्वाचा भाग. मी दुर्बीण डोळ्यांना लावून ठेवली होती. मागे सिद्धाला काहीच काम नसल्यामुळे तो गवताची काडी चावत झोप आवरत बसला होता. दुपारची वेळ. जंगलातला सुखावणारा गारवा. बुडाखाली हिरवं, ओलसर गार गवत. कानाला सुखावणारा आणि

फक्त तेवढाच पक्ष्यांचा आवाज. जोडीला मधूनच 'झिल्ली' किड्याचा वाढत जाऊन मग पटकन थांबणारा आवाज. तोही आर॰ डी॰ बर्मननं चाल लावल्यासारखा पकड घेणारा. या साऱ्या वातावरणात आम्ही आरामात बसलो होतो. सगळे स्नायू शिथिल झालेले.

मेंदूला धक्का बसायला ही अत्यंत उत्तम वेळ होती. एक मोठा आवाज आला. रानडुकराचं गुरकावणं खूप मोठं आणि कान कापणाऱ्या आवाजात केलं, तर येईल तसा. मी ताडकन गुडघ्यावर उभाच राहिलो! सिद्धा मागे झाडाच्या फाट्यात बसला होता, तो फाट्यातच उभा राहिला. सगळी रानकुत्री ताठ उभी राहिली. काही चार-दोन पावलं पुढे गेली. दोन मोठे नर मात्र बरेच पुढे गेले. तो आवाज येतच राहिला. आधी फक्त एकाच घशातून येत होता. मग दोन-तीन... जंगलात घुमून ते आवाज येतच राहिले. कुत्री अस्वस्थ झाली होती. मला कळेचना, हा आवाज कुणाचा. अरुणला विचारलं तर तो म्हणाला, रानकुत्र्यांचाच आहे.

हे अविश्वसनीय होतं. रानकुत्री भुंकू शकत नाहीत. एकमेकांशी संपर्क साधायचा असेल, तेव्हा ती शीळ घालतात. ह्या शिळा खूप लांबवर ऐकू जातात. टोपणातून शीळ घातली, तर रानकुत्र्यांच्या शिळेची नक्कल सहज करता येते; पण बंदुकीच्या वापरलेल्या पोकळ गोळीतून तर ह्या शिळेचा हुबेहूब आवाज काढता येतो. तो आवाज मला परिचित होता. आत्ताचा हा आवाज मात्र खूप वेगळा होता. या आवाजात जिवाचा आकांत होता. धोक्याची सूचना होती, भीती होती.

मला अरुणवर विश्वास ठेवावा लागला. कारण त्यानं हा आवाज पूर्वी दोनदा ऐकला होता. वाईट गोष्ट म्हणजे त्या गोंधळात तो आवाज कुठली कुत्री काढतायत हे बघण्याचंही मला सुचलं नाही. खरं तर सुचलं नाही, हे आता म्हणवतंय. त्या वेळी वेळच नव्हता ते बघायला.

मी मागे वळून सिद्धाला खुणेनंच 'काय होतंय, हा काय प्रकार आहे?' असं विचारलं. तो उत्साहात काहीतरी खुणा करत होता. मात्र, त्या खुणा काही मला कळेनात. शेवटी मी परत कुत्र्यांकडे नजर वळवली. जी दोन कुत्री खूप पुढे गेली होती, ती पुढचे दोन पाय उचलून फक्त मागच्या पायांवर उभं राहून काहीतरी बघत होती. उड्या मारल्यासारखं करत होती. मधूनच दोन-चार पावलं डावीकडे-उजवीकडे पळाली. परत मागच्या पायांवर उभी राहिली. रानकुत्री बुटकी असल्यामुळे कधी कधी त्यांना गवतामुळे लांबचं दिसत नाही. अशा वेळी ती मागच्या पायावर उभी राहतात आणि त्यांची उंची वाढवतात. ही कुत्री 'उभं' राहून एका उंचवट्यामागे बघत होती. त्या उंचवट्यामागे उतार सुरू होत होता आणि मग एक ओढा होता. ओढ्याभोवती दाट झाडी होती. तिकडेच तोंड करून ही कुत्री उभी होती. त्यांचा कोलाहल चालू होता.

मग अचानक हा आरडाओरडा थांबला. पुढे गेलेली कुत्री झटक्यात वळली आणि जीव खाऊन पळाली. त्यांच्या मागोमाग एक खूप मोठं पिवळं जनावर धावत आलं. त्याचा चेहरा गोलसर. अंगावर काळे पट्टे. अंगावरच्या छोट्या छोट्या स्नायूंत मोठी ताकद होती. अंगात बळ आणि नजरेत जरब होती. रानकुत्री बघत होती, त्या उंचवट्याजवळ आल्यावर वाघ एकदम थांबला. त्याची नजर आमच्याकडे गेली. अर्धा-एक क्षणच काय तो थांबला असेल.

वाघ दिसल्याक्षणी मी अरुणचा खांदा गच्च पकडला. तो व्हिडिओ कॅमेऱ्यातून कुत्र्यांकडे बघत होता. "अरुण, वाघ!!!" मी अस्फुटसा ओरडलोच. काही तरी वेगळं घडतंय याची कल्पना अर्थातच त्याला होती; पण वाघ कल्पनेपलीकडे होता.

अरुणनं कॅमेरा वाघावर रोखला. दरम्यान मी घाईत एक फोटो काढला. वाघ क्षणभर थांबला. पण मग लगेच तसाच, आमच्याच दिशेनं पुढे धावत आला. मात्र वाघाचा आमच्या अंगावर येण्याचा बेत नव्हता. वाटेत जो कुत्रा उभा होता, त्याच्या अंगावर वाघ धावला. आम्ही नसतो, तर वाघानं पुढच्या काही

ढांगांमध्ये कुत्र्याला गाठून कदाचित लोळवलं असतं. आमच्यामुळे तो बुजला असावा. कारण पाठलाग सोडून तो वळला आणि एक मोठी डरकाळी फोडून परत उंचवट्यामागे गायब झाला. कुत्री जी पळत सुटली ती थांबलीच नाहीत.

आमच्यात श्वास घेण्याचं भान आलं. शीर न् शीर ताडताड उडत असल्याचं लक्षात आलं. अंगात काही वेगळंच चैतन्य पसरलं. असं का झालं, हे अजूनही मला सांगता येत नाही. पण हातात काही तरी घेऊन जोरदारपणे आपटावंसं वाटलं. जंगल गिळून टाकणारी मोठी विजयी आरोळी ठोकावीशी वाटली. सर्वांग शिवशिवू लागलं. अंगातून रक्त वाहत असल्याचं ठळकपणे जाणवलं.

आता हे लिहितानाही तीच जाणीव, तीच अवस्था परत अनुभवास येत आहे. गाडीच्या खिडकीतून जंगल बघणाऱ्या व्यक्तींना ही गोष्ट कधी कळणार नाही. पडद्यावर जंगलातले प्राणी बघितलेल्यांना याची कल्पना करता येणार नाही. असे प्रसंग अक्षरशः अर्ध्या-पाऊण मिनिटात घडतात. पूर्वसूचना न देता घडतात. पण आयुष्यातल्या असंख्य क्षणांपैकी हे मोजके क्षण अजरामर असतात. त्यांचा मोठा खोल ठसा मनावर उठतो. शेवटी हेच निसटते क्षण काय ते आपले असतात. बाकी सगळं आयुष्य म्हणजे लादलेला भारा असतो. माझ्या मनातली आरोळी ही ते क्षण पकडल्याच्या विजयाची आरोळी असावी!

कृष्णमेघ कुंटे

**क. पुढील विधाने चूक की बरोबर ते लिहा.** **(४)**

१. लेखक वाघ पाहण्यासाठी जंगलात गेला होता.

२. सिद्धा मुका होता.

३. वाघ रानकुत्र्याची शिकार करण्याच्या प्रयत्नात होता.

४. रानकुत्र्यांचं निरीक्षण हा लेखकाचा छंद होता.

**ख. जोड्या जुळवा.** **(४)**

| | |
|---|---|
| १. मती कुंठित होणे | अ) दिसेनासे होणे |
| २. हाकेच्या अंतरावर असणे | आ) मग्न होणे |
| ३. तल्लीन होणे | इ) काही सुचेनासे, समजेनासे होणे |
| ४. गायब होणे | ई) जवळ असणे |

**ग. पुढे दिलेल्या नाम व क्रियापदाच्या जोड्या जुळवून गाळलेल्या जागा भरा.** **(४)**

(१. आरोळी २. शीळ ३. कोलाहल ४. फूत्कार) (अ. घालणे आ. टाकणे इ. देणे ई. माजणे)

१. डोक्यात उलटसुलट विचारांचा --------- ---------वर निर्णय घेणं अनेकदा अवघड जातं.

२. माधवला दयाळ पक्ष्यासारखी हुबेहूब --------- --------- येते.

३. नागाने --------- --------- ऐकून कोण घाबरणार नाही?

४. कोकणात खूप ठिकाणी घरे बऱ्याच अंतरा-अंतरावर असल्यामुळे --------- --------- एकमेकांना बोलावतात.

**घ. वाक्यरचनेत आवश्यक ते बदल करून पुढे दिलेल्या दोन वाक्यांचे एक वाक्य करा.** **(२)**

१. इकडे एवढं झालं तरी त्या गव्याला आम्ही त्याच्या इतके जवळ आलोय याचा पत्ताच नव्हता! तो हिरवंगार गवत खाण्यात पार तल्लीन झाला होता.

२. आता मात्र कुत्री सावध झाल्यासारखी सावरून बसली. मग आम्ही तिथंच थांबलो. पाठीवरच्या सगळ्या गोष्टी गवतात ठेवल्या आणि मांडी घालून बसलो.

**च. वर्तमानकाळ वापरून पुढील उताऱ्याचे पुनर्लेखन करा.** **(२)**

अरुणनं कॅमेरा वाघावर रोखला. दरम्यान मी घाईत एक फोटो काढला. वाघ क्षणभर थांबला. पण मग लगेच तसाच, आमच्याच दिशेनं पुढे धावत आला.

**छ. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** **(४)**

१. गव्याला पाहून अरुणची काय प्रतिक्रिया झाली?

२. 'हेच निसटते क्षण काय ते आपले असतात. बाकी सगळं आयुष्य म्हणजे लादलेला भारा असतो.' ह्या वाक्यांतून लेखकाला काय सुचवायचे आहे, असे तुम्हाला वाटते?

**भाग २**

**कालावधी : १५ मिनिटे** **(गुण १२)**

**खालीलपैकी '१-९' ही नऊ विधाने 'स्नेहवन' ह्या उताऱ्यातील वाक्यसमूहांचा आशय वेगळ्या शब्दांत मांडतात. प्रत्येक विधानाचा 'क, ख, ग, घ, च, छ, ज' या सातांपैकी एका वाक्यसमूहाशी योग्य मेळ घालून जोडी जुळवा. '१' हे एक विधान आणि त्याच्याशी जुळणारा वाक्यसमूह 'क' उदाहरणादाखल जुळवून दाखवला आहे. खालीलपैकी दोन विधाने ही उताऱ्यातील वाक्यसमूहाशी मिळतीजुळती नाहीत.**

उदा॰ १ - क

**विधाने**

**१)** विठ्ठलाचं नामस्मरण करत जीवन कंठणारं ते कुटुंब

**(क)** त्याचं नाव अशोक देशमाने. वय जेमतेम २६. दुष्काळग्रस्त परभणी जिल्ह्यातील मंगरूळ हे त्याचं गाव. शेतकरी कुटुंब. आई-वडील आणि सगळं कुटुंबच विठ्ठलभक्त. विठुमाईचं नाव ओठावर ठेवूनच वावरणारं! गावात पाण्याचं दुर्भिक्ष कायमचंच. यंदा तर दुष्काळात गाव अक्षरश: होरपळून गेलेलं. मग दुष्काळग्रस्त मराठवाड्यात जे चित्र दिसत होतं, तेच चित्र गावातही उमटू लागलं. भल्याभल्या घरची माणसं जगण्यासाठी गाव सोडून शहरात जाऊ लागली. डोक्यावरच्या कर्जाच्या भाराची चिंता चेहऱ्यावर घेऊन जगण्याचा संघर्ष करू लागली. पोराबाळांची आबाळ सुरू झाली.

२) हे करण्यासाठी त्याने कंबर कसली होती.

३) ही जाणीव त्याला लज्जास्पद वाटून छळू लागली.

४) मुलांच्या डोईवर त्याने छत उभे केले.

५) मुलांच्या शाळा बंद झाल्या.

६) ह्या निर्णयावर त्यानं शिक्कामोर्तब केलं.

७) माणसांची साखळी तयार केली.

८) त्यानं अतोनात पायपीट केली.
९) पहिल्यांदा पैशांचं पाठबळ उभं केलं पाहिजे.

स्नेहवन
(ख) पोटभर खायला मिळण्याची भ्रांत असलेल्या घरांमधल्या मुलांची पाटी-पेन्सिल आणि दप्तरं गुंडाळून ठेवली गेली. एका दुष्काळात उद्याची पिढी बरबाद होणार, त्यांच्या जगण्याचे मार्गच कोरडेठाक होणार या विचारानं अशोक देशमाने हैराण झाला. संगणक अभियांत्रिकीची पदवी घेऊन पुण्यात चांगली नोकरी करतानाही, गावाकडच्या व्यथांच्या बातम्या कानावर पडल्या की तो आणखीनच अस्वस्थ व्हायचा. ती बेचैनी अनावर झाली, की एखादी कविता कागदावर उमटायची. काहीतरी निर्धार व्यक्त व्हायचा. सरकारी उपाययोजनांमधील कोरडेपणानं ती जखम अधिकच भळभळू लागायची.
(ग) आपलं गाव, घर, सख्खे शेजारी, सारे दुष्काळानं होरपळत असताना, आपण नोकरी एके नोकरी करत सुखाच्या स्वप्नांचे इमले बांधत बसलो, या जाणिवेनं त्याला शरम वाटू लागली आणि काहीतरी केलं पाहिजे, असं त्यानं ठरवलं. मनात कामाचा आराखडा तयार झाला होता. तो आराखडा घेऊनच अशोक समोर बसला होता. दुष्काळामुळे विस्कटलेली घरं सावरण्याचा, पुढच्या पिढीला जगण्याचा व खडतरपणावर मात करण्याचा नवा मंत्र देऊ पाहणारा आराखडा अशोकच्या डोक्यात तयार होता. नोकरी सोडायची आणि दुष्काळग्रस्त कुटुंबांसाठी पूर्णवेळ काम करायचं, असं त्यानं ठरवलं होतं. तेच सांगायला तो आला होता. त्या भेटीत त्यानं अस्वस्थपणे मनातली तळमळ व्यक्त केली आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांसाठी आधार होण्याचा निर्धार बोलून दाखवला.
(घ) 'असं काही काम करायचं असेल, तर पहिल्यांदा आर्थिक स्थैर्याची हमी मिळवली पाहिजे. स्वत:बरोबर आणखी काही जणांना सावरायला निघायचं, तर आपल्या हातात आधाराची भक्कम दोरी हवी,' मी व्यवहारीपणाने सल्ला देत होतो आणि अशोक नम्रपणे मान हलवत ऐकत होता.
(च) मग एके दिवशी अशोकचा फोन आला. दुष्काळग्रस्त भागातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांचं संगोपन करण्यासाठी पूर्णवेळ काम करण्याचा त्याचा निर्णय पक्का झाला होता. फक्त सध्या नोकरी सुरू ठेवायची, थोडे पैसे हाताशी येईपर्यंत काम करायचं, असं ठरलं होतं. गावोगावी हितचिंतकांचं जाळं उभं करण्याचा एक आखणीबद्ध प्रयत्न अशोक करत होता.
(छ) चांगलं काम करणाऱ्याच्या पाठीशी शेकडो हात आणि माणुसकीनं भारलेली असंख्य मनं उभी राहतात. अशोकच्याही पाठीशी मोठा स्नेहपरिवार उभा राहिला आणि 'स्नेहवन' नावाच्या संस्थेचा जन्म झाल्याचं त्यानं जाहीर केलं. पुण्याजवळ भोसरीत अनिलभाऊ कोठे नावाच्या एका हितचिंतकानं आपला रिकामा बंगला अशोकच्या 'स्नेहवन'साठी देऊ केला. डॉ. विकास आमटेंनी भरभरून आशीर्वाद दिले.
(ज) आपला मुलगा काहीतरी भलं काम करतोय, याचं समाधान आई-वडिलांच्या डोळ्यांत वाचायला मिळालं आणि २७ वर्षांचा हा तरुण गरजू कुटुंबांतील मुलं शोधण्यासाठी फिरू लागला. दुष्काळग्रस्त भागातील अनेक कुटुंबांनी त्याच्याकडे विश्वासाने मन मोकळं केलं आणि त्याला माणसांची गरज लक्षात आली. दीड-दोन महिन्यांत स्नेहवनाच्या त्या सावलीत आत्महत्याग्रस्त कुटुंबांतील १८ गरजू मुलं आणि एक दुष्काळग्रस्त कुटुंब असा एक परिवार नांदायलाही लागला. रात्रपाळीची नोकरी करून दिवसा माणसं जोडणाऱ्या अशोकच्या स्वप्नाला आकार आला.
परवा अचानक त्याचा फोन आला. 'नऊ ऑगस्टला स्नेहवनाचं औपचारिक उद्‌घाटन करणार आणि त्याच दिवशी नोकरीला रामराम ठोकणार. आता कधीही या, मी स्नेहवनातच भेटेन', हे सांगताना त्याच्या सुरातलं समाधान लपत नव्हतं.

दिनेश गुणे

**भाग ३**

**कालावधी : १५ मिनिटे** **(गुण १२)**

**खालील उताऱ्याचे एकूण १४ भाग केले असून ते दोन गटांत विभागले आहेत.**

**गट १ : १ - ७ भाग (७)**

**गट २ : क - ज भाग (७)**

**१ - ७ या क्रमवार अंकांनी दर्शविलेल्या प्रत्येक भागानंतर आशयाशी जुळणारा अक्षराने दर्शविलेला एक भाग निवडायचा आहे व त्यातून एक सलग अर्थपूर्ण उतारा तयार करायचा आहे.**

उदाहरणादाखल १ ह्या भागापुढे जुळणारा 'क' हा भाग जोडून दाखवला आहे.

उत्तरपत्रिकेवर योग्य पर्याय नोंदवा.

**कुरुंदकर आणि मी**

उदा. **१ - क**

**(१)** कुरुंदकरांविषयी तसं खूप लिहिलं गेलं आहे. तरीही मी लिहितो आहे, कारण मीही आज वयाच्या पन्नाशीत आहे. कुरुंदकरांच्या आणि माझ्या आयुष्याचा हिशोब नेमका काय आहे?

**(क)** अवघ्या ५० वर्षांच्या आयुष्यात या माणसानं लिहिलेली ३५ पुस्तकं, त्या प्रत्येक पुस्तकाची खोली, त्यातील विषयवैविध्य, व्यासंग, अभ्यास, हे सारं बघितल्यावर आपण आपल्या आयुष्यातील ५० वर्षं खरंच नेमकं काय केलं, असा मला प्रश्न पडतो. कुरुंदकर प्रतिभेची आणि व्यासंगाची उंच उंच विमानं उडवत असताना आपण फक्त साबणाचे फुगे उडवत राहिलो की काय, असं शल्य वाटत राहतं. व्यासंग करावा आणि मग प्रकट व्हावं, ही गोष्ट माझ्यासारखे अनेक जण विसरले आहेत. झालं असं की, आम्हाला लिहिता यायला लागलं तो कालखंड आणि वृत्तपत्रांच्या अनेक आवृत्त्या, अनेक नियतकालिकं आणि दिवाळी अंक सुरू झाले तो कालखंड एकच होता.

**गट १ :**

(१) कुरुंदकरांविषयी तसं खूप लिहिलं गेलं आहे. तरीही मी लिहितो आहे, कारण मीही आज वयाच्या पन्नाशीत आहे. कुरुंदकरांच्या आणि माझ्या आयुष्याचा हिशोब नेमका काय आहे?

(२) त्यामुळे आम्ही लिहीत गेलो आणि ते छापून येत राहिलं. एका वर्षी तर मी १८ दिवाळी अंकांत लिहिलं होतं... त्यातून एक प्रतिमा बनत गेली, मान्यता मिळाली. पुस्तकं प्रकाशित होत गेली; पण आज मागे वळून पाहताना वाटतं, एखाद्या विषयाचा कुरुंदकर जसा सांगोपांग अभ्यास करत, तसा आपण कुठे केला?

(३) ज्या साहित्यावर आपलं प्रेम आहे, त्यातील महत्त्वाचे मानदंड तरी आपण पूर्णपणे वाचले का? इंग्रजी साहित्य आपण किती वाचू शकलो? आपण एकदा लिहायला लागलो की, नवनवे विषय खुणावत राहतात. थोडंफार वाचून आपण त्यांची तात्कालिक तयारी करतो. त्यात आपल्या व्यासंगापेक्षा मतप्रदर्शनच जास्त असतं. आपल्या आजूबाजूचा मोठा समूह फारसा व्यासंगी नसल्यामुळे तो असं लेखन वाचून प्रभावित होतो.

(४) घरी त्यांचे मामा – ना. गो. नांदापूरकर हे मराठीतले नामवंत साहित्यिक, समीक्षक आणि अत्यंत व्यासंगी होते. त्यांची पुस्तकं कुरुंदकरांनी वाचून काढली. या सगळ्यांतून त्यांची मनोभूमिका घडली. मला

पूर्वी वाटायचं : फार पूर्वीच्या काळात लेखनाची माध्यमं मर्यादित होती हा खूप अन्याय होता. आज मला असं वाटतं की, तेव्हा माध्यमं मर्यादित होती हेच बरं होतं. कारण त्यामुळे स्पर्धा खूप तीव्र असायची.

(५) वरवर कितीही म्हटलं तरी आतूनही ती गरज वाटत नाही. मग आपण तेच तेच बोलत राहतो, तेच तेच लिहीत राहतो. हेमंत देसाई एकदा म्हणाले होते की, ज्यांना खूप वाचनाची आवश्यकता आहे, ती माणसं आज खूप लिहीत आहेत आणि ज्यांनी लिहायला हवं ते मात्र वाचत बसले आहेत. या पार्श्वभूमीवर मला कुरुंदकर समजावून घ्यावेसे वाटतात, माझ्यातील अंधाराला उलगडून बघावंसं वाटतं. मला आजकाल अनेक तरुण मित्र 'आम्हाला लिहावंसं वाटतं, काय लिहू?' असं विचारतात. पूर्वी मी कौतुकानं विषय सुचवायचो. आता सांगतो - जी चूक आम्ही केली, ती करू नका; लेखन सुरू करण्यापूर्वी अगोदर किमान तीन वर्षं मराठी-इंग्रजीतील आवडीच्या विषयांवरचं खूप वाचून घ्या. मगच लेखन सुरू करा. कदाचित अनेकांना हे चुकीचं वाटेल. अभिव्यक्त होणं या गोष्टीचं महत्त्व ते मला सांगतील. पण खरं सांगतो, खूप लिहिल्यानंतर आता एक पोकळपणा तीव्रतेनं जाणवतो आहे. कुरुंदकरांकडे पाहिल्यावर तर स्वतःचं खुजेपण अधिकच तीव्रतेनं जाणवतं.

(६) काही जण म्हणतील, सामाजिक कार्यकर्ता असेल तर व्यासंगातून थोडीशी सूट असायला हरकत नाही. पण माझ्यापुढे कार्ल मार्क्सचं उदाहरण आहे, आपल्या डॉ॰ बाबासाहेब आंबेडकर, शरद जोशी यांचं उदाहरण आहे. प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून आंबेडकर किंवा जोशी यांनी लढे दिले, पण तत्पूर्वी त्यांनी संबंधित विषयाचा सांगोपांग अभ्यास केला. आंबेडकरांनी जातिव्यवस्थेची खोलवर चिकित्सा केली आणि शरद जोशी यांनी शेतकऱ्यांचं दारिद्र्य या विषयी अत्यंत मूलगामी विवेचन केलं. म्हणून त्यांनी हाती घेतलेले विषय निर्णायक वळणापर्यंत गेले. कधी कधी वाटतं आयुष्यात उपेक्षेचा कालावधी मोठा असला पाहिजे. त्यात तुमच्या क्षमता जास्त उजळून निघतात. अनेक वर्षं वाचन-संशोधन करून नंतर व्यक्त होण्याची पूर्वीच्या काळी पद्धत होती, तीच योग्य होती. माझ्यानंतरच्या पिढीच्या लेखनाचा जन्म तर थेट सोशल मीडियावरच झालेला आहे.

(७) जितकं कमी शब्दांत लिहाल, तितकं जास्त वाचलं जातं, याच निकषावर जर ते लिहीत राहिले, तर मूळ विषयाचं वाचन व दीर्घलेखन न होण्याचा धोका संभवतो.

**गट २ :**

(क) अवघ्या ५० वर्षांच्या आयुष्यात या माणसानं लिहिलेली ३५ पुस्तकं, त्या प्रत्येक पुस्तकाची खोली, त्यातील विषयवैविध्य, व्यासंग, अभ्यास, हे सारं बघितल्यावर आपण आपल्या आयुष्यातील ५० वर्षं खरंच नेमकं काय केलं, असा मला प्रश्न पडतो. कुरुंदकर प्रतिभेची आणि व्यासंगाची उंच उंच विमानं उडवताना आपण फक्त साबणाचे फुगे उडवत राहिलो की काय, असं शल्य वाटत राहतं. व्यासंग करावा आणि मग प्रकट व्हावं, ही गोष्ट माझ्यासारखे अनेक जण विसरले आहेत. झालं असं की, आम्हाला लिहिता यायला लागलं तो कालखंड आणि वृत्तपत्रांच्या अनेक आवृत्त्या, अनेक नियतकालिकं आणि दिवाळी अंक सुरू झाले तो कालखंड एकच होता.

(ख) पण जेव्हा आपण कुरुंदकर, नेमाडे आणि इंग्रजीतल्या दिग्गजांचं काही वाचतो, त्या क्षणी आपली सारी आवरणं गळून पडतात. आपण फक्त व्यक्त होत राहिलो, पण स्वतःला समृद्ध करण्याचं काम तसंच राहून गेलं, ही खंत आणि ही सल पुन्हा पुन्हा जाणवायला लागते. कुरुंदकरांच्या चरित्रात हैदराबाद

येथे त्यांनी जे वाचन केलं त्याचा उल्लेख आहे. महाविद्यालयातून ते जवळच्या ग्रंथालयात जात, तिथं संध्याकाळपर्यंत सर्व प्रकारचं वाचन करत. अनेक महिने त्यांनी हा परिपाठ ठेवला.

(ग) ती 'लाईक, कमेंट, शेअर' या मोहजालात लवकर सापडते. प्रत्यक्ष काम करणारी व्यक्ती असेल तर ते क्षम्य मानलं जातं, किंबहुना त्या कामाचे मार्क त्या लेखनामध्ये पकडले जाऊन सरासरी उंच होते, पण 'अभ्यासोनी प्रकटावे' हे मात्र तसंच राहून जातं. चळवळी करताना ऊर्जास्रोत असणाऱ्या व्यक्तीची बॅटरी जितकी जास्त, तितका तिचा प्रकाश अनुयायांना दूरवर दिसायला लागतो. त्यामुळे सामाजिक कार्यकर्त्यांसाठीही व्यासंगाची पूर्वअट पाहिजे, असं मला या वळणावर वाटतं.

(घ) तेव्हा शाळा-महाविद्यालयं यांच्यासारख्या 'लेखन आणि संशोधन' यांचं नातं असणाऱ्या इयत्ता निर्माण करायला हव्यात का, असा अतिरेकी वाटणारा विचार मनात येऊन जातो... कुरुंदकरांची प्रेरणा किमान उरलेल्या आयुष्यात तरी व्यासंगाची साथ द्यायला लागो, अशा आज मीच मला शुभेच्छा देतो!

(च) आपण केवळ प्रतिक्रियावादी लेखन करत राहिलो. घडलेल्या घटना, त्यांचा तेव्हाचा अर्थ लावणं, व्यक्त होणं, असंच आपल्या एकूण लेखन-व्यवहाराचं स्वरूप राहिलं. एक कार्यकर्ता म्हणून ते नक्कीच महत्त्वाचं आहे. घडणाऱ्या घटनांवर प्रतिक्रिया व्यक्त करून समाजमन बदलवण्यासाठी प्रयत्न करणं गरजेचं असतं, पण आपण फक्त तितकंच करत राहिलो, ही खंत आता कुरुंदकरांकडे बघून वाटत राहते. ज्या विषयात आपण काम करतो, त्यात जगभरात, भारतभरात किंवा महाराष्ट्रात लिहिलेलं सगळं तरी वाचलं का? जे मानवी जगण्याशी जोडलेले महत्त्वाचे विचार आहेत, त्यावर मार्क्सपासून अनेक विचारवंतांनी लिहिलेलं सगळं साहित्य वाचून तरी आपण आपली वैचारिक भूमिका बनवली का?

(छ) – 'मी असे जग बनवेन, मी जग निर्माण केले, मी हे जग मोडेन असे म्हणून अथवा लिहून जग निर्माण होत नसते. समाजाची रचना मुख्यतः आर्थिक मुद्द्यांवर ठरत असते.' कुरुंदकरांनी हे असे मुद्दे मांडून मला अधिक वाचनाला आणि स्वतःची समज अजून वाढवण्याला प्रोत्साहन दिलं आहे.

(ज) परिणामी, आपली उंची वाढवत नेणं हा एवढाच पर्याय शिल्लक असायचा. आज अनेक माध्यमं उपलब्ध आहेत. आणि त्यातल्या कुणीही आपलं छापलं नाही, तर सोशल मीडियावर आपण लिहू शकतो. ब्लॉग लिहू शकतो, युट्यूब व्हिडिओ करू शकतो. हे सगळं नक्कीच चांगलं आहे, परंतु या सर्व प्रक्रियेत व्यासंग वाढवणं राहून जातं. नोबेल विजेता लेखकही पुस्तक लिहितो आणि मीही पुस्तक लिहितो. पी॰ साईनाथ वृत्तपत्रात लिहितात, मीही लिहितो. एखादा जागतिक विचारवंत फेसबुकवर पोस्ट टाकतो आणि मीही टाकतो; पण यातील खोली व अंतर हे मात्र आम्ही विचारात घ्यायला तयार नाही, असंच मला वाटतं आहे. कुरुंदकरांच्या मृत्यूला आज ३८ वर्षं झाली. आजही त्यांची सर्व पुस्तकं तितक्याच उत्सुकतेनं वाचली जातात आणि ती तितकीच मार्गदर्शकही आहेत. माझ्यानंतर ३५ वर्षांनी माझं काय टिकेल? तात्कालिक परिस्थितीला प्रतिसाद देता देता आपण तात्कालिकच राहतो की काय, अशी साधार भीती वाटते. एकदा तुमच्याकडे वाचकांची आणि चाहत्यांची गर्दी झाली की, व्यासंग करण्यासाठी फुरसत मिळत नाही.

हेरंब कुलकर्णी

भाग ४

कालावधी : २५ मिनिटे [गुण १६]

**पुढे दिलेले शासकीय परिपत्रक वाचून त्यावर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१८/प्र.क्र.४५/कार्या-६

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई ४०००३२

दिनांक : २६ नोव्हेंबर, २०१८

**प्रस्तावना : -**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त होणाऱ्या माहिती अर्जांची संख्या कमी होण्याच्या दृष्टीने व कामकाजात पारदर्शकता येण्यासाठी पुणे महानगरपालिकेने जावक क्र. म.आ/से/१०६२, दिनांक ३१.७.२००९च्या आदेशान्वये, नागरिकांना अवलोकनासाठी अभिलेख उपलब्ध करून देण्याचा प्रयोग केला होता. त्याच धर्तीवर जिल्हास्तरीय कार्यालयापासून ते निम्नस्तरीय सर्व कार्यालयांत नागरिकांना अवलोकनासाठी अभिलेख उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक : -**

शासकीय कामकाजात अधिक पारदर्शकता येण्यासाठी व माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त माहिती अर्जांची, प्रथम व द्वितीय अपीलांची संख्या कमी होण्याच्या दृष्टीने राज्यातील जिल्हास्तरीय कार्यालयांपासून ते निम्नस्तरीय सर्व कार्यालयांत तसेच महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हापरिषद इत्यादी सर्व कार्यालयांत प्रत्येक सोमवारी किंवा सदर दिवशी सार्वजनिक सुट्टी असल्यास त्यानंतरच्या कार्यालयीन दिवशी दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत नागरिकांना, माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत विहित प्रक्रियेनुसार, त्यांच्या मागणीनुसार अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून द्यावेत.

प्रत्येक कार्यालय प्रमुखांनी स्थानिक परिस्थितीच्या अनुषंगाने आवश्यक दुरुस्तीसह नागरिकांना अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्याच्या प्रयोगाची आपापल्या कार्यालयात अंमलबजावणी करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१८११२६१५२८३५३७०७ असा आहे. हे पत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे,

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
४. राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

५. सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. प्रबंधक (मूळ शाखा / अपील शाखा), उच्च न्यायालय, मुंबई
७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
८. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
९. प्रबंधक, लोकआयुक्त व उप-लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१०. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सर्व), मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
११. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
१२. सर्व मंत्रालयीन विभाग
१३. सर्व विभागीय आयुक्त / सर्व जिल्हाधिकारी
१४. महासंचालक, यशदा, पुणे

**क. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(४ गुण)**

१. नागरिकांना अभिलेख उपलब्ध करून देण्याचा प्रयोग पहिल्यांदा कुठे झाला होता? त्यामागचा हेतू काय होता?
२. अभिलेख केव्हा आणि कोठे उपलब्ध होऊ शकतील?

**ख. परिपत्रकाच्या आधारे खालील विधाने योग्य की अयोग्य ते सांगा.** **(४ गुण)**

१. पुणे महानगरपालिकेने नागरिकांना पाहण्यासाठी अभिलेख उपलब्ध करून दिला होता.
२. या परिपत्रकान्वये सर्व कार्यालयांनी नागरिकांना अभिलेख पाहण्यासाठी उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आलेल्या नाहीत.
३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर पाहता येईल.
४. वरील परिपत्रकाचा हेतू शासकीय कामकाजात अपारदर्शकता येणे हा आहे.

**ग. रिकाम्या जागेत योग्य शब्दयोगी पद भरा.** **(४ गुण)**

१. लिपिकाच्या जागेसाठी अर्ज करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी अर्जा---------------- आपले दोन फोटो देणे आवश्यक आहे.
२. निर्मात्यांना प्रेक्षकांच्या अभिरुची---------------- चित्रपटांची निर्मिती करावी लागते.
३. हिमाचल प्रदेशा---------------- कन्याकुमारी---------------- सर्व नागरिकांना समान कायदा लागू झाला पाहिजे.
४. या देवळाची रचना हेमाडपंती मंदिराच्या धर्ती---------------- केली आहे.

**घ. रिकाम्या जागी कंसात दिलेल्या क्रियापदाची रूपे भरा.** **(४ गुण)**

स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी सर्व कर्मचाऱ्यांनी झेंडावंदनासाठी हजर अ) ---------------- (राह) आवश्यक आहे. त्या दिवशी कोणीही गैरहजर आ) ---------------- (अस) त्याच्याबाबत कडक कारवाई इ) -------------- (कर) जाईल. कर्मचाऱ्यांना आपल्या कर्तव्याची जाणीव करून ई) -------------- (दे) दृष्टीने हे परिपत्रक शासनाच्या सर्व कार्यालयांमध्ये पाठवावे.

**श्रवण**

**एकूण कालावधी : ६० मिनिटे** **एकूण गुण ५०**

श्रवण या विभागात एकूण तीन भाग आहेत

**भाग १**

**कालावधी : २५ मिनिटे** **(गुण ३०)**

**तुम्हाला एकूण ५ ध्वनिफिती ऐकवल्या जातील. प्रत्येक ध्वनिफितीवर आधारित ३-३ वाक्ये दिली आहेत. त्यांना 'होय' किंवा 'नाही' असे प्रतिसाद द्यायचे आहेत. प्रत्येक ध्वनिफीत ऐकवण्याआधी त्यावर आधारित वाक्ये वाचायला दिली जातील. प्रत्येक ध्वनिफीत एकदाच ऐकवली जाईल.**

**ध्वनिफीत १**

**प्रवीण दवणे**

१. समोर बसलेली मुले श्रीमंत कुटुंबांतून आलेली होती.

२. वक्ते लहानपणी तीन खोल्यांच्या घरात राहत.

३. वक्ते लहानपणी घराच्या माळ्यावर अभ्यासाला बसत.

**ध्वनिफीत २**

**विठ्ठल कामत**

१. विठ्ठल कामत यांचा जन्म कारवार येथे झाला.

२. विठ्ठल कामत यांचे वडील सुरुवातीला मुंबईत वेटरचं काम करत असत.

३. विठ्ठल कामत यांच्या वडिलांनी हॉटेल मालकाला ३५००० रुपयांचा नफा करून दिला.

**ध्वनिफीत ३**

**अनघा मोडक**

१. अनघा यांची दृष्टी अपघातामुळे गेली.

२. अनघाच्या कुटुंबियांनी तिच्या वेदना सहवेदनेने समजून घेतल्या.

३. अनघाच्या गुरूंनी तिला स्वत:मध्ये पाहायला शिकवले.

**ध्वनिफीत ४**

**बातम्या**

१. १५ दिवस पाऊस गायब होता.

२. पाऊस पडूनही रस्ते कोरडे राहिले आहेत.

३. शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागणार आहे.

**ध्वनिफीत ५**

**उपेंद्र लिमये**

१. उपेंद्र लिमये यांना चित्रपट हे माध्यम अधिक आवडते.

२. चांगला विषय हे कोणत्याही माध्यमाचे मोठे सामर्थ्य असते.

३. टी.व्ही. वर एखादी कथा खूप सविस्तर सांगता येते.

भाग २

**कालावधी : १० मिनिटे** **(गुण १०)**

**पूर्ण संभाषण लक्षपूर्वक ऐकून त्याआधारे आई आणि मुलगा यांचे एकमत आहे की मतभेद आहेत ते ओळखून योग्य पर्यायासमोर बरोबरची खूण (✓) करा.**

| क्र. | विधाने | एकमत | मतभेद |
|---|---|---|---|
| १. | आंघोळ केल्यावर ताजेतवाने वाटते. | | |
| २. | मासिक पाळी असताना देवाजवळ दिवा लावू नये. | | |
| ३. | बाहेरून आल्यावर हातपाय न धुतल्याने शिवाशिव होते, पावित्र्य राहत नाही. | | |
| ४. | मासिक पाळीदरम्यान स्त्रीची शारीरिक स्थिती नाजूक असते म्हणून पूर्वी तिला विश्रांती दिली जाई. | | |
| ५. | पोटाला आराम म्हणून आठवड्यातून एकदा उपवास करायला हवा. | | |

भाग ३

**कालावधी : २५ मिनिटे** **(गुण १०)**

**जागतिक हवामान दिनानिमित्त पर्यावरण अभ्यासक प्रणाली राऊत ह्यांची मुलाखत तुम्ही ऐकणार आहात. हे संभाषण लक्षपूर्वक ऐकून विचारलेल्या प्रश्नांसाठी उत्तराचा योग्य पर्याय निवडा.**

१. संभाव्य परिस्थितीचा अंदाज घेऊन आपल्याला आपत्कालीन उपाययोजनांसाठी तयार राहिले पाहिजे कारण ...
   अ. जागतिक हवामानदिनानिमित्त काही तरी केले पाहिजे.
   आ. हवामान बदलांमुळे जागतिक वातावरणात असमतोल निर्माण झाला आहे.
   इ. महाराष्ट्रातील हवामानासाठी जीवनशैलीत बदल केले पाहिजेत.

२. पुढीलपैकी कोणते वाक्य बरोबर आहे?
   अ) भूकवच, जलावरण, वातावरण, वायूंचे प्रमाण ह्या सर्वांचा समतोल ह्यातून निर्माण झालेला घटक म्हणजे हवामान.
   आ) जीवसृष्टीच्या निर्मितीतून हवामान तयार झाले.
   इ) भूकवच, जलतरण, वातावरण, वायूंचे प्रमाण ह्या सर्वांचा समतोल ह्यातून निर्माण झालेला घटक म्हणजे हवामान.

३. उत्खनन म्हणजे ---------

अ) उठणे

आ) खोदकाम

इ) इंधन तयार करणे

४. राऊत यांनी हवामानबदलाचे मुख्य कारण कोणते सांगितले?

अ) मोठ्या प्रमाणावर कार्बन डायऑक्साईडची निर्मिती

आ) नद्यांचे प्रदूषण

इ) लोकसंख्या वाढ

५. वादळ, बर्फवृष्टी, अवर्षण, पर्जन्यवृष्टी, अवकाळी पाऊस या कारणांनी ...

अ) तापमान कमी होते.

आ) कार्बन डायऑक्साईडची निर्मिती होते.

इ) अन्नउत्पादन कमी होते.

६. दि. २३ मार्च हा जागतिक हवामान दिन म्हणून का निवडला आहे?

अ) जागतिक हवामान संघटनेची स्थापना

ब) जागतिक हवामान संघटनेचा अहवाल जाहीर

क) हवामान तज्ज्ञांची जागतिक परिषद आयोजित

७. हवामान बदलामुळे जीवसृष्टीवर कोणते थेट परिणाम होतील?

अ) अन्नधान्य तुटवडा, विषाणू प्रादुर्भाव

ब) तापमान घट

क) जीवसृष्टीची वृद्धी

८. सद्य काळात किती प्रमाणात तापमानवाढ सुरू आहे.

अ) दरवर्षी १ अंश सेंटिग्रेड

आ) दर चार-पाच वर्षांत १ अंश सेंटिग्रेड

इ) दर शंभर वर्षांत १ अंश सेंटिग्रेड

९. पुढीलपैकी चुकीचे विधान कोणते?

अ) १ टन सिमेंटनिर्मितीतून अर्धा टन कार्बन डायऑक्साईड निर्माण होतो.

आ) १५ लाख टन कोळशापासून वीजनिर्मिती करताना २४ लाख टन कार्बन डायऑक्साईड निर्माण होतो.

इ) कार्बन डायऑक्साईडच्या निर्मितीमध्ये वाहतुकीचा वाटा ७५ टक्के आहे.

१०. कार्बन डायऑक्साईडचे गुणधर्म कोणते?

अ) हलका आणि थंड

ब) हलका आणि उष्ण

क) जड आणि उष्ण

## लेखन

**एकूण कालावधी : ८० मिनिटे** **एकूण गुण ४०**

लेखन ह्या विभागात दोन भाग आहेत

**भाग १**

**कालावधी : २० मिनिटे** **(गुण २०)**

**खालील उतारा वाचा. डाव्या रकान्यात मजकुरातील काही विशिष्ट शब्दांवर खुणा केलेल्या आहेत. उजव्या बाजूच्या रकान्यात दिलेले शब्दप्रयोग काहीही बदल न करता वापरून उतारा पुन्हा लिहा. रकान्यातील शब्दप्रयोग वापरताना आवश्यकतेनुसार वाक्याची पुनर्रचना करा. अशा रीतीने तयार केलेला नवीन उतारा उत्तरपत्रिकेत लिहा. उदाहरणादाखल (०) पुनर्रचना केलेले एक वाक्य खाली दिले आहे.**

विषय : कुष्ठरोग असाध्य नाही.

उदा॰ (०) औषधोपचारांमुळे त्यावर पूर्णतः मात करता येते.

| | |
|---|---|
| कुष्ठरोग हा स्पर्शाने पसरणारा आजार नसून सध्याच्या बहुविध औषधोपचारांमुळे तो पूर्णत: (०) बरा होतो. त्यामुळे समाजाचा ह्या आजाराकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक होत आहे. त्यामुळेच कुष्ठवसाहतीत दाखल करण्यापेक्षा घरातच राहून रुग्णावर उपचार आणि त्याचे पुनर्वसन करण्याकडे (१) कल दिसून येत आहे. मुंबईतील कुष्ठरुग्णांच्या कुटुंबांचे सामान्य कुटुंबांशी रोटी-बेटी व्यवहार वाढले असून हा बदल निश्चितच स्वागतार्ह आहे. ह्या आजाराचे उच्चाटन करण्यासाठी त्याची योग्य माहिती समजून घेणे, ती इतरांना देणे आणि गैरसमज, भीती दूर करणे (२) गरजेचे आहे. कुष्ठरोग हा मायक्रोबॅक्टेरिअम लेप्री ह्या जंतूमुळे होणारा सांसर्गिक आजार आहे. कुष्ठरोगाची (३) सांसर्गिकता ही शरीरातील कुष्ठजंतूंच्या प्रमाणावर अवलंबून असते; दृश्य स्वरूपातील विकृतीवर किंवा विद्रूपतेवर नाही. कुष्ठरोग हा महारोग नसून स्पर्शाने मुळीच (४) पसरत नाही. केवळ औषधोपचार न घेतलेल्या कुष्ठरुग्णांकडूनच हवेमार्फत या रोगाच्या जंतूंचा (५) प्रसार होतो. कुष्ठजंतूंचा हवेमार्फत शरीरात प्रवेश झाल्यानंतर साधारणत: तीन ते पाच वर्षांनंतर प्राथमिक लक्षणे शरीरावर दिसायला लागतात. कुष्ठरोगाचे जंतू मुख्यत्वे चेतातंतू आणि त्वचा यांवर (६) आघात करतात. कुष्ठरोग हा आजार आनुवंशिक नाही. पाप-पुण्य याचाही त्याच्याशी कोणताही संबंध नाही. नवस फेडणे, मंत्र-तंत्र वा जडीबुटी हा या आजारावरील (७) उपाय नाही. वास्तविक कुष्ठरोगाविरुद्धच्या नैसर्गिक रोगप्रतिकारक शक्तीमुळे ९८ टक्के लोकांना तो होणे (८) अशक्यच आहे. | **(०) मात करणे**<br><br>(१) प्रवृत्ती वाढीला लागणे<br><br>(२) आवश्यकता असणे<br><br>(३) संक्रमण होण्याची शक्यता<br>(४) संसर्ग होणे<br><br>(५) लागण होणे<br><br>(६) घातक परिणाम दिसून येणे<br><br>(७) तोडगा नसणे<br>(८) तिळमात्र शक्यता नसणे<br><br>(९) सर्वसाधारण समजूत असणे<br>(१०) आटोक्यात आणणे |

| | |
|---|---|
| १९४८पर्यंत ह्या आजारावर प्रभावी औषध उपलब्ध नव्हते, त्यामुळे हा एक असाध्य रोग (९) समजण्यात येत होता. १९८०मध्ये बहुविध औषधोपचार (मल्टी ड्रग) पद्धती विकसित झाल्याने हा आजार (१०) नियंत्रणात आणणे शक्य झाले. | |

**भाग २**

**कालावधी : ६० मिनिटे** **(गुण २०)**

**खालील चार विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर तुमचे विचार व्यक्त करा. (शब्दमर्यादा : ३५०)**
गुण देताना खालील बाबींचा विचार केला जाईल :

- दिलेल्या विषयाचा सर्वंकष विचार करून तुम्ही त्याला न्याय दिला आहे का?
- तुम्ही तुमच्या मताबाबत योग्य युक्तिवाद केला आहे का व पुष्टीदाखल योग्य उदाहरणे दिली आहेत का?
- तुमचे लेखन विषयाशी सुसंगत आहे का व तुम्ही साऱ्या मुद्द्यांची योग्य मांडणी केली आहे का?
- तुमची शब्दयोजना आणि लेखनशैली विषयानुरूप आहे का?

**विषय १ : शहरातील वाहतुकीच्या समस्या आणि सार्वजनिक वाहतुकीचे सुलभीकरण**
ह्या विषयावर एका वृत्तपत्रातील 'जनमानस' ह्या सदरासाठी वाचक म्हणून तुम्हाला एक पत्र लिहायचे आहे. ह्या विषयावर लेखन करण्यासाठी तुम्ही खालील तीन मुद्द्यांचा आधार घेऊ शकता व तुमचे मत मांडू शकता.

| |
|---|
| • वैयक्तिक वाहन वापरणे सोयीचे ठरते, पण त्यामुळे वाहतूक कोंडी वाढते. पार्किंगसाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने कशाही, कुठेही गाड्या उभ्या केल्या जातात. |
| • रिक्षावाल्यांच्या बेशिस्त वर्तनामुळे व मनमानीमुळे सर्वसामान्यांना मनस्ताप होतो. बसेस अनियमित असतात आणि लोकल ट्रेन्स भरून वाहतात. |
| • स्मार्ट शहर म्हणताना पादचाऱ्यांना रस्त्याने सुरक्षित चालण्याचीही सोय आपल्याकडे नाही. |

**विषय २ : २०२०मध्ये जाहीर झालेले नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण**
देशात तब्बल ३४ वर्षांनंतर नवे शिक्षण धोरण जाहीर करण्यात आले आहे. या नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाबद्दल दूरदर्शनवर एक चर्चा झाली. त्या चर्चेनंतर प्रेक्षकांना मतप्रदर्शन करण्याची संधी देण्यात आली आहे. तुम्ही दूरदर्शन संचालक मंडळाला ह्याबाबत एक सविस्तर ईमेल लिहा. त्यासाठी खालील मुद्द्यांचा आधार घ्या.

| | |
|---|---|
| १. | आंतरशाखीय शिक्षणावर व संशोधनावर भर अशा स्वागतार्ह शिफारशी |
| २. | शिक्षकांनी केवळ शिकविण्याऐवजी शिक्षणाचे नेतृत्व, व्यवस्थापन आणि नियोजन करावे अशी योजना |
| ३. | शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीतील आव्हाने |

**विषय ३ : पुस्तकाचे अंतरंग**

एका मासिकासाठी तुम्ही साहित्यविषयक ब्लॉग लिहीत आहात. 'अनवट - शब्द सूर डोंगरवाटा' ह्या मिलिंद गुणाजी यांच्या भटकंतीविषयक पुस्तकात उल्लेख केलेल्या विविध डोंगरवाटांतील निसर्गवर्णनाबद्दल एक टिपण लिहा. त्यासाठी खालील मुद्द्यांचा आधार घ्या.

- पुस्तकाच्या अंतरंगाचा गोषवारा द्या.
- पुस्तकात उल्लेखिलेली भटकंतीची स्थळे कोणती? त्यातील निसर्गाच्या प्रतिमा लेखकाने कशा मांडल्या आहेत हे सांगा.
- पुस्तकातील शब्दसौंदर्याची काही उदाहरणे द्या.

**विषय ४ : पुस्तक परीक्षण**

पुस्तक : प्रकाशवाटा

एका साहित्यविषयक व्यासपीठासाठी 'प्रेरणादायी पुस्तके' ह्या सदरांतर्गत तुम्ही लेख लिहिणार आहात. 'प्रकाशवाटा' ह्या डॉ॰ प्रकाश आमटे यांच्या आत्मचरित्राचे सुमारे ३५० शब्दांत परीक्षण लिहा. त्यासाठी खालील मुद्द्यांचा आधार घ्या.

- ह्या आत्मचरित्राचे टप्पे कोणते? कुठला कालपट ह्या पुस्तकात सादर केलेला आहे?
- ह्या पुस्तकातील महत्त्वाच्या व्यक्तिरेखा कोणत्या? या पुस्तकाला कोणती पार्श्वभूमी आहे?
- पुस्तक युवापिढीसाठी प्रेरणादायी आहे का?

## संभाषण

**एकूण कालावधी : २० मिनिटे**

**एकूण गुण ५०**

यात प्रत्येकी दहा मिनिटांचे दोन भाग असतील.

**भाग १ : सादरीकरण**

**कालावधी : १० मिनिटे** **(गुण २५)**

**दिलेल्या दोन विषयांपैकी एका विषयावर तुम्हाला सुमारे पाच मिनिटे सादरीकरण करायचे आहे. त्यानंतर पाच मिनिटे प्रश्नोत्तरे होतील. खालील दोन विषयांपैकी एक विषय निवडा. सादरीकरण करताना पुढील बाबींकडे विशेष लक्ष द्या.**

- सादरीकरणाच्या उताऱ्याची उचित मांडणी करा.
- प्रमाणभाषा, म्हणी, वाक्प्रचार आणि वैशिष्ट्यपूर्ण शब्दयोजना वापरा.
- तुमचा स्वतःचा दृष्टिकोन स्पष्टपणे मांडा.

**विषय १ : वृक्षांचे महत्त्व**

'वृक्षांचे महत्त्व' ह्या विषयावरील चर्चासत्रात तुम्ही सहभागी होणार आहात. त्यात तुम्हाला पाच मिनिटे सादरीकरण करायचे आहे आणि त्यानंतर प्रश्नोत्तरे होतील. ह्या विषयावर मुद्दे तयार करा. योग्य ती उदाहरणे द्या. त्यासाठी तुम्ही पुढील मुद्द्यांचा आधार घेऊ शकता.

- माणसाच्या तिन्ही मूलभूत गरजा पुरवणारं निसर्गाचं देणं म्हणजे वृक्ष
- पर्यावरण संरक्षणासाठी वृक्ष
- सण, उत्सव आदींमधून उलगडणारं संस्कृतीचं वृक्षांशी नातं

**विषय २ : साहित्य : समाजजीवनाचा आरसा**

'साहित्य : समाजजीवनाचा आरसा' ह्या विषयावरील चर्चासत्रात तुम्ही सहभागी होणार आहात. त्यात तुम्हाला पाच मिनिटे सादरीकरण करायचे आहे आणि त्यानंतर प्रश्नोत्तरे होतील. ह्या विषयावर मुद्देसूद उतारा तयार करा. योग्य ती उदाहरणे द्या. त्यासाठी तुम्ही पुढील मुद्द्यांचा आधार घेऊ शकता.

- साहित्याच्या माध्यमातून जीवनाचा खरा अर्थ उलगडतो.
- साहित्य ही अर्थपूर्ण सामाजिक कृती आहे.
- साहित्य हे नव्या बदलांचा आरंभबिंदू ठरत आधुनिक जग निर्माण करू शकते.

**भाग २ : चर्चा**

**कालावधी : १० मिनिटे** **(गुण २५)**

**दिलेल्या विषयावर परीक्षकांबरोबर सुमारे १० मिनिटे चर्चा करा.**

**दोन्ही भागांच्या पूर्वतयारीसाठी तुमच्याकडे एकूण १५ मिनिटे वेळ असेल. परीक्षेदरम्यान तुम्हाला उत्स्फूर्तपणे बोलायचे आहे. परीक्षेदरम्यान व पूर्वतयारीसाठी तुम्हाला कुठलेही मुद्रित साहित्य, शब्दकोश अथवा भ्रमणध्वनी वापरायची परवानगी नाही. खालील दोन विषयांतील एक विषय निवडा. निवडलेल्या विषयाची एक बाजू घेऊन तुम्हाला परीक्षकांबरोबर त्या विषयावर चर्चा करायची आहे. चर्चेचा अनुक्रम खालीलप्रमाणे असावा :**

- तुमचे मत मांडा व योग्य उदाहरणे द्या.
- तुमच्या विरोधी बाजूच्या विधानांचा परामर्श घ्या.
- तुमच्या विरोधात बाजू मांडणाऱ्याला तुमची बाजू पटवून देण्याचा यथायोग्य प्रयत्न करा.

**विषय १ : मातृभाषेतून शिक्षण आवश्यक**

खालीलपैकी समर्थन करणाऱ्या किंवा विरोध दर्शविणाऱ्या बाजूची निवड करून तुम्ही निवडलेल्या बाजूने चर्चा करा.

| समर्थन करणारी बाजू | विरोध दर्शविणारी बाजू |
|---|---|
| • मातृभाषेतून शिक्षण ही नैसर्गिक गोष्ट आहे.<br>• आपली विचारप्रक्रिया मातृभाषेतून होते.<br>• उच्च दर्जाचे, मुलांना सहज आत्मसात होणारे, जीवनोपयोगी आणि कमी खर्चात मिळणारे शिक्षण<br>• त्यासाठी कौटुंबिक-सामाजिक वातावरण पूरक असते | • इंग्लिश ही वैश्विक ज्ञानभाषा आहे.<br>• अधिकाधिक ग्रंथसामग्री त्याच भाषेत आहे, त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावरचे शिक्षणाचे व्यासपीठ खुले होते.<br>• इंग्लिश भाषेत संवाद साधता आला की मनात न्यूनगंड राहात नाही.<br>• नोकरीच्या अधिक संधी उपलब्ध होतात. |

**विषय २ : एकत्र कुटुंबपद्धती**

खालीलपैकी समर्थन करणाऱ्या किंवा विरोध दर्शविणाऱ्या बाजूची निवड करून तुम्ही निवडलेल्या बाजूने चर्चा करा.

| समर्थन करणारी बाजू | विरोध दर्शविणारी बाजू |
|---|---|
| • वडीलधाऱ्या माणसांचे मार्गदर्शन<br>• कौटुंबिक नात्यांतील जिव्हाळा व भावनिक आधार<br>• मुलाबाळांसाठी संस्कारी व पोषक वातावरण<br>• खर्चाची विभागणी<br>• मनुष्यबळ | • तरुण पिढीची कुचंबणा<br>• कामाची असमान वाटणी<br>• कौटुंबिक राजकारणामुळे मानसिक त्रास<br>• आर्थिक असमानता<br>• प्रत्येकाला स्वतःचा अवकाश न मिळाल्याने अपुरेपणाची भावना |

# ऋणनिर्देश


अभिजित रणदिवे
अमित वरंडेकर
अद्वैत जोशी
अनिल गोहिल
अंजली भागवत
अन्वया सरदेसाई
आनंद काटीकर
आशिष सावंत
कलिका मेहता
गुरूदत्त कामत
जयश्री हरि जोशी
ज्योती नारळकर
तारा गोपीनाथ
निष्का प्रधान
नेहा ठोंबरे
प्रज्ञा दळवी
प्रियंका काटकर
मधुरा गावंडे
मयुरेश नारळकर
मोहन आगाशे
वर्षा माने
विजया देव
वैशाली करमरकर
श्वेता रेडेकर
सुनंदा महाजन
सुपर्णा कुलकर्णी
संकेत देशपांडे

पु. ल. देशपांडे-नीलिमा गुंडी-द. दि. पुंडे-प्र.ना.परांजपे-गजेंद्र देवडा-अविनाश बिनीवाले-इंदिरा संत, वीणा संत-चेतन एरंडे, प्रीती एरंडे-मारुती चितमपल्ली-बा. भ. बोरकर-सुचेता कडेठाणकर-भीमसेन जोशी-वसंत काळपांडे-कौशल इनामदार-ए. आर. रहमान, वंदना अत्रे-सुहास कुलकर्णी-मिलिंद चंपानेरकर-अच्युत गोडबोले-माधवी ठाकूरदेसाई-अरविंद वैद्य-मृदुला बेळे-मो. रा. वाळंबे-मधुकर केशव ढवळीकर-शांता शेळके-सुनीता देशपांडे-वैशाली करमरकर-महेश एलकुंचवार-माधवराव चितळे-श्री. बा. जोशी-प्रकाश गोळे-माधव आचवल-पु. श्री. लेले-दिलीप कुलकर्णी-गुरू ठाकूर-अतुल देऊळगावकर-व्यंकटेश माडगूळकर-दुर्गा भागवत-रेखा इनामदार साने-कुसुमाग्रज-निपुण धर्माधिकारी-महेश एलकुंचवार-विजया मेहता-दिवाकर-चैतन्य कुंटे-वा. गो. आपटे-सुहास लिमये-सतीश आळेकर-सुहास किर्लोस्कर-विंदा करंदीकर-स्वाती चंदगडकर-सुमन वाडये-सुहास बहुळकर-विशाल वाडये-शैलजा शेवडे-अरुणा ढेरे-ग. प्र. प्रधान-श्रीनिवास कुलकर्णी-गुरुनाथ धुरी-गौरी देशपांडे-जी. ए. कुलकर्णी-द. ग. गोडसे-अरुण टिकेकर,मनीषा टिकेकर-प्रभाकर पेंढारकर-माधव गडकरी-मेघना पेठे-अंबरीश मिश्र-नरेंद्र जाधव-निखिलेश चित्रे-मनमोहन-शंकर वैद्य-सतीश सोळांकूरकर-कृष्णमेघ कुंटे-अंजली जोशी-हेरंब कुलकर्णी- दिनेश गुणे-नीलांबरी जोशी-अमोल उदगीरकर-शरद तांदळे-मधुगंधा कुलकर्णी-आनंद नाडकर्णी-रेणू दांडेकर-समीरण वाळवेकर-रघुनाथ माशेलकर-किरण पुरंदरे-संदीप खरे-भास्कर चंदावरकर-श्रीराम लागू- सुधीर गाडगीळ-गिरीश कुबेर-राहुल देशपांडे-किशोरी आमोणकर-शशि व्यास-अभिजित घोरपडे-जीवनप्रकाश कुलकर्णी-रामचंद्र तिवारी-सुधीर फडके-जितेंद्र अभिषेकी-अशोक केळकर-चिन्मय धारूरकर-प्रवीण दवणे-विठ्ठल कामत-अनघा मोडक-उपेंद्र लिमये-रोहित नरवडे-लोकसत्ता-साप्ताहिक सकाळ-मुंबई तरुण भारत-लोकमत-विवेकानंद चित्रकला महाविद्यालय-लोकमान्य सेवा संघ-आयुका-मराठी विज्ञान परिषद-राजहंस प्रकाशन-रोहन प्रकाशन-मौज प्रकाशन-अभिजित प्रकाशन-पद्मगंधा प्रकाशन-पॉप्युलर प्रकाशन-मॅजेस्टिक प्रकाशन-प्रसाद प्रकाशन-नितीन प्रकाशन-साधना प्रकाशन-उन्मेष प्रकाशन-प्रफुल्लता प्रकाशन-मेहता पब्लिशिंग हाउस-लोकवाङ्मय गृह-परचुरे प्रकाशन-कॉन्टिनेन्टल प्रकाशन-सुमंगल सांस्कृतिक प्रकाशन-मैत्रेय प्रकाशन-ज्योत्स्ना प्रकाशन-सुरेश एजन्सी-महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन-चंद्रकला प्रकाशन-परंधाम प्रकाशन-रामकृष्ण मठ प्रकाशन-वरदा प्रकाशन-साहित्य प्रसार केंद्र-मराठी अभ्यास परिषद-रसिक आंतरभारती प्रकाशन-हिंदुस्थान प्रकाशन संस्था-आकाशवाणी सोलापूर

# संदर्भसूची


| | |
|---|---|
| खाणे : एक भाषिक व्यवहार | नीलिमा गुंडी, *खाणे : एक भाषिक व्यवहार*, भाषाभान, उन्मेष प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली २००८ |
| भाषेतील बदल | प्र.ना. परांजपे, *जीवनाला आकार देणारी भाषा*, भाषेतून भाषेकडे भाषांतराकडे..., प्रफुल्लता प्रकाशन, पुणे २०१७ |
| एक एक जे अक्षर | द. दि. पुंडे, *एक एक जे अक्षर नवे तू शिकसी*, भयंकर सुंदर मराठी भाषा, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, आवृत्ती तिसरी २००८ |
| पेपर (कविता) | इंदिरा संत, *पेपर*, बाहुल्या, मौज प्रकाशन गृह, मुंबई, आवृत्ती दुसरी १९८५ |
| होम स्कूलिंग | चेतन एरंडे, प्रीती एरंडे, *'होम स्कूलिंग' मुलांचं 'शाळाबाह्य' शिक्षण*, लोकसत्ता, १८ जुलै, २०२० चतुरंग पुरवणी, २०२० |
| पक्षी जाय दिगंतरा | मारुती चितमपल्ली, *पक्षी जाय दिगंतरा*, पक्षी जाय दिगंतरा, प्रकाशक : भा. ल. कुलकर्णी, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर १२, आवृत्ती दुसरी १९८९ |
| रूपकळा (कविता) | बा. भ. बोरकर, *रूपकळा*, मौज दिवाळी अंक १९७७ |
| गोबीकन्या सुचेता | सुचेता कडेठाणकर यांची मुलाखत, शब्दांकन : वंदना अत्रे, *गोबीकन्या* वेचक वेधक, रसिक आन्तरभारती प्रकाशन, पुणे. आवृत्ती पहिली २०१७ |
| राष्ट्रीय शैक्षणिक धोरण | वसंत काळपांडे, *आता वेध अंमलबजावणीचे*, दै. सकाळ ९ ऑगस्ट २०२० |
| दशक'क्रिया | अग्रलेख, *'दशक'क्रिया'*, लोकसत्ता १ जानेवारी २०२० |
| गणित | अच्युत गोडबोले, माधवी ठाकूरदेसाई, *प्रास्ताविक*, गणित, मनोविकास प्रकाशन, पुणे |
| काळभान | वैशाली करमरकर, *आदिप्रेरणांचे झरोके*, संस्कृतिरंग, राजहंस प्रकाशन पुणे, आवृत्ती दुसरी, २०१३ |
| ऋतुहीन (कविता) | गुरू ठाकूर, *ऋतुहीन*, साप्ताहिक सकाळ दिवाळी अंक २०१९ |
| काझिरंगा | व्यंकटेश माडगूळकर, *काझिरंगा आणि मानस*, जंगलांतील दिवस, मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे, आवृत्ती सहावी २०१५ |
| मोहक मार्तंड | *मोहक मार्तंड*, अग्रलेख, लोकसत्ता १९ ऑगस्ट २०२० |
| एका गायकाचे फेसबुक लाईव्ह | सुहास किर्लोस्कर, *एका गायकाचे फेसबुक लाईव्ह*, फेसबुक |
| आयुष्याची मौल्यवान माती | सुहास बहुळकर, *शिल्पकार करमरकर*, आयुष्याची मौल्यवान माती, राजहंस प्रकाशन, पुणे, २०१५ |
| म्हणींची लज्जत | शैलजा शेवडे, *म्हणींची लज्जत*, व्हॉट्सॲप वरून |
| मनातल्या उन्हात | श्रीनिवास कुलकर्णी, *मनातल्या उन्हात*, डोह, मौज प्रकाशन, मुंबई, आवृत्ती चौथी १९८९ |
| दगडांचे सौंदर्य | बा. भ. बोरकर, चांदण्याचे कवडसे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९८२ |
| शुभ्र काही जीवघेणे | अंबरीश मिश्र, *शुभ्र काही जीवघेणे पुस्तकाचे पाठपृष्ठ*, शुभ्र काही जीवघेणे, राजहंस प्रकाशन |
| फिनिक्सच्या राखेतून उठलाय मोर | निखिलेश चित्रे, *पुस्तकाची प्रस्तावना*, फिनिक्सच्या राखेतून उठलाय मोर, लोकवाङ्मय गृह, पुणे |
| स्मरणी | मनमोहन, *स्मरणी*, आदित्य, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७१ |
| कुरुंदकर आणि मी | हेरंब कुलकर्णी, *नरहर कुरुंदकरांकडे पाहिल्यावर स्वत:चे खुजेपण अधिकच तीव्रतेने जाणवते*, अक्षरनामा मराठी ऑनलाईन फीचर्स |
| भाषा आणि भाषेची लवचीकता | पु. ल. देशपांडे, *द्वितीय जागतिक मराठी परिषद, मॉरिशस, येथे केलेले अध्यक्षीय भाषण (२६-४-१९९१)*, मित्रहो! संपादिका: शांता शेळके, परचुरे प्रकाशन, मुंबई, आवृत्ती चौथी २०१३ |

| | |
|---|---|
| समाजमाध्यमे | गजेंद्र देवडा, *समाज माध्यमे : प्रभाव आणि उणिवा*, मुंबई तरुण भारत, ९ एप्रिल २०१८ |
| आदेश | अविनाश बिनीवाले, *आदेश*, बोलू कवतिकें, राजहंस प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, २००५ |
| जिद्द | भीमसेन जोशी, *जिद्द*, निवडक कालनिर्णय, सुमंगल सांस्कृतिक प्रकाशन, आवृत्ती चौथी. २०१० |
| चित्र'कथा | कौशल इनामदार, *चित्तरकथा १*, क्षितीज जसे दिसते, मैत्रेय प्रकाशन, मुंबई, आवृत्ती पहिली, २०१२ |
| संगीत व तंत्रज्ञान | ए. आर. रहमान मुलाखत: वंदना अत्रे, *गिन गिन तारे मैने उंगली जलायी है...*, लोकमत दीपोत्सव दिवाळी अंक २०१९ |
| भारतीय वैज्ञानिक व त्यांचे शोध | सुहास कुलकर्णी, मिलिंद चंपानेरकर (संपादित), *विज्ञान - संशोधन*, यांनी घडवलं सहस्रक, रोहन प्रकाशन, पुणे २००६ |
| डॉ. कमला सोहोनी | अरविंद वैद्य, *आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पहिल्या भारतीय महिला शास्त्रज्ञ डॉ. कमला सोहोनी*, प्रज्ञावंत भारतीय १, रोहन प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली २०१७ |
| बौद्धिक संपदा | मृदुला बेळे, *ज्ञानफळांच्या राखणीसाठी व पेटंट*, कथा अकलेच्या कायद्याची, राजहंस प्रकाशन, पुणे २०१७ |
| पैठणी (कविता) | शांता शेळके, *पैठणी*, गोंदण. अभिजित प्रकाशन १९७५ |
| सोबत | सुनीता देशपांडे, आहे मनोहर तरी, मौज प्रकाशन गृह, मुंबई |
| वाडा | महेश एलकुंचवार, *गहकुटं विसंगितं*, वाचू आनंदे – संपादक माधुरी पुरंदरे, ज्योत्स्ना प्रकाशन, पुणे |
| काळ - एक कल्पना | श्री. बा. जोशी, *निमित्त १८ जूनचे*, उत्तम मध्यम. श्री. बा. जोशी. पद्मगंधा प्रकाशन, आवृत्ती पहिली २०१० |
| पिलू | प्रकाश गोळे, *पिलू*, निसर्ग आणि माणूस, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे |
| प्रकाश | माधव आचवल, *प्रकाशाचे संगीत*, किमया, मौज प्रकाशन गृह, मुंबई |
| प्रकाश निराळ्या दृष्टिकोनातून | पु. श्री. लेले, *प्रकाश - निराळ्या दृष्टिकोनातून*, प्रकाश, प्रसाद प्रकाशन, पुणे |
| आंतरिक पर्यावरणाची हानी | दिलीप कुलकर्णी, *ऊर्जा : वर्तमानाची ऐतिहासिक पार्श्वभूमी*, ऊर्जा-संयम, राजहंस प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली २०१४ |
| कर्ब उत्सर्जन कसे कमी करायचे? | अतुल देऊळगावकर, *ॲडल्टस् आर शिटींग ऑन अवर फ्युचर!*, लोकमत दीपोत्सव दिवाळी अंक २०१९. |
| गोठवलेलं दूध | दिलीप कुलकर्णी, *गोठवलेलं दूध*, दैनंदिन पर्यावरण, राजहंस प्रकाशन, पुणे, आवृत्ती दुसरी १९९५ |
| बचत : साबणाची आणि पाण्याची | दिलीप कुलकर्णी, *बचत : साबणाची आणि पाण्याची*, दैनंदिन पर्यावरण, राजहंस प्रकाशन, पुणे, आवृत्ती दुसरी १९९५ |
| सहभोजन | दिलीप कुलकर्णी, *सहभोजन*, दैनंदिन पर्यावरण, राजहंस प्रकाशन, पुणे, आवृत्ती दुसरी १९९५ |
| नाटक | पु. ल. देशपांडे, *नाटक*, एक शून्य मी, मौज प्रकाशन गृह मुंबई, आवृत्ती बारावी २०१३ |
| नट, नाटक आणि नाटककार | महेश एलकुंचवार, *सहा. २८ ऑक्टोबर २०१२. अनंत भालेराव स्मृती पुरस्कार स्वीकारताना. औरंगाबाद*, सप्तक, राजहंस प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली २०१४ |
| तालमीला सुरुवात | विजया मेहता, *बेबीचं जग*, झिम्मा : आठवणींचा गोफ, राजहंस प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली २०१२ |
| किलबिललेले उजाडताना (कविता) | विंदा करंदीकर, *किलबिललेले उजाडताना*, धृपद, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, आवृत्ती पहिली १९५९ चौथे पुनर्मुद्रण २००७ |
| हिराबाई | पु. ल. देशपांडे, *हिराबाई*, गणगोत, मौज प्रकाशन गृह, गिरगाव, मुंबई |

| | |
|---|---|
| जाई-जुई | अरुणा ढेरे, *जाई-जुई*, रूपोत्सव, सुरेश एजन्सी, पुणे, १९८८ |
| आई | गुरुनाथ धुरी, *गंधे कोंदाटले जग*, आदिकाळोख. मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई |
| बाप आणि लेक | गौरी देशपांडे, *हिशेब*, बापलेकी, मौज प्रकाशन गृह मुंबई, आवृत्ती तिसरी २००५ |
| लग्न | जी. ए. कुलकर्णी, *लग्न*, कुसुमगुंजा, परचुरे प्रकाशन |
| माझा पहिला गुरू | द. ग. गोडसे, *माझा पाचवा गुरू*, नांगी असलेले फुलपाखरू, पॉप्युलर प्रकाशन, आवृत्ती पहिली १९८९ |
| ग्रंथशोध | अरुण टिकेकर, *ग्रंथशोध*, अक्षरनिष्ठांची मांदियाळी, रोहन प्रकाशन, आवृत्ती तिसरी २०१२ |
| चक्रीवादळ | प्रभाकर पेंढारकर, चक्रीवादळ, मौज प्रकाशन गृह, गिरगाव, मुंबई. |
| सुवर्णयुगाचे महावस्त्र - पैठणी | माधव गडकरी, *सुवर्णयुगाचे महावस्त्र, ऐश्वर्याचे प्रतीक - पैठणी*, असा हा महाराष्ट्र (भाग पहिला) मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई १९८८ |
| महाराष्ट्राचा चिंतामणी | नरेंद्र जाधव, *महाराष्ट्राचा चिंतामणी*, लोकसत्तातर्फे प्रकाशित महाराष्ट्राचा चिंतामणी या अंकातून |
| शिक्षणाचे तत्त्वज्ञान | शिक्षण. स्वामी विवेकानंद. रामकृष्ण मठ प्रकाशन, धंतोली, नागपूर,आवृत्ती पंधरावी २०१३ |
| महात्मा गांधींचे शिक्षण विचार | महात्मा गांधी, गांधी विचार दर्शन : शिक्षण विचार, अकोलकर ग. वि. महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन, पुणे १९९४ |
| शिक्षकाचा खरा धर्म कोणता? | जे. कृष्णमूर्ती, *शिक्षकाचा खरा धर्म कोणता?*, जीवनभाष्ये खंड दुसरा अनुवाद : विमलाबाई देशपांडे, चंद्रकला प्रकाशन, पुणे, आवृत्ती तिसरी २०१३ |
| शिक्षण विचार | आचार्य विनोबा भावे, *शिक्षण विचार*. विनोबा भावे. परंधाम प्रकाशन. पवनार, वर्धा, आवृत्ती नववी २००० |
| औदुंबर | मो. रा. वाळंबे, *औदुंबर*, सुगम मराठी व्याकरण व लेखन, नितीन प्रकाशन, पुणे, आवृत्ती चौपन्नावी २०१९ |
| पुरातत्त्वाची वाटचाल | मधुकर केशव ढवळीकर, *परिशिष्ट पुरातत्त्वाची वाटचाल*, भारताची कुळकथा, राजहंस प्रकाशन, पुणे, आवृत्ती दुसरी २०१८ |
| निसर्ग आणि उत्सव | माधवराव चितळे, *जलसंस्कृतीची भारतीयता*, मराठी अभ्यास परिषदेचे त्रैमासिक भाषा आणि जीवन, वर्ष ३७, अंक ४, दिवाळी २०१९ |
| सांस्कृतिक पर्यावरण | मधुकर केशव ढवळीकर, *सांस्कृतिक पर्यावरण*, भारताची कुळकथा, राजहंस प्रकाशन पुणे, आवृत्ती दुसरी २०१८ |
| मुंबईत वसंतागम | दुर्गा भागवत, *मुंबईत वसंतागम*, भावसंचित, दुर्गा भागवत, शब्द पब्लिकेशन. बोरिवली मुंबई, २०१५ |
| वाक्प्रचारांच्या गोष्टी | वा. गो. आपटे, मराठी भाषेचे संप्रदाय व म्हणी, वरदा प्रकाशन, आवृत्ती चौथी २०१६ |
| श्रीराम लागू यांची सुधीर गाडगीळ यांनी घेतलेली मुलाखत | *ध्वनिफीत*, आकाशवाणी सोलापूर यांच्या संग्रहातून |
| स्वर्गातील आत्मे | दिवाकर (शंकर काशिनाथ गर्गे), *स्वर्गातील आत्मे*, दिवाकरांच्या नाट्यछटा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे |
| महाराष्ट्रातील संगीत महोत्सव | चैतन्य कुंटे, *प्रस्तावना*, शिल्पकार चरित्रकोश (चित्रपट- संगीत खंड ७, भाग २) संपादक : चैतन्य कुंटे, माधव इमारते. साप्ताहिक विवेक. (हिंदुस्थान प्रकाशन संस्था), मुंबई, आवृत्ती पहिली २०१४ |
| रेषेचे लाघव | शांता शेळके, *रेषेचे लाघव*, धूळपाटी, सुरेश एजन्सी, पुणे |
| राजकारणाची भाषा | ग. प्र. प्रधान, *राजकारणाची भाषा*, मराठी अभ्यास परिषदेचे त्रैमासिक - भाषा आणि जीवन, वर्ष ३, अंक २, उन्हाळा, १९८५, साधना साप्ताहिक व प्रकाशन |

| | |
|---|---|
| निसटलेले क्षण... | कृष्णमेघ कुंटे, *निसटलेले क्षण...*, एका रानवेड्याची शोधयात्रा, राजहंस प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली २००२ |
| हंस अकेला | मेघना पेठे, *हंस अकेला*, हंस अकेला, राजहंस प्रकाशन, पुणे |
| लेखणी | शंकर वैद्य, *लेखणी*, असंग्रहित |

## दुवे

| | |
|---|---|
| मधुगंधा कुलकर्णी यांची डॉ. आनंद नाडकर्णी यांनी घेतलेली मुलाखत, *ध्वनिफीत* | https://www.youtube.com/watch?v=-cYicUT_GLA&list=RDCMUCwZit5ah1vBwbpeQV55VRIA&start_radio=1&t=0 |
| विज्ञान गीत (कविता) शंकर वैद्य, सतीश सोळांकूरकर, *विज्ञान गीत*, मराठी विज्ञान परिषद यांची वेबसाईट | https://www.mavipamumbai.org/vidnyan-geet/ |
| डॉ. रघुनाथ माशेलकर यांची मुलाखत, *दृश्यफीत* | https://www.youtube.com/watch?v=q5bX86NyZ54 |
| पावसाचा अंदाज, *ध्वनिफीत* | https://www.youtube.com/watch?v=q4kTMjFpOJg |
| प्रायोगिक नाटक म्हणजे नेमकं काय?<br>निपुण धर्माधिकारी | http://natakwagaire.blogspot.com/2015/06/blog-post_98.html |
| बिगरी ते मॅट्रिक<br>पु. ल. देशपांडे, *ध्वनिफीत* | https://www.youtube.com/watch?v=GizlrfGUpms |
| हरितात्या<br>पु. ल. देशपांडे, *ध्वनिफीत* | https://www.vibby.com/watch?vib=7kSESBf_K |
| किरण पुरंदरे, *दृश्यफीत* | https://www.youtube.com/watch?v=j-CwfmCxjnc& |
| भास्कर चंदावरकर, *ध्वनिफीत* | https://www.youtube.com/watch?v=4_Fc_e0L66I |
| विजया मेहता यांची गिरीश कुबेर यांनी घेतलेली मुलाखत, *दृश्यफीत* | https://youtu.be/-W_gLPJc004 |
| किशोरी अमोणकर यांची शशी व्यास यांनी घेतलेली मुलाखत, *दृश्यफीत* | https://youtu.be/XYU3Sj1xXcM |
| राहुल देशपांडे यांचे भाषण, *ध्वनिफीत*, 'अस्तित्व' बी.एम.सी.सी. | https://www.youtube.com/watch?v=Ntu_z8WAraM&feature=youtu.be |
| वारली चित्रकला, सौजन्य : विवेकानंद चित्रकला महाविद्यालय कराड | mweditor@marathiworld.com https://marathiworld.com/varlichitrakala |
| स्नेहवन, दिनेश गुणे, *लोकसत्ता* | https://www.loksatta.com/vishesh-news/sarva-karyeshu-sarvada-2018-snehawan-organization-in-maharashtra-1966535/ |
| समाजमाध्यमे, रोहित नरवडे, *ध्वनिफीत* | https://youtu.be/Qf4Wc3eQFk0 |
| रूपकळा (काव्यवाचन), सुनीताबाई देशपांडे, *दृश्यफीत* | https://www.youtube.com/watch?v=x2eVgD72Pbk |

| | |
|---|---|
| रेणू दांडेकर यांची समीरण वाळवेकर यांनी घेतलेली मुलाखत, *ध्वनिफीत* | https://www.youtube.com/watch?v=vuULd9WcuaE |
| भाषाविज्ञान, अशोक केळकर, *ध्वनिफीत* | https://www.youtube.com/watch?v=dUgz8873Ssg |
| इंटरनेट ऑफ थिंग्ज, *ध्वनिफीत* | https://www.youtube.com/watch?v=t7ekZwCiZRo&feature=youtu.be |
| गीत - आकाशी झेप घे रे पाखरा, गीतकार जगदीश खेबुडकर, गायक व संगीतकार - सुधीर फडके, *ध्वनिफीत* | https://www.youtube.com/watch?v=mYvSHjO9LXA |
| गीत (सरीवर सर), संदीप खरे, *ध्वनिफीत* | https://www.youtube.com/watch?v=4ojdvkA1lyY |
| काटा रुते कुणाला (गीत), *ध्वनिफीत* | https://www.youtube.com/watch?v=3bVbAD-Ws6E&feature=youtu.be |
| सांगली वस्तुसंग्रहालय - एक परिचयपट (महाराष्ट्र पुरातत्त्व विभाग), *दृश्यफीत* | https://www.youtube.com/watch?v=HPP0Pcmt_k0 |
| प्रश्नपत्रिका १ *ध्वनिफीत* १ - अरुणा ढेरे - स्त्रीसाहित्य | https://youtu.be/p6oxaRDyDFU (१८.१० - २०.२७ = २.१७) |
| प्रश्नपत्रिका १ *ध्वनिफीत* २ - अरुणा ढेरे - साहित्यसंमेलन | https://youtu.be/GpD-QNph_BU (४२.२० - ४४.२९ = २.०९) |
| प्रश्नपत्रिका १ *ध्वनिफीत* ३ - शासकीय अनुवाद | https://youtu.be/KGrsWJNrFbc (६.३८ - ७.१२ = १.१४) |
| प्रश्नपत्रिका १ *ध्वनिफीत* ४ - शासकीय अनुवाद | https://youtu.be/KGrsWJNrFbc (१.०९.४९ - १.११.३६ = १.४७) |
| प्रश्नपत्रिका १ *ध्वनिफीत* ५ - चिन्मय धारूरकर | https://youtu.be/05xWKF3BATU (५६.४९ - ५९.१६ = २.२७) |
| प्रश्नपत्रिका २ - *ध्वनिफीत* १ - प्रवीण दवणे | https://youtu.be/oXiXGHtuqwI (२.५० - ४.५० = २.००) |
| प्रश्नपत्रिका २ - *ध्वनिफीत* २ - विठ्ठल कामत | https://youtu.be/7I06TdNhK3w (०.४१-२.०६ = १.२५) |
| प्रश्नपत्रिका २ - *ध्वनिफीत* ३ - अनघा मोडक | https://youtu.be/LDgh7goIVE0 (०.०९-२.०१ = १.५२) |
| प्रश्नपत्रिका २ - *ध्वनिफीत* ४ - बातम्या | https://youtu.be/WqTyrkUWbUo (०.०० - ०.२४ = ०.२४) |
| प्रश्नपत्रिका २ - *ध्वनिफीत* ५ - उपेंद्र लिमये | https://youtu.be/qnZIu4h4n08 (१.५५ - ३.४८ = १.५७) |

## Practice Book for My Marathi Level 6

- Course material
- An integrated communicative approach
- Systematic and effective learning of the language
- For young and adult learners
- For classroom study as well as for self learners
- Language skills: Understanding, speaking, reading, writing Marathi

## The set contains:

1. Orientation material
2. Practice Book
3. Audio & audio-visuals
   https://mu.ac.in/mymarathi6

**Visit us:** www.rmvs.marathi.gov.in

मुंबई विद्यापीठ
UNIVERSITY OF MUMBAI

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI

9 789354 075179

**Price:** Rs. 1250 | 25 USD | 20 EUR